दस्तावेजांची पाकीटे

सन १९६२

म. ग्रं. सं., दापोली
काव्य
नं. 9328

REFBK-0012704

दासोपंतांची पासोडी

संपादक :

न. शे. पोहनेरकर

REFBK-0012704

REFBK-0012704

मराठवाडा साहित्य परिषद

मराठवाडा साहित्य परिषद प्रकाशन

प्रकाशक : रा. च. माढेकर
अध्यक्ष : मराठवाडा साहित्य परिषद्
इसामियाँ बाजार, हैदराबाद द.

सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
मालक व संचालक : भारत मुद्रक आणि
प्रकाशक लिमिटेड,
अ ८।५५८, नारायणगुडा, हैदराबाद द.

मूल्य :
(कागदी) आठ रुपये
(कापडी) नऊ रुपये

प्रकाशकाचें निवेदन

आतांपर्यंत अनेक व्यक्तींनी व संस्थांनीं श्रीदासोपंतांच्या 'पासोडी' च्या प्रकाशनाचा प्रयत्न केला पण योग आला नाहीं. मराठीच्या या महावस्त्राच्या प्रकाशनाची संधि मराठवाडा साहित्य परिषदेला लाभली याबद्दल धन्यता वाटते.

पासोडीच्या मूळ आणि नक्कल अशा दोन्ही प्रती थोरल्या देवघरांत होत्या. त्या मिळवून देऊन प्रकाशनास संमति दिल्याबद्दल श्री. दिगंबरस्वामी महाराजांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. या कामीं श्री. विनायकराव, व श्री. शंकरराव चौसाळकर, श्री. रामभाऊ पांडे, श्री. किशनराव पिंगळीकर व श्री. दत्तोपंत देशपांडे इत्यादींनीं बहुमोल साहाय्य केलें आहे. संस्था त्यांची सदैव ऋणी आहे.

जुन्या पासोडीच्या दुरुस्तीच्या व मायक्रो फिल्मिगच्या कामीं नॅशनल आर्चाइव्हजनें आम्हांस अत्यंत आत्मीयतेनें सहकार्य केलें. पासोडीच्या दोन्ही प्रतीवरून मुद्रण प्रत तयार करून तिचें संपादन करण्याचें जबाबदारीचें काम यशस्वी रीतीनें श्री. न. शे. पोहनेरकरांनीं पार पाडलें, श्री. माधवराव गाडगीळ यांनीं पासोडीचा सूक्ष्म अभ्यास केला व माहितीपूर्ण लेख लिहून दिला, पासोडीवरील आकृति मुळा-प्रमाणें तयार करण्याचें अतिशय किचकट व परिश्रमाचें काम श्री. भगवान भालेराव यांनीं आस्थेवाईकपणें केलें व जयहिंद मुद्रणालयाचे उत्साही कार्यकर्ते श्री. जगन्नाथराव बर्दापूरकर व श्री. अनंत भालेराव यांनीं छपाईचें काम अत्यंत चोखपणें केलें याबद्दल संस्था सर्वांची कृतज्ञ आहे.

पासोडी-प्रकाशनाच्या कामीं व श्रीदासोपंतांच्या विषयीं माहिती मिळविण्याच्या कामीं ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य केलें त्या सर्वांचे मी पुन्हां एकदां मनःपूर्वक आभार मानतों.

-प्रकाशक



श्रीदासोपंतांचें पासोडींतील हस्ताक्षर



श्रीदासोपंतांची समाधि (अंबेजोगाई)



राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद पासोडी बघत असतांना

छायाचित्रांत : श्री. न. शे. पोहनेरकर, डॉ. राजेंद्रप्रसाद, श्री. हनुमंतराव वैष्णव एम्. पी.
परिषदेचे अध्यक्ष प्रा. रा. ब. माढेकर

१२५७५

श्रीदासोपंत : चरित्र आणि वाङ्मय

मराठी शारदेच्या साहित्यभांडारांत पहिल्या प्रतीचे जे नामवंत मानकरी आजपर्यंत होऊन गेले त्यांत दासोपंतांचें स्थान पुष्कळच महत्त्वाचें असें आहे. दासोपंतांची आत्मसंतुष्टवृत्ति आणि प्रसिद्धिपराङ्मुखता यांनीं त्यांचें वाङमय एका मर्यादित परीघापुढें प्रसिद्धि पावूं शकलें नाहीं. वस्तुतः लक्षावधि संख्येनें मराठी साहित्याची सेवा करणारा हा थोर पुरुष आजहि पूर्णपणें प्रकाशांत न यावा हें महाराष्ट्राचें दुर्दैव आहे असें म्हणावें लागेल. सव्वा लाख संख्येचा गीतार्णव, नऊ हजार ओव्यांची गीतार्थचंद्रिका, सव्वा लाख पदार्णव आणि इतरहि ५०।७५ च्या जवळ ग्रंथरचना करणारा हा मराठीचा नवकोट नारायण अभ्यासकांना आव्हान देत आजहि अजिंक्य म्हणून उभा आहे. जुन्या पंडिती परंपरेप्रमाणें दशोपनिषदावर संस्कृतमधून भाष्यें लिहिणें, आणि वेदांत ग्रंथांवर प्रदीर्घ अशा मराठी टीका लिहिणें हें काम साध्यासुध्या माणसाचें असूं शकत नाहीं. या प्रचंड पंडिती साहित्या-खेरीज लळितें, भारुडें, आरत्या, स्तोत्रें, नामावल्या, पद्यें, संगीतशास्त्रानुसार भक्तिवेदांतयुक्त रचना या गोष्टी आजहि पाहिल्या म्हणजे अक्षरशः छाती दडपून जाते. ६४ वर्षांच्या आपल्या हयातींत, चारशे वर्षांपूर्वीच्या प्राचीन कालांत, एक व्यक्ति किती परिश्रम करूं शकते याचें दासोपंत हें मूर्तिमंत उदाहरण आहे. कसली अनुकूलता होती त्यांना ! अयाचित वृत्तीचा गृहस्थाश्रम चाललेला. उद्यांची काळजी स्वप्नांतसुद्धां त्यांनी कधीं केली नाहीं. आपल्या आत्मसामर्थ्याचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि परमेश्वराच्या पायावर एकांतिक दृढ निष्ठा. दोनच गोष्टी होत्या त्यांच्या पाठीशीं. साहित्यसेवा हा त्यांचा धंदा नव्हता. साहित्य ही त्यांची कला नव्हती. तर साहित्यांत त्यांचें जीवनसर्वस्व होतें. आपल्या भोंवतालीं वावरणाऱ्या बहुजनसमा-जाला सन्मार्ग दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे आणि आपल्या ग्रंथरचनेद्वारा ते त्यांनीं आमरण पालन केलें. आपल्या लिखाणांत व्याकरणाची शुद्धता, रसिकाची रसवत्ता, कलावंतांची कुशलता किती प्रमाणांत आहे याची दखल घेण्याचें त्यांना कांहींच प्रयोजन नव्हतें. आपल्याला जें वाटतें आणि पटतें तेंच त्यांनी लेखणींतून लिहिलें. श्रोत्यांना काय वाटतें याचा विचार करण्यास त्यांच्याजवळ वेळ नव्हता. 'ग्रंथ केला अव्युत्पन्नें' असें ते एके ठिकाणीं म्हणतात. पण हा अव्युत्पन्न कवि दशोपनिषदाचा भाष्यकार आहे आणि गीतार्णवाचा सराईत पोहणारा आहे ही कल्पना मनांत आली म्हणजे दासोपंतांची निरभिमान आणि प्रांजळ मनोवृत्ति, कर्तव्यबुद्धींतील प्रामाणिक भावना यांचें सम्यक् दर्शन आपणास होतें.

विषयविवेचनाच्या ओघांत जेव्हां ते अनेक महत्त्वपूर्ण विषयांचा ऊहापोह आपल्या ग्रंथांतून करतात तेव्हां दासोपंतांच्या चौफेर आणि सर्वंकर्ष बुद्धीची साक्ष निश्चित पटते. सामाजिक जीवनाचा ठाव घेणारी त्यांची लेखणी राजकीय परिस्थितीच्या चित्रणांतहि तितकीच जागरूक असते. समाजांतील ढोंग आणि बुवाबाजीचा खरपूस समाचार घेत असतांना तिला जशी विलक्षण धार चढते, तशीच भक्तीच्या शीतल छायेंत तिची माधुरी मनाला शांत करते. तर्कपद्धतीनें विषयाची मांडणी करण्यांत अनेक प्रमाणांची पखरण ते लीलेनें करतील तर अनुभवाच्या आधारावर इतर सर्व प्रमाणांची आणि शास्त्रवचनांची कसून झडतीहि घेतील.

दासोपंतांची ही थोरवी महाराष्ट्राला पूर्णपणें कळावयास त्यांच्या ग्रंथसंपत्तीचें प्रकाशन शक्यतों लवकर होणें अगत्याचें आहे. त्याच पुण्यकार्याच्या संकल्पाचें अक्षतोदक प्रस्तुत पासोडी प्रकाशनाच्या रूपानें आज सोडण्यांत येत आहे.

दासोपंत-चरित्र साधनें

नाथ पंचायतनांत दासोपंतांना स्थान आहे. परंतु या पंचायतनापैकीं एकट्या श्रीएकनाथांच्याच जीवनचरित्राची आज आपणाला माहिती मिळूं शकते. बाकीच्या श्रीजनीजनार्दन, श्रीरामा जनार्दन, श्रीविठा रेणुकानंदन आणि श्रीदासोपंत यांच्या संबंधीं आजहि म्हणावी तशी माहिती आपणांपुढें आलेली नाहीं. जीवनचरित्राच्या ऐतिहासिक आधारापेक्षां आपल्या साहित्यसेवेनेंच हे सर्व महापुरुष आज अमर होऊन राहिलेले आपणांस दिसतात. प्राचीन काळीं यांच्यासंबंधीं असलेली माहिती लेखनबद्ध अशी विशेषशी पाहावयाला मिळत नाहीं. श्रीदासोपंतांचें जीवनचरित्रहि याला अपवाद असें नाहीं. जुन्या वाङ्मयांत दासोपंतांच्या जीवनचरित्राचे धागेदोरे सांपडणें अत्यंत कठीण आहे. क्वचित कुठें उल्लेख आढळतो. साकल्यानें यासंबंधीं विचार करतां खालीलप्रमाणें संदर्भ आपणांपुढें येतात.

'भक्त विजय' या ग्रंथांत अनेक सत्पुरुषांना वंदन करतांना महिपतीनें दासोपंतांना नमन केलेलें आहे तर भक्तलीलामृतांत 'दत्तअनुग्रही' म्हणून त्यांचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. याच भक्तलीलामृतांत श्रीएकनाथ आणि दासोपंत यांची भेट झाल्याचें सांगण्यांत आलें असून दासोपंतांची पैठणला भेटहि वर्णन करण्यांत आली आहे.

जयरामसुत आणि गिरिधर या समर्थ संप्रदायांतील दोन ग्रंथकारांनीं अनुक्रमें आपल्या संतमालिकेंत आणि समर्थप्रतापांत दासोपंतांचा आणि त्यांच्या गीतार्णवाचा उल्लेख केलेला आहे.

केशवकवि आपल्या श्रीएकनाथचरित्रांत अंबेजोगाई येथें श्रीएकनाथ-दासोपंत भेट वर्णन करून दासोपंतांची पैठणला प्रतिभेटहि झालेली दाखवितो.

'तत्त्वविलास' या ग्रंथाच्या नवव्या पटलांत 'श्रीदिगंबरानुचरें। बहुग्रंथ केलें दत्तवरें। निजभक्त कर्माचारें। संप्रदायें विचारें राखिलें ॥१६॥ अशी नोंद आज सांपडते.

शके १७१७ मध्यें रचलेल्या 'भक्तमंजरींत' दिनकर कवीनें दासोपंतांच्या जीवनचरित्राची माहिती एका अध्यायांत दिलेली आहे. यांत विशेषता एवढीच कीं दिनकर दासोपंतांना अंबेजोगाईचेच समजतो, बुटेदरडींत त्यांची तपश्चर्या आणि साक्षात्कार वर्णन करतो. 'अंबेजोगाई सिद्धस्थळ। तेथें माता योगेश्वरी वेल्हाळ। मुकुंद मुनी आदि सकळ। सिद्धि पावले॥' अशा अंबेजोगाईंतच त्यांनी दासोपंतांचें जीवन वर्णन केलेलें आहे.

वरील सर्व उल्लेख जीवनचरित्र या दृष्टीनें पूर्ण असे नाहींत. ते दासोपंतांचें जीवनसंदर्भ आहेत. चरित्र या दृष्टींनी झालेला पहिला व भरघोस प्रयत्न म्हणजे 'महाराष्ट्र कवि' मासिकांत श्री. वि. ल. भावे यांनी छापलेलें 'श्रीदासोपंतचरित्र हा होय. प्रस्तुत ओंवीबद्ध चरित्राची 'एकच' प्रत श्री. भाव्यांना, श्री. श्रीधर अवधूत देशपांडे यांच्याकडून मिळाली होती. हींत मात्र दासोपंतांच्या जीवनाचा बालपण, तारुण्य आणि अंबेजोगाईला येऊन स्थायिक होण्यापर्यंतचा भाग आलेला आहे.

इ. स. १९२७ मध्यें याच चरित्राची टीपा आणि इतर संदर्भासुद्धां इंग्रजी भाषांतरित आवृत्ति श्री. जस्टिन इ. अॅबट यांनी आपल्या 'The Poet saints of Maharashtra' या मालेंतील ४ थ्या पुस्तकांत प्रकाशित केली.

याखेरीज त्रोटक स्वरूपांत दासोपंतांचीं चरित्रें, श्री. ज. र. अजगांवकर यांच्या संतकविचरित्रमालेंत, डॉ. केतकर यांच्या ज्ञानकोशांत, श्री. चित्रावशास्त्र्यांच्या चरित्रकोशांत, श्री. भावे यांच्या महाराष्ट्र सारस्वतांत, आणि श्री. पांगारकर यांच्या मराठी वाङमयाच्या इतिहासांत आलेलीं आहेत.

श्री. भावे आणि श्री. अॅबट यांचीं चरित्रें

अंबेजोगाईच्या श्री. श्रीधर अवधूत देशपांडे यांच्याकडून मिळालेल्या प्रतीवरूनच 'महाराष्ट्र कवींत' दासोपंतांचें पहिलें ओवीबद्ध आणि विस्तृत असें चरित्र आपणापुढें आलें. श्री. अॅबटनी हेंच चरित्र प्रत्येक ओंवीच्या इंग्रजी भाषांतरासुद्धा प्रकाशित केलें. परंतु मूळ हस्तलिखितांतील उणीवा बऱ्याच होत्या. एकूण ओंवीसंख्या ७७८ असली तरी त्यापैकीं २७० ओंव्यांत अनुसूयेचेंच चरित्र वर्णन करण्यांत आलेलें आहे. त्यांत कुठेंहि अध्याय किंवा प्रकरणवारी अशी नाहीं. या चरित्राचा कर्ता कोण तेंही त्यांत समजत नाहीं. 'It is unfortunate that the only manuscript of the Dasopant charitra in known existance is incomplete. Perhaps sometime the remaining portion may be found and

with it the name of the Author.' असा उल्लेख श्री. अँबट यांनीं आपल्या प्रस्तावनेंत केलेला आहे. प्रस्तुतच्या चरित्राबद्दल श्री. पांगारकर यांनीं 'तें अविश्वसनीय आणि बनावट आहे' असें आपलें मत दिलेलें आहे.

उपलब्ध नवीन प्रत

बावगी (बेदर) येथील दासोपंतांच्या वंशजाकडे चरित्रविषयक माहिती मिळवीत असतांना तेथील शिष्योत्तम श्री. लक्ष्मणराव आप्पासाहेब देशपांडे चिटगोपेकर यांच्याकडून याच ओंवीबद्ध चरित्राची एक प्रत आम्हाला मिळाली. या प्रतीचें वैशिष्ट्य हें आहे कीं हींत १२ अध्याय पाडलेले आहेत आणि कविनामाचा उल्लेखहि पण आहे. मात्र दुर्दैवानें ही प्रत देखील पूर्ण अशी नाहीं. शेवटचा १२ वा अध्याय अपूर्ण असल्यानें पुढील किती अध्याय गहाळ झाले याची कल्पना करणें कठीण आहे. श्री. भावे आणि श्री. अँबट यांनीं प्रकाशित केलेल्या चरित्रांतील ७७८ ओंव्या थोड्याफार फरकानें हींत आहेतच पण त्याखेरीज २११ ओंव्या हींत अधिक आहेत. प्रत्येक अध्यायाचा प्रारंभ आणि शेवट हा स्वतंत्र उपक्रमोपसंहारानें करण्यांत आलेला आहे. 'हे ग्रंथरूप समाधी। तुम्हा निरंतर प्राप्त असे त्रिशुद्धी। यास्तव तुमचे चरणारविंदी। होतसे मिलिंद हनुमदात्मजें ॥ (११–८१) हे ग्रंथचि सिंव्हाद्रि शिखर। येथें तिष्ठें श्रीदिगंबर। त्या दिगंबराचे अभय कर। इच्छितसे हनुमदात्मज ॥ (१०–७८) श्रोते तुम्ही सहजानंद मूर्ति। तुमचे कृपेनें दिगंबर प्राप्ती। यास्तव शरणागत आपणाप्रति। हनुमदात्मज अनन्य ॥ (५–९९) अशा प्रकारें प्रत्येक अध्यायांत कवीनें आपल्या नांवाचा उल्लेख केलेला आहे. इतीश्री दासोदिगंबर चरित्र। सर्वज्ञ करी श्रवण मात्र। प्रीति पावो श्रीयोगेश्वर। (अमुक) अध्याय गोड हा ॥ अशी प्रत्येक अध्यायाची समाप्तिओंवी आहे.

हा हनुमदात्मज कोण.

प्रस्तुत चरित्राचा कवि 'हनुमदात्मज' कोण असावा याची आजतरी कांहीं माहिती मिळत नाहीं. असें म्हणतात कीं पूर्वी बेदरला 'रोट्यावाले' या आडनांवाचें एक घराणें नांदत होतें. त्यापैकीं एकानें प्रस्तुत ग्रंथ रचिला. शोध घेतां बेदरला आज हें घराणेंहि नाहीं आणि कुणाला त्यासंबंधीं कांहीं माहितीहि नाहीं. म्हणजे प्रस्तुत चरित्राचा कर्ता केवळ नांवानेंच आज आपणापुढें आहे. मात्र तो बेदर प्रांताचा असावा असें सिद्ध करणारे पुरावे चरित्रांत आहेत. 'त्यांनींच याला संरक्षी' हे विशिष्ट वाक्यप्रयोग याची ग्वाही देतात. 'मार्तंड माझा कुळदैवत' असा ज्या प्रेमपुरनायकाचा उल्लेख कवीनें आपलें कुलदैवत म्हणून केला आहे तें मल्लारीचें स्थानहि बेदरच्या जवळचें 'मैलार' हेंच असून या प्रांतांत त्याची ख्यातीहि आहे.

उपलब्ध प्रतीचें वैशिष्टय

नारायणपेठ येथें जन्मल्यापासून अंबेजोगाईस येण्यापर्यंतची कथा दोन्ही चरित्रप्रतींत असली तरी प्रस्तुतच्या हस्तलिखितांत कांहीं भाग महत्त्वाचा आहे. भावे आणि अँबट प्रतींत 'नारायणपेठचे देशपांडिये । नाम ज्याचे दिगंबररायें । पार्वती त्यांची भार्या निश्चये ॥ असें सांगितल्यानंतर पुढच्याच ओंवींत 'त्यांचे उदरीं अवधूत । अवतरलें पुत्ररूपें' असा उल्लेख करून दासोपंतांचें जन्मप्रकरण संपविलें आहे. परंतु या नवीन प्रतींत त्यापुढें 'कोण तिथि कोण वार । कोण शक कोण संवत्सर । तें ऐकावें सविस्तर । कृपा करून दीनावरी' असें लिहिल्यानंतर पुढील संस्कृत श्लोकहि दिलेला आहे:—

शकेऽग्नि मुनि वेदेंदु गणिते परिधाविने ।
अब्देसितेनभस्येस्ये पक्षेष्टम्यां तिथौ दिने ॥
विधौ विधूदये चार्द्रा ख्दितीय चरणे भुवि ।
श्रीगुरोर्नररूपेण स्वभक्तेष्वभ्यवातरत् ॥

या संस्कृत श्लोकानंतरहि 'शके चौदाशे तिरव्याहत्तर । परिधावी नाम संवत्सर । भाद्रपद कृष्ण अष्टमी इंदुवार । आरिद्रानक्षत्र द्वितीय चरणें ॥ अर्ध रात्रीं चंद्रोदयें । तत्समयो श्रीगुरुरायें । अवतरले निश्चयें । मानवरूप भक्तास्तव ॥' अशा दोन ओंव्या लिहून पुढें '१४७३ भाद्रपद व ८' असा स्पष्ट व निःशंक उल्लेखहि केलेला आहे.

बादशहाचें देणें श्रीदत्तात्रयानें भरले आणि दासोपंतांची सुटका झाली ही आख्यायिका सर्वप्रसिद्ध आहेच. दामाजी पंतांच्या विठ्या महाराप्रमाणेंच दासोपंतांचा हा 'दत्ताजी पाडेवार' होता. दोन्ही प्रतींत ही आख्यायिका आहेच. मात्र या प्रतींत भक्तविजयांतील दामाजीपंतांच्या कथेचा संदर्भहि कवीनें दिलेला आहे ' ते कथा भक्तविजयीं विस्तार । लिहिली असे निर्धार । मतितार्थ तया आधारें । सहज लिहिणें पैं प्राप्त ॥ (४–३९)

प्रकाशित प्रतींत अनुसूयेच्या तोंडीं एक 'पाळणा' घातलेला आहे. तोहि या प्रतींत नाहीं.

प्रस्तुत प्रतीचें प्रामाण्य

सामान्यतः संतचरित्रांत आख्यायिकांना स्थान असतेंच. याहि चरित्रांत तसा प्रकार आहे. दासोपंत आपल्या घरून निघाल्यानंतर माहूरला कसें गेले तेथून साक्षात्कार झाल्यानंतर नांदेड वगैरे गांवें करीत राक्षसभुवनला कसें आले इत्यादि सर्व माहिती चरित्रकारानें दिलेली आहे. अभ्दुततेचा भाग वजा केल्यानंतरहि प्रस्तुतच्या चरित्रानें दासोपंतांच्या व्यावहारिक जीवनाची आपणास पुष्कळच माहिती मिळते अशा स्थितींत श्री. पांगारकरांनीं याला ' अविश्वसनीय आणि बनाबट ' कां म्हणावें

तें आमच्या लक्षांत येत नाहीं. राक्षसभुवनला मिळालेल्या ज्या पादुकांचा कवि उल्लेख करितो त्या आजहि देवघरीं आहेत. ज्या डाकुळगी गांवाचा उल्लेख या चरित्रांत आहे त्या गांवचे श्री. कृष्णाजीपंत कुळकर्णी यांचे वंशज आजहि तेथें असून त्यांना मिळालेली दत्तमूर्ति ही आज तेथें पहावयाला मिळते. याच मूर्तीचें श्रीदत्तमंदिर बांधण्यांत आलें असून तेथील पूजाअर्चेची व्यवस्था श्री. लक्ष्मणराव आप्पासाहेब देशपांडे यांच्याच नियंत्रणाखालीं होत आहे. असें असूनहि प्रस्तुतचें चरित्र बनावट आणि अविश्वसनीय कां, तें कांहीं कळत नाहीं.

दासोपंत–कीर्तनाख्यान

कीर्तनोपयोगी म्हणून रचलेले एक आख्यानहि असेंच उपलब्ध झालें आहे. वृत्त जातींत याची रचना आहे. काव्य अगदींच सामान्य असें आहे. दासोपंतांच्या जन्मा-पासून त्यांचें अंबेजोगाईस येणें व सितोपंत देशपांडयांना अनुग्रह होणें इतका कथा-भाग यांत आहे. यांतहि दासोपंतांचा जन्मकाळ ' शक चवदासे तिरव्याहत्तर। भाद्रे कृष्ण अष्टमी थोर। रात्र झालीसे दोन प्रहर। जन्म झाला चंद्रवारीं ॥ ' असा दिलेला आहे. शेवटीं निर्याणाचा उल्लेखहि ' पंध्राशें सदतिस शकीं षष्ठी ती कृष्ण माघ मासाची। संपवि अवताराला . . . . ' असा केलेला आहे. दासोपंतांच्या समाधिस्थाना चा उल्लेखहि 'मुकुंदराज नाथबुटी संनिध होतसे पंत समाधीच।' असा केला आहे. गोविंद योगीराज देशपांडे यांनीं रचलेलें हें आख्यान गेल्या पिढींतील आहे.

इतर कागदपत्रें

दासोपंतांच्या घराण्यांत अंबेजोगाई येथें देवघरांतून कागदपत्रें आहेत परंतु त्यांवरून दासोपंतांच्या जीवनचरित्राची माहिती मिळणें कठीण आहे. दासोपंतांच्या नंतर त्यांच्या वंशजांत झालेलीं वांटणीपत्रकें, त्यांना जहागीर आणि इनामाच्या मिळालेल्या सनदा, अभयपत्रें इत्यादि त्यांत आहेत. त्यावरून दासोपंतांच्या वंशजांची माहिती कळते. या सनदादेखील, मलिकंबर, छत्रपति श्रीशिवाजी महाराज, श्री-छत्रपति संभाजी व शाहु महाराज, श्रीमंत पेशवे बाजीराव, बाळाजी बाजीराव व माधवराव इत्यादिकांच्या आहेत. परंतु त्यांत प्रत्यक्ष दासोपंतांसंबंधीं कांहीं माहिती नाहीं.

दासोपंतांचें जन्मस्थान

चरित्रसाधनांचा प्रपंच वरीलप्रमाणें केल्यानंतर अजूनहि एका मुद्याचा ऊहापोह करावासा वाटतो. दासोपंतांचें जन्मस्थान म्हणून नारायणपेठचा उल्लेख सर्वांनीं केलेला आहे. क्वचित् एखादा उल्लेख 'नारायण खेड' असाहि येतो. मध्ययुगीन चरित्र कोशांत तो 'नारायणगांव' असा आहे. यांपैकीं खरें कोणतें हा प्रश्नच आहे. सर्वांनीं

उल्लेख केलेलें 'नारायणपेठ' हें गांव हैदराबाद राज्याच्या महबूबनगर जिल्ह्यांत आहे. तो प्रांत तेलंगणचा आहे. प्रत्यक्ष नारायणपेठ गांवांत आजहि कांहीं विद्वान अशीं ब्राह्मण घराणीं आहेत. परंतु त्यांतील कुणाहि पुरुषांस दासोपंतांच्या नांवांची माहितीहि नाहीं. आपल्या प्रांतांत कुणीतरी असा एखादा महापुरुष होता याची कसलीच वार्ता त्यांना नाहीं. अर्थात् आज तरी नारायणपेठला कांहींहि माहिती मिळण्याची शक्यता नाहीं.

दुसरें नारायणखेड हें गांव बेदरपासून १० कोसांवर असून तेथेंहि दासोपंतां-संबंधीं कांहीं माहिती आज सांपडत नाहीं. नारायणखेडला देशमुख, देशपांडे आणि कुळकर्णीपणाचीं वतनें एकाच घराण्यांत असल्यानें आज त्यांचाच विस्तार सर्व तालुकाभर पसरलेला आहे. या घराण्यांतील मूळ पुरुषाला संतति नव्हती म्हणून तो काशीयात्रेला निघाला. वाटेंत अंबेजोगाईला मुक्काम पडला असतांना तेथील देशपांडे घराण्यांतील एक चुणचुणीत मुलगा त्यानें दत्तक घेतला. नारायणखेड तालुक्याचे आजचें देशपांडे घराणें याच दत्तक मुलाचे वंशज आहेत असें म्हणतात. दोघांचीं गोत्रेंहि एकच आहेत. अंबेजोगाईचे देशपांडे दासोपंतांचे शिष्य आहेत. एवढाच नारायणखेडशीं दासोपंतांचा संबंध पोंचतो.

तिसरें 'नारायणगांव' हें अभावानेंच असल्यानें त्याच्यासंबंधीं विचार करावयाचें कारण नाहीं. बेदर परगण्यांत नारायणपेठ हें गांव आजतरी सांपडत नाहीं.

अशा स्थितींत दासोपंतांचें जन्मस्थान असलेलें 'नारायणपेठ' कोणतें हा प्रश्न अनिर्णित असाच राहतो.

आख्यायिका

संतांच्या जीवनांत आख्यायिकांची रेलचेल असते. त्यांच्या जीवनचरित्रांचा ऐतिहासिक आधार म्हणून जरी त्यांचें प्रामाण्य संशयास्पद असलें तरी विरुद्ध पुराव्याच्या अभावीं, मागोवा घेण्याइतपत त्यांची कास धरणें अयोग्य ठरणार नाहीं. दासोपंतांच्या जीवनांत तसें पहातां आख्यायिका फार कमीच आहेत. बेदरशहाच्या कैदेतून दासोपंतांची सुटका ही प्रमुख आख्यायिका सर्वांनीं मान्य केलेली आहे. अंबेजोगाईला स्थायिक राहिल्यानंतर त्यांचें जीवन आत्मसंतुष्ट बनलें आणि साहित्याच्या निर्मितींतच त्याचा व्यय झाला. अशा स्थितींत असंभाव्य आख्यायिकांची निर्मिति होणेंहि अशक्य होतें. व्यक्तिशः त्यांच्या अनुग्रहानें कुणाला कांहीं अनुभव आले असल्यास आज त्याहि माहितीची वाणच आहे. अशा स्थितींत आख्यायिकांच्या आधारानेंच केवळ आपणास दासोपंतांचें चरित्र पहावें लागेल असें समजण्याचें कारण नाहीं.

दासोपंतांच्या जीवनचरित्राचीं साधनें हीं अशा प्रकारचीं आहेत.

एवढ्या सर्व माहितीचा मागोवा घेतल्यानंतर दासोपंतांच्या जीवनचरित्रासंबंधीं आपणांस काय माहिती मिळते ती आतां आपण पाहूं या.

दासोपंतांचें चरित्र

बेदर परगण्यांतील नारायणपेठचे देशपांडे दिगंबरपंत आणि त्यांची पत्नी पार्वतीबाई यांच्या पोटीं शके १४७३ भाद्रपद वद्य ८ सोमवारीं मध्यरात्रीं दासोपंतांचा जन्म झाला. घरीं गजांत लक्ष्मीचें वैभव होतें. पांचव्या वर्षीं अतिशय धूमधडाक्यानें उपनयनसमारंभ केला. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें यांचें नांव दासोदिगंबर असें पडलें. याच सुमारास बेदर प्रांतांत दुष्काळ पडला. लोक अन्नावांचून त्रस्त झाले. दिगंबर पंतांनीं भूतदयेच्या भावनेनें सरकारी खंडाचें धान्य गरीबांना वांटून प्रजेचें पालन केलें. परंतु सरकारी रकमेचें पोतें कशानें भरणार? वेळेवर भरणा न झाल्यानें बादशहाचें बोलावणें आलें. दिगंबरपंत आणि दासोपंत दोघेंहि बेदरला गेले. भूत-दयेच्या गोष्टींनीं बादशहाचें मन वळणें अशक्य होतें. 'एक महिन्यांत थकलेली बाकी चुकती करा. नसतां दासोपंतांस मुसलमान केलें जाईल' अशी ताकीद मिळाली. बादशहाच्या कैदेंत ओलीस म्हणून दासोपंत राहिले. दिगंबरपंत दुःखी अंतःकरणानें नारायणपेठला परत आले.

दासोपंतांची सतेज व पाणीदार मुद्रा बादशहाला फार आवडली आपल्या धर्मांत एक चांगली भर पडणार याचा त्याला आनंद झाला. कैदेंत असेपर्यंत दररोज १ रु. ची नेमणूक त्यानें दासोपंतांसाठीं करून दिली. बेदरला झरणी नरसिंहाचें जागृत असें स्थान आहे. दासोपंत सकाळीं उठून तेथें जात, प्रातर्विधि, स्नान व उपासना उरकीत. मिळालेला १ रु. दान करून टाकीत. आजूबाजूला असलेल्या शेतकरी आदि लोकांना या बालयोग्याचें हें दृढव्रत पाहून पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. एक महिन्यानंतर विच्याऱ्यावर धर्मांतराची आपत्ति कोसळणार या विचारानें सर्वांना हळहळ वाटे. मात्र सत्पुरुषांचा पाठीराखा परमेश्वर अशी गोष्ट होऊं देणार नाहीं असाहि मनोमन आशावाद त्यांना वाटत होता.

महिना संपत येत होता. बादशहाचा आनंद ओसंडून वहात होता. इतर जनतेंत हळहळ वाढत होती. दिगंबरपंत मातबर होते परंतु एक महिन्यांत दोन लक्ष रकमेची उभारणी तशा दुष्काळी परिस्थितींत त्यांनाहि अशक्य होती. आपला मुलगा आपणांस कायमचा अंतरला. आपण आपल्या हातानें त्याला काळाच्या तोंडांत निरविलें असें त्यांना वाटून ते सारखे दुःख करीत होते. तर पार्वतीबाईंच्या डोळ्यांतून अश्रूंची संततधार अखंड वहात होती.

महिना संपावयास कांहीं दिवस उरले होते. बादशहानें स्थानिक हिंदु मुसलमान प्रतिष्ठितांची सभा बोलाविली. 'दिलेल्या मुदतींत रक्कम आली तर ठीक आहे, नसतां हा मुलगा मुसलमान बनेल आणि त्यानंतर आपलें हें कृत्य अन्यायाचें म्हणून कुणालाहि म्हणतां येणार नाहीं अशी आपली न्याय्य बाजू बादशहानें मांडली.

महिना आजच संपणार. दरबारांत 'दत्ताजी पाडेवारानें' दिगंबरपंतांच्या खंडाची दोन लक्ष रुपयांची रक्कम भरणा केली. स्थानिक जनतेचा आनंद गगनांत

मावत नव्हता. बादशहालाहि दुसरा कांहीं पर्याय उरला नव्हता. त्यानें ताबडतोब पालखी आणविली आणि दासोपंतांना सन्मानपूर्वक नारायणपेठला पाठवून दिलें. दासोपंतांना सन्मानपूर्वक आलेलें पाहून दिगंबरपंत आणि पार्वतीबाई यांना अत्यंत आश्चर्य वाटलें. परंतु दत्ताजी पाडेवाराची माहिती झाल्यानंतर प्रेमाश्रूंनीं सर्वांचे डोळे पाझरूं लागले.

या प्रकारानें दासोपंतांच्या मनाची शांति नाहींशी झाली. त्या काळच्या पद्धती-प्रमाणें त्यांचा विवाहहि झालेला होता. परंतु ' षोडश वर्ष या देहास । नाहीं पाहिला तो जगदीश ।। ' अशी अंतरंगांत तीव्र तळमळ जाणवूं लागली. ' गजांत लक्ष्मी त्याचे घरी । सर्व लक्षणयुक्त भार्या सुंदरी ।। ' सर्व कांहीं होतें. परंतु जीवनाची सार्थकवेळ आतुरतेनें साद घालीत होती. नश्वरतेची जाणीव वाढत होती. शाश्वत सुखाकडे डोळे लागले होते. एके दिवशीं मध्यरात्रीं आपल्या शयनागारांतून कोणाला नकळत त्यांनीं प्रस्थान ठेविलें.

आरंभीं हिलालपूरला आले. तेथून डाकोळगीला गेल्या वेळीं तेथील कुळकर्णी कृष्णाजीपंत यांनीं या बालयोग्याचें दर्शन घेऊन अनुग्रहाची प्रार्थना केली. ' हें पुढें होईल मनोरथ ' असें त्याला सांगून स्वारी तेथून निघाली. प्रेमपूरला येऊन कुलदैवताचें दर्शन घेतलें. गोदामातेच्या नाभिस्थानीं नंदिग्रामास आले. कांहीं दिवस त्या पुण्यपावन स्नानाचा लाभ घेतला. तेथून मातापूरला गेले. श्रीदत्तजननी अनुसूयेची आराधना केली. सह्याद्रि शिखरावर आरोहण केलें आणि त्या श्रीदत्ताच्या सिध्दस्थानावर तपश्चर्येला प्रारंभ केला. एक ना दोन, बारा वर्षेंपर्यंत ही तपस्या चालूं होती. साधनेची सांगता झाली. दृष्टांत झाला कीं ' गंगातीरीं राक्षसभुवनला वाळवंटांत पादुकांचा प्रसाद मिळेल तो स्वीकारून कार्यभाग करावा. ' श्रीदत्तात्रयाचें ध्यान करीत अनुष्ठान संपविलें. राक्षसभुवनचा रस्ता धरिला. पुन्हा तेथें गोदेचें स्नान झालें. वाळवंटांत बसल्या ठिकाणीं वाळू बाजूला करितांच पादुका सांपडल्या. धन्यतेचा आनंद ओसंडूं लागला. अवधूताचें दर्शन झालें. तेथेंहि कांहीं काळ साधना केली.

डाकुळगीला जाऊन कृष्णाजीपंतांना कृतार्थ केलें. त्यांना श्रीदत्तात्रयाची मूर्ति दिली. वाणीसंगमीं येऊन कांहीं काळ तेथें काढला. आतां चिंता नाहींशी झाली. अमृतानें नाहलेल्या सोन्याचा दिवस त्यांच्या जीवनांत उजाडलेला होता.

दासोपंतांच्या एकाएकी नाहींसें होण्यानें दिगंबरपंत-पार्वतीबाई आणि दासोपंतांची पत्नी यांच्या दुःखाला सीमा राहिली नव्हती. प्रतीक्षेंत काळ जाऊं लागला. वर्षें लोटलीं. दासोपंतांचा थांग ना पत्ता. १२-१५ वर्षें गेलीं. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पति नाहींसा झाल्यानंतर १२ वर्षांनीं सौभाग्यचिन्हांचा त्याग करणें दासोपंतांच्या पत्नीला आवश्यक झालें. दिगंबरपंतांनीं या धर्मकृत्यासाठीं आपल्या सरंजामासुद्धां वाणीसंगमाचें प्रस्थान ठेविलें.

गंगेच्या पलीकडे दिगंबरपंतांचा पडाव होता. अलीकडे वाघेश्वराच्या मंदिरांत

दासोपंतांचा मुक्काम होता. योगायोग मोठा चमत्कारिक खरा ! आपलें धर्मकर्म उरकीत असतांना या परस्थ पाहुण्यांना दासोपंतांनीं पाहिलें. पूर्वायुष्यांतल्या स्मृति चावळल्या. ही मंडळी येथें कां आली असावी याचाहि अजमास त्यांनीं बांधला सहजगत्या त्या सरंजामापैकीं एकाला सांगितलें, ' आपल्या यजमानांना सांगा कीं ज्या कार्यासाठीं येथें आपण आलां आहां तें कार्य सध्यां स्थगित करावें.' त्या गृहस्थास आणि सांसर्गिक जनास आश्चर्य वाटलें. कर्णोपकर्णीं ही वार्ता यजमानांपर्यंत गेली.

यजमानांनीं बातमीचें मूळ आस्थेवाईकपणें शोधून काढलें. वाघेश्वराच्या देवळांत दासोपंतांची आणि त्यांच्या मातापित्यांची भेट झाली. परमेश्वरी लीलेचें अगाधत्व पाहून सर्वांना आनंदाचें भरतें आलें. दिगंबरपंतांनीं पुत्राला घरीं परतण्याचा आग्रह केला. परंतु दासोपंत आतां आईबापांचें पुत्रच केवळ नव्हते. ते परमेशाचे लाडके बनलेले होते. स्वानंद साम्राज्याचे अधिकारी होते. त्यांनीं नारायणपेठला परतण्याची सूचना अमान्य केली. मात्र तीहि नम्रपणें. दिगंबरपंतांनीं 'आमच्या उतारवयांत आम्ही तुला सोडून राहूं शकत नाहींत' असें म्हटल्यावर त्यांनीं माता, पिता आणि पत्नी यांना ठेवून घेतलें. आपल्या कारभाऱ्यास बोलाविलें, आणि आपल्या संपूर्ण माल-मत्तेचें, वतनदारीचें दानपत्र त्यांच्या नांवें लिहून देऊन त्याला परत जाण्यास सांगितलें. आपल्या वंशांतील कुणीहि पुढें नारायणपेठला जातां कामा नये असा निर्बंध ठरवून दिला.

कांहीं दिवसांनीं अंबेजोगाईचा आदेश आला. तिकडे निघाले. साधुत्वाची ख्याति वाढत होतीच. अंब्यास येऊन गांवाच्या मध्यभागीं असलेल्या गणपतीच्या देवालयांत मुक्काम ठेवला.

त्या वेळीं अंबेजोगाईचे देशपांडे सितोपंत होते. धर्मपरायण असूनहि अंधभक्ति त्यांच्यांत नव्हती. 'दृष्टिभेट होतांच माझी समाधि जो लावील, त्यालाच मी गुरु करणार !' असा त्यांचा संकल्प होता. नेहमींप्रमाणें स्वारी आपल्या लवाजम्यासुद्धां देवदर्शनास निघाली होती. गणपतीचें दर्शन घेतलें. परस्थ पाहुणे पाहून चौकशी केली. दासोपंतांची दृष्टिभेट झाली, तोंच काय चमत्कार ! सितोपंतांची शुद्ध गेली. ते दंडप्राय आडवे झाले. घटकाभरानें सावध होऊन दासोपंतांना वंदन केलें. अंबेजोगाईंत दासोपंतांचे पहिले व प्रमुख शिष्य ते बनले.

सितोपंतांनीं आपल्या गुरूची सर्व व्यवस्था लावून दिली. दासोपंतांची दगदग संपली. त्यांचें जीवन स्थिर झालें. यापुढील आयुष्य आपल्या शिष्योत्तमाच्या आग्रहाप्रमाणें त्यांनीं अंबेजोगाईलाच व्यतीत केलें.

अंबेजोगाईंतील दासोपंतांचें जीवन म्हणजे मराठी शारदेचें महासत्र ! भजन, पूजन, उपासना इत्यादि चालवीत आपल्या लेखनशालेंत बसून त्यांनीं मराठी सारस्वताचीं अनेक दालनें समृद्ध केलीं. दररोज ढबू पैशाच्या वजनाची शाई लिहून आटवावयाची, हा त्यांचा नित्यक्रम. संप्रदाय परंपरा निर्माण झाली. गीतार्णवाला

उधाण आलें. गीतार्थचंद्रिका पौर्णिमेच्या पूर्णतेजानें तळपूं लागली. उपनिषदांनीं भाष्याचे पेहराव केले. पदार्णवांत परमपावन परमेश्वर विहार करूं लागला.

वयाचीं ६४ वर्षें झालीं. शके १५३७ माघ वद्य ६ ला श्रीदत्तात्रयाच्या पुण्य-स्वरूपांत ते विलीन झालें. मुकुंदराजाच्या वाटेवर श्रीनृसिंहतीर्थावर दासोपंतांची प्रशस्त समाधि आजहि या आठवणी सांगत उभी आहे.

पांचवें वर्षीं मुंज, १६ व्या वर्षीं गृहत्याग, १२।१५ वर्षें तपश्चर्या आणि प्रवास ३५ ते ४० व्या वर्षापर्यंत अंबेजोगाईस येणें, आणि त्यानंतर अखंड दोन तपें मराठी शारदेची अविरत सेवा! व्यक्ति स्वार्थावर पाणी सोडून समाजकल्याणासाठीं आपली लेखणी आमरण झिजवीत जगण्याचें असिधाराव्रत दासोपंतांनीं स्वीकारलें आणि तें यशस्वीपणें पाळलें. मराठीच्या संतपरंपरेंत दासोपंतांचें स्थान आपल्या वैशिष्ट्यानें कायमचें अमर राहील.

दासोपंतांचें वंशज

दासोपंतांचें कायम वास्तव्य अंबेजोगाईलाच झालें. त्यांचें निर्याणहि तेथच झालें. साहजीकच त्यांच्या वंशजांच्याकडे ज्येष्ठपणाचा मान आला. सितोपंत देशपांडे यांनीं शिष्यत्व पत्करिल्यानंतर अंबेजोगाईचीं सर्वच देशपांडे घराणीं दासोपंतांचीं वंश-परंपरेनें शिष्य बनलीं. महाराष्ट्र कवींत माहिती देतांना 'गीतार्णवाच्या पहिल्या अध्यायाची एकच प्रत आम्हाला दासोपंतांचे विद्यमान वंशज श्रीधर अवधूत देशपांडे वास्तव्य अंबेजोगाई यांचेकडून मिळाली' असा श्री. भावे यांनीं उल्लेख केला आहे. वर दिलेली वस्तुस्थिति ध्यानांत घेतां प्रस्तुतचे श्रीधर अवधूत देशपांडे हे दासोपंतांच्या शिष्यपरपरेंत येतात. वंशपरंपरेंत नव्हें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. एवढें मात्र निश्चित कीं याच श्रीधर अवधूत देशपांडयांच्याकडे दासोपंतांचीं हस्तलिखितें कितीतरी काळापासून पडून होतीं. त्याचें संरक्षण आरंभीं तरी त्यांनींच केलेलें आहे.

दासोपंतांच्या वंशजांच्या दोन शाखा बावगी (बेदर प्रांत) आणि चंद्रपूर (नागपूर प्रांत) अशा प्रसिध्द असून परळीवैद्यनाथ येथेंहि त्यांची तशीच एक शाखा आजहि आहे. दासोपंतांच्या पासून कितव्या पिढीला या शाखा वेगवेगळ्या झाल्या याचाहि मागोवा मिळणें आपणांस शक्य आहे.

बावगी घराण्याच्या संग्रहीं जें कागदपत्र पहावयास मिळालें; त्यांतील एका बाडांत पुढील उल्लेख आहे.

'श्रीदेवदत्तात्रयाय नमः । दासोपंतजी स्वामियासी मुख्य यासि पुत्र ।। वडील दत्ताजी उपनांव अन्ना ।। धाकटे उपनांव अबा ।। दत्ताजी गोसावियास पुत्र २ ।। वडील आनंद गोसावी दासोबा गोसावी ।। आनंद गोसावी नकल ।। दासोबा गोसावि-यास पुत्र विश्वंभर गोसावी यास पुत्र तिघेजन ।। दासोबा गोसावी आनंद गोसावी कमलनयन गोसावी ।। '

अशा प्रकारची माहिती देऊन आनंद गोसावी यांच्या नांवापुढें 'बावगी वगैरे' आणि कमलनयन गोसावी यांच्या नांवापुढें 'याचे वंशे चंद्रपुरात असे' असा उल्लेख आहे.

दत्ताजी गोसाव्यांच्या पुत्रापकीं योगिराज गोसावी 'याचे विस्तार परळीत असे' असाहि उल्लेख करण्यांत आला आहे.

वरील माहितीवरून दासोपंतांच्या वंशजांचीं वेगवेगळीं घराणीं केव्हां बनलीं याचा अजमास आपणासं करतां येतों.

दासोपंतांच्या या मूळ घरांत जीं कागदपत्रें आणि त्यांच्या नकला आपणास मिळतात त्यांत सनदा, अभयपत्रें इत्यादि आहेत. त्यांत मलिकंबर यांची सनद 'दत्ताजी दिगंबर गोसावी महानुभाव साकिन कसबे माार' यांच्या नांवची, शंकराजी पंडित सचिव यांचें अभयपत्र दासोबा गोसावी यांच्या नांवचें अशीं असून इतर कागद-पत्रांतहि विशेषता आहेच.

राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरेचें एक पत्र क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती यांचें आहे. त्यांत दासोबा गोसाव्याच्या इनामी गांवास कुणी तोशीस न द्यावी अशी आज्ञा आहे. ते लिहितात, 'गोसावी यांच्या इनामास उपसर्ग द्यावया तुम्हास गरज काय ! हे रीत स्वामीस मानत नाहीं. हें जाणून + + + + त्यास एक जर्रा उपसर्ग न देणें फिरोन बोभाट आलिया स्वामीस मानणार नाहीं. ताकीद असे.'

दुसरें एक पत्र राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्सरेचे क्षत्रियकुलावतंस राजा शंभु छत्रपती स्वामी यांचे विश्वंभर देवाजी गोसावी यांच्या नांवाचें आहे; त्यांतहि वरीलप्रमाणेंच ताकीद करण्यांत आलेली आहे.

राज्याभिषेक शके ५६ सौम्यनाम संवत्सरे क्षत्रियकुलावंतस श्रीराजा शाहु-छत्रपती यांचे विश्वंभर देवाजी गोसावी यांना नूतन इनाम दिल्यासंबंधींचें एक पत्र आहे.

अशा प्रकारें श्रीमंत बाजीराव बल्लाळ प्रधान यांचें देवाजी गासावी यांच्या नांवचें, श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान यांचें 'श्रीहरिभक्तपरायण सर्वज्ञ स्वामी गोसावी वंश दासो दिगंबर संप्रदाय श्री दत्तात्रय गोत्र गाल्व सूत्र आपस्तंब वास्तव्य क्षेत्र अंबेजोगाई' यांच्या नांवचें, श्री. जानोजी भोसले यांचे, कृष्णशाम गोसावी शास्त्री यांच्या नांवचें, श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान यांचे श्रीकृष्णशाम बिन कमलनयन शास्त्री उपनाम गोसावी यांच्या नांवचें, श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांचें कृष्णशाम गोसावी यांच्या नांवचें, अशीं आणि इतरहि कितीतरी पत्रें अंबेजोगाईस आज पहावयास मिळतात.

दासोपंतांच्या वंशजांतहि ग्रंथरचना आणि काव्यनिर्मिति झाली असण्याचा संभव आहे. बावगीच्या बाडांत एक प्रातःस्मरण स्तोत्र आलेलें आहे. त्याच्या खालीं नोंद

आहे 'इतिश्री दिगंबरानुचरात्मजावरज विरचिते' यावरून या घराण्यानें सरस्वतीची सेवा पुढेंहि चालूं ठेवली असल्याचें दिसतें परंतु आजतरी यापैकीं कुणाचेंहि लिखाण उपलब्ध झालेलें नाहीं. कदाचित् भविष्यकाळांत अधिक माहिती हातीं येईल अशी आज आपण आशा करूं या.

अंबेजोगाईचें थोरलें आणि धाकटें देवघर

दासोपंतांचें वास्तव्य अंबेजोगाईस झाल्यापासून आणि तेथील प्रमुख नागरिकांचें गुरुपद त्यांच्याकडे आल्यापासून त्यांच्या घराला देवघर असें म्हणण्याची प्रथा पडली. आज अंबेजोगाईला हीं देवघरें दोन आहेत. एक थोरलें आणि दुसरें धाकटें. या नांवा-वरून कुणीहि सहज कल्पना करील कीं,वडील मुलाच्या वंशाचें घर थोरलें देवघर असेल, व धाकटचा मुलाच्या वंशाचें घर धाकटें देवघर असेल. परंतु वस्तुस्थिति अशी नसून ती सर्वस्वी उलट मात्र आहे. धाकटचा मुलाचें घर हें थोरलें देवघर असून वडील मुलाचें घर हें धाकटें देवघर आहे. याचें कारणहि तसेंच गमतीचें आहे. ज्या वेळीं दासोपंतांच्या दोन मुलांत वांटण्या होण्याची वेळ आली, त्या वेळीं रीतीप्रमाणें वडील भावानें इस्टेटीचे दोन समान वाटे करावयाचें आणि धाकटचा भावानें त्यापैकीं एक स्वीकारून राहिलेला वडील भावानें घ्यावयाचा. अशी वांटणीची पध्दति असल्यानें, वडील मुलानें इस्टेटीचे दोन भाग केले. त्यांत त्यांनें दूरदर्शित्वानें प्रापंचिक महत्त्वाच्या वस्तु एका भागांत ठेविल्या आणि 'देव्हारा' दुसरा विभाग म्हणून ठेविला. धाकटचा मुलानें वांटणी उचलतांना चाणाक्षपणा केला. त्यानें प्रापंचिक वस्तुपेक्षां देव्हाऱ्याला अधिक महत्व देऊन तो उचलला. अस्सल देव्हारा धाकटचा मुलाकडे गेल्यानें शिष्य परंपरेला तें घर अधिक जवळचें झालें. देव तेथें भक्त यावयाचेंच. आणि म्हणून देव्हारा असलेलें हें वस्तुतः धाकटें घर थोरलें बनलें. आणि वडील भावाचें घर हें धाकटें बनलें.

वांटणी होतांना दासोपंतांचे ग्रंथहि वांटले गेले आणि तेहि अर्धे अर्धे अशा स्वरूपांत. म्हणूनच आज कुठेंच संपूर्ण प्रत मिळणें अशक्य होतें. भाऊबंदकी महाराष्ट्रा-च्या हाडींमासीं खिळलेली आहे. व्यवहारी आणि राजकारणी लोकांपुरतांच तिचा पगडा आहे असें नव्हे. आनंदाची गोष्ट एवढीच कीं आजच्या श्रीदिगंबरस्वामी आणि श्रीयशवंतस्वामी या थोरल्या आणि धाकटचा देवघरच्या विद्यमान अधिपतींनीं आपल्या पूर्वजांचा ज्ञानाचा वारसाच तेवढा आपल्यापर्यंत स्वीकारला. भाउबंदकीला स्थान दिलें नाहीं. म्हणून सर्वांचे संबंध अतिशय प्रेमाचे असे आहेत. दासोपंतांच्या ग्रंथांचा धांडोळा दोघेंहि एकमतानें घेतात आणि हा अप्रकाशित असा अमाप साहित्य-संग्रह लवकर प्रकाशित व्हावा अशी दोघांचीहि मनीषा आहे.

दासोपंतांचा देव्हारा

'दासोपंतांच्या उपासनेंतील दत्तमूर्ति अजन अंबेजोगाईस आहेत' अशा प्रकारचा

उल्लेख श्री. पांगारकरांनीं केलेला आहे. तो वस्तुस्थितीला धरून असा नाहीं. दासोपंत दत्तसंप्रदायी होते. त्यांची उपासना श्रीदत्तात्रयाची होती. हें जरी खरें असलें, तरी त्यांच्या पूजेंत होत्या त्या केवळ पादुकाच. दत्तात्रयाची मूर्ति नव्हती. श्रीपादुका आणि कमलनयन श्रीशंकर हेंच त्यांचें उपास्य दैवत होतें. आपल्या साधनावस्थेंत राक्षसभुवनला ज्या पादुका त्यांना मिळाल्या तोंच प्रसाद त्यांनी स्वीकार केला होता. नवीन असा देव्हारा त्यांनीं संपादन केला नाहीं. आज जी दत्तमूर्ति आपणाला अंबेजोगाईस दिसते तिच्या पाठीशीं छोडीशी वेगळी माहिती आहे.

आपला समाधिकाल जवळ येत चालला, असें जेंव्हा श्रीदासोपंतांना जाणवलें तेव्हां तशा प्रकारची बातमी त्यांनीं आपल्या भक्तांना दिली. सर्वांना अत्यंत वाईट वाटलें. आज आपणासमोर असलेली आणि प्रत्येक वेळीं पुढेंमागें संभाळणारी ही पवित्र मूर्ति आपणास अंतरणार याची कल्पनाहि सर्वांना दुःसह झाली. ' मनुष्याणां सहस्रेषु ' असा हा महापुरुष योगायोगानें प्राप्त झाला असतां त्याचा चिरवियोग आतां लवकरच आपणास होणार या वार्तेनें प्रत्येकाचें अंतःकरण पिळवटून गेलें. अनेकांनीं अनेक प्रकारांनी हा दुःखद प्रसंग पुढें ढकलावा अशा प्रार्थनाहि केल्या. परंतु नियतीच्या नियमांत ढवळाढवळ करणें विशेषतः सत्पुरुषांना मानवत नाहीं आपल्या भक्तांचें दुःखहि त्यांना प्रामाणिकपणाचेंच वाटलें. परंतु त्याला उपाय काय ? ' आज नाहीं तर उद्यां तरी हा प्रसंग घडावयाचाच आहे. ' मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ' त्यासंबंधीं विनाकारण चिंता किंवा दुःख करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पार्थिव शरीर गेलें तरी आत्मा हा अमर असल्यानें शोक करणें व्यर्थच नाहीं का ' परंतु हा धीर प्रापंचिक भक्तांना कसा वांटावा ? शेवटीं सर्वांनीं मागणी केली कीं ' आपलें सान्निध्य सतत जाणवत रहावें अशी कांहीं वस्तु आपल्या हातानें आम्हां सर्वांस निरवून द्यावी आणि मग वियोग घडावा.' या सर्वांच्या मागणीप्रमाणें दासोपंतांनी नदीकांठांतून शाडू आणला आणि त्याची दत्तमूर्ति तयार केली. मूर्ति पूर्ण तयार झाल्यानंतर ती धान्याच्या कणगींत स्वहस्तें पुरून ठेविली आणि सर्वांना सांगितलें कीं, ' आजपासून एक महिन्यानें ही मूर्ति पितळेची होईल, दुसऱ्या महिन्यानें तांब्याची होईल, तिसऱ्या महिन्यानें चांदीची होईल, चवथ्या महिन्यानें सोन्याची होईल आणि पांचव्या महिन्यानें रत्नखचित होईल. या गोष्टीवर विश्वास ठेवा आणि पांच महिने संपल्यानंतर मूर्ति बाहेर काढा. '

भक्तांचें कसेंबसें समाधान झालें. दासोपंतांनी आपली जीवनयात्रा संपविली. दोन महिने संपत आलेलें होतें. कणगींतील दत्तमूर्ति आतां कशी बनली असेल इकडे सर्वांचे डोळे अधीरतेनें लागलेले होते. निष्ठावानांनी पांच महिने आपली जिज्ञासा दाबून ठेवावयाचें ठरविलें. परंतु चंचल वृत्तीला इतका धीर कसा निघावा. दुसरा महिना संपला आणि एका अतिजिज्ञासु भक्तानें कुणाला न समजतां एकांतांत कणगींत हात घालून मूर्ति उकरून पाहिली. खरोखरीच ती तांब्याची झाली होती. घाईघाईनें

त्यानें तिच्यावर धान्य लोटून दिलें. मूर्ति पुन्हां पहिल्याप्रमाणें बुजवून टाकली. आपण पाहिलें ही वार्ता सोयीस्करपणें त्यानें गुप्त ठेविली. पांच महिने संपले आणि सर्वांनीं समारंभानें मूर्ति बाहेर काढली. पहातात, तों ती तांब्याचीच ! आणि मग शोधाअंतीं खरा प्रकार जाणवला. व्यावहारिक दृष्ट्या ही बातमी गुप्त असली तरी सत्याला ही लबाडी मानवणें शक्य नव्हते. अंबेजोगाईला देव्हाऱ्यांत आज जी तांब्याची मूर्ति आहे तिचा इतिहास हा असा आहे. दासोपंतांना मिळालेल्या श्रीपादुका आणि ही दत्तमूर्ति यांचाच देव्हारा आज थोरल्या देवघरीं आपणास पहावयाला मिळतो.

धाकटें देवघर हें मूळचें वडील घर असल्याने तेथें कमलनयन श्रीशंकराची मूर्ति आहे. दासोपंतांच्या देव्हाऱ्याची माहिती अशा प्रकारची आहे.

दत्तोपासक दासोपंत

' कलौ चंडि विनायकौ ' याप्रमाणेंच ' कलौ श्रीपाद वल्लभः ' असेंहि म्हटलें जातें. महाराष्ट्रांत आणि मराठवाडयांत श्रीदत्तात्रयाची उपासना फार प्राचीन काला-पासून आहे. अवैदिक म्हणून समजल्या गेलेल्या महानुभाव संप्रदायांतहि श्रीदत्तात्रयाची उपासना प्रमुख म्हणून स्वीकारण्यांत आलेली आहे. दासोपंतांच्या कुलपरंपरेंत श्री दत्तात्रयाचीच उपासना असल्यानें बालपणापासूनच त्यांच्या मनावर दत्तभक्तीचे संस्कार दृढ झालेले होते. बेदरला बादशहाच्या कैदेंत असतांना त्यांनी आपल्या उपास्य देवतेला अनेक प्रकारें आळविलें आहे. पदार्णवांतील कांहीं पद्यें याची साक्ष देतील.

बंदी पडला बालक स्मरे जनका । प्राण व्येचीत जाईल क्षणू येका ।।
तुजवांचूनी करुणा न ये आणिका । तैसी गती बा जहाली माझी येका ।।
दत्ता धावरे धावरे धावणीया । मायबापा सांडिसी झणी माया ।।
तुजवांचुनी न स्मरे योगीराया । भवबंधन पडलों गुण क्रीया ।।
केवी राहु कवण दिशा पाहू । पंथू न कळे केउता जाऊ ।।

अशा तळमळीच्या अवस्थेंत दत्ताजी पाडेवारानें त्यांच्या हाकेला ' ओ ' दिली आणि तेव्हांपासून दत्तप्रेमाचें अमाप भरतें आलें. माहूरगडचें प्रयाण, पुढील प्रवास, प्रसादप्राप्ति आणि अंबेजोगाईचें वास्तव्य या सर्व आयुष्यक्रमांत दत्तभक्तीचा धागा अविरत आणि अखंडितपणें कार्यक्षम होता.

महाराष्ट्रांतील संतपरंपरेंत एक फार मोठें वैशिष्ट्य आहे. त्यांचीं उपास्यें वेगवेगळीं असलीं तरी त्यांत संप्रदायाचा दुराभिमान आपणास दिसत नाहीं. दत्त-संप्रदायांतीलच श्रीएकनाथ भागवतधर्माचे महान् प्रणेते बनतात. आणि दत्त-संप्रदायांतीलच श्रीदासोपंतहि भगवान श्रीकृष्णाच्या गीतामृताचे महान् अधिकारी भाष्यकार होतात. अध्यात्माच्या बाबतींत तरी महाराष्ट्रानें लोकशाहीची उपकारक शिस्त आंगीं बाणवून घेतली आहे. जे जे कोणी येथे येतील त्या सर्वांसाठीं भगवन्नामाचा दरवाजा त्यांनी खुला केलेला आहे. तेथें उपासनाभेद असले

तरी ' सर्व देव नमस्कारं केशवं प्रतिगच्छति ' ही भावना सर्वांच्या अंत:करणांत पूर्णपणें भिनलेली आहे. ' आध्यात्मिक लोकशाही ' हें महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचें महत्त्वाचें आंग आहे. आपापल्या उपासना वैशिष्ट्यांचें संरक्षण करीतहि त्यांनीं महाराष्ट्राच्या अभंग एकत्वाला अर्घ्य प्रदान केलेलें आहे. गणपति, देवी, विष्णु शंकर, पांडुरंग अशा उपासनावैचित्र्यांत एकात्मतेची भडक भावना त्यांनी जोपासली म्हणूनच आजहि पंढरीच्या वाळवंटांत अनेक देवतांचे पाईक मराठीची भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळवीणेच्या तालनादावर आनंदानें बेभान होऊन नाचतांना आपणास दिसतात.

दासोपंतांच्या दत्तोपासनेचेंहि असेंच आहे. ते स्वतां कमलनयन श्रीशंकराची उपासना करीत होते, यावरूनहि हेंच सिध्द आहे.

दत्तात्रयाच्या उपासकांचे तीन संप्रदाय आहेत. गुरुसंप्रदाय, अवधूतसंप्रदाय आणि आनंदसंप्रदाय. उपासना श्रीदत्तात्रयाचीच परंतु पध्दति पात्र थोडीशी वेगळी. यांचीं घोषणावाक्येंहि श्रीगुरुदेवदत्त, अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त, आणि आनंदें दत्तात्रय देवदेव. अशीं वेगवेगळीं आहेत. दासोपंतांनीं आपल्या परंपरेंत आनंद संप्रदायाची जोपासना केली. उपासनेची पध्दति आणि परंपरा बांधून दिली. हाच संप्रदाय आज-पर्यंत अंबेजोगाईस व इतरत्र चालतानां दिसतो. तत्वविलासंकारांनींहि याचसाठीं ' निजभक्त कर्माचारें । संप्रद्रायें विचारें राखिलें ॥ ' असा उल्लेख करून ठेविलेला आहे.

श्रीदत्तात्रयाच्या ध्यानमूर्तिविषयींहि असाच प्रकार आपणांस दिसतो. आपल्या पहाण्यांत आणि वाचण्यांत येणारी श्रीदत्तमूर्ति ही श्रीतुकोबारायांनी वर्णन केल्याप्रमाणें ' तीन शिरें सहा हात । तया माझा दंडवत ॥ काखें झोळी पुढें श्वान । नित्य जान्हवीचें स्नान ॥ माथा शोभे जटाभार । अंगीं विभूती सुंदर ॥ तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥ अशी असते. दासोपंतांची दत्तमूर्ति मात्र तीन तोंडांची नाहीं. ती आहे एकमुखीच. पण तिला सहा हात आहेत. त्रिशूल, डमरू, कमंडलू, शंख, चक्र आणि माला हीं त्या हातांत धारण केलेलीं आयुधें आहेत. डाकुळगी गांवच्या ज्या कृष्णाजीपंत कुळकर्ण्यांवर दासोपंतांनीं अनुग्रह केला. तो दर वर्षीं दत्त-जयंतीला अंबेजोगाईस येत असे. पुढें पुढें वार्धक्यानें त्याला येण्याजाण्याचे कष्ट सोसेनात. तेव्हां दासोपंतांनीं त्याला एक श्रीदत्तमूर्ति दिली. आजहि ही मूर्ति डाकुळगीला आहे. ही मूर्ति देखील एकाच तोंडाची अशी आहे. दासोपंतांनीं आपल्या देवघरांत भक्तांसाठीं म्हणून करून दिलेली मूर्तिसुध्दां अशीच एकमुखी आहे. प्रस्तुतच्या पासोडीवर शेवटच्या १३ व्या भागांत त्यांनीं जी दत्तमूर्ति चितारलेली आहे ती देखील एकमुखी पण सहा हातांची अशीच आहे. नेपाळांत एकमुखी दत्तात्रयाच्या मूर्तीची माहिती कुणीतरी मागें प्रसिध्द केलेली होती परंतु दासोपंतांच्या परंपरेंत या एकमुखी दत्ताची उपासना अशाच प्राचीन परंपरेनें आजपर्यंत चालत आलेली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

आपली परंपरा सातत्यानें टिकून रहावी आणि तिच्यांत एकसूत्रीपणा यावा या दृष्टीनें दासोपंतांनीं संप्रदायवैशिष्ट्याची उत्तम बांधणी करून दिलेली आहे. प्रत्येक दिवशींचा उपासनाविधि, सात वारांचीं वेगवेगळीं भजनें, पर्वकाळाचीं आणि उत्सवाचीं विशेष भजनें, पदें, आरत्या, शेजारत्या, अष्टकें, स्तोत्रें, या सर्व त्यांनीं आंखून व रचून ठेविल्या आहेत. विशिष्ट प्रसंगीं करावयाचीं लळितें, संगीत, टिप-या यांचीहि रचना केलेली आहे. नित्यपाठासाठीं दशनाम, शतनाम, सहस्रनाम, स्तवराज, माहात्म्यें हींहि तयार करून दिलेलीं आहेत. दासोपंतांच्या पदार्णवांत या सर्व पद्यांचाहि समावेश अर्थात आहेच. उत्सवपध्दति, सेवा, अर्चन, उत्तरार्चन यांची देखील शिस्त त्यांनींच घातलेली आहे. यावरून आपल्या पाठीमागें आपला उपासना-संप्रदाय सातत्यानें टिकावा आणि भाविकांच्या भक्तीला कायमचें व योग्य असें वळण लागावें, याची केवढी तळमळ त्यांच्या ठिकाणीं होती, हें दिसतें.

दासोपंतांच्या दत्तसंप्रदायांत श्रीदत्तात्रयाचे एकूण १६ अवतार मानलेले आहेत. यांच्या उत्सवाच्या निरनिराळ्या तिथीहि ठरलेल्या आहेत. त्यांची नोंद अशी:-

१ श्रीयोगिराज (कार्तिक शु. १५)
२ श्रीअत्रिवरद (कार्तिक व. १)
३ श्रीदत्तात्रय (कार्तिक व. २)
४ श्रीकालाग्निशमन (मार्गशीर्ष शु. ७)
५ श्रीयोगीजनवल्लभ (मार्गशीर्ष शु. १५)
६ श्रीलीलाविश्वंभर (पौष शु. १५)
७ श्रीसिध्दराज (माघ शु. १५)
८ श्रीज्ञानसागर (फाल्गुन शु. १०)
९ श्रीविश्वंभरावधूत (चैत्र शु. १५)
१० श्रीमायामुक्तावधूत (वैशाख शु. १४)
११ श्रीमायामुक्त (ज्येष्ठ शु. १३)
१२ श्रीआदिगुरु (आषाढ शु. १५)
१३ श्रीशिवरूप (श्रावण शु. ८)
१४ श्रीदेवदेव (भाद्रपद शु. १४)
१५ श्रीदिगंबर (आश्विन शु. १५)
१६ श्रीकृष्णशाम (कार्तिक शु. १५)

—आणि यांच्याखेरीज श्रीसर्वज्ञावतार म्हणजेच श्रीदासोपंत (भाद्रपद व. ८). मूर्तीच्या नित्यस्नानासाठींहि कांहीं नियम आहेत. हाताची मूठ वळून ती जमिनीवर उभी टेकवावी, आंगठा उभा करावा. मूर्तीची उंची, मुठीसुध्दां आंगठ्यापेक्षां अधिक भरली तर नित्यस्नान, आणि त्यापेक्षां कमी भरली तर नित्यस्नान नाहीं. अशाच नियमानें

इतरहि पूजाविधि ठरविण्यांत आलेले आहेत. संप्रदायवैशिष्ट्यानें होणारा ' आनंदे दत्तात्रय देवदेव !' हा जयघोष आजदेखील प्रत्यही ऐकावयाला येतोच.

दासोपंतांचा साहित्यसागर

दासोपंतांचें जीवनचरित्र, उपासनासंप्रदाय यांची त्रोटक माहिती घेतल्यानंतर एकदां त्यांच्या साहित्यसागराचें ध्रुवदर्शन घेणें ही क्रमप्राप्त गोष्ट आहे. विठ्ठल कवीचा चित्रकूट हा मोरोपंतांसारख्या रसिकालाहि दुर्लंघ्य वाटला कारण तो 'कूट' होता. दासोपंतांनीं 'कूट' निर्माण केला नाहीं परंतु त्यांच्या शारदामंदिराची लांबी रुंदी आणि भव्यता अशी आहे कीं तिचें ओझरतें दर्शनहि अतिशय कठीण काम आहे. त्यांची अफाट आणि अमाप रचना वघितली असतांना त्यांना खऱ्या अर्थानें मराठीचे कुबेर असेंच कुणीहि म्हणेल. मोरोपंत आणि इतरहि अनेक कवींनीं त्यांच्या सव्वा लाख गीतार्णवाचा उल्लेख करून ठेवलेलाच आहे. श्री. भावे आणि श्री. पांगारकर या साक्षेपी विद्वानांनीं त्यांच्या ग्रंथांच्या याद्या प्रसिध्द केलेल्या आहेत. त्यांचा एकूण संख्येचा आंकडा मोठा असला तरी प्रत्यक्षांत तितके ग्रंथ आज तरी उपलब्ध होण्या-सारखे नाहींत. त्यांत अर्धी किंवा त्यापेक्षां अधिक नांवें स्तोत्रादिकांचीं आहेत. आणि तीं नित्यपाठांत असल्यानें सहज मिळण्यासारखीं आहेत. संप्रदायपध्दतींत त्यांचें जसें महत्त्व आहे तसें तें साहित्याच्या क्षेत्रांत असणार नाहीं, ही गोष्ट अगदीं उघड अशी आहे. श्री. देवांनीं प्रसिद्ध केलेली यादी 'अंबेजोगाईस जाऊन दासोपंतांच्या घरांतील दप्तरें पाहून केली आहे ' असें श्री. पांगारकर लिहीत असले, तरी तिच्यांतील सर्वच कृति आज अंबेजोगाईस उपलब्ध नाहींत. या यादींत ३३ नांवें तर नामावल्या. स्तोत्रें, कवचें इत्यादिकांचीं आहेत. अर्थात् त्यांना ग्रंथांच्या यादींत मोजतां येणें कठीण आहे. प्रत्येक नांव एकेका ग्रंथाचें आहे असा समज याच्या बुडाशी आहे. वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. चरित्रकोशांत ज्याप्रमाणें ' पंचीकरण- अडीच हात पासोडीवर लिहिलेलें ' असा पासोडीचा उल्लेख आला आहे. तसाच हा प्रकार आहे. त्यांची रचना प्रचंड आहे यांत शंका नाहीं पण स्तोत्रें आणि नामावल्या म्हणजे ग्रंथ नव्हेत, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

दासोपंतांच्या देवघरांतून शोध घेतला असतां त्या ठिकाणीं आज उपलब्ध असलेली दासोपंतांची रचना पुढीलप्रमाणें आहे:—

१ गीतार्णव, २ गीतार्थचंद्रिका, ३ प्रबोधोदय, ४ पदार्णव, ५ ग्रंथराज, ६ उपनिषद्भाष्यें (संस्कृत), ७ पासोडी पंचीकरण.

यांपैकीं संस्कृतचीं उपनिषद्भाष्यें सोडलीं तरी सर्व ग्रंथांची आज उपलब्ध ओंवी-संख्या पावणेदोन लाखांपर्यंत जाते. मात्र प्रकाशित यादींतील ग्रंथांचा शोध अजूनहि चालूं आहे, कारण त्या यादींतील बरेचसे ग्रंथ आज तेथें नाहींत.

दासोपंतांचें हें संपूर्ण ग्रंथलेखन अंबेजोगाईस त्यांच्या रहात्या घरीं झालें. आजहि त्यांच्या लेखनशाळेचें आपणांस दर्शन घेतां येतें. महाराष्ट्र कवींत माहिती देतांना 'दासोपंतानें आपला गीतार्णव बुटेदरडी नांवाच्या गुहेंत रचला..... ही बुटेदरडी कुठें आहे तें माहीत नाहीं' असें म्हटलें आहे. महाराष्ट्र सारस्वतांतहि याचाच अनुवाद 'दूर डोंगरांत बसून केवळ कडुनिंबांचीं पानें व फळें यांवर राहून लिहिला' अशाप्रकारें करण्यांत आलेला आहे. ही वस्तुस्थिति नाहीं. आपल्याच घरीं एका ठराविक ठिकाणीं दासोपंत स्वत: लेखनसाहित्य घेऊन बसत. आणि त्यांचें लेखन अविरत चालत असे. भक्तांचा मेळावा नेहमीं भोंवतालीं असेच परंतु 'गलबल्यांतहि' एकांत कसा साधावा हें त्यांना कळलें असल्यानें कधीं त्यांच्या लेखनकामाठींत खंड पडला नाहीं किंवा व्यत्यय आला नाहीं. सिद्ध पुरुष असल्यानें त्यांचें मूळ आचरणच नियमबद्ध होतें. त्यांत कडुनिंबांचीं पानें फळें खाण्याचा प्रश्नच येत नाहीं. ज्या बुटेदरडीचा वर उल्लेख करण्यांत आलेला आहे. ती अंबेजोगाईलाच आहे. मुकुंदराजांच्या समाधीचें जें प्रशस्त खोरें आहे, त्याच्या समोरच्या डोंगरावर ही बुटेदरडी आहे. त्या प्रांतांत 'बुटेनाथ' या नांवाच्या सिद्धस्थानानें ती जागा प्रसिद्ध आहे. दासोपंत तेथें जात येत असतील परंतु ग्रंथलेखनासाठीं त्यांनीं ती जागा स्वीकारली होती, याला आख्यायिकेचा देखील आधार मिळत नाहीं. त्यांचें सर्व लेखन त्यांच्या रहात्या घरींच त्यांनीं केलेलें आहे. आज उपलब्ध असलेले ग्रंथच नुसते बघितले आणि दासोपंतांच्या दोन तपाच्याच स्वस्थ जीवनाचा विचार केला म्हणजे त्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांची आपणांस कल्पना येते. तसें पाहतां त्या वेळचें लिखाण बोरूच्या लेखणीचें. कागदहि जाडा भरडाच ! परंतु व्रतबद्ध होऊन त्यांनीं आपली साहित्य सेवा आमरण केली हेंच त्यांच्या ग्रंथरचनेचें महान् वैशिष्ट्य आहे.

दासोपंतांचें प्रकाशित वाङ्मय

लक्षावधि रचना करणाऱ्या दासोपंतांचे ग्रंथ आजपर्यंत पूर्ण स्वरूपांत प्रकाशांत येऊं शकले नाहींत. राजकीय दृष्टीनें मराठवाडचाला जो विभक्तपणा आलेला होता त्या योगानें या ग्रंथांकडे लक्ष देण्यास कुणाला सवड झाली नाहीं. अनेक संशोधकांनीं अंबेजोगाईच्या यात्रा केल्या. हस्तलिखितांची मागणी केली. कांहीं कांहीं वेळा ती पूर्णहि करण्यांत आली. परंतु प्रत्येक हस्तलिखिताची गत 'गेला तो गेलाचि' अशी होत गेल्याकारणानें हस्तलिखितें मिळणें वरचेवर अशक्य होत गेलें. संतांच्या वाङ्मया-कडे पहाण्याचा एकमेव श्रद्धाळू दृष्टिकोन अनेकांचा असल्यानें त्यास प्रकाशित करण्याचा विचार तरी कुणी करावयाचा ? नवीन पिढीला त्या भक्तिपर वाङ्मयाचें सोयीरसुतक असण्याचें कारण नव्हतें आणि जुनी पिढी आपलें हें धन इतरांच्या हातीं देण्यास तयार नव्हती. परंतु अशाहि अवस्थेंत श्री. श्रीधर अवधूत देशपांडे यांनीं आपल्या गुरुपरंपरेचें हें वाङ्मय प्रकाशांत यावें यासाठीं, खरोखरीच तळमळ

दाखविली. संशोधकांच्या हांकेला त्यांनीं बराबर 'ओ' दिली. म्हणूनच आजचें तोकडें कां असेना, प्रकाशित वाङमय आपणाला वाचावयास सांपडतें. एरव्ही, दासोपंतांचें लिखाण आजतागाईत प्रकाशितच होतें ना ! व्यक्ति किंवा संस्था यांचे खाजगी प्रयत्न या कार्याला मर्यादित पडतात. हैदराबाद राज्याच्या गेल्या राजवटीचा विचार करतां या कामीं सरकारचें साह्य कितपत मिळालें असेल, हें काय सांगावयाला पाहिजे ?

अशाहि स्थितींत दासोपंतांचें जें त्रुटित साहित्य प्रकाशित स्वरूपांत आपणांपुढें आहे त्याची नोंद अशी:–

१. दासोपंतांच्या पदार्णवापैकीं एकूण १६०५ पदांचें प्रकाशन ' दासोपंतांचीं पदें ' या नांवानें श्री. काशीनाथ वामन लेले यांनीं केलें.

२. गीतार्णवाच्या १८ अध्यायांपैकीं १ ला, २ रा, १२ वा आणि १३ वा अध्याय ३२७० ओंव्यांपर्यंत, ' महाराष्ट्र काव्यग्रंथ–मालेंत ' श्री. वि. ल. भावे यांनीं

३. श्री. अजगांवकर, श्री. नाईक व श्री. अंबेवाडी यांनी बेळगांवाहून २० कवींच्या मराठी टीकांसहित श्रीमद्भगवद्गीतेचें प्रकाशन करण्याचा प्रयत्न केला होता. दुर्दैवानें ती योजना पहिल्याच अध्यायावर संपली. या पहिल्या अध्यायांत दासोपंतांच्या ' गीतार्णव ' आणि ' गीतार्थबोध चंद्रिका ' या दोन गीता–टीकांचे १ ले अध्याय प्रकाशित करण्यांत आले.

४. श्री. शंकररावजी देव धुळें यांनीं दासोपंतांचा ' ग्रंथराज ' हा छोटेखानी ग्रंथ प्रकाशित केला.

५. दशोपनिषदावर दासोपंतांनीं जीं संस्कृत भाष्यें लिहिलीं त्यापैकीं ईश, केन आणि कठ या तीन उपनिषदांचीं भाष्यें आनंदाश्रमाच्या ग्रंथ–मालेंतून प्रकाशित करण्यांत आलीं.

६. भारत इतिहास संशोधक मंडळानें दासोपंतांच्या देवघरचीं कांहीं कागदपत्रें आपल्या अहवालांत प्रसिध्द केलेलीं आहेत.

दासोपंतांच्या प्रकाशित वाङमयाचा हाच त्रोटक वृत्तांत आहे. उपलब्ध आणि प्रकाशित साहित्याची तुलना केली असतांना प्रकाशित साहित्य अल्प आहे हें खरें असलें तरी, महाराष्ट्रापुढें ठेवण्यांत आलेली ही दासोपंत साहित्याची ' वानगी ' बहुमोल अशी आहे. त्यावरून दासोपंतांची गाढ विद्वत्ता, अखंड व्यासंग आणि सूक्ष्म निरीक्षण यांचा आपणास पुरेपूर प्रत्यय येतो. त्यांचे रचनाप्रकार, भाषाप्रभुत्व आणि पल्लेदार प्रतिभा याचेंहि दर्शन आपणांस होऊं शकते.

दासोपंतांच्या साहित्याचा हा त्रोटक आढावा घेतल्यानंतर आतां त्यांच्या ग्रंथांचें थोडेसें जवळून दर्शन घेऊं या.

गीतार्णवाच्या कांठीं

जुन्या कविमंडळींत दासोपंतांचा येणारा उल्लेख त्यांच्या गीतार्णव या सुप्रसिद्ध गीताटीकेसंबंधीं येतो. श्रीमद्भगवद्गीतेवर टीका आहेत पुष्कळच ! परंतु विस्ताराच्या दृष्टीनें गीतार्णवाची बरोबरी करणारी एकहि टीका तींत नाहीं. मराठी साहित्याचा विचार करतांना प्रदीर्घ अशी हीच पहिली आणि कदाचित् शेवटचीहि टीका म्हणावी लागेल. या टीकेपैकीं १ ला, २ रा, १२ वा आणि १३ वा अपूर्ण, असे अध्याय प्रकाशित झालेले आहेत. यांची ओंवीसंख्या अनुक्रमें ३१३३, ५६५५, ९९७ आणि ३२७० अशी आहे. गीतार्णवाच्या १५ व्या अध्यायाची ओंवीसंख्या ४८३१ असून गीतेचें सारसर्वस्व किंवा ज्ञानेश्वरांच्या शब्दांत ' एकाध्यायी गीता ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या १८ व्या अध्यायासाठीं एकूण १८००० च ओंव्या दासोपंतांनीं लिहिलेल्या आहेत. संपूर्ण गीतार्णवाचें परिशीलन किंवा लेखन करणारा बहाद्दर ४०० वर्षांच्या काळांत तरी कुणी निघाला नाहीं हें श्री. पागांरकरांचें म्हणणें मात्र अक्षरशः खरें आहे, असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं.

आपल्या या प्रचंड टीकेला प्रारंभ करीत असतांनाच दासोपंत लिहितात, 'आतां मी येक करीन । सांडूनि युक्तायुक्तपण । आलें वचन बोलैन । आवाथिला ॥' आपलें हें ' आलें वचन ' ' प्राकृत आणि आरुष ' आहे याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच विद्वानांच्या संदर्भानें ते लिहितात, ' नव्हे विषयो तुम्हाकारणें ' विद्वत्तेच्या दृष्टीनें हा विषय विद्वानांना कदाचित् पटणार नाहीं परंतु ' गीतेचेनि येणें संबंधें । आईकावें ॥ ' अशी त्यांनीं विद्वत्प्रार्थना केलेली आहे. गीतेची टीका आपण करितों तें आपल्या अधिकाराच्या आणि विद्वत्तेच्या अभिमानानें नव्हें. तसा अहंकार त्यांच्या ठिकाणीं दिसत नाहीं. ' न कळत गीता भावार्थु ' हें त्यांचें म्हणणें असलें, किंवा ' ग्रंथ रचिला अव्युत्पन्नें ' असा त्यांनीं जरी स्वतःचा उल्लेख केलेला असला, तरी 'आत्मान्वयें वचनें । घ्यावीं तुम्ही ॥' असें ते वाचकाला विनवितात. त्यांची टीका ही त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेच्या आधारावरच त्यांनीं रचलेली आहे. ' स्वमती चालिला अर्थु । ' हें त्यांचें या बाबतींत मुख्य सूत्र आहे. ग्रंथग्रंथांतरांचे अनेक आधार अनेक प्रसंगीं त्यांनी दिलेले आहेतच किंबहुना अशा आधारांन्वयेंच ते आपल्या मताची सिध्दि करीत असतात परंतु श्रीज्ञानेश्वरांच्याप्रमाणें कुणालाहि ' वाट पुसत ' जाण्याचें धोरण दासोपंतांचें नाहीं. आपल्या स्वतंत्र प्रज्ञेवरच त्यांची भिस्त असल्यानें कदाचित् ही टीका विद्वानांच्या आदरास पात्र होणारहि नाहीं, अशी जाणीव त्यांच्या मनांत आहे. ' समर्थे उपेक्षा केली । तो काये भीड धरी बोली । आतां जोडलां करकमळी । नमस्कारू तया ॥ ' आपणांस ऐकावयाचें किंवा वाचावयाचें नसेल तर वाचूं नका. माझा तसा आग्रह नाहीं. मी नमस्कार करितों तो स्वीकारा आणि बाजूला सरा असा ठांबेठोक आदेश त्यांनीं विद्वानांना दिलेला आहे. चांगलें किंवा वाईट या दोन्हींची जबाबदारी त्यांनीं स्वतांकडे ठेविली आहे. येथें त्यांचा दृढ आत्मविश्वास आपल्या प्रत्ययाला येतो.

तत्कालीन विद्वानांत संस्कृत भाषेला अतिशय महत्त्व होतें. मराठी ही सामान्य जनसमाजाची बोलभाषा. तिला शास्त्रीय विचार पेलतां येणें अत्यंत अशक्य आहे असें त्यांना वाटे. दासोपंतांना आपले विचार बहुजनसमाजापर्यंत पोंचवावयाचे होते म्हणून ते म्हणतात, ' ययां संस्कृताचा अभिमानु । तेणेंचि नाशिला हा जनु ।' आपल्या अभिमानानेंच विद्वानांची विद्वत्ता एका ठराविक परिघांत कोंडली जाऊन तिला नवोन्मेष फुटणें बंद झालें. ही प्रवृत्ति अतिशय घातक आहे हेंहि त्यांना वाटत होते, म्हणूनच ते म्हणतात, ' पुढेंहि येणे करुनु । विनाशु असे ॥ ' आपल्या नाशाचा हा इशारा त्यांनीं स्पष्टपणें, अशा दुरभिमानी संस्कृतपंडितांना देऊन ठेवलेला आहे. ' प्राकृत म्हणौन दूषिती । तेचि यया ज्ञाना वंचिती । भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख कीं ना ॥ हातीं देतां नवरत्नें । मन्हाटे बोले नें घणें । आतां हानी तया कारणें । ते दूरि नसे ॥ संस्कृतें बोलिलें सेवणें । तेंचि सांडावें प्राकृत वचनें । ऐसिया मूर्खा मुंडणें । किती आतां ॥ ' अशी मराठी भाषेची ठसठशीत वकिली त्यांनीं केली आहे. इतक्यावरहि पंडितराज तयार नसतील तर दासोपंत त्यांच्यासाठीं आपलें लेखन स्थगित करावयास तयार नाहींत. तुम्ही ऐकणार नसाल तर तुमची इच्छा. 'मीचि मातें श्रोता । मीचि मातें वक्ता । मननरूपें हे गीता । विचारितु असे ॥ ' माझ्या स्वतःच्या वाचन आणि मननाचा हा परिपाक माझ्या आत्मसंतोषासाठीं आहे असें त्यांनीं टीकाकारांना लगेंच बजावलेलें आहे. ' न पाहे श्रोतयाचें वदन । न करी भाष्याधारें विवरण । स्वस्वानुभवें हें मनन । म्हणौनि संपादि ॥ आइकैल तेणें आइकावें । मानैल तेणें घ्यावें । नावडे तेणें नेघावे । दोहीं श्रवणी ॥ स्वतःच्या स्वतंत्र अभ्यासाचें हें फळ आपल्यापुरतेंच असल्यानें इतरांच्या राजीनाराजीचें त्यांनीं किंचित्हि भय बाळगिलेलें नाहीं.

आपल्या विवरणासाठीं कुणाचाहि 'मागोवा' दासोपंतांनीं घेतलेला नसल्यानें त्यांच्या ठिकाणीं प्रचलित कुठच्याहि मताचा अभिनिवेश असलेला दिसत नाहीं. स्वानुभवाच्या भक्कम पायावर त्यांनीं आपल्या टीकामंदिराची उभारणी केलेली आहे. त्यांचा आशावादहि जबर आहे. इतरांना ही टीका महत्त्वाची न वाटली तरी स्वसंप्रदायिक जे योगी । यया मननाचे विभागी । टीका हे तयाचि जोगी । तेहीं आइकावी ॥ ' आपलें विवेचन हें आपलें गीताग्रंथाचें स्वतंत्र मनन आहे. यांत पूर्वसूरींचा आवर्जून अधिक्षेप नाहीं. किंवा अनुसरणहि नाहीं असें त्यांनीं स्पष्टपणें सुचविलेलें आहे.

गीतार्णव हा खरोखरीच अर्णव आहे. यांत अनेक रत्नें आहेत. विषयाची मांडणी करतांना यांत मूळ श्लोकाचा भावार्थ तर दिलेला आहेच. खेरीज, नाथांनीं ज्याप्रमाणें आपल्या रुक्मिणीस्वयंवरांत वेदांताच्या रूपकानें श्रीकृष्ण–रुक्मिणीबरोबर जीव–शिवाचेंहि लग्न लाविलेलें आहे, त्याप्रमाणेंच प्रस्तुत गीताटीकेंत दासोपंतांनीं कौरव आणि पांडव यांच्यांवर वेदांताचें रूपक बसवून वेदांत विषयाची सविस्तर मांडणी केलेली आहे. प्रत्येक श्लोकांतून हें वेदांती रूपक खेळविलेलें असल्याकारणानें विवे–

चनाचा अतिशय विस्तार झाला आहे. तरी देखील विषयप्रतिपादनांत दासोपंतांच्या अभिजात प्रज्ञेची चमक अनेक ठिकाणीं आपल्या अनुभवास येते.

दासोपंत केवळ ' बाबा वाक्यं प्रमाणम् ' म्हणून चालणारे टीकाकार नाहींत. ते बुद्धिप्रामाण्यवादी आहेत. 'स्वानुभवचि येथिचें प्रमाण। स्वानुभव हेंचि साधन अन्यथा शास्त्र श्रवण । तैसें हें नव्हे ॥' असें त्यांनीं आरंभींच सांगून टाकलें आहे. केवळ शब्दप्रमाणाला त्यांच्याजवळ थारा नाहीं. शंभर श्रुतींनीं अग्नि थंड आहे असें सांगितलें तरी ज्याप्रमाणें भगवान् श्रीशंकराचार्य मानावयाला तयार नाहींत त्याप्रमाणें अनुभवाच्या अभंग अःधारावर दासोपंतहि इतर प्रमाणांना विशेष महत्त्व द्यावयाला तयार नाहींत. ' प्रत्यक्षा दृश्या कारणें । कायिसी तीं आप्तवचनें । अश्वतें अश्व आनें । रूपें न घडे ॥ क्षुधा लागली कीं नाहीं । हें कवणा पुसणें कायी । गुडघा ते नव्हे डोई । प्रत्यक्ष जो ॥ असोनि ऐसें वर्तमान । शब्देवीण न मानिती प्रमाण। नेघती पदार्थाचें अभिधान । प्राकृतें शब्दें ॥ अशा प्रकारें आपल्या अनुभवावर त्यांची भिस्त अत्यधिक आहे. केवळ शद्धप्रमाणांनीं एखादी गोष्ट सिद्ध करतां आली आणि अनुभवांत ती विपरीत असली तर तिचें विपरीत दर्शन त्यांना मान्य नाहीं. आपल्या अनुभवाला जें पटेल तेंच ग्रहण करण्याचा दासोपंतांचा बाणा आहे. आपल्या अनुभूतीशीं प्रामाणिकता त्यांनीं आपल्या ग्रंथांत सर्व ठिकाणीं राखलेली आहे.

तसें पाहतां दासोपंतांचें जीवन आत्मसंतुष्टच होतें. त्यांनीं आपला स्वतंत्र संप्रदाय सुरूं केला हें जरी खरें असलें तरी, तो फार मर्यादित होता. त्याचा ' व्याप ' त्यांनीं केलेला नाहीं. ते नेहमीं आपल्यांतच आपण रमलेले दिसतात. 'युक्ति संप्रदाय रचणें । स्वार्थें फल तेथ भजणें । ऐसें निजदासा न मने । परम शुद्धातें ॥ ' एकदां व्याप वाढला कीं त्या ठिकाणीं अनेक भानगडी येतात. आणि अशा भानगडींनीं चित्त व्यग्र झालें कीं हातांतील सेवेंत खंड पडतो. आपली साहित्यसेवा बरी आणि आपण बरे. तिच्यांत अंतर न येतां जो कांहीं पसारा वाढविणें त्यांना शक्य झालें तेवढाच दासोपंतांनीं वाढविला. आवर्जून संप्रदायविस्तार असा त्यांनी केलेला नाहीं.

सभोंवती पसरलेल्या विषयांच्या पसाऱ्यांत बिचाऱ्या मनुष्याची स्थिति अतिशय केविलवाणी होते. प्रत्येक विषय त्याला आपणाकडे आकर्षित करीत असतो. ' सुंदर आणि तरुणी । अभर्तृका होये कामिनी । वरि आनु ही पोषकु कव्हणी । धनी न वर्ते ॥ तीतें जो तो दृष्टी । अभिलाषू लागे किरीटी । तैसें जें जें चिन्हें वोखटीं । ते एकदांची मीनती ॥ ' अशा अनाथ पण सुंदर आणि तरुण विधवेची आणि व्यवहारांत वावरणाऱ्या भावडया जीवाची अवस्था एकसारखी असते. अशा स्थितींत इंद्रियांचा हट्टानें निग्रह करावा, तर तेंहि हितकारक ठरतेंच असें नव्हें. कारण मनावर भक्तिप्रेमाचे आणि ज्ञानाचे संस्कारहि त्याबरोबर अवश्य असतात. केवळ निग्रह केला तर त्याचा परिणाम म्हणजे ' तयाचे देह पडैल । योगाची सिद्धी न घडैल । तमचि वाढी करील ।

म्हणौनि विघ्न हे ।।' आपल्याच अनुभवी मतानें चालावयाचा हा प्रांत नाहीं. कुणीतरी जाणता मार्गदर्शक येथें लागतों, यालाच परमार्थांत गुरु असें म्हटलें जातें. गुरु करावा हें खरें. परंतु त्याची ओळख होणें व प्राप्ति होणें अतिशय कठीण आहे. समाजांत भोंदु गुरूंना काय कमी आहे ? 'तंव तो पाहे आमंत्रण । कोठे मिळेल गोड अन्न । कवण करिती पूजन । शोडषोपचारी ।। कवण हिरण्य समर्पिती । कवण सर्वस्व देती । कन्या एकाधी अर्पिती । काय पां हे ।। करिती पुनः पुन्हा नमस्कार । दिसती जन भक्तीपर । कोठें सें आहे घर । ययाचें पां ।।' अशी विवंचना ज्यांच्या अंतरंगांत एकसारखी चालूं असेल अशा प्रकारे अडक्याचे तीन गुरु जीवाचा उद्धार करूं शकत नाहींत. बरे, गुरु अधिकारी भेटला आणि शिष्याची भूमिका तयार नसली तरी उतरावयाचा परिपाक कसा उतरेल ? मनचि नाहीं ठांइं । गुरुनें सांगावें तेथ कायी । परमार्थु तो नव्हे भंडाई । चंचळाची ।। याचसाठीं सामान्य माणसानें आपापलीं नियतकर्तव्यें करावीं, ईश्वरनिष्ठा वाढवावी आणि आपल्या जीवनांत सौभाग्याची प्रभात केव्हांतरी उगवेल ही दृढ आशा मनाशीं बाळगून व्यवहार करावा हेंच हितकर आहे. आपापलें कर्तव्याचरण करीत असतांनाहि स्वतःच्या जीवननिष्ठेचा दृढतर विश्वास हवा आहेच. आपला स्वधर्म, मग तो यशस्वी होवो वा न होवो निःसंशय श्रेष्ठ आहे, ही मनोमन भावना आपली पातळी उंचाविते. ' स्वधर्मी केवळ आसक्तु । सिद्धि असिद्धि सम जाणतु । तो योगी कर्मी भक्तु । कैसा तो अवधारी ।। करितां ईश्वर आराधन । वरि पडो एकाधे विघ्न । परी भक्तीपासाव मन । न चळे जयाचे ।। देहांतक होतु कष्ट । क्षणक्षणा उपजो अरिष्ट ।। सिद्धी पावता अभीष्ट । वरी विफळ जाये ।। परंतु जयाचें वेधलेपण वेचूचि पाहे तेथें प्राण । निर्मलही परी मन । न सोडी जयाचे ।।' अशा प्रकारें एकनिष्ठपणें परमेश्वरी कर्तव्याची आराधना करणारास हमखास सिद्धी मिळेल हें काय सांगावयास पाहिजे ?

राजा आणि प्रजा यांच्याविषयीं दासोपंतांचे विचार अगदीं आधुनिक पद्धतीचे आहेत. राजा हा तरी एक माणूसच नां ! मग त्याचें विशेष वैशिष्ट्य असें काय आहे ? ' अपार मीनती जीव । ते आपुलेनि प्राचीनें सर्व । त्या माजीं राजा स्वमेव । माणूस येक ।। अवघिया सारिखेचि अन्नपान । निद्रा जाग्रती जिणें मरण । राज्य भोगिती बहुतजण । आपुलालेन प्राचीनें ।। अश्व भागु अश्वीं नेणें । गजभागु गजा देणें । नरभागु नराकारणें । वाटवांचि तो ।। चोर भागु तौ चोराचा । मृत्तिकेतें भागु कैंचा । देवभागु देवाचा । तयांमाजि ।। मुखक मक्षिका मत्कुण । विभागु नेती सकळ जाण । राजा आदि समान । भोग सारिखे ।। द्रव्यादि पदार्थ देखणें । सारिखेंचि सर्वांकारणें । स्पर्शें अनुभऊ घेणें । सारिखाचि तो ।। नाद आइकती अपूर्व । तेही सारिखेंचि सर्व । स्त्रीसुखाचे अनुभव । समान तेही ।। अनिवार साही विकार । अंतीं नाशे शरीर । व्याधि आधि निरंतर । सारिखींचि भोगणें ।। राजा तो कासेंन आगळा । विचारी पां गोपाळा ।। '

सर्वांप्रमाणेंच त्याला सहा विकारांचे अनुभव येतात. तोहि आपल्या व्यक्तिपुरतांच उपभोगाचा स्वामी आहे मग त्याची विशेषता ती काय आहे ?

दासोपंत एकनिष्ठ भक्तीचे फार मोठे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या मतें एकनिष्ठता हें अतिशय महत्त्वाचें जीवनमूल्य आहे. सरड्याप्रमाणें दिवसांतून दहा वेळां आपलीं ध्येयें आणि मतें बदलणें त्यांना मान्य नाहीं. आधींच पूर्ण विचाराअंतीं आपलें साध्य ठरवावें आणि दृढनिष्ठेनें मग त्याच्या मार्गावर पाऊल ठेवावें. मग तेथें कसलीहि सवलत किंवा तडजोड असूं शकत नाहीं. ' पतिव्रते ऐसे आचार । आणि वेळाचे पांच भ्रतार । याहुन मिळाले अपार । तरि ना न म्हणे ॥ वेश्येची जैसी भर्तृसेवा । एकनिष्ठ ही पांडवा । ते काजा न ये आघवा । व्यर्थ भक्तियोगु ॥ ' अव्यभिचारी निष्ठेचें महत्त्व याचसाठीं परमार्थ मार्गांत फार मोठें वर्णन करण्यांत आलेलें आहे.

सहवास आणि संगति यांचा परिणामहि जीवनावर फार मोठे संस्कार करीत असतो. माणसाचें मन असतेंच मुळीं संस्कारक्षम. अर्थात् या मनावर भोंवतालची परिस्थिति, संगति यांचा फार मोठा परिणाम होतो. यांचे ठसे अतिशय खोल असे उमटतात. ' येंकाचि गुणाचे बळ । शरीरी नाहीं प्रबळ । रजतमी आळुमाळ । सत्वही दिसे ॥ करितां वैराग्यश्रवण । आधीं भेदें जयाचें मन । मग क्षणा येंका मागुतेन । संगती पालटे ॥ तैं ते भाव सूटती । संगा अनुसार उपजती । अंतःकरण मृदु आथी । जाण तयाचें ॥ आइकोनी दुःख परावें । हृदयीं जया न साहवें । आपुलें सर्वस्व द्यावें । यैसे मानी ॥ भक्ति आइकोनी प्रेमवंतु । वैराग्य आइकोनी त्यागवंतु । कर्म आइकोनी आसक्तु । तेथें होय ॥ आइकतां विवेकु कळे । हृदयींचें अज्ञान मावळे । आवडी मन रंगले । तयेचि अर्थीं ॥ आली क्रोधाची वृत्ति । शरीरीं धरी वीरपती । परंतु विवेक युक्ती । दुजियाची आइके ॥ श्रवणेंचि सांडी आला गुणु । विवेकु करी प्रधानु । तेणें धरिलाही अभिमानु । बळावेना ॥ संगास्तव अर्जुना । उपजे विषयांची वासना । ते संगेचि तेणें पुन्हां । सांडूं शके ॥ यापरी येकुही गुणु । नाहीं जया प्रधानु । केला तैसा मनु । जयाचा होये ॥ जयावरी प्रेत्न चालती । आइके दुजियाची भक्ति । आणि उक्ति उपजे युक्ति । उपजविलीया ॥ तो मनुष्य जाण वीरा । मृदुत्वें गा धनुर्धरा । आणिला ये द्वारा । मोक्षाचिया ॥

अनेक शास्त्रांचा अभ्यास केला. खूपखूप अध्ययन केलें, विद्वत्ता प्राप्त करून घेतली. आणि तो ज्ञानयोग आचरणांत न बाणला तर त्याची किंमत काय ? ज्ञान मिळवावें तें अंतःकरणांत रुजून त्याचा परिपाक जीवनांत उतरावा म्हणून. शाब्दिक ज्ञानप्राप्तीने वाणी संस्कारित होईल, बुद्धि तीक्ष्ण होईल परंतु व्यवहारांत जर तें ज्ञान आचरणांत न आलें तर, दासोपंतांच्या मतानें त्याचें विशेष असें महत्त्व नाहीं. ' लावण्य आणि तरुणपणें । सौंदर्याचेनि अतिमानें । आणि ऊर्वसीतें उणें । येसी शुभगा ॥ परंतु येकेचि घ्राणेंनवीण । व्यर्थ श्रमासीचि कारण । लक्षण तेंही अवलक्षण ।

यैसे होये ।। युद्धसामग्री अपार । आणि शाब्दिक नाना बडिवार । आणि रण देखोनी शरीर । कांपे जैं ।। सुख आणि शृंगारु । चंदन पुरुषा अलंकारु । तथापि नवज्वरें तो समग्र । वायांचि गेला ।। घ्राणेंवीण सुपाणी । मोती ले जैं सोवासिणी । तैं तें व्यर्थ जनी । हांसें होय ।। अलंकार वस्त्रें भूषणें । प्राणेनवीण जैसें लेणें । तैसीं आत्मज्ञानें ज्ञानें । सकळें व्यर्थें ।। सकळ भक्तीची वोडव । दंभें वाया गेली सर्व । प्रेमेंवीण हावभाव । ते काये करावे ।। केवळ कर्पुराची राशी । परिमळेंवीण माती जैशी । तैसें ज्ञान व्यर्थ जैं आपणासी । स्वरूप न कळे ।। आत्मसाक्षात्कारू प्रतीती । गहनु संदेहो ये अर्थी । मग येरी ब्रह्मज्ञान व्युत्पत्ती । ते काय करावी ।। षड्रस अन्न पचिले । स्निग्ध-पात्रीं वोगरिले । तें विष्टारसें विटाळिले । वायाचि जाये ।। तैसे त्या पुरुषाचें ज्ञान । तया होये पवित्रपण । येसा उपावो नाही जाण । असेव्य ते ।।

बोलून चालून गीतार्णव आहे हा. अनंत रत्नें यांत आहेत. दृढ निष्ठेनें यांत बुडया घेणारा पाणबुडया मात्र हवा आहे. मधूनच एखादी प्रासंगिक घटना, कधीं एखादी गोष्ट, आपल्या मोंवतालची परिस्थिति, समाजाच्या दुरवस्थेचें एखादें चित्रण, राजकीय वातावरणाची एखादी बाब, अनेक विषय यांत आहेत. सर्व ठिकाणीं वर्णनांना आत्मानुभवाची धार आलेली आहे. पाहिलें, अनुभविलें आणि लिहिलें हा दासोपंतांचा बाणा असल्याकारणानें, अशीं हीं तोकडीं प्रासंगिक वर्णनें देखील मनाची पकड घेतात. जाणवत असेल तर ती एकच गोष्ट ! आणि ती म्हणजे विवेचनाचा अमर्याद विस्तार. तेथें संयम नाहीं. लेखणीला बंधन नाहीं. मानवी जीवनाची धडपड आणि तिची विफलता याच्या वर्णनासाठीं दिलेली एक काल्पनिक साधी कथा ४० ओंव्या घेऊन बसते. अशा प्रकारचीं वर्णनें क्वचित् कंटाळवाणीहि वाटतात परंतु त्यांत सहजतेचा ओघ असल्यानें मनुष्य वाचतांना आपोआप सरळपणें वहात जातो. हेंच यांच्या रचनेचें वैशिष्टय आहे. गीतार्णवाचें संपूर्ण प्रकाशन झाल्यानें कितीतरी नवीन विषय आपल्यापुढें येतील आणि मराठी साहित्यांत फार मोठी भर पडेल यांत कांहीं शंका नाहीं.

गीतार्थबोधचंद्रिकेच्या चांदण्यांत

गीतार्णवासारखी सव्वा लाख ओंव्यांची प्रदीर्घ टीका गीतेवर लिहिल्यानंतर पुन्हां प्रस्तुतची 'चंद्रिका' टीका दासोपंतांनीं कां लिहिली असा एक सहज प्रश्न कुणाच्याहि मनांत उभा राहील. प्रस्तुत टीकेच्या प्रस्तावनेंतच या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं देऊन ठेविलेलें आहे. 'मागां गीतार्णव रचिलें । तें समुद्रचि होऊन ठेले । न वचे कवणा उल्लंघिले । शब्दार्णव ।। तो परमार्थु ज्ञानयोगें । उमगितां सहसा न उमगे । आणि लोकापेक्षा तेणें आंगें । देखोनि प्रवर्तली ।। गीतार्थबोधचंद्रिका । आरंभिली हे लघुटीका । संतोषी करूं लोकां । श्रोतयातें ।।' शब्दार्णवाचे सराईत पोहणार नेहमींच दुर्मिळ असावयाचे. सामान्य समाजाला एवढी झेप घेणें कठीण आहे म्हणून त्यांच्यासाठीं ही

लघुटीका रचण्यांत आलेली आहे. प्रस्तुत टीकेचा समारोप करीत असतांनाहि पुन्हां हा प्रश्न त्यांनीं उपस्थित केला आहे. ' मागां गीतार्णव सांगीतलें । तेथ काय होतें उरलें । जे पुडती आयास केले । म्हणती साधु ।।' या प्रश्नाचा उत्तरादाखल समारोपहि त्यांनींच त्यापुढें केलेला आहे. लोकापेक्षा हें तर पहिलें कारण आहेच. परंतु बोलून चालून समुद्रासारखी ती रचना ! प्रत्येक पद पदार्थाचा भाव आपल्या विवेचनांत आलाच पाहिजे ही इच्छा आणि अपेक्षा असली तरी तसा तो आलाच असेल ही खात्री कोण देणार ? ' तरि पदाचा घेतां अर्थु । गमिता तेथील परमार्थु । तोचि मतीतें निःप्रांतु । सागरू जाला ।।' गीतेंतील पदांतून असलेला परमार्थ भाव दाखवीत असतांनांच दासोपंत इतके रंगले कीं त्यांना कसलेंहि भान राहिलें नाहीं. ' आनंदे करितां तेथ क्रीडन । आले असेल कैसें वचन । काय म्हणैल वैय्याकरण । यैसी शंका ।। ' गीतार्णवांत संयमाला थारा नाहीं. धो धो आवाज करीत निघालेला वेदांत वैतरिणीचा तो प्रचंड पूर ! ' आलें वचन बोलैन ' अशा सैलपणानें निर्माण झालेलें तें विवेचन. अशा स्थितींत पदार्थाचें विवेचन केलें असलें तरी गीता–ग्रंथांतील प्रत्येक पद पदांतराचा झाडा आणि विवेचन त्यांत आलें असेलच याची दासोपंतांना स्वतःलाहि खात्री नाहीं. आणि म्हणूनच ही राहिलेली उणीव भरून काढण्यासाठीं ही लघुटीका त्यांनीं रचलेली आहे. ' यालागिं पदार्थु नेटका । यैसी ते हे लघुटीका । गीतार्थ बोधचंद्रिका । नामें रचिली ।।' अनिर्बंध परमार्थ आणि वेदांत याची माहिती गीतार्णवांत वाचावी परंतु ' गीतार्थ मात्रूचि पहाणें । तरी यिये टीकेतें सेवणें । शक्ति अनुसार बोलणें । बोलिलों येथ ।।' अर्थात याही टीकेत वाचकांची संपूर्ण जिज्ञासा तृप्त होईलच असा अहंकार दासोपंतांना नाहीं. म्हणूनच त्यांनीं सांगून टाकलें आहे कीं ' यथामति हें प्रकल्पना । उत्तम टीका मानावी ना । नातरी सर्वज्ञत्वें गुणा । हेचि आणावी ।।' गीतार्णवांतील वेदांताच्या अनिर्बंध लहरींनीं निर्बुजलेला जिज्ञासु या टीकेंत गीतेचा भावार्थ यथार्थ रूपांत पाहून संतुष्ट होईल अशी दासोपंतांची रास्त आशा आहे.

गीतार्णवांत जितका संयमाचा अभाव तितकीच त्याची काळजी या टीकेंत घेण्यांत आली आहे. नाहींतरी दासोपंतांची लेखणी बहुप्रसव अशी आहे. जिला ते लघुटीका म्हणतात ती गीतार्णवाच्या मानानें लघु असली तरी तिचीहि ओंवीसंख्या सुमारें ८८८९ इतकी म्हणजे ज्ञानेश्वरीच्या बरोबरीनें येते. याहि टीकेसाठीं त्यांनीं ' परोपकाराचे सागर । साधु सर्वदा उदार । ते माझे वाकुडे उत्तर । संपादीतीलचि ।।' उदार वाचकांच्या संपादणीची मागणी केलेली आहे.

प्रसंगोपात अनेक विषयांचें आणि परिस्थितीचें वर्णन हें दासोपंतांसारख्या लेखकाला अपरिहार्य होऊन बसतें. प्रस्तुतची लघुटीकाहि याला अपवाद कशी असूं शकेल ? ही पहा तत्कालीन आपल्या समाजाची परिस्थिति. 'करावी सेवा व्याघ्राची । येसीया उग्र म्लेंछाची । मग तो मानी तैं मानु तोचि । येर तें काय ।। इतुकी वयसा

गेली । परि दर्भें पवित्रें नाहीं घातलीं । बहुसालें सिरें घेतलीं । चोरां पुंडांचीं ॥ तेणें मानु राजद्वारी । मरती आपुलेनि हातें वैरीं । येरू परमार्थ अमकियावरी (?) । ठेवा परुता ॥' ही तत्कालीन समाजाची मनोवृत्ति आजच्या आपल्या समाजपुरुषालाहि किती चपखलपणें लागू पडते हें सांगावयाला कशाला हवें ? परिस्थितीचा पालट झाल्यानें मनाचीं स्थित्यंतरें चुटकीसरशीं होत नसतात. हेंच खरें.

दासोपंतांच्या काळीं मराठींत ज्या रचना होत त्यांची ओझरती कल्पना 'अकीर्तिकरं' या पदाच्या व्याख्यानावरून आपणांस येते. ' तुझी अकीर्ति बोलती । मग तयावरी प्रबंध रचिती । कां थोर थोर सांगती । सानया पुढें ॥ तेही वृद्ध जाले । तेही आणीक अनुग्रहीले । तुझिये अकीर्ति केले । भाट नागरिक ॥ वार्ता, पदें उखाणें । प्रबंध प्रसंग जाणे ॥' अशा प्रकारांचा उल्लेख यांत आलेला आहे. 'ग्राम्य गायन विनोदु ' असा लोकवाङ्मयाचा उल्लेखहि गीतार्णवांत आपणांस पहावयाला सापडतो.

प्रसंगांचीं चित्रणेंहि बहारीचीं केलेलीं आपणांस पहावयास मिळतात. भारतीय वीरांचा हा रणवेश तर पहाः—

' सैन्यातें भारू समर्थ । आवेशें वीर समस्त । नृत्य करिती उपस्थित । देखोनि युद्ध ॥ जंव जंव नेटु पडे । तंव तंव वीरश्रीतें चढें । गर्जती वीर धनुर्वाडे । अपाडेसी ॥ एक ते दाविती आवांका । घेती पर्वतेसी थडका । थरथरा कांपे भूमिका । ऐसें तें न मने ॥ एका पायीं ब्रीदावळी । एक ते देती आरोळी । उडाण करिती अंतराळी उगेंचि येक ॥ उलथू पाहती मेदिनी । सूर्यातें दाटिती नयनी । स्वतेजें तपती रणी । आपणचि जे ॥ एकते राय मुकुटांचे । कुंचे मयूरपत्री एकाचे । एक न सुधे शंकेचे । मान न धरिती ॥ एकाचे मोकळे कबर । एक नृत्य करिती वीर । उन्मत्त जाले समग्र । पीसाळले ॥ वारु हींस करिती । तो नादु न साहे येराप्रती । अपूर्व काय द्विजमूर्ति । प्रवर्तले हे ॥ सजळ मेघ चालिलें । की प्रळयाचें मान पावलें । संहार कर्तेन प्रेरिले । पुरुष पाहे ॥ एकांची शस्त्रें झळकती । एक धारनी रमती । रविबिंब तया दीप्ती । झाकोळले हे ॥ आवेशें करिती पाउल । बोलती प्रतापाचे बोल । पुढे पुढें केवळ । पासीं पांवले ॥ '

दासोपंत कर्मसंन्यास मान्य करीत नाहींत. त्यांच्या मतें कर्म करीत रहाणें हेंच साधकाला काय आणि सिध्दाला काय दोघांनाहि आवश्यक आहे. सामान्य माणूस हा अधर्मी बनला तर तो भार आहेच. ' कर्महीन जो नरु । त्याचा पृथ्वी मानी भारु । ह्या कारणें पामरू । व्यर्थचि जिये ॥ यया कारणें तूं कर्म करी । नियत विहित बरवया परी । कर्माची न पवे थोरी । अकर्म तें ॥ ' कर्म सोडून पृथ्वीला भारभूत होऊन जगणें हें मनुष्यप्राण्याला केंव्हाहि शोभा देणार नाहीं. सामान्य माणसानें जशीं कर्में करणें आवश्यक आहे तशींच तीं ज्ञान्यालाहि आवश्यक आहेत असें दासोपंतांनीं

स्पष्टपणें सांगितलेंलें आहे. ' यदि ह्यहं न वर्तेयं ' या श्लोकावरील टीकेंत ते म्हणतात, ' वर्णाश्रम भंगले । मनुष्य देह भंगले । संसार समुद्रीं बुडाले । चालते तारू ॥ साधन मार्गु मोडला । तैं स्वर्गुही ओस पडिला । हाही लोकु बुडाला । नरदेहें वीण ॥ म्हणौनि कर्म न करितां । हा लोकु होईन उच्छेदिता ॥ ' या ठिकाणीं त्यांनीं ज्ञानी माणसाच्या कर्माची ही जबाबदारी केवळ अवतार पुरुष श्रीकृष्णापुरतीच मर्यादित न ठेवितां सर्वंच मुक्त महंतांना ती शिस्त सांगितली आहे. ' म्हणौनि मी कर्म करी । आणि ते घाली मुक्तावरी । अर्जुना माझी पावतीं थोरी । तरी हें करावें ॥ ' ज्ञानी आणि मुक्त मनुष्यानें कर्मे करावीं असें दासोपंतांचें आवर्जून सांगणें आहे. सामान्य माणूस हा ' महाजनो येन गतः स पंथः ' अशा न्यायानें आपल्या भोंवतालीं पाहून वागत असतो. आपलें कुठें चुकत असेल तर तसें सुधारून घेतो. त्याला जर तुम्ही म्हणूं लागला कीं ' कर्मयोगु हा अनुत्कृष्टु ' आणि ' ज्ञानयोगु तो उत्कृष्टु ' तर त्याचा लाभ होण्या-ऐवजीं तो सपशेल खड्ड्यांत नाहीं कां जाणार ? त्याचें चालूं असलेलें साधन सुटेल आणि अधिकाराच्या अभावी ज्ञानसाधना त्याला पेलतां येणार नाहीं. एवंच ' इदं च नास्ति परं न लभ्यते ' अशी त्याची त्रिशंकूची अवस्था होईल म्हणूनच त्यांनीं पुन्हांहि बजाविलें आहे कीं, ' आचरण करूनी दाऊनी । कर्मची प्रेरावे तया लागूनी । हेचि करा ययाचि पासूनी । मुक्ति आहे ॥ ' कर्माचा असा आग्रह धरला तर निष्कर्मत्व कसें प्राप्त होईल ? कारण ज्ञानमार्गांत निष्कर्मत्व प्राप्ती ही अवश्यक बाब आहे. त्याचाहि खुलासा दासोपंतांनीं केलेला आहे. ' कर्मापासाव सुटणें । म्हणिजे केला कर्मी न लिंपणे । न करणया ऐसें करणें । तें करणें नव्हे ॥ ' कर्मत्याग म्हणजे अकर्मत्व नव्हे. ' कोरडे वाहे मृगजळ । तैसे अकर्मेंचि कर्म होत आहे । ऐसे मन लाहे । तो भाग्याचा गा ॥ तैसे विषय भोगावे । तेथिचे रागद्वेष न धरावे । ज्ञानी जो तेणें करावे । इतुलेचि हे ॥ वांचूनि क्रियाचि सांडावी । हे निष्ठा नव्हे बरवी । आपुली नियत ते करावी । यथा काळी ॥ ' येथपर्यंत श्रीकृष्णाच्या मताचा मतितार्थ सांगून शेवटीं म्हणतात, ' आमुचें हेंचि सांगणें । जें आपुला स्वधर्मु न सांडणें । तैसेनसीं योगु करणें ब्रम्हज्ञानाचा ॥

विषयविवेचनाच्या ओघांत दासोपंत तल्लीन झालेले आपणांस दिसतात. कृष्णार्जुनाचा हा पावन संवाद जणुं आपण प्रत्यक्ष ऐकत आहों अशा एकात्मतेनें तें यांत रमतात आणि मग ' दक्षिण करें थापटितु । अर्जुना अर्जुना म्हणतु । सावधान सावधान अनंतु । ऐसें म्हणे ॥ ' अशा प्रकारच्या स्वाभाविक वर्णनाच्या ह्या छटा त्यांच्या लेखणीवाटे आपोआप ओघळतांना दिसूं लागतात.

गीतार्थाच्या विवेचनांत श्लोकांतील पद पदांतरांचा विचार तर त्यांनीं केलेला आहेच परंतु विशदीकरण करतांना मूळांत नसलेल्याहि गोष्टी ते स्पष्टीकरणासाठी सांगतात. दहाव्या अध्यायांत विभूति वर्णन संपलें असतांना आणि गीतेंत आलेल्या सर्व विभूती सांगून झाल्या असतांनाहि आणखी स्पष्टीकरण करावें म्हणून त्यांनीं पुढील विभूति

सांगितल्या आहेत, ' वर्णामाजि श्वेतवर्णु । याती माजी ब्राह्मणू । पंडितामाजी सर्वज्ञु । ब्रह्मनिष्ठु मी ॥ पाषाणामाजीं रत्न । धातूमाजीं कांचन । वस्त्रामाजीं तें जाण । देवांग तें मी ॥ तृणामाजी दर्भु वीरा । धारामाजी मेघधारा । ऐसिया विभूति अपारा । जाण प्रकारें येणें ॥

गीतार्णवांतील वेदांत लहरींचें प्रचंड तांडव येथें नाहीं. चंद्रिकेचा शीतल प्रकाशच येथें जाणवतों.

चंद्रिका टीका अजूनहि एका वैशिष्ट्यानें आगळी अशी आहे. गीतेचा श्लोक प्रारंभीं देऊन त्याखालीं सरळ ओंव्यांना प्रारंभ केलेला नाहीं. तर आधीं त्या श्लोकावर संस्कृतमध्यें भाष्य दिलें आहे. अर्थात् तें भाष्यहि दासोपंतांचें स्वत:चेंच आहे. प्रतिपदीं झाडा घेण्यासाठीं प्रत्येक पदाची फोड करण्यास त्यांना संस्कृत टीका सोयीची वाटली. या टीकेची मर्यादाहि विवेचनाप्रमाणें कमीअधिक ठेविलेली आहे. आणि या संस्कृत टीकेच्यानंतर मराठींतून ओंवीबद्ध विवेचन केलेलें आहे. संस्कृतचे अभिमानी आणि मराठीचे प्रेमी या उभयतनांहि एकाच वेळीं आणि एकाच ताटांत दासोपंतांनीं या वाङमयीन चंद्रिकाभोजनाची संधि आपल्या प्रस्तुत टीकेंत आणून दिलेली आहे.

दासोपंतांचे रचनाप्रकार

गीतार्णवाच्या कांठावर, गीतार्थबोधचंद्रिकेच्या शीतल प्रकाशांत आपण कांहीं काळ काढला. दासोपंतांच्या संपूर्ण ग्रंथाची अशाप्रकारें ओळख करून घेतां आली असती तर तें बरें झालें असतें. परंतु विस्तारभयास्तव आज तो विचार हातीं घेतां येत नाहीं. मात्र दासोपंतांनीं आपल्या प्रचंड साहित्यांत किती प्रकारांनीं साहित्य-शारदेला आळविलें आहे, हेंहि पहाणें तितकेंच महत्त्वाचें आहे. त्यांच्या साहित्याचें ओझरतें दर्शन हा आमचा उद्देश असल्यानें माहिती देतांना संयमानेंच लिहावें लागणार आहे. म्हणून त्यांच्या इतर ग्रंथांच्या ऐवजीं रचनाप्रकारांचें थोडक्यांत दर्शन घेऊं या.

ओंवीवृत्त दासोपंतांनीं सर्रास वापरलेलें आहे. मराठीच्या वैशिष्ट्याची ही ओंवी तिच्या बाळपणींच तिला पाळण्यांत ऐकावयाला मिळालेली असल्यानें आणि तिच्या रचनेंत लवचिकपणा अधिक असल्यानें बहुतेक संतांनीं तिचाच उपयोग केलेला आहे. दासोपंतांची ओंवी बहुतेक श्रीज्ञानेश्वरांच्या धर्तीवर असलेली दिसते. नाथांची चार चरणी ओंवी क्वचित् मधूनच डोकावतांना दिसली तरी सामान्यत: ते साडेतीन चरणी ओंवीचेंच लेखन करतांना दिसतात.

ओंवीखेरीज दासोपंतांची पदपदांतरांसारखी जातिवृत्तांतील रचनाहि. अशीच भरपूर आहे. सव्वा लाख पदार्णव अशी त्यांची प्रसिद्धि आहे. अर्थात् सर्वच पदें आज उपलब्ध नसलीं तरी २० ते ३० हजारांपर्यंत ही रचना आजहि आपणास मोजतां येते.

मराठी साहित्यांत आपण जेव्हां लोकवाङ्मयाचा मागोवा घेतों तेव्हां त्यांत भारुडें आणि तत्सम रचना आपणांस दिसते. श्रीएकनाथांनीं वैशिष्टयपूर्ण भारुडें रचिलीं आणि गवळिणी गायिल्या हें आपणांस ठाऊक आहे. त्यांचेच समकालीन श्रीदासोपंतहि या प्रकारांत मागें नाहींत. जुन्या काळीं देवदेवतांच्या उत्सवांत लळितें करण्यांत येत. त्या वेळीं अनेक सोंगें घेत असतांना त्यांच्यासाठीं या रचना प्रामुख्यानें करण्यांत येत असत. दांसोपंतांनीं आपल्या वाङ्मयांत याही दृष्टीनें रचना करून संप्रदायाला शोभा आणली आहे. पदार्णवांतील अनेक पद्यें आपणांस नाथांच्या गवळणींची आठवण करून देतांना दिसतात. नाथांनीं जितक्या प्रकारें ही रचना केली आहे तितक्याच प्रकारानें दासोपंतांनींहि हें दालन समृद्ध केलेलें आहे. हा पहा दासोपंतांचा गोंधळी:—

मुखींनाम हातीं टाळी । दास नाचती गोधळी रे ।।
तुम्ही श्रीदत्त म्हणारे । सर्व सांडूनी कल्पना रे ।।
दिगंबराचा गोंधळु । ब्रह्मानंदाचा सुकाळु रे ।।
यमावरूनी करूनी वाट । दास चालतसे धीट ।।
जा रे पैं सांगी यमराजा । दास पीटीताती भुजा ।।
दिगंबराचा किंकरू । योग संग्राम झुंजारू ।।

दासोपंतांच्या बेदरकार बाण्याला साजेसाच असा हा त्यांचा गोंधळी आहे. योगसंग्रामाचा झुंजार असा हा गोंधळी यमराजाला भुजा पिटून हाकारतो आणि त्यांच्या छातीवर पाय देऊन पुढें जाण्याची घडाडी बाळगतो. हा पहा एक डाक्या ठसक्यांत डांक घालीत आहे:—

प्रथम डाक नादविता नमन केलें गणनाथा ।।
स्वामी सद्गुरु समर्था गुणातीता केवला
नमन सारजें अक्षतें गुरुकृपें श्रीशंकरें
राहाणीं गाई आदरे प्रेमभारे डोलतु
नमस्कारू भूतनाथा अत्रिवरदा अवधूता
तूं बा सकलजगकर्ता विश्वपिता म्हणौनी
भैरव भूतांचा गोसावी गुरु हस्तु नमिला जीवी
वंदुनी मस्तकी अनुभवीं पावलों ।।

याच थाटांत हा पहा त्यांचा बाळसंतोष आपणापुढें येतो. याचें अस्सल मराठी–पण कुणाला सांगावयाला कशाला पाहिजे ?

आम्हा सर्व सर्व देसी । तापसंसार नीवसी ।।
आलों श्रीदत्त सभेसी । बाबा बाळसंतोष ।।

आम्ही धर्माचं लेकरूं । बाबा बाळसंतोष ।।
आम्ही पुण्याचं लेकरूं । बाबा बाळसंतोष ।।
उपदेशाचा कानवला । न फाडिता रसा आगळा ।।
येती तात्काळ डोल । बाबा बाळसंतोष ।।
न खंडविता खंडिली । जीव शिवेवीण साविली ।।
देगा भवती काचोळी । बाबा बाळसंतोष ।।
जीर्ण स्वरूपाचा शेला । देगा राजाधिराजा वहिला
मागे तो बाळ दुर्बळ । बाबा बाळ संतोष ।।
दिगंबराचा सेवकु । सभेसी आला याचकु ।।
जाहला दिगंबर रूपकु । बाबा बाळसंतोष ।।

अशीं कितीं सोंगें वर्णन करावीं. एकेकाचे एकेक पद द्यावें म्हटलें तरी स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल. वानगीदाखल म्हणून ही दोन तीन सोंगे आपण पाहिलीं तेवढीं पुरेत. कारण बोलून चालून पदार्णवाचें संशोधन आहे ते. प्रत्येक बुडीस मोत्यांची ओंजळ हाताशीं येणार. किती दाप्यांची पहाणी करावी. प्रत्येकाचा घाट आणि डौल मनमोहक आहे.

दासोपंतांचें नारायणपेठ तेलंगणांत आणि त्यांचा राजकीय व्यवहार बेदरशीं म्हणजे कानडीचा सीमाप्रांत. साहजिकच त्यांना कानडी आणि तेलंगी या दोन्ही भाषांचें ज्ञान आपोआपच मिळालेलें होतें. स्वतः मराठीचे खंदे सेवक आणि याहि भाषांचें ज्ञान असल्याकारणानें त्यांनीं कानडी व तेलगू भाषेंतहि मराठी लोकवाङ्मयाचे नाद घुमविले आहेत. एकदां एका विषयांत मनुष्य रंगला कीं त्याची वाणी सर्व मुखानें आपले आंतरिक बोल बोलावयाला लागते. हा पहा एक कानडी भाषिक श्रीदत्तात्रयाचा जोगवा मागत आहेः—

जोगवा बेंडूत श्रीदत्ता । वस्ती माडीदी मूळपर्वत्ता ।।
नवरात्री उत्साऊ वोबंत्तु दीना । अनुसुया उदर दल्ली सप्त उदीना ।।
अन्नत्याग माडिदरू निर्जरू निधाना । महिमा दोऊद काळाग्नीशमना ।।
पंचप्राणा माडिदरु आरती । पंचप्राणा तत्व तुपानें तोयसी ।।
वोवाळीं सीदारू निमगे मंगळमूर्ति ।।
अत्रि अनुसूया तप पर्वतांगे । कपिला सापत्नी ताईनीमांगे ।।
व्यास देउरु पुराण हेळिदांगें । श्रीदिगंबरु जोगवा बेडिदांगें ।।

भाषा कानडी आहे परंतु तिच्यावर मराठीचे संस्कार आहेतच. भाषावैचित्र्य असले तरी विषय एकच. दोन पात्रांत एकच अन्न असल्याप्रमाणें कानडींतील हा जोगवा जसा मराठी वैशिष्ट्यानें मोहरलेला आहे. तसाच कानडी भाषेच्या कलाकुसरींत

मराठीची मायिक गुंफण मौजेची वाटल्यावांचून रहात नाहीं. संत विश्वाचे असतात. अमुक भाषा त्यांना मान्य आणि अमकी अमान्य असा भेद त्यांच्यांत नसतो. याच न्यायानें दासोपंतांनीं मराठी शारदेचा हा महाप्रसाद कानडीच्या ताटांतहि ओगरिला आहे. त्याचबरोबर, इकडे पहा ही तेलंगी ताई आपल्या पदरांतील एक रत्न दाखवीत आहे. दासोपंतांनींच तें तिच्या ओटींत टाकलें आहे :—

त्रिविध तापमूबाधि चिद्घनमु । परम भयमु अपरंपारा ।।
येमिचेदु यक्कड पोदु चूडने श्रीदत्तु । कालमोक्किने य यंमा ।।
दासाने संकुडा दिगंबराचंद्रचूडा । पोया निगुडा निचुपवेइडा ।।

पुरंदरदासाची कानडी आणि तिकन्नाची तेलंगी या दोन भाषांत दासोपंतांनीं आपली आठवण ठेवून दिली असतांना ते तुलसीदास आणि सूरदासांच्या हिन्दीला कसें विसरतील? हिन्दीच्या विशाल परिघाची त्यांना जाणीव होती म्हणूनच त्यांनीं तिच्याहि ओटींत आपल्या शब्दरत्नांची ओंजळ टाकलेली आहे. हे पहा, हे दोन डौलदार दाणे आणि त्यांची तेजस्वी कांति:—

सुनरे गुनिया हमरी बात । धन जोबन कोई न आवे संगात ।।
किसकी दुनिया किसकी मवेसी । दिन दो रहेंगे फिर उठचले परदेसी ।।१
आयेंसो ना रहेंगे गयेंसो और आवे । मेरा मेरा कहे भूली हाथ झाड जावे ।।२
कहां भीम अर्जुन कृष्ण रावण सांई । कोई न छुडावत न भूलो मेरे भाई ।।३
दिगंबर कथियो अंक बिचारा । उनके चरनोंपे हम दीये सरीरा ।।४

\+ \+ \+

कर्म करूं तो सांई तुमकी दुराई । आसन मुद्रा जोग जुगत भी गयी ।।
हे राम जोगी संत जगावे । श्रीदत्त के घर आवेरे ।।१
बिभूती आस्नान बीं भरण भीक्षा दीक्षा दत्त की मुद्रारे ।।२
दिगंबर का हम पंथ चलाऊं । कथुं तो ब्रह्म कीं विद्या रे ।।३

भारुडांची आणि पदांची ही वैशिष्ट्यपूर्ण रचना करीत असतांनाच दासोपंतांनीं 'अन्योक्ति' प्रकारहि हाताळलेला आहे. उपदेशांचें वाण एकदां घेतल्यानंतर ज्या ज्या मार्गानें योग्य वाटले त्या त्या मार्गानें त्यांनीं आपलें कार्य केलें आहे. ही पहा, चंदनान्योक्ति. आपल्या आधुनिक काव्यांतहि आपण चंदनान्योक्ति वाचिलेल्या आहेतच. पण त्यापेक्षांहि यांत कांहींतरी विशेष असा त्यांचा दृष्टिकोन आपणांस जाणवेल:—

शेर खदिर सर्प संगती धरलीस चंदना रे ।।
पाशीं लसुण राशी असतां कें गुण उरतील चंदना रे ।।

अरे अरे अरे अरे अरे चंदनारे
खळसंगु असतां साधुत्व काय उरे चंदना रे।।
कर्वंतु कुठारा तुजचि लागीं पैं चंदनारे ।।
हृदय कठिण परि परगुण न विचारी चंदना रे।।
गुण भुलसी तरी पडसील बाहेरी चंदना रे ।।
घालुनी दहनावरी पाहती थोरी चंदना रे ।।
दिगंबरा वांचूनी न धरी आन साधु सज्जना रे ।।

किती उतारे द्यावे? नुसते नमूने द्यावयाचे म्हटलें तरी त्यानें कितीतरी पृष्ठें आडवावीं लागतील. या वाङ्मयप्रकाराचें वैशिष्टयच हें आहे. जीवनाचीं आंगें जितकीं विविध तितकेच हे प्रकार वेगवेगळे. थोडक्यांत परिचय करून घेणें हा आपला उद्देश असल्यानें यापेक्षां अधिक उतारे देऊन जागा आडविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. दासोपंतांनीं मराठी शारदेचें हेंहि दालन संपूर्ण यशस्वितेनें शोभविलेलें आहे. त्यांत, टिपरीचे खेळ आहेत, गोफ गुंफलेले आहेत, देवतांच्या आरत्या गायिलेल्या आहेत. हृदयाच्या हिंदोळ्यावर त्यांना झुलविले आहे. विरहिणीच्या आर्त दुःखाची मांडणी केलेली आहे. प्रातःकाळीं भूपाळ्या आळविलेल्या आहेत. परमात्म्याच्या विश्रांतीसाठीं शेजारत्या म्हटल्या आहेत. पाळणें हालवून झोके दिलेले आहेत, अभंगाच्या आळवणीनें स्तोत्रेंहि गायिलीं आहेत. अनंत प्रकार आहेत या रचनेचे !

ग्रंथकार दासोपंत विद्वत्तेच्या आणि आत्मविश्वासाच्या अधिकारानें तत्त्वचर्चा करतात तर कर्मयोगी भागवद्भक्त दासोपंत बहुजनसमाजांत मिसळून त्यांच्याच कलानें परमेश्वराची आळवणी करितात. हेंच संतांचें वैशिष्टय आहे. त्यांना अगम्य असा विषय नाहीं आणि निषिद्ध असा प्रकार नाहीं. त्यांच्या हातीं पडलें कीं प्रत्येक साहित्यप्रकाराचें सोनें व्हावें ही त्यांच्या भागवतसेवेची हमखास महिमा आहे.

भगवद्भक्त दासोपंत

श्रीमद्भगवद्गीतेच्या गौरवाचे दासोपंत आणि लोकवाङ्मयाचें निर्माते दासोपंत हीं दोन स्वरूपें आपण बघितलीं. परंतु दासोपंतांचें मूळ स्वरूप कोणतें ? त्यांची जीवननिष्ठा काय ? वेदांताचें विवेचन करतांना अनेक ग्रंथांचीं प्रमाणें देऊन हजारों ओंव्यांत लीलेनें क्रीडा करणारे विवेचनकार दासोपंत आणि समाजाच्या प्रत्येक थराचें बारकाईनें परीक्षण करून सर्वांना परमार्थाची पेठ सवंग करून ठेवणारे दासोपंत या दोन्ही स्वरूपांत आपणांस त्यांच्या मूळ रूपाची ओळख पटत नाहीं. पंडित आणि लोकरंजनकार म्हणून आपण त्यांना ओळखूं शकू. परंतु दासोपंतांची जीवननिष्ठा या-पेक्षां वेगळी आहे. नाथपंथाचे अनुग्रहीत योगीश्वर ज्ञानराज हे ज्याप्रमाणें ज्ञानेश्वरींत हाडाचे भक्त म्हणून आपण पहातों. ओंवी ओंवीतून भगवत्प्रेमांत नाहलेला त्यांचा मनोभाव

आपणांस जसा प्रत्ययाला येतो तसाच दासोपंतांच्या वाङमयाचा साकल्यानें विचार केला असतांना आपणांस त्यांचा पिंड भक्ताचा असल्याचें दिसतें. शास्त्रीय प्रमेयांची उकल करतांना प्रत्ययाला येणारी त्यांची विवेचक बुद्धि ज्या वेळीं ईश्वरप्रेमाच्या प्रांतांत पदार्पण करते त्या वेळीं त्यांचें खरेंखुरें अंतरंग आपणांसमोर उघडें होतें. आणि खऱ्याखुऱ्या दासोपंतांचें दर्शन आपणांस घडतें. ' प्रेम दे मज प्रेम दे ' अशी आवर्जून मागणी करणारें मन भक्ताचेंच असणार. इतरांचें कसें असेल ? ' उत्तमें लक्षणें कायें करु । तुझिया नामाचा जेणें विसरु । देवा नलगे ब्रह्मसाक्षात्कारु । नामवादिया माते ॥ ' (गी. १५) परमार्थं साधनांत ज्याप्रमाणें कर्मवाद, ज्ञानवाद भक्तिवाद हीं मतें आणि मार्ग आहेत त्याचप्रमाणें दासोपंतांनीं आपला 'नामवाद' हाहि विशेषत्वानें सांगितला आहे. स्वत:ला 'नामवादी' म्हणून त्यांनीं हा स्वतंत्र शब्द नवीन स्वरूपांत पुढें आणलेला आपणांस दिसतो. आपल्या ईश्वरी प्रेमासाठीं ते वाटेल तें करावयाला तयार आहेत. अद्वैताच्या अनुभवानें जर भक्तिप्रेमाचा आणि नामाचा आनंद नाहींसा होणार असेल तर ते अशा ज्ञानाला आणि अनुभवाला दुरूनच नमस्कार करुं इच्छितात.

तुझा नामस्मरण घोषु । तेणें नित्य जयातें उल्हासु । तयां दासांचा मी दासु । अत्रिवरदा ॥ ज्याच्या हृदयीं प्रेमरसु । तेणें पाल्हाइला संतोषु । संसार श्रमातें विनाशु । करुनी निववी ॥ तयांच्या द्वारीं मी पडैन । झाडीन येणें मस्तकें आंगण । देवातें दुर्लभ म्हणौन । न ये आणिता ॥ तुझ्या ठायीं चित्र नुरे । ऐसें कें देखेन साकारें । तुझेनि रूपें सुंदरें । सार्वंकाळ ॥ तुझी प्रेम कीर्तन नवाळी । करितां निज–दास राउळी । पवित्रु होईन तिया धुळी । आंगावरी घेता ॥ तुझे श्रीपाद प्रक्षाळण । घेईन तीर्थ संजीवन । आणिका तीर्थांची आण । वाइली असे ॥ मरणकाळीं निर्वाणी । मातें नाठवो तुजवांचूनी । माझें मीपण तुझ्या चरणीं । ज्ञान सामावो ॥

अंत:करणांतील भगवत्प्रेम या ओंव्यांतून ओसंडून वहात आहे, हें आपणास दिसेल.

गुरुचरणावर एकनिष्ठ आणि एकांतिक श्रद्धा असावयाला हवी आहे. अद्वैताचा अनुभव आला. ' वासुदेव: सर्वमिति ' असा प्रत्यय आला तरी तशाहि अवस्थेंत गुरु तो गुरूच असतो. त्याची योग्यता कमी होत नाहीं. ज्ञानियांच्या राजानें ज्ञानेश्वरीचें गीतामंदिर उभारलें, अमृताशीं पैंज मारली परंतु आपण ' निवृत्तिदासु ' आहोंत याची अंतरंगांत नेहमीं जाणीव ठेवली. ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर देखील श्रीगुरूचें अपर एकदेशित्व अमान्य करतां येत नाहीं. सामान्यांची गोष्ट सोडा. मुक्तात्म्याला देखील हें बंधन आहेच. इतकेंच नव्हें तर तें अपरिहार्य म्हणून पाळावें लागतें. सर्वात्मत्वाचा साक्षात्कार झाला म्हणून झालें काय ?

आपुलिया भर्तारातें । भजतां पतिव्रता ते । व्यापकतेचेनि मत्ते । यैसे न म्हणे ॥ अवघेचि माझे भर्तार । का ययाची समानता सर्वत्र । हें जाणें पापाचें उत्तर ।

पतिव्रता जे ।। कां पितृभक्तु येकाधा । अनुसरोनी अभेदा । विश्व माझा पिता हे कदा । न बोले वचन ।। तैंसाचि आपुला सद्‌गुरु । आदियोगी दिगंबरु । तयाचा भजन प्रकारु ।। आचरित असतां ।।

सर्वांग आपलेंच असतें यांत कांहीं शंका नाहीं. सर्वावयवांवर आपलें सारखेंच प्रेम असतें परंतु या आपलेपणांतहि तारतम्य आहेच. कपाळ तें कपाळ आणि पाय तें पायच. ' ह्मणौनी सद्‌गुरुची महिमा । ते दुजेया न ये उपमा । म्हणौनी सर्वदेशित्वीं आम्हा । एकदेशित्व प्रिय ।। ' आणि म्हणूनच पूर्णावस्थेच्या परमोच्च शिखरावरसुद्धां गुरूचें स्थान ' दहा अंगुलें, वरच शिल्लक असावें लागतें. कारण दासोपंत युक्तिवादानें म्हणतात, ' सर्वत्र ऐक्य म्हणौनी । वेश्या ते नव्हे जननी । व्यवहारी स्त्री भगिनी । येकी नेणाचिया ।। अहो व्यवहार मुद्रा मोडावी । मग सर्वत्र ऐक्यता जोडावी । ऐसी कृत्रिम नसरे गांवीं । सभाग्याचां ।। '

भक्तिप्रेमावांचून असलेली विद्वानांची विद्वत्ता व्यवहारांत स्वार्थाच्या कलंकानें डागळलेली असते. आपल्या विद्वत्तेचें मोल आपणाला व्यावहारिक मूल्यांत मिळावें ही बहुतेकांची अपेक्षा असते व ही अपेक्षा सफल करण्यासाठीं त्यांना खोट्या खऱ्याची प्रामाणिक बुद्धिहि सोडावी वाटणें अपरिहार्य होतें. शब्दांचा कीस पाडून खऱ्या-खोट्याची जादुगिरी सजविणें हा त्यांचा हातचा मळ होऊन बसतो. आणि अशा आत्मवंचनेंत त्यांना कांहीं विपरीतहि वाटेनासें होतें.

पंडिता हेचि महंती । आणि तया योग्यता वित्पत्ती । सत्याचें असत्य करिती । असत्याचें सत्य ।। नाना युक्ति चाळितील । नाना लक्षण करतील । सत्य मांडो ने-दितील । असत्या पुढां ।। येकाचें सत्यत्व मोडावें । असत्य आपुलें प्रतिष्ठावें । तरीचि योग्यत्व भोगावें । राजसभेप्रति ।। ' तत्कालीन काय आणि आज काय, शब्दपंडितांची ही प्रवृत्ति समाजांत पावलोंपावलीं अनुभवाला येते. परंतु दासोपंत ' नामवादी ' आहेत. त्यांच्या अंतःकरणांत ईश्वरी प्रेमाचा प्रवाह वहातो आहे. आणि म्हणूनच अशा लटपटपंचीची त्यांना चीड आहे. मोक्षाची जिथें पत्रास नाहीं तेथें व्यावहारिक वैभवाची मिजास कितीशी ? ' चूळ भरला समाधीचा । आंचवलों देह प्रपंचा ॥ मुखशुद्धीं नाम ध्यावं । वाचा श्रीदत्तु म्हणावं ॥ दिगंबरीं आम्ही धालों । दिगंबरु स्वयें जालों ॥ ' ही बेदरकार आणि प्रामाणिक अशी त्यांची व्यवहारी जाणीव आहे. तेथें क्षुद्र लाभ हानींची गणती कोणी करावयाची ?

नाशवंत अशा प्रपंचांतील कसलीहि गोष्ट त्यांना ईश्वरी प्रेमाशीं तोलून पहातां येत नाहीं. त्याबाबतींत त्यांच्याजवळ तडजोड नाहीं आणि सवलत नाहीं.

' तुझिया प्रेमाचा विसरु । ऐसें भाग्य मी काय करु । यया नाशवंताचा शेजारू । पुरे जाला ।। विशिष्ट अथवा समान । तुजहून एक आन । गमे जेणें तें ज्ञान । नरक-

तुल्य ॥ गुणांचा प्रताप आइकणें । तेणें प्रेम पावैन । श्रेय पाहोनी भजैन । तें नव्हे मी दासु ॥ '

श्रेय हातीं येत असेल तर माझी भक्ति आहे नसतां नाहीं अशी देखील कामना जिथें नाहीं तिथें प्रेयासंबंधीं विचारच कशाला ? भक्ति हेंच साधन आणि साध्य ! अशा भावनेनें हीं अंत:करणें रंगलेलीं असतात.

अपराध नेहमीं घडतात. त्याबद्दल काय करावें तें ईश्वरानें ठरवावें. आपण नेहमीं 'क्षमस्व परमेश्वर ' अशी प्रार्थना करितों. परंतु दासोपंतांचें हळुवार अंत:करण देवाला अपराधाची ' क्षमा कर ' असेंहि म्हणावयाला तयार नाहीं. कां ? तर ते म्हणतात, ' अपराधु क्षमा करणें । हें तूंतें आज्ञा देणें । आय थोरपण येसणें । माझा आंगीं ॥ नेणो म्हणे तोचि श्रेष्ठु । नेणेंचि तो विधि उत्कृष्टु । जाणें मने तो निकृष्टु । दंडावा कीं ॥ मी जाणतों देवा तूंतें । हें माने येका अभक्तातें । ह्मणौनि ऐसिये मतीतें । आश्रयूचि नये ॥ ' ' क्षमा कर ' अशी आज्ञा ईश्वराला करण्याचा आपणाला काय अधिकार आहे ? त्याची इच्छा जशी असेल तसें तो करील. भक्तीची ही हळुवार भूमिका विलोभनीय नाहीं असें कोण म्हणेल ?

तुझी इच्छा ही सर्वतंत्र स्वतंत्र अशी आहे. ' ती जें कांहीं आमच्यावर आणील तें वरदानच आहे, आणि आम्ही त्यांतच संतुष्ट आहों. आमच्या मनाविरुद्धहि कांहीं घडलें तरी तुझी इच्छा म्हणून आम्ही त्याचा तितक्याच आनंदानें आणि निष्ठेनें सत्कार करूं. म्हणूनच ते एके ठिकाणीं म्हणतात '

' तुझा करितां आचारू । मोक्षु हो अथवा संसारू । तेथें नाहीं आदरू । माझिया मना ॥ येणे मान्यता हो अमान्यता । अर्थु अनर्थु हो भलता । परंतु तुझा मार्गु तो सर्वथा । सांडणेंचि नाहीं ॥ तुजशीं समान कां थोर । यैसें आइकतांचि उत्तर । यया देहावरी धार । हाणैन खड्गाची ॥ न धरी तरी नधरु मेदिनी । सवींग पडो वन्ही । परी हे नसंडी करणी । तुझिया दासत्वाची ॥ स्त्रीपुत्रादि पदार्थ । आताचि नाशो हे समस्त । रोकडे शरीर येथ । पडता दिसो ॥ प्रळया यैसा आघातु । वरी पडो मेरु प्रस्तुतु । सूर्या यैसा दीप्तु । आंगीं जडो ॥ सागरीं बुडतांहि न संडी । व्याघ्रमुखीं पडो उडी । दंडू करितां कदंडी । आंग देईन ॥ महादु:खेंही न चळणें । ऐसा तो निश्चयो म्हणणें । आतां भाग्य प्रधानें विघ्ने । तें जैं पडती ॥ सार्वभौम हो निर्वैर । श्रीचि संप्राप्ती अपार । परंतु तुजहूनि सार । तें मी न भजे ॥ देवलोकीचा मी इंद्रु । जालों वरुणु सूर्योचंद्रु । परंतु भक्तियोगु तोचि थोरू । सर्वदा भजे ॥ हित जोडो तात्विक । तेही परि नेघे आणिक । मानिती सकळ लोक । परि ते काय ॥ '

परमेश्वरी प्रेम, परमेश्वरी भजन आणि त्याचेंच चिंतन हेंच अशा भक्तांचें सार-सर्वस्व असतें. दुसऱ्या कसल्याहि गोष्टीचें त्यांना महत्त्व वाटत नाहीं. सदाचारानें आणि

भक्तीनें ईश्वरप्राप्ति नाहीं अशी खात्री पटूं द्या. आम्ही दुराचारी आणि अभक्तहि होऊं अशी दासोपंतांनीं देवाला खात्री दिलेली आहे.

तुझ्या स्वरूपीं प्रवेशणें । हें जैं घडेल अभजनें । तैं तेंहि परी मनें । आश्रयीन ।। भेटी ग्राशील भजना । तरि तेचि तुझी मी मागेना । ऐक्य पावल्या ही मना । निवडीन मी ।। नापेक्षी तुझी भेटी । जरी भक्ति तुटे ।। '

शिरकमळाची अपेक्षा असेल तर तें माग. तात्काळ त्याचें अर्पण होईल कारण ' यया प्रेमानंदाचें बळ । ऐसें आहे. ' आणि म्हणूनच शेवटीं आत्मविश्वासानें तें म्हणतात,

तृणतुल्य स्वर्गु जेणे । निर्गुणानंदाचें पुरें पारणें । मोक्षातें आणि उणें । हें सगुण प्रेम ।। '

दासोपंतांच्या भक्तीची पायरी ही अशी वैशिष्टचपूर्ण आहे. ' न पाहे श्रोतयाचें वदन ' अशा बेदरकार मनोवृत्तीनें शारदेची पूजा करावयाला निघालेल्या या शारदा भक्ताच्या अंतरंगांत परमेश्वरी प्रेमाचा महापूर कसा दुथडी ओलांडून वहात आहे याची आपणांस कल्पना आली असेल. आत्मरंगीं रंगलेल्या अशा महाभागवताला आपल्या साहित्याचे टीकाकार आपल्या कृतीबद्दल काय बोलतील याची विवंचना करावयाला वेळ कुठें आहे ? अखंड ध्यान जेथें परतत्त्वाचें आहे तेथें साहित्याच्या कसोटीवर आपलें वाङमय बसतें कीं नाहीं याची दखल घ्यावी कुणी ? ' प्रसन्न झालासी तरि काय देसी । क्षोभलासी देवा तरि काय नेसी ? ' असा ठणठणीत सवाल प्रत्यक्ष परमेश्वराला करणाऱ्या या बालेघाटी बहाद्दराच्या वाङमयांत मराठी मनाच्या मानी परंपरेचा खराखुरा साक्षात्कार आपणांस होतो हें काय सांगावयाला पाहिजे ? अशाच त्यागी परंपरेनें मराठीचा विरक्त संसार सजला आणि गाजलेला आहे. मराठीचें वाङमय इतर सर्व वाङमयांत वैशिष्टयानें उठून दिसतें तें अशा निस्पृह आणि बाणेदार साहित्याचार्यांच्या लेखणीमुळेंच.

दासोपंत आणि ज्ञानेश्वर

दासोपंत जुन्या परंपरेचे व्यासंगी पंडित होते. त्यांचा मराठीचा अभिमान सर्वश्रुत आहे. आपलें साहित्य निर्माण करण्याच्या आधीं त्यांनीं पूर्वाचार्यांचा गाढ परिचय करून घेतलेला होता हें त्यांच्या ग्रंथांतील अनेक संदर्भांवरून स्पष्ट होतें. या त्यांच्या व्यासंगाला भाषेची मर्यादा नव्हती. संस्कृतचें वाचन झाल्यानंतर त्यांनीं श्रीज्ञानेश्वरी-चाहि सखोल अभ्यास केला होता हें आपणांस सहज लक्षांत येईल. गीतार्णव आणि गीतार्थबोधचंद्रिका या दोन टीकांची वरवर पहाणी केली तरी त्यांच्या भाषेंतील ज्ञानेश्वरांचीं वैशिष्टचें चटकन आपल्या लक्षांत आल्यावांचून रहात नाहींत. ज्ञानेश्वरांचे शब्दविशेष तर त्यांनीं यशस्वीपणें हाताळलेले आहेतच आणि खेरीज रचनापद्धतींत

देखील त्यांच्याच पद्धतीचा आविष्कार साधलेला आहे. दासोपंतांची ओंवी सामान्यतः ज्ञानेश्वराप्रमाणेंच साडेतीन चरणीं आहे ही गोष्ट देखील याचेंच द्योतक आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रासादिक वाणीचा दासोपंतांच्या गीताटीकांवर किती परिणाम झाला होता हें खालील कांहीं उदाहरणावरून आपल्या ध्यानांत येईल:—

—जी तुमचें महिमान न कळे (गी. ८–३११)
—हे भाष माझी (८–१२३)
—स्वयुक्ती पाडें मी बोलेंन । तुम्ही जाणते सर्वज्ञ । आत्मप्रकाशें घेऊन । रूप करणें ।। (८–४१०)
—अभ्यासु कीरु असाचु (८–४८१)
—आंगवणेचिया लाठिवा । न पाहे क्षत्रिया सर्वां ।। (१–४०१)
—सैन्यातें धिंवसा होआवा (१–७५६)
—मोठा शंखु । वाइला भीमें (१–१०९९)
—धुरेचि वरे घाये घालणें (१–१४०२)
—इतुलेचि अपेक्षी मन । पासाव तुम्हा ।। (१–१४१९)
—यालागि असंत संताची । तुटी न करी (२–५४४)
—तरी अवधारी मातु ऐसी । जे लौकिकी अनारिसी (२–६८८)
—मना आराणूक नाथी । तेणें संभ्रमें ।। (२–५३९३)
—पृथ्वी येसणें पात्र (१५–१९७)
—ध्यानयोगी परी तो पार्था । जिंकोन आरायिला चित्ता (गी. चं.१२–२८४)

वरील शब्दपंक्ति आणि त्यांचा उपयोग यावर ज्ञानेश्वरांच्या वळणाची इतकी छाप आहे कीं प्रथमदर्शनीं त्या ज्ञानेश्वरांच्याच वाटतात. सांगितल्यावांचून त्यांचें दासोपंत कर्तृत्व लक्षांत येणें कठीण आहे. अशा अनेक ओंव्या आपणांस आढळतात. विस्तार भयास्तव अधिक उदाहरणांचा मोह आवरणें भाग आहे.

ज्ञानेश्वरांचा हा ठसा केवळ शब्द आणि प्रयोग एवढ्यापुरताच मर्यादित नाहीं. थोड्याशा बारकाईनें पाहिलें असतां दोघांच्या कल्पनासाम्याचीं स्थळेंहि आपणांस हवीं तितकीं सांपडतील:—

—पुत्रस्नेहें मोहितु । (ज्ञा. १–८५)
—पुत्र मोहें कवळितु । (गी. चं. १–१)
—नातरी असाध्य देखोनि व्याधी । अमृता सम दिव्य औषधी । वैद्य सूची निरवधि । निदानीची ।।८६ (ज्ञा. २)
व्याधी परीक्षा करणें । ते भेषजे साधारणें । मग योजावीं रसायनें । तये रोग निवृत्ती ।। ८६ (गी. २)

–ताहानें ताहानची पियावी । भूकेलिया भूकची खावी ॥ (ज्ञा. १२–६३)
क्षुधेनें क्षुधाचि भक्षावी । तृषेनें तृषा प्राशावी ॥ (गी. १२–२१०)

–वायूसी येके ठायी । बिढार जैसे नाहीं । तैसा न धरीच केंही । आश्रयो जो ॥ (ज्ञा. १२–२११)

येके स्थानी न करी वासु । अर्जुना दीडही दिवसु । पवनु जैसा उदासु । सर्वत्र विचरे ॥ (गी. १२–९२९)

–एरव्ही तरी माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता कोरान्न मागे ॥ (ज्ञा. १२–८५)

तुझा जालयाहीवरी । अभवतु तो जो चिंता करी । जैसी समर्थांची अंतुरी । दरिद्र नेणें ॥ (गी. १५–२९)

समर्थांची जे स्त्री । आणिकाते पदर पसरी । तें तेणें संसारीं । कासया जीजे ॥ (गी. चं. ९–४१३)

वरील कल्पनासाम्य वाचकांना वेगळें विशद करण्याची आवश्यकता नाहीं. श्रीएकनाथांनीं ज्ञानेश्वरीचें संशोधनच केलेलें असल्यानें त्यांच्या रचनेंत ज्ञानेशांच्या शब्द आणि कल्पनांची पखरण असणें स्वाभाविकहि आहे. परंतु श्रीदासोपंतांसारख्या आत्मसंतुष्ट महापुरुषानें देखील ज्ञानेश्वरीचा इतका सखोल व्यासंग करावा ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. लेखणी हातीं घ्यावयाच्या आधीं लेखकाला किंवा कवीला किती चौफेर अभ्यासाची आवश्यकता असते हें यावरून सहज सिद्ध होतें, ' स्वमती चालिला अर्थु ' असें लिहितांना त्या मतीवर किती प्रकारचे अभ्यास आणि संस्कार व्हावे लागतात हें येथें पहाण्यासारखें आहे.

मराठवाड्यांतील भाषाविशेष आणि दासोपंत

अभ्यासाच्या दृष्टीनें दासोपंतांनीं पूर्वसूरींचा किती व्यासंग केला होता हें पाहिल्यानंतर साहजिकच मनांत एक कल्पना येते. मूळ ठिकाण तेलंगणांत असूनहि ज्यांनीं अंबेजोगाईसारख्या मराठीच्या आदिस्थानांत निवास केला, त्या दासोपंतांच्या वाङ्मयांत, त्यांचा 'मराठवाडा' कितपत उतरला आहे. मराठवाड्याच्या बोलभाषेंत आजहि प्राचीन मराठीचे कांहीं विशेष जतन केले आहेत. त्यांतील कांहीं उच्चार आणि वाक्प्रचार आजच्या आमच्या ग्रंथलेखनांत आम्ही अशुद्ध म्हणतों. तथापि मराठवाड्याचें हें वैशिष्ट्य दासोपंतांच्या वाङ्मयांत कसें उतरलें आहे हें पहाणें मौजेचें आहे. या दृष्टीनें आगदीं वरवर पाहिलें असतांना आपणांस असें दिसतें कीं दासोपंतांच्या चोखंदळ पंडिती दृष्टीलाहि मराठवाड्याचें हें वैशिष्ट्य टाळणें इष्ट वाटलें नाहीं. त्यांनीं त्याची आवर्जून जपणूक केलेली आहे.

–कार्पास फळ वावरी । दृष्टी पडिलें ॥
–कीटणाचें लेणें । अंतरीं जैसें ॥
–सातही अध्ये संपले ॥
–पुरुजितु वीरु टणकु ॥
–अरिवर्ग कुळदीपनु । तावी स्वतेजें ॥
–जेहीं मजकारणें धडें । आपुलीं दीधलीं ॥
–श्रवणी सांचल आइकती ॥
–आणि सुडका न मिळे बाहेरी ।
–दृष्टीचेनि झावळपणें । अनुभवा ये ॥
–टप करूनी मोडी घडी ॥
–हिरवी तरडी प्रचंडु । तांदळा हो ॥
–झांजड झांजड उजेडले ॥
–घर ना ठावो स्वभावो । सुनाट ढोर ॥
–वहाटुळी माजी घाली । तया मनातें ॥
–हृदयीं सर्वदा धुपधुपितु ॥
–जैसें भिंतीवरी लिहिलें ॥

दासोपंतांच्या प्रकाशित अशा थोडयाशा रचनेंतहि अशा प्रकारचे कैक भाषा आणि शब्दविशेष आपणास सांपडतात. यांचा वापर आजहि मराठवाडयांत सरीस होत असतो. परंतु आमच्या सुधारलेल्या ग्रंथभाषेला या शब्दांच्या अर्थछटांचें यथार्थ ज्ञान नसल्यानें आम्ही त्यांना खडयाप्रमाणें वेंचून बाजूला करतों.

दासोपंतांच्या अभ्यासक्षेत्रांत कोणत्याहि भाषेला मज्जाव नव्हता. संस्कृत आणि मराठी याखेरीज कानडी आणि तेलंगी या भाषाहि त्यांनीं अभ्यासलेल्या होत्या असें आपणास म्हणतां येतें. ' शाब्दीक तरी ब्रह्मज्ञान । श्रेष्ठ या अभ्यासाहून । कानडे महाराष्ट्र तेलंगण । भलयते हो ॥ ' (गी. चं. १२–२४६) कणाकणांनी ज्ञानाची संचणी मिळेल तेथून करावी लागते याचें दासोपंत हें मोठें उदाहरण आहे. अनेक प्रकारच्या क्षेत्रांतून आपला व्यासंग चालू ठेवून जनतेच्या बोलभाषेची ग्रंथभाषेशीं मिळवणी करून सुंदर असा परिपाक त्यांनीं आपणापुढें ठेंविलेला आहे. दासोपंतांच्या वाङ्मयांतून ' मराठवाडयांतील मराठी ' च्या अभ्यासकांना कितीतरी नवीन गोष्टी लक्षांत येतील आणि भाषिक इतिहासाचें यथार्थ ज्ञान होईल हें सहज सिध्द आहे.

दासोपंत आणि संगीत

संस्कृत आणि प्राकृत अशा दर्शन ग्रंथांशींच दासोपंतांचा परिचय होता असें नसून त्यांना संगीतशास्त्राचीहि चांगलीच माहिती होती असें आपणास म्हणावें लागतें.

सामान्यतः दहापांच चाली, ५।२५ वृत्तें यांचा परिचय कविकुळाला असतो परंतु अनेक रागांत आवर्जून पद्यरचना करावयाची, याला संगीतशास्त्राचा परिचय निश्चितच आवश्यक आहे. अशी रचना येरा गबाळ्याला साधेल असें वाटत नाहीं. पदार्णवांत आलेल्या पदांतून खालील रागांच्या पदांचा समावेश आहे.

मल्हार, गौंडी, ब्याहाग, केदार, मालकंस, भैरव, भूपाळी, रामकल्कि, बिभास, अहेरी, धवळ धनासरी, भिन्नपूर्वी, कल्याण, वसंत, तोडी, धनाश्री, धनाश्रीमुलतानी, कमल मल्हार, मालगौंड, काफी, गौडसारंग, कापडगौंडी, वराडी, अशा कितीतरी रागांतून त्यांनीं आपलीं पदें रचलेलीं आहेत. संपूर्ण पदार्णव आज उपलब्धहि नाहीं परंतु दैवयोगानें तो सांपडला तर कितीतरी नवीन नवीन रागांची रचना आपल्यापुढें येईल. आणि दासोपंतांच्या संगीत शास्त्राच्या व्यासंगावरहि पुष्कळच प्रकाश पडेल. संगीतांत स्वरज्ञानाचें महत्त्व फार आहे. दासोपंत यांतहि तितकेंच तज्ज्ञ आहेत. स्वर आणि ताल यांच्या नुसत्या मूळाक्षरांचीं त्यांनीं कांहीं पद्यें बांधलेलीं आहेत.

सासागम पाग माग मासा सासा गमा पाग माग माग मापा गमा पानि पानि सासा मागारि सानिसा गमपासमा सानिधाप मगारि पनिसा रिरि पसासा सनिधापमगारिसा ॥

तत्ताथडिंकु थडिं ढिंढिकु ढिंकुकु तदिगदा थों दिगदा। धिमिकित्ता धिमिकि धिमिकि धिमिकितो ॥ टङ्गणणां गिणणां गिणण्णां ॥ टङ्गणणां गिणां गिणां टङ्ग गणणां गिणागिण ॥ तथारि थारि थारि द्धिमिकि द्धिद्धिमिकि धिमिकिटा ॥

ही जांगजोड काय दाखविते ? वानगीदाखल एकेकच रचना येथें दिली आहे. अशा कितीतरी तालस्वरांच्या रचना त्यांनीं केलेल्या आहेत. साहित्य संगीत आणि कला या सर्वांगानें दासोपंत सिद्धहस्त होते, असें आपणास यावरून म्हणतां येईल.

दासोपंतांची चित्रकला

पासोडीवर अनेक आकृति चितारल्यांत आलेल्या आहेत. साध्या चौकोनाच्या कपाटाकृतींतसुद्धां दासोपंतांची कलात्मक मांडणी आपणास जाणवल्यावांचून रहात नाहीं. विशेषतः कमानी, महिरपी, पासोडीच्या भोंवतीं काढलेली वेलबुट्टीची चौकट या गोष्टींत त्यांचें हस्तकौशल्य निश्चित आहे. परंतु त्याखेरीज चित्रें म्हणून ज्या आकृती काढल्या आहेत, उदाहरणार्थ, सर्प, हंस, दत्तमूर्ति, हातांतील आयुधें, यांत दासोपंतांची अभिजात कलादृष्टि आपल्यापुढें येते. विशेषतः सळसळणारी सर्पाकृति, तिच्यांतील वळवळणारे बांक, दोन जिभा, फणा, डोळे यांचें चित्रण किंवा मूर्तीच्या शरीराची प्रमाणबद्धता, आंगांगांत मजकूर लिहितांनाहि इंद्रियांच्या चढउताराप्रमाणें मजकुरांचें

घेतलेलें वळण, हातांत ज्या आयुधाचें चित्र असेल तें धरतांना बोटांचें होणारें विशिष्ट वळण, नाक, डोळा आणि तोंड व हनुवटी यांचा रेखीवपणा या गोष्टी पाहिल्या म्हणजे दासोपंत हे कसलेले चित्रकारहि होते असें आपणांस म्हणावें लागतें. पंचकोशाचें आणि स्थूलादि देहाचें चित्र चितारतांना योजनापूर्वक काढलेली हृदयाकृति, या गोष्टी सामान्य लेखकाला किंवा अभ्यासकाला जमण्यासारख्या नाहींत. दासोपंतांचा हंस हि या दृष्टीनें फार सुंदर आहे. लाल रंगांत जाड अशी रेषा देऊन या आकृति चितारण्यांत दासोपंतांचें कौशल्य आणि सराईतपण सहज दिसतें. मजकूर लिहितांना तो इतका व्यवस्थित लिहिलेला आहे कीं आधीं आकृति काढून घेतल्यानंतर त्याच्या भागांत तो बसेल इतकाच रचण्यांत यावा. अक्षरांची खांचाखेंच किंवा गर्दी तेथें नाहीं. मजकुराची कोंबाकोंबी त्यांत नाहीं. 'लिहितां लिहितां क्षणांत योजूनी' अशा प्रकारची ती रचना केलेली असल्यानें आंखीव आणि रेखीव अशी तिची मांडणी झालेली आहे. आणि इतक्यावरहि आश्चर्य असें, कीं या सर्व कामाठींत खाडाखोडीला कोठेंच वाव नाहीं. सर्व कांहीं पुरती लिहिल्याप्रमाणें. आकृति काढून मजकूर लिहिला किंवा मजकुरानंतर आकृति काढली हें कळण्याची देखील पंचाईत.

अर्थात् दासोपंतांच्या व्यासंगांत साहित्य, संगीत आणि कला यांचें सुंदर संमेलन झालेंलें आहे. विशेषतः त्यांच्या पासोडींत हा त्रिवेणी संगम उत्कृष्टपणें आपल्या अनुभवाला येतो.

पासोडी : स्वरूपदर्शन

पासोडीची रुंदी ४ फूट आणि लांबी ४० फूट आहे. संपूर्ण कापडावर मजकूर लिहिलेला आहे. मजकुराच्या चारहि बाजूंस एक इंच रुंद अशी चौकट आंखण्यांत आली असून आंत वेलबुट्टी काढलेली आहे. संपूर्ण पासोडीभर ही चौकट आंखलेली आहे. कापडाचा मूळ रंग अर्थात्च पांढरा असेल परंतु चारशें वर्षांच्या दीर्घकालानें आतां धुरकट आणि मळकट असा झालेला आहे. आरंभीं, मधून मधून आणि शेवटींहि बराचसा भाग फाटलेला आहे. मूळांतच १३ विभाग करण्यांत आलेले असून प्रत्येक विभागाची समाप्ति जाड अशा लाल रेघेनें करण्यांत आलेली आहे. अक्षराची शाई काळी आणि रेषांची शाई लाल, अशी उपयोगिण्यांत आली आहे. एकूण १३ विभागांच्या संबंधींची माहिती त्या त्या विभागाच्या प्रारंभीं देण्यांत आलेली आहेच.

पंचीकरण–पांसोडीचा उल्लेख करीत असतांना चरित्रकोशांत 'अडीच हात पासोडीवर लिहिलेलें' असें म्हटलें आहे. पण ती वस्तुस्थिति नाहीं.

पासोडीवरील मजकूर सामान्यतः वाचतां येतो. कारण दासोपंतांचें लेखन बोरूच्या लेखणीचें असून ठसठशीत आणि स्पष्ट असें आहे. सामान्यतः प्रत्येक अक्षराची

उंची अर्ध्या इंचाइतकी आहे. अक्षराचा घाट आणि डौल वळणदार व घोटीव आहे. जीर्णविस्यमुळें आंखलेल्या सीमारेषा आणि क्वचित् अक्षारेंहि पुसट होत चालली आहेत. आकृतींच्या रेघाहि अशाच अस्पष्ट झालेल्या आहेत. परंतु बहुतेक ठिकाणीं मजकूर वाचतां येतो. ज्या ठिकाणीं पूर्ण फाटूनच झड झालेली आहे तेथें मात्र नाइलाज आहे पण असा भाग फार थोडा आहे.

पंचीकरण

वेदांतविषयांत पंचीकरणाचें विवेचन आदिकवि मुकुंदराजापासून अनेकांनीं केलेलें आहे. आपापल्या ग्रंथांत, ओघांत आल्याप्रमाणें, हा विषय कमी अधिक प्रमाणांत सर्वांनींच हाताळला आहे. कांहीं कांहीं कवींनीं स्वतंत्र पंचीकरणेंहि लिहिलेलीं आहेत. परंतु पंचीकरण हा स्वतंत्र विषय घेऊन इतक्या सूक्ष्मपणें आणि मोठ्या प्रमाणांत या विषयाचें विवेचन मराठीं भाषेंत दासोपंतांच्या खांचून इतरांनीं केलेलें नाहीं. मराठीच्या साहित्यांत दासोपंतांचें प्रस्तुत पंचीकरण या दृष्टीनें अपूर्व असें आहे.

पासोडीचें अपूर्वत्व

ऐतिहासिक आणि इतर अनेक प्राचीन अवशेषांत शिलालेख, ताम्रपट, नाणीं, घामडयावरील लेख क्वचित ताडपत्रें इत्यादिकांवरचे लेख अनेक आहेत. परंतु ४ फूट रुंद आणि ४० फूट लांब लिहिलेलें इतकें मोठें कापड जगांतील कोणत्याहि भाषेच्या भांडारांत असेल असें वांटत नाहीं. या दृष्टीनें, चारशें वर्षांपूर्वीचें हें मराठीचें महावस्त्र, मराठीच्याच नव्हे, तर अखिल भारताच्या प्राचीन वस्तुसंग्रहांत एकमेव म्हणूनच मानावें लागेल.

पासोडी कां लिहिली ?

दासोपंतांनीं आपलें सर्व प्रदीर्घ लिखाण कागदावर लिहिलें आणि या पंचीकरणा-साठीं मात्र कापडाचा उपयोग केला. असें कां ? अशी एक शंका मनांत आल्यावांचून रहात नाहीं. लक्षावधि संख्येचा गीतार्णव आणि पदार्णव कागदावर आल्यानंतर पंचीकरणासाठीं मात्र कागद अपुरा पडला. या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. १६०० ओंव्यांसाठीं कागदाची टंचाई पडावी हें कारण होऊं शकत नाहीं. जबाबदार ग्रामा-धिकाऱ्याचे गूरु आणि आस्थेवाईक शिष्यांचे मार्गदर्शक दासोपंत, यांनीं कागदाच्या अभावी कापड वापरलें हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं.

दासोपंतांनीं पंचीकरणासाठीं कापड कां वापरलें याची कल्पना पासोडीचें दर्शन घेतलें असतां आपणांस येऊं शकतें. नुसत्या विवेचनानें पंचीकरण लिहावयाचें असतें तर दासोपंतांनीं १६०० ऐवजीं १६००० ओंव्याहि लिहिल्या असत्या. त्यांना हें सहज

शक्य होतें. परंतु दासोपंत हे नुसते उपदेशकच नव्हे, तर हाडाचे अभिजात शिक्षकहि होते. आपलें विवेचन कपाटाकृतींनी स्पष्ट करावें, अनेक आकृतींच्या साह्यानें त्याची फोड करावी ही कल्पना त्यांना आल्यानंतर साहजिकच विवेचन आणि आकृति यांची जांगजोड कागदावर करावयाची म्हणजे कागद एकाला एक चिकटवून त्याची फार मोठी गुंडाळी करावी लागली असती. शिवाय वाचावयाला आणि रक्षणाला तें अतिशय त्रासाचें झालें असतें. नाहीं तरी कागदापेक्षां कापडाचें आयुष्य मुळांतच अधिक असूं शकतें. या सर्व दृष्टींनीं त्यांनीं कागदाऐवजीं ४० फूट लांबीच्या कापडावरच आपलें लेखन केलें आणि मराठी शारदेला आपल्या या अभिनव महावस्त्राची बहुमोल जोड करून दिली.

अहंकारा तमसा ।। उपजणें (जालें अविकासा) ।। (मग ते) आकाश बव्हसा[1] ।। पवना (धीन व्यालें) ।। ४८ ।। (तामसा-अहंकार तें ।। हें तेज आणते आपातें) ।। (आप) तिये पृथ्वीतें ।। प्रसवतें जा (लें) ।। ४९ ।। (महत्तात्वें पांचभूतें) उपजलीं ।। तीं सर्वोत्तामें अ (वलोकिलीं) ।। (तीं पांचही एकत्र मेळविली ।। केली ते ठायीं)।।२५०।। (येक येक भूत विभागूनि ।। दो दो (ठायीं करुनी) ।। (एकु) विभागु ठेउनीं वेगळाचि ।। ५१ ।। (तिया दुजा विभागु जो काढिला ।। तो ही ती ठायीं विभागिला) ।। पांचां भूतां मेळविला ।। अनुक्रमेंचि ।। ५२ ।। गगन चतुर्द्धा[2] विभागूनि ।। अंत:करण (चार गुणी) ।। (जालें मन बुद्धि चित्तहंकार त्या सूंनि ।। जीवनी) वाचा ।। ५३ ।। शब्दु देणे पृथ्वीसीं ।। तरि तेणें गुणें तें आकाशीं ।। सहज वर्त्ते[3] तोसी ।। देणें (लागे) ।।५४।। (घेणें न लागे कांहीं तयाला ।। व्यान वायु तो मनोरुपें गगनीं) ध्येला ।। समानांशें दिधला ।। पवनु पवना ।।५५।। त्वचारूपें दहनी ।। पाणिरूपें जीव (नी) ।। (पाद ही आपापासूनी ।। तयाची असे) ।।५६।। (तेज चतुर्द्धा) भेदिलें ।। बुद्धिरूपें व्योमा दीधलें ।। उदानरूपें मेळविळे ।। पवना तेज ।।५७।। च (हु भागाचे अंश तेजासी ।। + + + + ++) ।। (तेंच (आप) गुणें पृथ्वीसी ।। ठाईं) चें असे ।।५८।। आप चतुर्धा करुनी ।। चित्र रुपें ठेविलें गगनी ।। प्राणरू (प तें तया देऊनि ।। जलआदि) ।।५९।। (रसना रुपें पावकीं ।। शिश्न) रूपें उदकीं ।। रस गुणें पृथ्वीसि कीं ।। आप समर्पिलें ।।२६०।। पृथ्वी चतुर्द्धा भेदू (नी ।। अहंकारांशें ठेविली गगनी) ।। (अपान रुपें पवनीं) ।। दहनी घ्राणरूपें ।।६१।। पायुरूपें[4] आपातें ।। गंधगुणें स्वभावें तें ।। आपुलां ठांईं (वर्त्ते ।। केवळ धरणी) ।।६२।। (ऐसी भूतें विभागिली) ।। तीं पंचीकृतें केलीं ।। येकमेकां

---

१ ब्रह्मसा. २. चतुर्हा. ३. 'वर्त्ते' हा शब्द गाळला आहे. ४. वायु.

मेळविळीं ।। माडणीस्तव ।।६३।। पंचीकृता सूक्ष्माचें ।। सूक्ष्म देह (जीवां ईश्वराचे) ।। (येरा अपंची कृतां स्थूळाचें) ।। विराट आणि स्थुळ ।।६४।। ऐसें सांगता पंचीकरण ।। तेणें बोधें न बोधे मन ।। आणि संदेह तें गहन ।। प (डों) चि लागलें ।।६५।। अहो स्थूळा (भूतां) पासून ।। करितां सूक्ष्मांचें निर्माण ।। कार्यापासाव करण ।। आणि कर्त्तें कैसें ।।६६।। कर्त्तेन वीण कार्य ।। तें प्रथम ही पांच विषय (तें स्फु) रलें कवणा आणि ज्ञेय ।। कवणा जालें ।।६७।। सात्त्विका पूर्वीं अहंकारा ।। तामसु जें हा बोलु खरा ।। तैं ज्ञानापूर्वीं कें थारा ।। द्रव्य स्फूर्त्ती तें ।। ६८ ।। त (म) ह्मणिजे अज्ञान ।। ज्ञानापूर्वीं कवणालागून ।। अज्ञान कार्य ज्ञान ।। कारण ऐसें जैं ।।६९।। असो अहंकारु येकु कीं वेगळे ।। तिन्ही निजशक्तिबलें ।। येकु ऐसें मानिलें ।। प्रथम वचन ।।२७०।। तरि येका अहंकारापासून ।। तत्त्वभेद उठावया कवण कारण ।। आणि गुणक्तीं ते येकपण ।। सहसां न घडे ।।७१।। सात्विकी कर्ते ज्ञानशक्ती ।। ते द्रव्य ना क्रिया निरुति ।। राजसीं असे क्रियाशक्ती ।। ते ज्ञान ना ज्ञेया द्रव्य ।।७२।। तामसीं द्रव्य शक्ति वर्त्ते ।। ते ज्ञान ना क्रिया निरुते ।। एवं शक्तिभेदु गुण-भेदातें ।। प्रकट करी ।।७३।। आणि पूर्वापर संभवन ।। हें बोलणें अघटमान ।। आतां येकातें ती (न) स्वभावगुण ।। ऐसें मानावें ।।७४।। तें अपरगुणाध्यासवशें ।। पूर्व गुण नासावा अनायासें[1] ।। येकेंचि समयें कां असे ।। स्फुरण त्रिपुटीचें ।।७५।। शद्ध श्रवणु श्रोता ।। येक समयेंचि अनुभउ असतां ।। तीही गुणा नित्यता ।। (सारिखीचि दिसे) ।।७६।। जाग्रती सुषुप्ति स्वप्न ।। येकेंचि समयें हें घडेल कैसेन ।। असो नित्य हें गुण ।। नित्य त्रिपुटी ।।७७।। त्रिविधा अहंकारापासून ।। (त्रि ही) तत्वाचें निर्माण ।। कीं कर्त्तया पासाव कार्य करण ।। ऐसें मानावें ।।७८।।

---

१. अनयासें.

अहंकारें त्रिविधें जालें ॥ तत्वांचे भेद वेगळाले ॥ तैं गुण (स्वभावीं) आपलालें ॥ भिन्नचि सकळ ॥७९॥ सत्वगुणें भिनु कर्त्ता ॥ रजोगुणें करण तत्वता ॥ तमोगुणें पाहातां ॥ कार्य वेगळें ॥२८०॥ (तें कर्त्ता कर्मांते प्रवर्तकु) ॥ कार्यीं विषयांतें भोगी येकु ॥ गुणभेदें हा आणिकु ॥ वेगळाचि जैं ॥८१॥ ऐसिया आशंका उपजती ॥ (तया कवण युक्ती छेदती) ॥ ऐसी विचारूनि युक्ती ॥ आपुला मनी ॥८२॥ येणें प्रोत प्रकारें करूनी ॥ तत्वाची केली मांडणी ॥ ते कपाटा (कृती नयनी) ॥ व्यक्ति दिसे ॥८३॥ येणें प्रकारें जाणतां ॥ आशंका छेदती समस्ता ॥ आणि तत्वाची मेळवणी करितां ॥ स्पष्ट दिसे ॥८४॥ त्रिगुणाहंकारु जाणावा ॥ येकु कीं वेगळा विचारावा ॥ तंव तये अर्थी आघवा ॥ उकलूचि असे ॥८५॥ अहंकारत्रयें निर्माण ॥ तत्वांचें ऐसें ज्ञान ॥ आणि कर्त्तयापासाव कार्य करण ॥ हें ही कळे ॥ ८६ ॥ भूतें भूतांपासून ॥ कीं विषय ययांचें (का) रण ॥ हें न संगता हि खुण ॥ जाणवों ये ॥८७॥ कर्त्तया पासाव कार्य करण ॥ तया अनुक्रमाचें ज्ञान ॥ आपें आप मन ॥ जाणे तया ॥८८॥ द्विविधें भूतें विभागिलीं ॥ तीं आपें-आप कळलीं ॥ येकें भागें घेतलीं ॥ तो प्रकारु कळे ॥८९॥ येक चतुर्धा विभागिती ॥ येक पंचधा बोलती ॥ तयांची सकळ कळे युक्ती ॥ आपेंआप ॥२९०॥ मेळविलीं भूतें भूतां ॥ तो तरि प्रकारू आइता ॥ आणि स्थूळ सूक्ष्म निवडितां ॥ आयासु न लगे ॥९१॥ सूक्ष्मा स्थूळ बहिरंग ॥ सूक्ष्म स्थूळा अंतरंग ॥ देहद्वय कळे सांग ॥ अनायासेंचि ॥९२॥ कर्तृभेदाचें करण ॥ आणि करणभेदा जे गुण ॥ कार्यभेदु कां ? हें वचन ॥ बोलावेंचि न लगे ॥९३॥ हें येक कळलयां ॥ अवघेचि कळे ह्मणौनिया ॥ निरोपण प्रकारें ऐसिया ॥ केलें आह्मी ॥९४॥ पूर्वीं भावचक्र जाणावें ॥ जाणोनि हृदयीं धरावें ॥ मग पंचीकरण पाहावें ॥ तरीचि कळे ॥ ९५ ॥

१

निर्विकल्प स्फुर (ण ।। ज्ञानरूप) तया (चे योगान) ।। ह्मणौनि (दृढ अंतः) कर (ण ।। सात्वि) क तें ।।९६।।

२

गमागमत्व हीनु ।। सर्वांग व्यापी व्यानु ।। जाला अंतः-करणापासूनु ।। सात्विक[1] तो ।।९७।।

३

श्रोतव्यादि धर्म श्रवणी ।। तो उपयुक्त ज्ञानसाधनी ।। कारणभूत मनी ।। तैं (सात्वि) क तो ।।९८।।

४

वक्तव्यादि धर्मांचें तें ।। तें उपयोगी ज्ञानातें।। मूळविद्या समूहातें ।। तें सात्त्विक तो ।।९९।।

५

शब्दज्ञानाचें साधन ।। सूक्ष्म समस्तां विषयांहून ।। अव्यक्तु अंतरंग ह्मणौन ।। सात्विक तो ।।३००।।

६

ऐसें हें कर्त्ता कार्य करण ।। अंतरंग ह्मणौन ।। सात्विक आणि स्थान ।। गगन ययाचें ।। १ ।।

७

सकल प्रधान ज्ञान ।। जया वृत्ति तें मन ।। सत्व-रजात्मक ह्मणौन ।। उपपादिलें असें ।। २ ।।

८

शरीर चंचळ करण ।। तें समानें येकेन ।। हे प्रवृत्ति निति साधणें ।। तैं रजसत्व तें ।। ३ ।।

९

अव्यक्ता जाणे स्पर्शातें ।। ह्मणौनि बहिर्मुख तें ।। त्वगेंद्रिय निरूतें ।। रजसत्वमय ।। ४ ।।

---

१. सात्वि तो.

१०

ग्रहणदान बाह्य व्यापार ।। परि साधनी योग कर ।। पाणींद्रिय तें साचार ।। ह्मणौन सत्वरजाचें ।। ५ ।।

११

सूक्ष्म विषयो परि बहिरंगु ।। स्पर्शु नव्हे अंतरंगु ।। या लागिं रजसत्वयोगु ।। तयाचां ठांयीं ।। ६ ।।

१२

हें कर्त्ता करण कार्य ।। अवघेंचि साभासमय ।। अंतरंग परि कार्य ।। बहिरंग ययाचें ।। ७ ।।

बहिर्मुखत्वें कर्ता करण कार्य

१३

निश्चयात्मक अर्थीं बुद्धि ।। कल्पितां पदार्थीं ।। ह्मणौनि रजस निरुती ।। बोलिलि ते ।। ८ ।।

१४

ऊर्ध्वस्पंदु उदानाचा ।। साधनविरोधी धर्मु तयाचा ।। ययास्तव रजाचा ।। उपपादिला तो ।। ९ ।।

१५

बाह्यरूप निर्द्धारिणें ।। अंतरंग ध्यान भंगणें ।। भावना सत्य देखणें ।। तैं चक्षु राजसु ।।३१०।।

१६

पाद गंतव्यातें करीति ।। व्यवहारु मातृ साधिती ।। साधन ध्यान मोडिती ।। राजस ते ।।११।।

१७

रूप बहिर्मुखते कारण ।। रूपें साधावें प्रपंच ज्ञान ।। राजसु विषयो तो ह्मणौन ।। प्रीयु राजसां ।।१२

१८

हें कर्त्ता कार्य करण ।। बहिर्मुख नित्य ह्मणौन ।। केवळ राजस लक्षण ।। ययाचें बोलिजे ।।१३।। समस्तें हि यें प्रकाशवंतें ।। रूपीं प्रवृत्ति ययांतें ।। ह्मणौनि तेजचि केवळ तें ।। ययाचें स्छान।।१४।।

१९

कल्पिता विषयांचें अनुसंधान ।। नव्हे रजतम-योगेंवांचून ।। यालागि मिश्रगुण प्रधान ।। चित्त जाणावें ।।१५।।

२०

शरीरधारण मात्र करी ।। त्यावरी जडु व्यापारीं ।। जाणावा तो प्राणु इतुलया वरि ।। रजतमात्मकु ।।१६।।

२१

रसैतव्य रसनेचें ।। तें साधनानुकूळ कैंचें ।। दे इंद्रिय बला तयाचें ।। रजस्तमोलक्षण अनर्थसाधन ।।१७।।

२२

तामस ह्मणौन जड अज्ञान ।। रज युक्तत्वें व्यापार गहन ।। शिश्नें कें साधन ।। तें परमार्था नये ।।१८।।

२३

रसु बाह्य विषयो साकारू ।। विक्षेपकु आणि सविकारू ।। अनर्थकरू श्रमविकारु ।। रजतमात्मकु तो ।।१९।।

२४

हें कर्त्ता कार्य करण ।। व्यवहार अनर्थसाधन ।। ज्ञान विरोधी ह्मणउन ।। रजतमात्मक पैं ।। ३२०।। सविकारें आणि रसपरें ।। उदक आयन ययां खरें ।। न घडे ययाचेनि व्यापारें ।। आपुलें हित ।।२१।।

२५

कर्माकर्मरूपें कल्पना ।। ते सत्य मानूनि कर्त्तेपणा ।। धरी तो अहंकारू सुजाणा ।। तामसु मानला ।।२२।।

२६

अधोमुख व्यापारीं ।। विसर्गादि धर्म करी ।। तेथें परमार्थु ना कुसरी ।। व्याहाराची ।।२३।। ह्मणोनि तामसु अपानु ।। ययाहुनि भला प्राणु ।। जयाचा धर्मु अज्ञानु ।। अनादि हा ।।२४।।

२७

घ्रन्तव्यातें घ्राण करी ।। कवण श्रेय त्या व्यापारीं।। देहरक्षण ही न करी ।। ह्मणौनि तामसु ।।२५।।

२८

पायु विसर्गातें करी ।। तें कवणा चातुर्या वारी ।। परमार्थी ना व्यवहारी ।। कुशळता हे ।।२६।। ह्मणौनि केवळ तामस ।। पायु इंद्रिय सदोष ।। (दोष किं वृत्तीचि माणुस) ।। घ्रिय करी ।।२७।।

२९

मध्यें शरीर रक्षण ।। किं परमार्थिक साधन ।। ह्मणौनि तामसा तया अज्ञान ।। तामसेंचि भजती ।।२८।।

३०

हें कर्त्तृत्व कार्य कर ।। भोगचातुर्य ना मोक्षचातुर्य ।। येणें करूनि कांहीं येक देहरक्षण ।। ह्मणौन तामसाचें ।।२९।। जड आणि अधोमुख ।। पृथ्वी स्थान यया येक ।। [1]..... ।। ययाचा ठांयीं ।।३३०।।

३१

अंत:करण मन बुद्धि चित्त अहंता ।। हा पंचविध जाणावा कर्त्ता ।। व्यानादि पंचक तत्वता ।। हें पांचहि प्राण ।।३१।। श्रोत्र त्वक् चक्षु रसना घ्राण ।। हे पंचविध ज्ञानकरण ।। वाचा पाणि पाद शिश्न ।। पांचवें पायु ।।३२।। हें कर्मेंद्रियें जाणावीं ।। आतां शब्दादिकें अघवीं ।। तत्वें तीं वोळखावीं ।। पांचही विषय ।।३३।। ऐसीं तत्वें पंच (वि) स ।। सकळ हे साभास ।। त्रिपुटी रूप अंश ।। . प्रकट केले ।।३४।।

१

शब्दु विषयो अंत:करणा ।। तोचि गुणु तया गगना ।। होतां शब्दाची कल्पना ।। व्योमचि उपजलें ।।३५।। तोचि शब्द व्योमी वर्म ।। सछिद्रता तेथें धर्म ।। अवकाश प्रदान कर्म ।।

---

१. मुळांतहि या ओवीचे तीनच चरण आहेत.

ऐसें जाणावें ॥३६॥ येथें प्रवेशु सूक्ष्माचा ॥ कार्यां करण कर्त्तयाचा ॥ विचारु कैसा येथिचा ॥ सांगावा तो ॥३७॥ अंतःकरण व्यानाधारें ॥ श्रोत्रेंद्रियाचेनि द्वारें ॥ वाचेसहित संचरे ॥ शब्दगुणें व्योमी ॥३८॥ तेथें आकाशीं अंतःकरण ॥ वायो व्यान तेज श्रवण ॥ आप वाचा शब्दुकारण ॥ रूप पृथ्वीचें ॥३९॥

२

स्पर्शु विषयो मनातें ॥ तो गुणु तया पवनातें ॥ ह्मणौनि स्पर्श-योगें तेथें ॥ निपजला तो ॥३४०॥ शब्द स्पर्शु तयातें ॥ चंचळता धर्म वायोतें ॥ विहरणादिक निरूतें ॥ कर्म जाणावें ॥ ४१ ॥ येथें सूक्ष्में प्रवेशलीं ॥ कर्त्ता कार्य करणें मिनलीं ॥ तीं निवाडें सांगीतलीं ॥ पाहिजती कीं ॥ ४२ ॥ मन समानाचेनि वेगे ॥ त्वगेंद्रियाचेनि मार्गें ॥ पाणींद्रियसहित रिघे ॥ स्पर्शगुणें पवनी ॥ ४३ ॥ पवनि आकातें मन॥ समान वायो जाणिजे खूण॥ त्वक् तेज पाणी जीवन ॥ वाचा ते पृथ्वी ॥ ४४ ॥

३

रूप विषयो बुद्धीतें ॥ तो गुणु तया तेजातें ॥ ह्मणौनि रूप योगें तेथें ॥ तेज उपजलें ॥ ४५ ॥ शब्दस्पर्शु रूप गुणु ॥ हे वर्म तेजा लागूनु ॥ उष्णता धर्म पचन ॥ प्रकाशन क्रिया ॥४६॥ तये स्थूळीं पावकीं ॥ कर्त्ता करणें मिनलीं असकीं ॥ ते विवंचना क्रमेंचि कीं ॥ सांगो येथूनि ॥ ४७ ॥ बुद्धि उदानाचेनि बळें ॥ चक्षु द्वारा रूपीं मिळे ॥ तेथें पादेंद्रिय ती वेगळें ॥ न शके राहों ॥४८॥ तेजीं आकाश बुध्याकारें ॥ वायो उदानु साचारें ॥ चक्षु तेज आप खरें ॥ पाद तेथें ॥ ४९ ॥ तेजीं पृथ्वीचें स्वरूप ॥ तें प्रत्यक्ष जाणावें रूप ॥ पैं सूक्ष्म आपेंआप ॥ मिनलें स्थूलीं ॥३५०॥

४

रसु विषयो चित्ता ॥ तो आपीं गुणु सर्वथा ॥ ह्मणौनि रसाची कल्पना होतां ॥ आप उपजलें ॥५१॥ शब्द स्पर्श रूप रस॥

गुण हे वर्म साभास ।। सारद्रता धर्म आपास ।। कर्म क्लेदनादिक ।।५२।। तेथें कर्त्ता कार्य करण ।। संक्रमलें त्रिपुटी स्फुरण ।। तेंचि आतां ज्ञान ।। तयाचें कैसें ।।५३।। चित्त प्राणाधारें रसनेद्वारा ।। शिश्नसहित येकसरा ।। रसगुणें प्रवेशु खरा ।। करी आपीं ।।५४।। तैं आपीं व्योम चित्ताकारें ।। प्राण वायो रसना खरें ।। तेज ह्मणउन चतुरें ।। उपपादिती ।।५५।। शिश्न आपु रस धरणी ।। ऐसी सूक्ष्में मिनलीं जीवनी ।। आतां पृथ्वी येथुनी ।। निर्माण जाली।।५६।।

५

गंधु विषयो अहंकारा ।। तो पृथ्वीतें गुण खरा ।। ह्मणौनि गंधगुणें धरा ।। निपंजती जाली ।।५७।। शद्ध स्पर्श रूप रस ।। गंधादि गुण साभास ।। ते येथें वर्म विशेष ।। पृथ्वीचां ठांयीं ।।५८।। येथें कर्त्ता कार्य करण ।। त्रिपुटीचें संक्रमण ।। जालें तैसें निरोपण ।। आरंभत असे ।।५९।। अहंकारु अपानवेगें ।। घ्राणेंद्रियाचेनि मार्गें ।। पायूसहित रिघे ।। गंधगुणे धरणी ।।३६०।। ।। तु[1] ।। तेथें पृथ्वीचें आकाश अहंकारु ।। वायो अपान घ्राण वैश्वानरु ।। पायु आप गंध समग्रु ।। ते महीचि महि ।।६१।।

६

ऐसीं स्छूळ भूतें उपजलीं ।। किं वर्म धर्म कर्मु सहितें कथिलीं ।। येक येकां मिनलीं ।। कारणें कार्यें ।।६२।। कारणभूत व्यापक तेथें ।। कार्यभूत व्याप्य वर्त्ते ।। ह्मणौनु कारणाचा गुणु कार्यातें ।। वर्म होय ।।६३।। आकाश आपुलेनि यकें गुणें ।। पवन द्विगुणु जाणणें ।। त्रिगुण तेज मानणें ।। चौगुणी आप ।।६४।। पृथ्वीतें पंचगुणा[2] ।। ऐसी हे वर्मभावना ।। उत्पत्ती जाली पांचाजणा ।। महाभूतांतें ।।६५।। ऐसीं स्छूलें महाभूतें ।। वर्त्तती सूक्ष्म सहितें ।। आतां येथून भिन्न भावातें ।। पावविजति ।।६६।।

---

१ मुळांत ३६० व्या ओवींतील शेवटच्या 'धरणी' या शब्दापुढे 'तु' असें लिहिलेलें आहे. हें अक्षर कुठचें किंवा काय संकेताचें आहे कळत नाहीं. २ पंचगुण.

[६ व्या आणि ७ व्या भागामध्यें ५ इंच जागा सोडलेली आहे. या जागेंत डावीकडे ९"×५" इतका भाग फाटलेला आहे.

या भागासाठीं २ फूट १ इंचाची जागा देण्यांत आलेली आहे. सामान्यतः ४० ओळींचा मजकूर यांत येतो. मात्र हा मजकूर सलग असा लिहिलेला नाहीं. तो कपाटाकृतींत आहे. या आकृतीची कल्पना खालीं दिलेल्या चौकोनावरून येऊं शकेल. मागच्याप्रमाणेंच, येथेंहि वाचकांच्या सोयीसाठीं आम्ही प्रत्येक चौकोनांत अक्षर किंवा क्रमांक देऊन त्यांतील मजकूर पुढें त्या त्या अक्षर आणि क्रमांकाखालीं दिलेला आहे. या भागापैकीं ७"×३" इतका उजवीकडेचा भाग फाटलेला असून डाव्या भागांतहि मधून मधून झड झालेली आहेच.

शुद्ध ब्रह्मापासून पंचमहाभूतें, ज्ञानकर्मेंद्रियें यांची उत्पत्ति दाखविणारें एक स्वतंत्र कोष्टक या भागाच्या शेवटीं आहे. तें मुळांत असल्याप्रमाणेंच देण्यांत आलेलें आहे.]

१											
द					त्ता					त्रे	य
१	७	१३	१९	२५	१	७	१३	१९	२५		
२	८	१४	२०	२६	२	८	१४	२०	२६		
३	९	१५	२१	२७	३	९	१५	२१	२७	१	१
४	१०	१६	२२	२८	४	१०	१६	२२	२८		
५	११	१७	२३	२९	५	११	१७	२३	२९		
६	१२	१८	२४	३०	६	१२	१८	२४	३०		

१

(व्योमा[1] दिही महाभूतें ॥ उपजुनि पावली पुष्टतेतें) ॥ कार्याकारण प्रवेशु तेथें ॥ जाला ॥६७॥ ह्मणौनि जीं बोलिलीं स्थूळें ॥ तीं सूक्ष्म सहितेंचि सकळें ॥ कर्त्ताकरण मिन्लें ॥ कार्यीं असतां ॥६८॥ स्थूळ सूक्ष्म विभागेंविण ॥ न घडे विषयांचें साधन ॥ या लागि ते विलक्षण ॥ (जाणावें किं) ॥६९॥ (करणें क्रिया) रूप विभागु ॥ ऐसा न घडे सत्य प्रसंगु ॥ सहजें कर्त्ता असंगु ॥ सहित करणेंसीं ॥३७०॥ घटद्रष्टा घटें भिन्नु ॥ तैसा विषयज्ञु विषयांचा जाणु ॥ दोंहींचा वेगळाला गुणु ॥ ह्मणौनियां ॥७१॥ हें ज्ञेय तो ज्ञाता ॥ विषय भोग्य तो भोक्ता ॥ ययांतें नसे येकात्मता ॥ कधींचि ते ॥७२॥ कर्त्ता विलक्षणु तैं करणांसी ॥ आणि सूक्ष्में विषयवासनेंसीं ॥ वेगलीक स्थूलां विषयांसीं ॥ ते सहित महाभूतां ॥७३॥ कर्त्ता कार्य करण ॥ ययाचें सहज वेगळेपण ॥ आतां करण तें इछाचि वांचून ॥ क्रिया न लगे ॥७४॥ ईश्वरें इछा केलीं ॥ स्थूळे सूक्ष्में विभागिलीं ॥ तीं जाणतीं देखिलीं ॥ कैसीं कैसीं ॥७५॥ वर्म धर्म कर्मसहित ॥ स्थूळ गगन वेगळेंचि तेथें ॥ अंतःकरण व्यानु श्रोत्र वाचा हें समस्त ॥ समूळ वेगळें ॥७६॥ वर्में धर्में कर्मेंसीं ॥ वायो वेगळाचि सूक्ष्मेंसीं ॥ सूक्ष्म तेथिचें तेणेंसीं ॥ विलक्षण तें ॥७७॥ मन समानु त्वचा कर ॥ हें कर्त्ते करणेंसीं इतर ॥ आतां तेज तैसेंचि अपर ॥ तें वर्में धर्में कर्मेंसीं ॥७८॥ तेथें बुद्धि उदान चक्षुपाद ॥ वेगलेचि ययाचे भेद ॥ आप विलक्षण तथाविध ॥ तें वर्म धर्म कर्मेंसीं ॥७९॥ चित्त प्राणु रसना शिश्न ॥ हें तया स्थूलेंसीं विलक्षण ॥ तद्वतचि मही स्थूळभूत भिन्न ॥ तें वर्म धर्म कर्मसहित ॥३८०॥ तेथें अहंकारू अपानु घ्राणु ॥ पायुसीं कर्त्ता विलक्षणु ॥ स्थूळ सूक्ष्म विभागु एतल्लक्षणु ॥ ऐसा जाणावा

---

१. 'व्योमा पांच दिही' असें नव्या पासोडींत लिहिलें आहे. पण मुळांत इतक्या अक्षरांची जागा असेल असें वाटत नाहीं. म्हणून आम्ही 'पांच' हा शब्द गाळला आहे.

॥८१॥ वीसा सूक्ष्माचें सूक्ष्म दळ ॥ विषय पंचकेसीं स्थूळ वेगळ ॥ येथें आन येकीं कुशळ ॥ युक्ति करिती ॥८२॥ स्थूळ विषय भूत गुण ॥ वासनामय सूक्ष्म आन ॥ तेही पांचीं मिळोन ॥ यें पंचविस तत्त्वें ॥८३॥ द्विविध कार्य स्थूळाचें ॥ तैसेंचि जाणावें सूक्ष्माचें ॥ कार्य कारण भाव तयाचे ॥ भेद सांगों ॥८४॥

द

सूक्ष्में तत्त्वें सांगींतलीं ॥ तीं द्विधा भेदें भेदलीं ॥ शरीराकारें रचलीं ॥ जीवा ईश्वरा ॥ ८५ ॥ तयामाजि येक थोर ॥ तें देवतामय ईश्वर शरीर ॥ हिरण्यगर्भ सविकार ॥ देह ह्मणती ॥८६॥ तैसें लिंगदेह जीवांचें ॥ तैसेंचि तें ईश्वराचें ॥ आतां देवतामय भेद तयाचे ॥ तेचि कवण ॥८७॥

१

प्रथम सत्वाचें स्फुरण ॥ निर्विकल्प अंतःकरण ॥ तेंचि विष्णुरूप होउन ॥ व्यक्ती आलें ॥८८॥

२

सत्वरजयोगें करून ॥ संकल्पात्मक मन ॥ तेंचि सोमरूप आपण ॥ साकारलें ॥८९॥

३

केवळ रजोगुण प्रधान ॥ निश्चयात्मक ज्याचें लक्षण ॥ ते मूर्तिमंत सगुण ॥ कमळजन्मा हा ॥३९०॥

४

रजतमयुक्त खरें ॥ चित्त जें अनुसंधानाकारें ॥ तेंचि नारायणरूप खरें ॥ अवतरे क्षीराब्धिशायी ॥९१॥

५

तमोगुणें अहंता ॥ सूक्ष्म जो कीं कर्त्ता ॥ तो श्रीमहारुद्र विचारितां ॥ अन सारिखें नव्हे ॥९२॥

६

पंचविधु कर्त्ता ज्ञेयु ।। तो ब्रह्मांडीं हा देवतामयु ।। कर्त्ता भोक्ता धेयु ।। ईश्वरु येणे रूपें ।।९३।।

७

चलनादि भावो हीनु ।। ब्रह्मांड व्यापी पवनु ।। तोचि वायो व्यानु ।। नैकवासी ।।९४।।

८

मध्यलोकीं राहोन ।। सर्वत्र करी चळन ।। नित्य जाणावें लक्षण ।। समानाचें तें ।।९५।।

९

ऊर्ध्वगती तो विचरे ।। तो उदानु वायु साचोकारें ।। आतां प्राणु तो ययानंतरें ।। सांगिजैल ।।९६।।

१०

पूर्व गतीचा प्राणु ।। विहरता जो प्रभंजनु ।। या नंतरे आनु ।। पवन कैसा ।।९७।।

११

अधोगती जो जाय ।। तो अपानु असे आहे ।। प्राणपंचक ऐसे होय ।। ब्रह्मांडीं हे ।।९८।।

१२

ब्रह्मांडीं पंचविधु ।। वायो जो बोलिला सिद्धु ।। चाळक तथा विधु ।। प्राणु जाणावा ।।९९।।

१३

शब्दाचीं घेती द्वारें ।। श्रोत्रेंद्रियें पवित्रें ।। तीं जाणावीं दिगंतरें ।। ब्रह्मांडीं यये ।।४००।।

१४

स्फुरे जेणें स्पर्शज्ञान ।। ऐसें त्वगेंद्रिय जें सुलक्षण ।। ते वायो देवत सगुण ।। जाणावे देवतामय ।। १ ।।

१५

रूप गुणातें जाणती ।। ऐसे चक्षु ज्ञानेंद्रिय होती ।। सूर्यो तयांची व्यक्ती ।। निरंतर पैं ।। २ ।।

१६

रस विषया अ (नु) भवी ।। ते रसना (क) वण जाणावी ।। (वरुण जो प्रत्यक्ष भार्वा ।। देवता साकारें) ।। ३ ।।

१७

घ्राण जें (परम पु) रुषाचें ।। ज्ञान जेणें गंधाचें ।। तें अश्विनौ देव साचें ।। देवत सगुण ।। ४ ।।

१८

ईश्वराचें पंचविध ।। ज्ञानकरण जें सिद्ध ।। ते देवतामय यथाविध ।। ऐसें सांगीतलें ।। ५ ।।

१९

ईश्वरातें जें वागेंद्रिय ।। चतुर्विध असे ज्ञेय ।। तेंचि पाहातां देवतामय ।। रूप अग्नीचें ।। ६ ।।

२०

पाणींद्रिय ईश्वराचें ।। जें कार्य निपजवी ग्रहणदानाचें ।। तेंच रूप इंद्राचें ।। व्यक्त वोळखावें ।। ७ ।।

२१

पाद विचरते त्रिपुरीं ।। तें देवत कवण ईश्वरीं ।। तरि वामनु ऐसी कुसरी ।। जाणावी बोलाची ।। ८ ।।

२२

शिश्न उत्पत्तीचें कारण ।। तें प्रजापति रूपें (सगुण) ।। देव (ता रूपें पुरा) तन ।। वर्त्तत असे ।।९।।

२३

(पायु) कर्म करण ईश्वरीं ।। आतां तें देवत कवण तरि ।। नैर्ऋति देव अभ्यंतरिं ।। जाणावी खूण ।।४१०।।

२४

कर्म करणाचे पंचविध ।। जे कीं अनादि ईश्वरीं भेद ।। ते देवतारूप सिद्ध ।। प्रकट केलें ।।११।।

२५

शब्द विषयो अंतःकरणी ।। तो गुणु तये गगनी ।। नाना भेद तयापासूनि ।। होते जाले ।।१२।।

२६

स्पर्श विषयो मनातें ।। आतां तो गुण पवनातें ।। अतएव निरंतरू वर्त्तें ।। पवनी तये ।।१३।।

२७

रूप विषयो बुद्धीसी ।। तों गुणु तया तेजासी ।। यालागि सोडून तयासी ।। तो न शके असों ।।१४।।

२८

रस विषयो चित्तातें ।। तो गु (णु तया) आपातें ।। ह्मणउन आपींच वर्त्तें ।। तयाचें स्थान ।।१५।।

२९

अहंकारा विषयो गंधु ।। तो पृथ्वीतें गुणु प्रसिध्दु ।। ह्मणौनि तया भेदु ।। नसे तेणेंसीं ।।१६।।

३०

भोक्तया विषय पंचक ।। ते पांचहि गुण भौतिक ।। तयाचे भेद सकळैक ।। तो हा प्रपंचु ।।१७।।

त्ता

सूक्ष्मां तत्वांचें सविकार ।। कार्य दुसरें तें लिंगशरीर ।। तयाचे भेद समग्र ।। सांगिजति ।।१८।।

१

अध्यात्म अंतःकरण ।। अधिभूत तें निर्विकल्प स्फुरण ।। अधिदेवत सगुण ।। विष्णु तेथें ।।१९।।

२

अध्यात्म मन ।। अधिभूत संकल्पात्मक स्फुरण ।। चंद्र अधिदैवत ह्मणौन ।। जाणावें तेथें ।।४२०।।

३

अध्यात्म बुद्धि जेथें ।। अधिभूत बोधव्य तेथें ।। अधिदेवत तेथें ।। जाणावें ब्रह्मा ।।२१।।

४

चित्त अध्यात्म खरें ।। चेतव्याधिभूत स्फुरे ।। अधिदेवत निर्द्धारिें ।। तेथें नारायणु ।।२२।।

५

अध्यात्म अहंकारू ।। अधिभूत अहंतव्य निर्द्धारू ।। दैवत तेथें रुद्रु ।। ऐसें जाणावें ।।२३।।

६

अंत:करणादि पंचक ॥ जीवस्थानी ऐसें येक ॥ अंश रूपें अनेक ।। करणचि भेदलें ।।२४।।

७

सर्व शरीर व्यापणें धातु सामग्री शोषणें ।। [1]नाहीं डीचा ठांयीं स्पंदनें ।। धर्म व्यानाचे ।।२५।।

८

समानु नाभी वसे ।। सकळां संधीं प्रवेशे ।। शरीर चांचलन आपैसें ।। तेणें होय ।।२६।।

९

कंठीं वसे उदानु ।। ऊर्ध्व स्पंदे तो पवनु ।। आतां पूर्व गती प्राणु ।। तोंची कैसा ।।२७।।

१०

क्षुधा तृषा प्राणाची ।। हृदयीं वस (ति जयाची) ।। (पूर्वगती स्वभावेचि ।। ठायी तयाचा) ।।२८।।

---

१. मुळांत 'नाही डीचा' असें स्पष्ट आहे. परंतु तेथें 'नाडीचा ठांगीं' असावयाला हवें असें वाटते. एक 'ही' अधिक लिहिली गेली असावी.

११

अधोगतीचा अपानु ।। गुदीं वसती तया लागून ।। करीं मळाचें विसर्जन ।। स्वाधीन स्वभावेंचि ।।२९।।

१२

ऐसा पंचकु प्राणाचा ।। पंच (कु स्व) भावु तयाचा ।। देहे चेष्टे जीवाचा ।। साकारु येणें ।।४३०।।

१३

अध्यात्म श्रोत्र जेथें ।। अधिभूत श्रोतव्य तेथें ।। दिशा अधिदैवत ।। निरंतर ।।३१।।

१४

त्वगेंद्रिय अध्यात्म ।। स्पर्शंयितव्य अधिभूत वर्म ।। अधिदेवत अनुपम ।। वायो येथ ।।३२।।

१५

चक्षु अध्यात्म जाणावें ।। द्रष्टव्य अधिभूत मानावें ।। सूर्य तेथें वोळखावें ।। अधिदेवत पैं ।।३३।।

१६

रसना अध्यात्म (केवळ ।। रसयितव्य अधिभूत समूळ) ।। (वरुण अधिदेव कुशळ ।। जाणती सर्व) ज्ञ ।।३४।।

१७

घ्राण अध्यात्म खरें ।। घ्रन्तव्य अधिभूत बरें ।। देवत साचोकारें ।। अश्विनौदेव ।।३५।।

१८

ज्ञानेंद्रिय पंचक ।। पिंडीं जाणावें हें अवश्यक ।। विषय जाणावे[1] हे सकलैक ।। तयाचेनि प्रकाशें ।।३६।।

१९

वाचा अध्यात्म साचोकारें ।। वक्तव्य अधिभूत खरें ।। अग्नि तेथें निर्द्धारें ।। जाणावें अधिदैवत ।।३७।।

---

१. 'जाणावेत हें,' मुळांत 'त' च्या जागीं चरण समाप्तीच्या रेघा आहेत.

२०

पाणि अध्यात्म सगुण ।। अधिभूत ग्रहण दान ।। इंद्र अधिदेवत ह्मणौन ।। जाणावें तेथें ।।३८।।

२१

पाद अध्यात्म बोलावें ।। गंतव्य अधिभूत स्वभावें ।। वामनु निरंतर जाणावें ।। तेथें अधिदेवत ।।३९।।

२२

शिश्न अध्यात्म खरें ।। आनंद अधिभूत साचोकारें ।। प्रजापति जाणावें ।। विचारें ।। तेथें अधिदेवत ।।४४०।।

२३

पायु अध्यात्म करण ।। अधिभूत विसर्गतव्य लक्षण ।। नैर्ऋति देव सगुण ।। देवत तेथें ।।४१।।

२४

पंचक्र कर्म करणाचें ।। पिंडीं कर्मसाधन जीवाचें ।। सांगीतलें येथिचें ।। सकळ विवरण ।।४२।।

२५

शद्ध विषयो अंत:करणी ।। तो गुणु वर्त्ते गगनी ।। तो स्थूळ येथें कारणी ।। वासना–मयु ।।४३।।

२६

स्पर्श विषयो मनातें ।। तो वासनामयु तेथें वर्त्ते ।। स्थूळ तो गुणु पवनातें ।। ह्मणौन पवनी ।।४४।।

२७

रूप बुद्धीतें विषयो ।। सूक्ष्म तया तोचि आश्रयो ।। स्थूळ तेजीं गुणु उभ्दउ लयो ।। तदंगेंचि तया ।।४५।।

२८

रस विषयो चित्तातें ।। तो वासनामयु चित्तीं वर्त्ते ।। स्थूळ रूप तेजातें ।। गुणु तो तेजीं ।।४६।।

२९

गंधु विषयो अहंकारा ।। अहंकारीं वासने तये थारा ।। स्थूळें गंधें धरा ।। सांडिलीचि नसे ।।४७।।

३०

विषयपंचक वासनामय ।। तें अंत:करणपंचकीं ज्ञेय ।। स्थूळ विषय भोग्य भय ।। ते भूतगुण भूतीं ।।४८।।

त्रे

पंचमहाभूतें स्थूळें ।। तयाचें द्विविध कार्य निपजलें ।। तया-माजि थोरलें ।। विराट ये (क जें) ।।४९।। (स्थूळ शरी)र ईश्वराचें ।। (रचलें भूत पंच) काचें ।। विव (रण संपूर्ण तया)चें ।। संक्षेपे (चि सांगितलें) ।।४५०।।

१

नाभीपासूनि पाद (तळें ।। जयाचें तें सात) हि पाताळें ।। (ठायीं) ठांयीं (स्थळें ।। तया लो) कांचीं ।।५१।। नाभिपासाव मस्तक वरि ।। स्वर्गें सातहि कुसरि ।। ऐसें ब्रह्मांडा अंतरीं ।। विराट शरीर हें ।।५२।। तयातें नाथी चळन ।। परंतु सहस्र चरण ।। ग्रहण दानें वांचून ।। सहस्र कर ।।५३।। सहस्र नयन विशाळ ।। विराट पुरुषातें केवळ ।। सहस्र मुखें ज्वाळ ।। तेथें अग्नीचे ।।५४।। यमु करकरींति दाढारें ।। दर्शनी तेजचि स्फुरे ।। जिव्हा लोल अभ्यंतरें ।। वलितपिलित ।।५५।। दिशांची जे पोकळी ।। तेचि श्रवण रंध्रें जालीं ।। वडवाग्नि त्रिपुर जाळी ।। ऐसा तो जठरू ।।५६।। सप्त सागर ते कुक्षी ।। सप्त द्वीपावर्त्ती कटि प्रदेशीं ।। रेत वृष्टि निर्द्धारेंसीं ।। वर्म जाणावें ।।५७।। तृण वृक्ष विशेषता ।। औषधी गुल्मलता[1] ।। केश रोमावली समस्ता ।। विराटासी ।।५८।। नदिया नद नाडी नाना ।। ऐसी हे पुरुष कल्पना ।। अनंत जीव-सृष्टि-रचना ।। तें जया आधारें ।।५९।। देव पितर-

---

१. मूललता.

ऋषिगण ।। आणि मनुष्य देह आन ।। यया समस्तांतें स्छान ।। शरीर जें ।।४६०।। कटि प्रदेशीं सकळ ।। जीवसृष्टी असे केवळ ।। चरणाचां ठांयीं व्याल ।। आणि लोक नादती ।।६१।। ब्रह्म रंध्र तें सत्यलोकु ।। नेत्रस्थान सूर्यलोकु ।। रसना जाणावा वरुण लोकु ।। विराटासी ।।६२।। ऐसीं स्थान मानें देवांची ।। (कीं) सकळें शरीरें ययांचीं ।। ह्मणौनि विश्वाधारमय हेंचि ।। येक जाणावें।।६३।।

य

जैसें विराट ईश्वराचें ।। तैसेंचि स्थूळ शरीर जीवाचें ।। कार्य दुस (रें महा) भूतांचें साकार जें ।।६४।।

१

अस्थि मांस त्वचा नाडी ।। पांचविधा रोमा परवडी ।। देहीं विकारीं फुडी ।। पृथ्वी जाणावी ।।६५।। स्वेदु लाल रक्त वीर्य ।। स्नायुमज्जादि सारद्र ज्ञेय ॥ तेंचि आप ध्येय ।। शरीर संबंधी ।।६६।। क्षुधा तृषा मैथुन निद्रा ।। हे उष्णधर्म वैश्वानरा ।। वर्त्तती तया स्थूळ शरीरा ।। आश्रयोनि ।। ६७ ।। चलन गमन धावन ।। निरोध सादन प्रसारण ।। हे चंचळ गुण ह्मणौन ।। पवनाचे पिंडीं ।। ६८ ।। भय काम क्रोधु ।। मोह शोकु यथाविधु[1] ।। हा व्यापकु गुणभेदु ॥ तया व्योमाचा ।। ६९ ।। पांच भौतिक निर्माण ।। औठ हस्त प्रमाण ।। यया शरीराचें कारण ।। पुण्य पाप ।।४७०।। हा शुक्ल रक्त संयोगु ।। देह निर्माण जाला सांगु ।। पड्विकारीं कर्मसंगु ।। व्यक्ती आला ।।७१।। आधीं व्यक्तीविण असणें ।। शुक्ल[2] रक्ताकारें तेणें ।। पाठीं मग निर्माण होणें ।। मातेगर्भीं ।।७२।। नवां मासां उपजला ।। उपजतां वाढों लागला ।। तारुण्यभरें पूर्ण जाला ।। उत्तार तेथूनि ।।७३।। वार्ध्दक्य पातलयावरि ।। इंद्रिय बळ नाही शरीरीं ।। पालटला निजाकारी ।। विशेषें क्रमें ।।७४।। शुद्धा ब्रह्मापासून ।। केलें भूतांचें निर्माण ।। तें जाणता अति गहन ।। धारणा न धरवे ।।७५।। आतां

---

१. यया विधु. २. शुक्र.

धारणेवीण विचारू ॥ सांगीतला हा प्रकारू ॥ येकु (करावा) ॥७६॥ भावार्थ संक्षेपें बोलावा ॥ तरि तोचि प्रकारू एकावा ॥ पाठ करून ठेवावा ॥ अंतरीं हा ॥४७७॥

अहंकाराचीं तत्वें १	सात्वि	कु अहंकारू	राजसुहंकारु क्रिया			तामसाहंकारू द्रव्य			
कर्त्तयापासाव करण २			रज	सत्व	तम				
कर्त्तयापासाव करणजाळ कैसें ३	सत्व	अंतःकरण	व्यानु	श्रोत्र	वाचा	शब्दु	सत्व	आकाशु	आकाशी शब्दु वर्म सछिद्रता धर्म अवकाशें प्रदानें कर्म
स्थूलीं सूक्ष्म प्रवेश ४									
स्थळीं सूक्ष्म कैसें ५	रज	मन	समानु	त्वक्	वाणी	स्पर्शु	रज	वायो	प ना शब्द स्पर्श वर्म च ल्यादिक धर्म वि रणादिक कर्म
विषयापासाव भूतें ६									
भूतांपासाव भूतें ७	रज	बुद्धि	उदानु	चक्षु	पाद	रूप	रज	तेज	तेज शब्द स्पर्शरूप वर्म उष ता हे धर्म पच प्रकाशनादिक कर्म
विषययोगें (भूतापासाव भूतें ८)									
(कर्त्ताकरण कार्य ९)	९ जतम	चित्त	प्राणु	रसना	शिश्न	रस	रजतम	आप	आ शब्द स्पर्शरूप रस हें र्म. सारद्रता हे धर्म क्ले नादिक कर्म
(आधारें कवण करणें कार्य कर्म १०)	तम	अहंकारू	अपानु	घ्राणु	पायु	गंध	तम	पृथ्वी	पृथ्वीसि शब्दस्पर्शरूपरस गंधु, हे वर्म काठिण्यादिक धर्म, धारणादिक कर्म
		कर्तृपंचक	चेष्टाकरण पंचक	ज्ञानकरण पंचक	कर्मकरण पंचक	विषय पंचक		महाभूतें	

[या विभागासाठीं ५ फूट २ इंच जागा लागली आहे. आरंभीं ३५ ओळी सलग असा मजकूर लिहिलेला असून त्यानंतर ठळक अशा तीन कपाटाकृति काढून त्यांत लेखन करण्यांत आलेलें आहे. या तिन्ही कपाटाकृतींची कल्पना येण्यासाठीं ज्या ठिकाणीं त्या प्रारंभ होतात तेथेंच त्या एकत्र देण्यांत आलेल्या आहेत. प्रत्येक कपाटाकृतींतील चौकोनास स्वतंत्र क्रमांक देण्यांत आलेला असल्यानें, कोणता मजकूर कोठें आहे; याची वाचकांना चटकन कल्पना येईल. या विभागांतलि शेवटचा भाग १।२ ठिकाणीं फाटलेला आहे. कपाटाकृति संपल्यानंतर सीमारेषा आंखून या ८ व्या आणि ९ व्या विभागांत ३ इंचाची जागा रिकामी सोडून देण्यांत आलेली आहे.]

शुद्ध ब्रह्म निरंजन ।। निरुपाधिक निर्गुण ।। प्रपंच हा तया-
पासून[1] ।। जाला प्रकारें येणें ।।४७८।। जीवेश्वर भावें भिन्नु ।।
ब्रह्मीं प्रपंच हा सगुण ।। अनादि सिद्धु सनातनु ।। असे जैसाचि
।।७९।। अैसें करितां निरोपण ।। आशंके प्रवर्त्तलें मन ।। मग आक्षेप
तयांपासून ।। स्फुरला तो कैसा ।।४८०।। अनादि ब्रह्म निर्गुण ।।
तेथें तेणेंसीं विलक्षण ।। अनादि जीव ईश्वर कवण ।। संत दुसरें
।।८१।। तीहीं तें अनादित्व घडे ।। तैं ब्रह्म अद्वय फुडें ।। ऐसें पूर्व
निरोपण तें न घडे ।। कदाकाळीं ।।८२।। तीहीं तो भेदु संतु वर्त्ते ।।
तैं येकदेशित्त्व आलें निरूतें ।। आतां मध्यें अंतर तयातें ।। चौथें
पाहिजे ।।८३।। तेणें असंतें भेदु असंतु ।। एवं चहु संतांचा सांघातु ।।
. . . . . ।। पुडती तैसाचि[2] ।।८४।। असंत ऐसें
तया लक्षण ।। न घडे पांचवेन अंतरें वीण ।। आतां तें संत किं
असंत कवण ।। काय पां कैसें ।।८५।। यापरि अंतर विचारितां ।।
केवळ होय अनवस्था।। ह्मणों नाना संतें तत्वतां।। संत तें येक।।८६।।

---

१. पासोन. २. मुळांतच या ओंवीचे तीन चरण आहेत.

संतासंत किं असंत ।। दुजें मानावें जें व्यक्त ।। प्रतियोगि संतासंत ।। हें तंव न घडे ।।८७।। आतां असंत संतां दुसरें ।। तें असभ्दावी तें खरें ।। तैं वंध्यापुत्रु देशा उरे ।। गेला घडे ।।८८।। ऐसया आक्षेपा परिहारू ।। ब्रह्मीं सभ्दाओ तो निरंतरू ।। आतां येकु जीव येकु ईश्वरू ।। तये ठांयीं ।।८९।। हा औपाधिकु भेदु मानावा ।। उपाधि विनाशी अभेदु जाणावा ।। ऐसा आक्षेप परिहरावा ।। तंवं येक सूचे ।।४९०।। उपाधि संत किं असंत ॥ संतु तैं विनाशु[1] हें अघटमत ।। असंत तैं मिथ्याभूत ।। पहिलेंचि नसावें ।।९१।। उपजोनि मरण साहे ।। ऐसा वंध्यापुत्रु कें आहे ।। यापरि औपाधिकु हे भेदु काये ।। कैसी युक्ती ।।९२।। ऐसया आक्षेपा निवारण ।। असतांच द्विविध लक्षण ।। येक तें वंध्यापुत्रासमान ।। अत्यंताभावरूप ।।९३।। दुसरें पृथग संत जाणावें ।। जे वेगळें निवडितां संत नव्हे ।। अधिष्ठानान्वयें मानावें ।। तेणेंसीं विपरीत ।।९४।। जैसें किरणेंसिं अनारिसें ।। मृगजळ सत्य आभासे ।। जाणतयाही मान असे ।। आभासतचि तें ।।९५।। परंतु किरण व्यतिरेकें पाहातां ।। कांहींचि कोठें नसे तत्वता ।। तैसी उपाधि जाणतां ।। जाणावी ब्रह्मीं ।।९६।। विवर्त्तरूपें उपाधि कल्पिता ।। तो औपाधिकूचि संचला ।। भानमात्रचि परि निर्धारिला ।। कांहीं नसे ।।९७।। ऐसा परि (हारू) करितां ।। आक्षेपु उपजला मागुता ।। अहो औपाधीकु[2] भेदु तत्वता ।। विवर्त्तु जैं ।।९८।। तैं गुणसाम्यावस्थे ।। गुणेंसीं प्रकृति तेथें ।। विवर्त्तोज्ञप्ति–मात्र स्फुरण तेथें ।। असे परब्रह्मीं ।।९९।। ते ब्रह्मेंसीं नव्हे विलक्षण ।। आनंदमय स्फुरे स्फुरण ।। यये अर्थीं प्रमाण ।। वेदूचि असे ।।५००।।

प्रज्ञानं ब्रह्म ।। छ ।। विज्ञानं ब्रह्म ।। छ ।।
प्रज्ञाप्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ।। छ ।।
सत्यंज्ञानमनंतं ब्रह्म ।। छ ।।

---

१. या चरणांतील 'हें' हें अक्षर नवीन पासोडींत गाळलेलें आहे. २. औधाधीकु.

इत्यादि नाना श्रुती ।। आतां अनुभउ ही प्रमाण आथी ।। तेचि आतां कैसी युक्ती ।। बोलिजैल ।। १ ।। मृगजळ मृगातें ।। भानमात्र तें हीं इतरांतें ।। परंतु तेंचि तें आपणातें ।। आपण कैसें ।। २ ।। निवर्त्ता आपुला निर्द्धारू ।। आणि तन्निरासें अधिष्ठान साक्षात्कारू ।। ऐसा काय घडे प्रकारू ।। साचोकारें ।। ३ ।। मृगजळ निरसूनि आप (णातें) ।। जाणे (अधिष्ठाना) किरणातें ।। ना तें स्पर्शे सूर्यातें ।। तरि हें घडे ।। ४ ।। उपाधि-भेदाचें निरसन ।। जाणे विवि (क्ता) त्म ज्ञानें करून ।। शुद्ध ब्रह्म अनुभऊन ।। युक्ति करी ।। ५ ।। ब्रह्मचि ब्रह्माचें सुखज्ञान ।। ब्रह्मचि ब्रह्माचें स्फुरण ।। यया वेगळेंही जें भान ।। तेंहि हेंचि ।। ६ ।। येसणा अनुभउ विवर्त्ता ।। हें तंव न घडे सर्वथा ।। आन येकि व्यवस्था ।। विपरीत येथें ।। ७ ।। विवर्त्तु ह्मणिजे कैसा ।। तो तया मृगजळा ऐसा ।। ना (नात्वें तया विद) शा ।। हें केविं घडावें ।। ८ ।। यद्यपि भासले भिन्न भिन्न ।। तरि अभेद न लगे साधन ।। भेदु तैसें येकपण ।। सहज तयाचें ।। ९ ।। भासलें भान विनाशें ।। पुडती काय तेंचि भासे ।। जेणें समाधि विसुकुसे ।। असमाधि होये ।।५१०।। याचिया निरासाकारें ।। वेदशास्त्र पुराणें ।। योग अभ्यास वचनें ।। महानुभावांचीं ।।११।। विवर्त्ता परिहारू ।। ऐसा न घडतां प्रकारू ।। हा न तुटतां ब्रह्मसाक्षात्कारू।। नव्हे (हें कां) ।।१२।। (ऐ) सया आक्षेपा वचन ।। आनंदमय जें स्फुरण।। तें पुरुषाचें निर्गुण।। स्वरूप शिव।।१३।। सच्चिदैक रसमयु।। सदसदात्मकु पुरुषु ज्ञेयु ।। तो विवर्त्तु साक्षी ध्येयु ।। ऐसें मानावें ।।१४।। अधिष्ठान साक्षात्कारू ।। तयातें बोधु समग्रु ।। विवर्त्तांत परि ईश्वरु ।। न ह्मणावा तो ।।१५।। अपर प्रकृति गुणमयी ।। देहें अवस्था सत्य प्रपंचमयी ।। ते विवर्त्तांचां ठांयीं ।। भासे तयातें ।।१६।। ऐसें करितां (निरोपण ।। आशंका) उपजली मागुतेन।। अपर प्रकृति ते भिन्न ।। तेणेंसीं कैसीं ।।१७।। सकळा अवस्थांचा

विलईं ।। तीतें स्थान कवणें ठांईं ।। हा वेगलाचि विवर्त्तेंसीं जईं ।। सदसदात्मकु ।। १८ ।। तैं विवर्त्तु नाशला अघवा ।। तो या पासाव कां स्फुरावा ।। देहें येणें न प्रकाशावा ।। आत्मबोधु तो ।। १९ ।। गेली अवस्था स्वभावें ।। ते ययाचाच ठांईं सामावे ।। कां जे मागुती उद्भवे ।। ययाचि पासून ।।५२०।। हा वेगळाचि विवर्त्तेंसीं ।। तैं देहावस्छां गुणांसीं ।। मा गुरु उपदेशुचि ययासी ।। तो कैसा (फळता) ।।२१।। ऐसिया आक्षेपा परिहारु ।। विवर्त्तु भास जो अपरू ।। तयाचा करितां विचारू ।। कैसा असे ।। २२ ।। गुणकृत तें संकल्प (ळ[1]) भान ।। गुणा गुणा अनित्यपण ।। येकें अभान ।। भान भासे ।।२३।। संतु तो तैं कां नाशे ।। असंतु तैं कां भासे ।। अव्यक्तु तैं दिसे ।। प्रत्यक्षु कां ।।२४।। व्यक्त तैं अव्यक्तीं ।। सामावे मूळ ज्ञाप्ति ।। आतां भिन्नु ऐसें बोलती।। गुंपती तेही ।।२५।। भिन्नु तैं निरसावा ।। निवासीं आपुला नुरावा ।। जैसा तैसा न स्फुरावा ।। निरासा वरि ।।२६।। अभिन्नु तैं ययालागून ।। कैसें साहातें निरसन ।। आंगीं विपरीत गुण ।। ते कांहीं नसते ।।२७।। ऐसा अभासु गुणकृतु ।। गुणी आभासे अनित्यु ।। इतुलयाचि साटीं विवर्त्तु ।। ऐसा कल्पिला ।।२८।। वांचूनि जें दृश्यभान ।। तें सकळ प्रकृति गुण ।। अधिष्ठाना ययासीं आन ।। बोलोंचि नये ।।२९।। सदसदात्मकु जो पुरुषु ।। हा जो देखे आभासु ।। देहें अवस्था विशेषु ।। प्रपंचु जो जो ।।५३०।। तो येणेंसीं नसे वेगला।। अतएव सदसन्मयूचि सकल ।। परंतु तेणें रूपें आळमाळ ।। न (कल्पावा) हा ।।३१।। कां जें आभासु तो जैं प्रकृतीचा ।। आणि सत्यभा ॐ[2] सद्रुपाचा ।। तैं नियमु येथिचा ।। तो ऐसा आहे ।।३२।। असदंगत्वें भान ।। तें असताचि परि अभान ।। हाचि अवघे परि निर्वाण ।। स्वरूप कैसें ।।३३।। हा कांहीचि नव्हे तें सकळ ।। कां बोलों नये मृगजल ।। मिथ्या ह्मणतां बरल ।। हासती ते ।।३४।।

---

१. मूळांतच 'ळ' हें अक्षर अधिक पडलेलें आहे. २. सत्याभांऊ.

तेणेंचि अंगें पाहावें ।। (असत्य) ही सुखें ह्मणावें ।। हें युक्तीचें मत्त अवघें ।। अ (से) ना (कां) ।।३५।। (ऐ) सेंचि असतां भेदु ।। कां विक्षेप मानिती साधु ।। असतेन भेदेंसीं अभेदु ।। सत्तान्वयें जैं ।।३६।। ऐसेनि भेदें भिन्न ।। जीवेश्वर असती ह्मणौन ।। बोलता येथें मन ।। आशंका धरी ।।३७।। अनंतधा भेद भिन्न ।। पुरुषु असावया कवण कारण ।। येक ब्रह्म अधिष्ठान ।। तें विवर्त्तु येकु ।।३८।। येकचि शुद्ध (आधी) ।। तें येकि त (याची प्रकृति) ।। (येक) शबल व्यक्ती ।। तेचि पावे ।।३९।। अनंतें जीव (रूपें भिन्न ।। हा असावा कवणें) कारणें ।। यये आशंके परिहारणें ।। लागेल आता ।।५४०।। अखंड ब्र (ह्म नि) रंजन ।। (ते) येक अधिष्ठान ।। तेथे येकि प्रकृति गुण ।। तीनीचि तियेचे ।।४१।। तीणेंसीं युक्त शबळ ।। तें येकचि तत्वमूळ ।। ईश्वरु ऐसें केवळ ।। अभिधान तया ।।४२।। (तो) परमात्मा सर्वेश्वरू ।। कारण (रू) प परात्परू ।। तया पासाव (जीव "विस्तारू" ।। अनादि) हा ।।४३।। आतां पूर्णा ईशा पासून ।। कैसें जीवाचें निर्माण ।। तें (सांगावें येथू) न ।। विवेकेंचि ।।४४।। परमात्मा परमेश्वरू ।। तो मुख्य बिंब निराकारू ।। ("जीवात्मा" तेणेसी इतरू) ।। तो प्रतिबिंब तयाचें ।।४५।। जैसें येकचि मुख आपुलें ।। दर्पणीं दिसे प्रतिबिंबलें ।। तैसें ईश्वर तत्व येकलें ।। जालें दो (ठांयीं) ।।४६।। (अहो 'दृश्य' रूपें) जें स्फुरावें ।। तें दर्पणेवीण ते न संभवे ।। आतां दर्पण स्थानी मानावे ।। (कवण तत्व) ।।४७।। (ऐसी) परिहारावी उक्ती ।। तरि दर्पण स्थानी अविद्या शक्ति ।। हा हो जीवापूर्वी कोठें होती ।। अविद्या हे ।।४८।। माया कृती ईश्वराची ।। तैसीचि अविद्या प्रकृति जीवाची ।। ("जाली" पूर्वी ते कैंची) ।। ऐसी आशंका ।।४९।। जीवा पूर्वी अविद्ये स्छान ।।

" " अशा अवतरण चिन्हांतील शब्द पासोडीची नवी प्रत तयार होत असतानांहि मुळांत नव्हते. नवी पासोडी लिहिणारांनीं संभवनीय म्हणून ते दिले आहेत.

तरि ते जाली ईश्वराचि पासून ।। अविद्या नामें आत्मा ज्ञान ।। ऐसें (जाणावें) ।।५५०।।

ब्रह्मवा–इद++आसीत्तदात्मानमेवावेदाहं
ब्रह्मास्मीति ।। तस्मात्तात्सर्वमभवत् ।।

ऐसें हें वेदाचें वचन ।। जें पूर्वीं ईश्वरा आत्मज्ञान ।। तेंचि अविद्या तेंचि कारण ।। सकळे जीव सृष्टीचें ।।५१।। अज्ञान पूर्वकु अ (ह) कारु ।। तोचि अंशत्वें ईश्वरु ।। जीव (त्वें ध) रूनि अवतारू ।। संसारीं खेळे ।।५२।। तिये अविद्येचा ठांईं प्रतिबिंबलें ।। चैतन्य जीवरूपें स्फुरलें ।। मग अनंतधा विस्तारलें ।। तेंचि होउनि ।। ५३ ।।

आत्मानंदे · · · · मातयतः ।।

ऐसा ययें श्रुतीचा विचारू ।। (जो अज्ञान पूर्वकु सुविचारू)।। तो आपणाहोनि इतरु ।। शंकिला ईश्वरें ।। ५४ ।। तयाची स्त्री पुरुषें जालीं ।। मिथुन योगें सृष्टि रचली ।। येणें प्रकारें खंडिली ।। आशंका ते ।। ५५ ।। अहो निराकारा ईश्वरातें ।। प्रतिबिंब घटे कव (णे) मत्तें ।। ऐसी आशंका येथें ।। होती जाली ।। ५६ ।। तरि निराकार गगन जैसें ।। दर्पणी प्रतिबिंबलें आभासे ।। निरा–कारत्व तैसें ।। अविद्या दर्पणीं ।। ५७ ।। (अहो) गगन जैसें अनाकार ।। तसेंचि प्रतिबिंब ही निराकार ।। परि अरूपवंताचें साकार ।। प्रतिबिंब हें ।। ५८ ।। यया आक्षेपा परिहारू ।। करिजैल तो आइको चतुरू ।। परमात्मा नित्यु निराकारु ।। प्रकृती अंतरंगत्वें ।। ५९ ।। अंतरंगु साक्षी विलक्षणु ।। तो मायायोगे सगुणु ।। गुण योगें आपणु ।। आकारुही होये ।।५६०।। [1]ऐसा साकारु निराकारु ।। परमात्मा सर्वेश्वरु ।। · · · · · · · · · · · · ।। जाणावें हें ।। ६१ ।। स्वप्नी दृश्य जैसे पुरुष ।। तैसेचि जीव ईश ।। आपुलया स्वरूपाचे अंश ।। आपणासीं व्यवहारते ।। ६२ ।। तरि स्वप्नि

---

१. मुळांत या ओवींत तीनच चरण आहेत.

द्रष्टा जो येकु आथी ।। तेणेंचि यावें जागृती ।। येर पुरुष भ्रांति ।। ते नसती कांहींचि ।। ६३ ।। तैसे ईश्वरा होतेचि आपुलें ज्ञान ।। जीवसृष्टीचे पाहिजे निराकरण ।। पुनरपि मोक्षाचें साधन ।। तें काय पाहिजे ।। ६४ ।। आतां ईश्वरु नित्यज्ञानी ।। ययां जीवां सत्य कां मानी ।। ज्ञान–दाता भजनी ।। प्रसन्नु होये ।। ६५ ।। स्वप्न दृश्यां पुरुषांतें ।। येणें नाहीं जागृतीते ।। आणि ब्रह्म साक्षात्कारु जीवांतें ।। हा तंव रोकडा ।। ६६ ।। ईश्वरत्वाचां कारणी ।। जिउ पावे ब्रह्मीं निर्गुणीं ।। मागुता देहावरि येउनि ।। उपदेशी आना ।। ६७ ।। स्वप्न आभासोनि नाशलें ।। तें पुनः न भसे कांहीं केलें ।। आणि हें तंवं पहिलें ।। तेंचि दिसे ।। ६८ ।। आक्षेपु उपजला ऐसा ।। आतां परिहार तो येथ कैसा ।। जीवु ईश्वरांशु अनारिसा ।। नव्हे हा शब्दु ।। ६९ ।। येका अग्नीचे अनेक ।। प्रतिबिंब होती दीपक ।। तैसे ईश्वरांश सकलैक ।। जीव जाणावे ।।५७०।। ऐसेनि वेदवाक्य प्रकारें ।। ईश्वरांशु जीव खरें ।। ह्मणतां आशंका स्फुरे ।। अनिवार ते ।। ७१ ।। अग्न्यंश भेदा स्थान ।। उपाधि भेदु असे कारण ।। दीप भेदु तो जेणें विण ।। वर्त्तीं न शके ।।७२।। ऐसा अद्वैतु ईश्वरु पूर्णु ।। तेथें उपाधि भेदु तो कवणु ।। तरि केवळ अविद्या लक्षणु ।। जाणावा तो ।। ७३ ।। अविद्या येकि कीं अनंता ।। ऐसाचि आक्षेपु करितां ।। अविद्या अनेकी यया मता ।। मानु दिधला ।। ७४ ।। अहो अविद्या येकि होती ।। तैं येकें ज्ञानें समस्तां मुक्ती ।। साधक कासया श्रमती ।। उपदेशितां गुरु ।। ७५ ।। अहो अविद्या ह्मणिजे अज्ञान ।। प्रथम जाले ईश्वरापासून ।। तो येकु तैं तेणेंसीं अभिन्न ।। येकचि तें ।। ७६ ।। अनंत होती पुरुष ।। तैं अनंत अज्ञान दोष ।। अविद्या गुणविशेष ।। मानावे ते ।। ७७ ।। ऐसिया असे आक्षेपा परिहारु ।। बोलिजैल अविद्या विचारु ।। अहो येकु प्रथम सर्वेश्वरु ।। हें अनारिसें नव्हे ।। ७८ ।। आपुलें अज्ञान ईश्वरांतें ।। अविद्या ह्मणिजे येकीचि ते ।। मूळाविद्या ऐसें जीतें ।।

असे अभिधान ॥७९॥ ते ईश्वरींचि असतां ॥ कार्यरूप अविद्या अनंता ॥ जीव सहिता व्यक्ता ॥ जालिया त्या ॥५८०॥ आपुलेनि अज्ञानें करून ॥ ईश्वरा जालें प्रपंच स्फुरण ॥ अपार जीवसृष्टि हो ह्मणौन ॥ येणें आकारें ॥८१॥ येकचि स्फुरण जालें ॥ तें इछेस्तव अनंतधा भेदलें॥ तैं येकचि अज्ञान स्फुरलें॥ जालें अनेक ॥८२॥ मूल विद्ये करितां ॥ अविद्या जालियां अनंता ॥ जीव प्रकृति समस्ता ॥ निपजलिया तिया ॥८३॥ नूतन आणि तापलें ॥ लोह घनें पीटिलें ॥ तेथें विस्फुलिंग उठिले ॥ अनंत जैसे ॥ ८४ ॥ जो जो लोहांशु भेदला ॥ तो पावक सहितु वेगळा ॥ ईश्वरु जीवरुपें भेदला ॥ अविद्येसी तैसा ॥ ८५ ॥ (आत्मा) विद्यतें जीवांतें ॥ बंधीं मोक्षीं कारण वर्त्तें॥ मूळा[1] विद्या तेथें पहिलेंचि वेगळी ॥ ८६ ॥ जो लोहांशु निवाला ॥ तोचि तेजांशु शांतु जाहला ॥ येरांचा झगझगाटु उरला ॥ तो जैसा तैसाचि ॥८७॥ कवणी ह्मणैल ऐसें॥ जें कार्याविद्या जन्हीं नाशे ॥ तन्हीं मूळा[2] विद्या असे ॥ तंवं तो बंधु ॥८८॥ जैं पेंडाचा सुटला ॥ तो बैल मुक्तूचि पैं बांधला ॥ जंव नाहीं मोकळा ॥ दारवठा तया ॥८९॥ ऐसिया आक्षेपा वचन ॥ तैसें हें नव्हे बंधन ॥ सत्यासारिखे द्विगुण ॥ प्राणियांसि ॥५९०॥ तैसा विस्फुलिंगु निवडला ॥ तो महाग्निसी वेगळा ॥ दीपु कारणेंसीं संचला ॥ पृथक् संतु ॥९१॥ मग तो स्वभावेंचि (मालवे) ॥ तैं काय महातेजीं सामावे ॥ यालागूनि तो नव्हे ॥ तैसा आक्षेपु॥९२॥ ईश्वरांश जीव खरे ॥ जाणावे दीपाचेनि आकारें ॥ आतां येथें येकें चतुरें ॥ युक्ति केली ॥९३॥ कर्त्तेन निमित्ये वीण ॥ पावक रूप

---

१. 'मूळा विद्या' या शब्दानंतर मूळ पासोडींत ∨ अशी खूण दिली आहे. व त्या खुणेचा मजकूर वरच्या बाजूस लांब अशा ४, ४½ ओळींत लिहिलेला आहे. वाचकांच्या सोयीसाठीं आम्ही येथें तो सलग उतरून घेतलेला आहे.

२. येथें 'मूळा' या शब्दापुढें ∨ अशी खूण असून खालील ओळींत त्याच जागीं + विद्या + असा सुटलेला शब्द चालू मजकुरांत दिलेला आहे. तें असें:—

॥ तन्हीं मूळा ∨ असे ॥ ॥ नव्हे भि + विद्या + न्न ॥ } अर्थात वर सुटलेला विद्या हा शब्द त्यांनीं खालीं दिलेला आहे. सुटलेले शब्द दासोपंतांनीं इतरत्रहि असेच दिलेले आहेत.

उपादान ।। अंश भेदें नव्हे भिन्न ।। सर्वथैव ।।९४।। तैसा अभेदु ईश्वरातें ।। कवणे निमित्तें वर्त्ते ।। परिहारु ययें आक्षेपातें ।। अपूर्व असे ।।९५।। आपणूचि ईश्वर अद्वैतु ।। आपणूचि जाला अनंतु ।। निमित्य कारण अव्यक्तु ।। आपणूचि तो ।।९६।। ययें पक्षीं निरोपण ।। ती हीं दृष्टांतीं जाणावी खुण ।। तेंचि पुनः निरोपण ।। सांग सांगों ।।९७।। दर्पणी प्रतिबिंब उमटलें ।। तेणें दृष्टांतें काय बोलिलें ।। तेंचि जाणावें तितुलें ।। येकदेशीयें तेजें ।।९८।। प्राकृत सकळ भान ।। देहें अवस्था अभिमानी गुण ।। त्रिपुटी व्यापार विलक्षण ।। जीव-रूपी जें ।।९९।। तें ईश्वर प्रकृतीचेनि सर्व ।। प्रतिबिंबले अवयव ।। तया वेगळे भाव ।। नसती कांहींचि ।।६००।। मूला विद्या दर्पणी ।। अनंता जीवांचि वानी ।। प्रतिबिंबलीं व्यक्तें ह्मणौनि ।। दृष्टांतु ऐसा ।।१।। अवेव तेंचि प्रतिबिंबले ।। परंतु तैसें नाहीं जालें ।। संकल्प मात्रें केलें ।। ईश्वरें सृजन ।।२।। आत्माज्ञानें विश्वकल्पना ।। आणिली गुणी गुणा ।। तेथें सत्य व्यवहारता स्वप्ना ।। सारिखे ह्मणितलें ।।३।। आतां येकूचि द्रष्टा स्वप्नीं ।। व्यवहारे बहुतां जनी ।। हा इतुलया साठीं मनी ।। मानावा दृष्टांतु ।।४।। सत्य संकल्पी परमानंदु ।। ह्मणौनि येणें कल्पिला जो भेदु ।। तो संतूचि पृथक् सिद्धु ।। ऐसा जाला ।।५।। पृथक् संता जीवातें ।। बंधु मोक्षु वेगळाचि वर्त्ते ।। ब्रह्मज्ञानी तयांतें ।। कां योग्यता नसावी ? ।।६।। प्रतिबिंबा परी व्यक्ति ।। मायाचि आली अविद्या कृति ।। संकल्प द्वारा उत्पत्ती ।। सकळां जीवांची ।।७।। सत्य संकल्पें ईशाचेन ।। जीवां स्वतंत्र सत्यपण[1] ।। अग्नीचे दीप सान ।। तैसे जाले ।।८।। देहे अवस्था अभिमानी ।। ईश्वरू कैसा स्वस्छानी ।। अंगभूत जीव तयापासूनि ।। जाला तो कैसा ।।९।।

---

१. 'सत्य' हा शब्द गाळलेला आहे.

श्री	दा	सो	पं	त
१	१	१	१	१
२	२	२	२	२

ॐ

१	६	११	१६	२१	२७	२९	३१	३३
२	७	१२	१७	२२				
३	८	१३	१८	२३				
४	९	१४	१९	२४				
५	१०	१५	२०	२५				
२६					२८	३०	३२	३४

श्री

१	३१	३७	४३	४९	५५	६१
२	३२	३८	४४	५०	५६	६२
३	३३	३९	४५	५१	५७	६३
४ ९ १४ १९ २४						
५ १० १५ २० २५						
६ ११ १६ २१ २६	३४	४०	४६	५२	५८	६४
७ १२ १७ २२ २७						
८ १३ १८ २३ २८						
२९	३५	४१	४७	५३	५९	६५
३०	३६	४२	४८	५४	६०	६६

श्री–ईश्वराचे देहचतुष्टय

१

सोडूनि आनंदमयता ।। आपुली उन्मनी अवस्छा ।। प्राकृत गुणसाम्य अधिष्ठितां ।। ज्ञप्तिमात्र जें ।।६१०।। ईश्वरु राहे स्वात्म स्थिती ।। स्वरूपानुसंधान वृत्ती ।। ते निमग्न जाली ज्ञप्ति ।। व्यक्त होये ।।११।। तीचेन योगे शबळु ।। परमात्मा जो केवळु ।। तो स्वरूपानुसंधानशीळु ।। होऊनियां ।।१२।। स्वस्वानंदिं सुटला ।। स्वरूप सर्वज्ञत्वें राहिला ।। आपणपयां जाणु जाला ।। ऐसें असतां ।।१३।। तेथिची जे ज्ञानमयता ।। तेचि मूळमाया तत्वतां ।। परा शक्ति चिन्मयता ।। बोलिजे महा-कारण ।।१४।। स्वाश्रया व्यामोहिनी ।। चित्प्रकाशाची खाणि ।। परम पुरुषु देहस्थानी ।। आवरण ज्ञानमय ।।१५।।

२

आपुलिया सर्वज्ञता ।। ईश्वरु स्वास्छिती असतां ।। स्वरूपाची स्वसंवेद्यता ।। तीचेनि अंगें ।।१६।। स्वरूपीं पडे अनवधान ।। स्वानुसंधानी दुचितेपण ।।। तेंचि माजलें विस्मरण ।। करी स्फुरण लोपा ।।१७।। ज्ञप्ति जे स्वरूपाची ।। ते प्रकृति ईश्वराची ।। गुण-त्रय तीचे तीचांचि ।। आंगीं असतां ।।१८।। होतें शुद्ध–सत्व–प्रधान ।। तंवचि तें स्वरूप स्फुरण ।। महामाया साक्षित्व आणि मीपण ।। तेथिचें पुरुषा ।।१९।। तेथें तीचांचि आंगींहून ।। तम उपजलें अप्रकाशमान[1] ।। तयाचें हें लक्षण ।। बोलिजत असे ।।६२०।। स्वरूपीं हो.....न ।। तेंचि जालें अज्ञान ।। माया देह माहा मोहन ।। व्यक्ती आलें ।।२१।। शुद्ध–सत्व गुणें महामाया ।। तेचि तमोगुणे (हें) माया ।। कारण–देह ईशा तया ।। बोलिजे हें ।।२२।।

दा– ईश्वराचीया अवस्था चतुष्टय

१

महा मायेचेनि योगें ।। ज्ञानरूप स्फुरे सर्वांगें ।। तेथें ज्ञाताचि

---

१ भान.

ज्ञानांगें ।। ज्ञेयत्वें स्फुरे ।।२३।। मी ब्रह्म सर्व सम ।। नित्य निरवैव निरूपम ।। गुणकर्म रूप नाम ।। यया जें वेगळें ।।२४।। जाण जाणतां आपुलें पूर्णत्व ।। तेंचि स्वरूप सर्वज्ञत्व ।। गुणें गुण गुणसाक्षित्व ।। होईल ऐसें ।।२५।। तेंचि स्वरूप सर्वज्ञता ।। महामाया शरीरीं अवस्था ।। तेथें उपजलया गुणभानाचें सर्वथा ।। साक्षित्व स्फुरे ।। २६ ।।

२

मायेचें होता सन्निधान ।। पूर्ववृत्ति स्वरूपानुसंधान ।। मी अद्वय ब्रह्म सनातन ।। येणें आकारें ।।२७।। तयाचें जालें विस्मरण।। तेंचि स्ववृत्ति लय लक्षण ।। प्रकर्षें लयो ह्मणौन ।। बोलिजे प्रळयो ।। ।।२८।। माया ह्मणिजे नेणपण ।। प्रळयो तें जाणावें विस्मरण ।। वर्त्तंतां हि आत्मज्ञान ।। सुषुप्ति जैसी ।।२९।। एवं माया शरीर कारण ।। तेथें अवस्था प्रळयो विस्मरण ॥ ईश्वरा स्वरूपा स्फुरण ।। जालें असतां ।।६३०।।

सो- **ईश्वरीं अभिमानी चतुष्टय**

१

महामाया शरीर विचारितां ।। आणि अवस्छा तेथिची सर्वज्ञता ।। ययां दोंहींचेनि संगें वर्त्तंतां ।। पुरुषा तया ।।३१।। मीपण उपजे स्वस्थानी ।। उभयांचेनि आश्रयत्वें करूनि ।। मी ब्रह्म समस्तां गुणी ।। सूटलों ऐसें ।।३२।। उभयाश्रयत्वें करून ।। स्वरूपीं उपजलें मीपण ।। तेणेंसीं युक्त ह्मणौन ।। सर्वेश्वरु तो ।।३३।। महामायाख्य ज्ञानदेहीं ।। आणि साक्षित्वावस्थेचां ठांयीं ।। अभिमानी परमात्मा यये विषईं ।। नसे संदेहो ।।३४।।

२

माया शरीर प्रळयावस्था ।। उभय संयोगीं पुरुष अ(सतां)।। ..... अवस्था ।। स्फुरे स्वस्वरूप ।।३५।। अज्ञाता

ज्या ज्या ठिकाणीं ..... अशी जागा सोडलेली आहे तेथें नवीन पासोडीवरहि मजकूर नाहीं.

पुरुषुचि जैं नाहीं ।। तैं अज्ञान कवण ..... ।। ..... दृष्टी-
वीण देही ।। अंधार नेणवे ।।३६।। ह्मणौन अज्ञानांतरवर्त्ती ।।
अज्ञु तो येकु ..... ।। ..... रीचि अज्ञाना आथी ।।
आधारें असणें ।।३७।। अंतरंगें पुरुषेंविण ।। लयातें कवण स्थान ।।
ह्मणौनी जालें ही अज्ञान ।। अभिमानी पाहिजे ।।३८।। एवं माया
प्रळयो दोन्ही ।। ईश्वरु येथिचा अभिमानी ।। तोचि महारुद्रु
ह्मणौनि ।। जाणतां जाणावा ।।३९।।

पं– ईश्वरीं गुण–चतुष्टय

१

महामाया देह ज्ञानमय ।। आणि साक्षित्व तें हीं तन्मय ।।
उभयाभिमानित्व ध्येय ।। ईश्वरत्व जें ।।६४०।। हें विविध येक
स्फुरण ।। स्वस्वरूपाचें अनुसंधान ।। स्वरूप प्रकाशवंत ह्मणौन ।।
बोलिजे शुद्ध सत्वाचें ।।४१।। स्वज्ञान स्वानुसंधान ।। आणि
स्वस्छिती जें (मी पण) ।। हें येक स्वरूप स्फुरण ।। शुद्ध सत्व
मायेचें ।।४२।।

२

माया प्रळयो त्रिनयनु ।। हा स्वरूपा प्रकाशमानु[1] ।। मायेचा
शुद्धु तमोगुणु ।। ऐसें जाणावें ।।४३।। नेणोनि नेणणें करावें ।।
विसरोनि विस्मरण दावावें ।। पुरुषेंचि तम प्रकाशावें ।। तिये
प्रकृतीचें ।।४४।। शुद्ध सत्व प्रकाशमान ।। होतें जें संवेदन ।। तेंचि
तमोगुणें करून ।। त्रिविध ऐसें ।।४५।।

त– ईश्वरी सार्द्ध मात्रात्रयात्मक बीज

१

महामाया साक्षित्व सर्वेश्वरु ।। हा त्रिविध स्फुरणांकुरू ।।
शुद्ध सत्वाचा प्रकारू ।। सांख्य बोलती ।।४६।। शुद्ध सत्व जें मायेचें ।।
तेंचि मूळ स्वरूप ॐकाराचें ।। चतुर्थ चरण येथिचें ।। अर्ध्द मात्रा
बीज ।।४७।।

---

१. भानू.

२

मायाप्रळयो त्रिनयनु ।। ऐसा त्रिविध मायेचा तमोगुणु ।। तो प्रणवा तृतीय चरणु ।। ऐसें जाणावें ।।४८।। तृतीय पादीं प्रणवातें ।। मकारु मात्रा वर्त्ते ।। ती पासाव व्यक्तीतें ।। आलें हें भान ।।४९।।

ॐ

शुद्ध सत्व आतां कारणी ।। तम उपजलें तेथूनि ।। आपलां मोहन रूपां लक्षणी ।। ऐसें जन्हीं ।।६५०।। तन्हीं तया तमातें स्थान ।। नसे शुद्ध सत्वेंवीण आन ।। यालागिं तमाचें भान ।। तें सत्वेंचि प्रकाशे ।।५१।। चंद्रातें आवरकु जाला ।। तो राहोचि चंद्रें प्रकाशला ।। निद्रावंतु निदैला ।। दाटी निदे ।।५२।। नेणणें नेणें नेणणयां ।। जाणणेंचि दावी तया ।। नेणु तो जाणु जाणावया ।। काय अशक्य ।।५३।। तैसें तम उपजलें ।। तें तेणें सत्वें अधिष्ठलें ।। तत्पूर्वक स्फुरलें ।। परि नाशेचिना ।।५४।। ऐसें तमपूर्वक स्फुरण ।। सत्वाचें[1] जालें तेथून ।। तमयुक्त सत्व ह्मणौन।। बोलिलें तें ।।५५।। तेंचि मायाप्रधान ज्ञान ।। जैसें जीवीं अन्यथा ज्ञान ।। त्रिपुटी रूप संवेदन ।। व्यक्त जालें ।।५६।। स्वरूपा ज्ञानें ज्ञान स्फुरे ।। तें ज्ञातृत्वा ज्ञेया ज्ञानाकारें ।। कर्त्ता करण कार्य प्रकारें ।। त्रिपुटी रूप[2] ।।५७।। तेंचि त्रिपुटीरूप स्फुरण ।। तत्वात्मक सगुण ।। देवतामय होउन ।। ईश्वरीं स्फुरे ।।५८।। ते हिरण्यगर्भ देवतामय ।। तेथिची अवस्था गुणकार्य ।। सांगिजैल साभासमय ।। गोचर जे कां ।।५९।।

१

वैकुं वासी रमारमणु ।। चतुर्भुज शामवर्णु ।। तो अंतःकरण रूपें विष्णु ।। व्यक्ती आला ।।६००।।

२

अमृतमयु शीतकरु ।। तारांमाजि ईश्वरू ।। प्रकाशमयु श्रीचंद्र ।। तो मन देवाचें ।।६१।।

---

१. सत्वातें. २. रूपें.

३

सकळां वेदांचा कर्त्ता ।। चतुर्मुखु विश्वपिता ।। तो पद्मजन्मा विचारितां ।। देवाची बुद्धि ।।६२।।

४

क्षीरसागरीं योगनिद्रा ।। जया निजरूपें उजगरा ।। तो नारायणु तया ईश्वरा ।। आपुलें चित्त ।।६३।।

५

कैलासवाशी शूळधरु[1]।। संसार समुद्रीचें तारू ।। जो जाणता महारुद्रु ।। अहंता ईशाची ।।६४।।

६

व्यापकु वायो गगनी ।। नाडळे जो आपुलां गुणी ।। तो व्यानु वायो ह्मणौनि ।। ब्रह्मांडीं जाणावा ।।६५।।

७

जो आसोनि मध्य[2] मंडलीं ।। चराचर सर्व चाली ।। तो समानु ऐसी आली ।। प्रतीती साचार ।।६६।।

८

ऊर्ध्व करी गमन ।। स्वर्गीं जयाचें स्थान ।। तो उदानु वायो खूण ।। जाणावी ऐसी ।।६७।।

९

पूर्वगती जया जाणें ।। वर्त्ते चंचळू जो गगनें ।। तो प्राणु विहरे अतिमाने ।। ब्रह्मांडीं यये[3] ।।६८।।

१०

अधोगति जो चाले ।। पाताळीं जेणें स्छान केलें ।। तो अपानु येकें बोलें ।। मानावा पैं ।।६९।।

११

शब्दुविषयो जेणें ज्ञान ।। तें श्रोत्रेंद्रिय आतां कवण ।। (त) रि (दि) शा हे (जाणा) वी खुण ।। सर्वथा पैं ।।६७०।।

---

१. मूळ. २. मध्व. ३. यय.

१२

त्वगेंद्रिय जें तत्वतां ।। ते जाणावी वायो देवता ।। जेणें स्पर्शु कळे देहवंता ।। ईश्वरातें ।।७१।।

१३

जो हा त्रैलोक्य लोचनु ।। तोचि सर्वेश्वराचा नयनु ।। रूपिं प्रकाशमानु[1] ।। प्रकाशी रूपातें ।।७२।।

१४

जेणें करणें रसु कळे ।। तें रसना इंद्रिय बोलिलें ।। वरुण रूपें आकारलें ।। येणें प्रकारें ।।७३।।

१५

घ्राणु जाणणें गंधाचें ।। अश्विनौ देव रूप तयाचें ।। ज्ञानकरण ईश्वराचें ।। येणें प्रकारें ।।७४।।

१६

धगधगीतु वैश्वानरू ।। वाचेनें धरिला तो आकारू ।। वक्तव्य करी ईश्वरू ।। तो रूपें तेणें ।।७५।।

१७

करावया घेणें देणें ।। प्राणींद्रिय ईशा कारणें ।। तोचि हा इंदू जाणणें ।। यज्ञ भोक्ता ।।७६।।

१८

पाद येक कर्मकरण ।।जें सर्वत्र कीजे गमन ।। तो वामनु स्थान ।। पाताळ जयाचें ।।७७।।

१९

उत्पत्तीचें कारण ।। कर्मेंद्रिय जें शिश्न ।। तें प्रजापति रूपें सगुण ।। देवत जाणावें ।।७८।।

२०

पायु वर्त्ते अधोगती ।। नैर्ऋति देव त्याची व्यक्ती ।। ऐसें कर्म करण बोलती ।। ईश्वराचें ।।७९।।

---

१. आकाशमानु.

२१

शब्दु विषयो अंतःकरण ।। तो गुणु तया गगना ।।

२२

स्पर्शु गुणु पवना ।। तो मनातें विषयो ।।६८०।।

२३

रूप विषयो बुद्धी ।। तो तेजीं गुणु आथी ।।

२४

आपीं रसु त्रिशुद्धी ।।

२५

गंधु धरणी तें ।।८१।।

२६

पंचविसां हीं तत्त्वांचें ।। देवतामय शरीर देवाचे ।। हिरण्य-गर्भ हें जयाचें ।। असे अभिधान ।।८२।। तेथें करण सहितु कर्त्ता ।। कार्ययोगें मिनला भूतां ।। तोचि स्थूळु भोगु भोगितां ।। अध्यासें तेणें ।।८३।। सूक्ष्म दशेचीं करणें ।। स्थूळें आकारें तेणें ।। आकारलीं हीं करणें ।। वासनेचे तिये ।।८४।। अव्यक्त सूक्ष्म शरीर ।। स्वप्नीं आभासे साकार ।। पूर्वाध्यासें दृढतर ।। वासना स्थूळाची ।। ८५ ।। तैसें हिरण्यगर्भ साकारलें ।। पांच भौतिक व्यक्त जालें ।। विराट नाम पावलें ।। सर्वथैव ।। ८६ ।। कीं स्थूळां इंद्रियां वांचून ।। केवळें सूक्ष्में करून ।। स्थूळ विषय-भोग साधन ।। नव्हे सर्वथा ।। ८७ ।। मानसीक जैसे फळहार ।। स्वप्नीं विषयभोग अपार ।। ते मनोरथ मात्र समग्र ।। स्थूळ शरीरेंविण ।। ८८ ।। ह्मणौनि तेणें ईश्वरें ।। हिरण्यगर्भचेनि आधारें ।। त्रिपुटीचेनि व्यापारें ।। रचिलें शरीर तें ।। ८९ ।। इछामात्रेंचि निपजलें ।। पांच भौतीक साकारलें ।। विराट ह्मणिजे तें रचलें ।। महा शरीर।।६९०।। नाभी पासूनि पादतळें।। ती सातही पाताळें ।। वरुतीं स्वर्गमंडलें।। मस्तक पर्यंत ।।९१।। सहस्र कर चरण

नेत्र ।। शिरें आणि श्रोत्र ।। ऐसें शरीर साकार घर ।। हिरण्य-गर्भचिें ।।९२।। ययाचेनि आंगें ।। सृष्टयादि कार्य अवघें ।। करितां जाला प्रसंगें ।। परमात्मा तो ।।९३।।

२७

ऐसें हिरण्यगर्भ देवतामय ।। सूक्ष्म शरीर ईश्वराचें ज्ञेय ।। कर्त्ता करण कार्य ।। त्रिपुटि रूप ।।९४।। ज्ञाता आणि ज्ञेय ज्ञान ।। भोक्ता भोग्य भोग ह्मणौन ।। हेंचि शरीर सगुण[1] ।। ऐसें जाणावें ।।९५।। यये शरीरीं ईश्वरातें ।। अवस्था स्थिती नित्य वर्त्ते ।। तेचि कैसी आतां येथें ।। बोलिजेल ।।९६।। स्छिति ह्मणिजे पालन ।। ऐसे बोलती ते अज्ञान ।। सृष्टिपूर्वी निर्माण ।। यया शरीराचें ।।९७।। हिरण्यगर्भापूर्वी ।। सृष्टि ते कैंची बोलावी ।। ह्मणौनि असो ते अघवी ।। व्यर्थ कल्पना ।।९८।। उपजणें ना कांहीं नाशणें ।। सार्वकाळ जैसें तैसेंचि असणें ।। तिये नित्यतेतें ह्मणणें ।। स्छिति ह्मणौन ।।९९।। विराट पांचभौतिक ।। यया पासाव सकळ लोक ।। एवं स्थूळां भूतांचें सकलैक ।। कार्यमात्र जें ।।७००।। प्रळयीं तेंचि संहारे ।। उत्पत्ती उपजे[2] आकारे ।। मध्ये राहे व्यवहारे ।। अनित्य तें ।। १ ।। यया परी अस्थिर ।। भूतकार्य जाण्हार[3] ।। काळदृष्टी नित्यक्षर ।। ऐसें आहे ।। २ ।। तैसें नव्हे हें ज्ञेय ।। हिरण्यगर्भ देवतामय ।। जया उपजु विनाशु हें द्वय ।। आथी ना कधीं ।। ३ ।। उत्पत्ति पूर्वींचि हें आथी ।। उत्पत्ति काळीं तेचि स्थिती ।। प्रळयीं विनाशु नाथी ।। ऐसेंचि हें ।। ४ ।। प्रळयीं हें विनाशतें ।। तें तेचि मुक्ति जीवांतें ।। ह्मणौनि नित्य असतें ।। सूक्ष्म मानें येचि रिति ।। ५ ।।

२८

ऐसें विराट देह साकार ।। येथें सृष्टयादिक व्यापार ।। निर्माण होये चराचर ।। व्यापार योगें ।। ६ ।।

---

१. स्फुरण. २. तेची. ३. जाणह्मार.

ब्राह्मणोस्य मुखमासीत् ॥
धाता यथा पूर्वमकल्पयत् ॥

येणें वेद–वाक्य प्रकारें ॥ भूतें निर्मिलीं साकारें ॥ लोक लोकपाळ ईश्वरें ॥ कर्त्ता होउनि ॥ ७ ॥ तेचि विश्वोत्पत्ति विचारितां ॥ विराट शरीरीं अवस्था ॥ जागृती जैसी भूतां ॥ स्छुलाचेनि आंगें ॥ ८ ॥

२९

(हिरण्यगर्भ) शरीर ॥ (आणि) स्छिति अवस्था निरंतर ॥ (उभयाभि) मानित्वें सा (चा) र ॥ परमात्मा विष्णु रूपें ॥ ९ ॥ (येथिची कै) सी विचारणा ॥ सांगिजैल ते कल्पना ॥ (हिरण्य–गर्भा) चिया अनादिपणा ॥ कवण कारण ॥१०॥ परमात्मा स्वयंबोधु ॥ तैं जाणतां अनादि सिद्धु ॥ तेथें मायेचा संबंधु ॥ अनादि तो ही ॥११॥ मग मायाप्रधान ज्ञान॥ त्रिपुटीरूप संस्फुरण॥ तेंहीं अनादि ह्मणौन ॥ जाणावें अंगें तेणें ॥१२॥ मग तयाचेनि[1] नित्यपणें ॥ अनादि त्रिपुटीचेनि स्फुरणें ॥ उपजु विनाशु यया कारणें ॥ तो आथीचिना ॥ १३ ॥ तोचि स्थितीचा कर्त्ता ॥ हिरण्यगर्भि नियंता ॥ परमात्मा अभिमानी वोळखतां ॥ श्रीविष्णु तो ॥ १४ ॥

३०

विराटशरीर उत्पत्यवस्था ॥ उभयाभिमानी ईश्वर कर्त्ता ॥ तोचि ब्रह्मा तत्वता ॥ ऐसें जाणावें ॥१५॥ जेणें रचिले भूतभेद ॥ जेणें रचिले हे वेद ॥ जेणें त्रिपदीचे विविध॥ ठाय वसविले॥१६॥ जो स्वयंभु सर्वेश्वरु ॥ तोचि जाला साकारू ॥ रचिता जाला साकारू ॥ रचिता जाला विश्वाकारू ॥ तोचि ब्रह्मा ॥१७॥

३१

हिरण्यगर्भ स्छिति विष्णु ॥ हा तमपूर्वकु सत्वगुणु ॥ प्रपंच

---

१. 'नि' अक्षर गाळलें आहे.

स्फुरण लक्षणु ॥ विस्तारला ॥१८॥ शुद्ध सत्वात्मक जें स्फुरण ॥ तेंचि हें नव्हे आन ॥ वर्त्ते माया प्रधान ॥ ह्मणौनि ऐसें ॥१९॥ दृष्टीचें रज तुटे ॥ आंगिचें तम फीटे ॥ तैं जैसें तैसें हेंचि घटे ॥ निर्मळ शुद्ध ॥७२०॥ सत्व पुटीं घालितां हीन सोनें ॥ तुक तुटे चढे वानें ॥ ठाया ये तैं बावन्नें ॥ कसीं उतरे ॥२१॥ तैसें जें शुद्ध सत्व ॥ तेंचि तमपूर्वक हें तत्व ॥ सगुण स्फुरण सत्यत्व ॥ देवता रूपें ॥२२॥

३२

विराट उत्पत्ति। कमलासनु ॥ हा त्रिविधु मायेचा रजोगुणु ॥ साकारू जो दृश्यमानु ॥ प्रपंचु सकळ ॥२३॥ त्रिपुटीरूप होतें पहिलें ॥ तेंचि स्फुरण साकारलें ॥ विषयो आपणचि जालें ॥ आपणा प्रति ॥२४॥ एवं साकारू प्रपंचु भासमानु ॥ हा तियेचा शुद्धु रजोगुणु ॥ पूर्वींचि तमपूर्वकु सत्वगुणु ॥ तोचि हा ऐसा ॥२५॥

३३

हिरण्यगर्भ स्छिति विष्णु ॥ ऐसा स्फुरे जो सत्वगुणु ॥ केवळ मायाप्रधानु ॥ येणें आकारें ॥२६॥ तो द्वितीय पादु प्रणवाचा ॥ सूक्ष्म प्रपंचु ईश्वराचा ॥ प्रकारू तो असे येथिचा ॥ वीज[1] विशेषु ॥२७॥

३४

साकारू सर्गु भूतांचा ॥ तोचि रजोगुणु मायेंचा ॥ प्रथम पादु प्रणवाचा ॥ तोचि बोलिजे ॥२८॥ अकारु मात्रा जे पहिली ॥ प्रणवाचा आरंभीं बोलिली ॥ ते हे ऐशी ह्मणींतली ॥ शास्त्र-वेत्तीं ॥२९॥

श्री

ऐसा परमात्मा सांगीतला ॥ माया गुणभेदु विस्तारिला ॥ आतां यया पासाव उपजला ॥ जीवात्मा कैसा ॥७३०॥ जाला तंव

---

१. वोज.

संकल्प व्यापारें ।। परि प्रतिबिंब ठसा साचोकारें ।। आणि सत्य संकल्पास्तव निर्द्धारें ।। सत्य जाला ।।३१।। हें मागां सांगीतलें निरोपण ।। आतां कैसें तयाचें लक्षण ।। तेंचि सांगिजैल येथून ।। संक्षेपतया ।।३२।। संकल्पु स्वप्नाकारें जाला ।। तैं द्रष्टाचि तेणें रूपें भेदला ।। दृश्य प्रपंचु आतला ।। तोचि स्वयें ।।३३।। जैसें उदक हालवलें ।। तेथेंचि[1] तरंगाकारे जालें ।। तैसें प्रकृति गुणी स्पर्शिलें ।। स्फुरे ब्रह्म ।।३४।। द्रष्टा द्रष्टत्वें संचला ।। तोचि स्फुरणाकारें आकारला ।। संकल्पु आंगेंचि जाला ।। भासला स्वप्नरूपें ।।३५।। तैं स्वप्नदशा पुरुषाचें ।। रूप तें रूप द्रष्टयाचें ।। मन तें मन साचे ।। प्राण ते प्राण ।।३६।। एवं द्रष्टयाचेचि अवयव ।। जाणावे प्रतिबिंबले सर्व ।। तैसें ईश्वरतत्व स्वमेव ।। जीवे जालें ।।३७।।

१

जीवाचे देहचतुष्टय

२

स्वस्वरूपाचें ज्ञान ।। महामाया ईश्वरीं चेतन ।। तेंचि अनंतधा होऊन ।। येक स्फुरलें ।।३८।। जीचीं महाकारणें जीवांचीं ।। ज्ञानें आपुलीं निजरूपांचीं ।। अंशु भेदु तो येणेंचि ।। प्रकारें जाणावा ।।३९।। असो स्वस्वरूपाचें स्फुरण ।। जीवातें जें स्वानुसंधान ।। जें न कळे गुरूवांचून ।। अपरोक्ष सिद्धी ।।७४०।। परंतु आपुलें जें जाणणें ।। तें असतचि असे निजगुणें ।। तेंचि ज्ञान बोलणें ।। शरीर महाकारण ।।४१।। स्वस्वरूपाचें अनुसंधान ।। तें स्फुरें जेणें करून ।। ऐसि जाणीवचि सनातन ।। शरीर तें ।।४२।।

३

आत्मया आपुलें अज्ञान ।। स्वरूपीं होतां विस्मरण ।। तेंचि शरीर कारण ।। नेणणें मात्र जें ।।४३।। येकीचि माया भेदली ।। अनंतें अज्ञानें जालीं ।। कारण शरीरें बोलिलीं ।। जीवांसि तीं ।।४४।।

---

१. तेथें चित्त रंगाकारें जालें.

शुद्धा आत्मया लागून ।। देहद्वय जें अन्यथा स्फुरण ।। तें लागावया कारण ।। हेंचि येक ।।४५।। मी देहो येणें आकारें ।। देह द्वयाचि स्फूर्ति स्फुरे ।। ते जाणावी चतुरें ।। विवेकेंचि ।।४६।। मी ह्मणिजे तो अहंकारू ।। सकळां त्रिपुटींचा विस्तारू ।। लिंग देहाचा प्रकारू ।। तोचि जाणावा ।।४७।। देहो ह्मणिजे गोचरू ।। जाणावें स्थूळ शरीर ।। दावी देखे समग्र ।। आत्मत्वें जें ।।४८।। एवं मी देहो ह्मणतां ।। आत्मा देहद्वया प्रकाशिता ।। परंतु यया अज्ञानाकरितां ।। न कळे तैसें ।।४९।। अहं ऐसे ह्मणोनि ।। आत्मवेंचि दृश्य मानि ।। तया अज्ञानाचि करणी ।। ऐसी आहे ।।७५०।। (मी) देहो ऐसें स्फुरण।। (जा) लें अज्ञानाचि पासून ।। अज्ञानें (चि दृढ) होऊन ।। (लागलें हें) ।।५१।। (ह्मणौनि) आपुलें अज्ञान ।। तें सूक्ष्मा स्थूळाचें कारण ।। कारण देहो ह्मणौन ।। तरीचि ह्मणीतलें ।।५२।। स्थूळ शरीर जीवाचें ।। लिंग चेष्टक तयाचें ।। अन्यथा ज्ञान आत्मयांचें ।। अज्ञानपूर्वक ।।५३।। त्रिपुटी रूपें विस्तारलें ।। तत्वांचे न भेदें भेदलें ।। हिरण्यगर्भांशु ह्मणीतलें ।। तेंचि कैसें ।।५४।।

४

येक विष्णूचीं बहुतें ।। अंत:करणें जालीं जीवांतें ।। तोचि अधिदैवत तयातें ।। ह्मणौनि बोलिजे ।।५५।।

५

अनत अंशभेद चंद्राचे ।। कार्योपाधि जाले साचे ।। तींचि मनें तयांचे ।। तेंचि अधिदैवत ।।५६।।

६

येकूचि जों चतुराननु ।। तो अनंता बुध्दी जाला आपणु ।। तोचि केवलु तयां लागूनु ।। अधिदेवत येक ।।५७।।

७

येक नारायणाचिया कळा ।। तीं अनंतें चित्तें जीवाला ।। तोचि अधिदेवत ह्मणीतला ।। तया चित्तांचें ।।५८।।

८

येकु रुद्र अनंत ॥ अहंकार जाले जीवां बहुत ॥ यालागिं अहंकारां तयां देवत ॥ तोचि येकु ॥५९॥

९

व्यानुवायो

१०

समानुवायो

११

उदानुवायो

१२

प्राणवायो

१३

अपानु हा ब्रह्मांडिचा पंचधा पवनु अंशत्वें पिंडीं

१४

दिशांचे अंशभेद[1] अनंत ॥ जीवांतें मस्त[2] ॥ या लागिं दिशाचि तेथ ॥ अधिदेवत सदा ॥७६०॥

१५

वायोचिया अनंत विभक्ती ॥ तींचि त्वगेंद्रियें जीवांप्रति ॥ या लागिं तोचि तयांप्रति ॥ अधिदेवत असे ॥६१॥

१६

येका सूर्याचे अनंत भेद ॥ ते नयन जीवाचे + सिद्ध ॥ या लागिं तोचि देवत सिद्ध ॥ त (या) + + + ॥६२॥

१७

येका वरुणाचिया अनंता ॥ रसना जालिया भूतां ॥ ह्मणौनि अध्यात्म तिया समस्ता ॥ अधिदेवत (तो) ॥६३॥

---

१. मुळांत 'अंशभेद' हा शब्द दोनदां लिहिलेला आहे. २. 'समस्त' असा शब्द असावा.

१८

येकां अश्विनौ देवांचें ॥ अंश तें घ्राण जीवांचें ॥ तें अध्यात्म तयांचें ॥ अधिदेवत तो ॥६४॥

१९

अंश भेदें भेदला ॥ अनंता वाचा अग्नीचि जाला ॥ ह्मणौनि तो तियाप्रति बोलिला ॥ अधिदैवत खरें ॥६५॥

२०

अनंत अंशभेद सुरपतीचे ॥ तेचि कर यया जीवांचे ॥ ह्मणौनि समस्तां तयांचें ॥ तेंचि देवत ॥६६॥

२१

(अनंत) वामनाचे अंश ॥ ते भूतांते पाद विशेष ॥ [1]+ + नि तोचि अधिदैवत ॥ तयांस बोलिलें असे ॥६७॥

२२

येका प्रजेंद्राचीं अनंतें ॥ शिश्नेंद्रियें भूतांतें ॥ ह्मणौनि अधिदेवत तयांतें ॥ तोचि प्रजापती ॥६८॥

२३

नैर्ऋति देव बहुतें ॥ पायु इंद्रियें भूतांतें ॥ तेंचि अधिदेवत तेथें ॥ ऐसें जाणावें ॥६९॥

२४

शब्दें शब्द अनंत जाले ॥

२५

स्पर्शगुणें स्पर्श भेदले ॥

२६

रूप गुणें सृजलें ॥ रूप गुण पिंडीं ॥७७०॥

२७

रसे रस अनंत

---

१. ' ह्मणौनि ' असा शब्द असावा.

२८

गंधें गंध बहुत ॥
या परीं पंचकांचे अनंत ॥ पंचक वासनामय ॥७१॥

२९

सूक्ष्माचेनि आधारें ॥ पांच भौतिक देह आकारे ॥ तेंचि स्थूळ शरीर चतुरें ॥ ऐसें जाणावें ॥७२॥ पूर्वीं जयाचें निर्माण ॥ तें विराट पुरुषाचि पासून ॥ ईश्वर इछा कारण ॥ तये ठांईं मानस शृष्टि चतुराननें ॥ ते कल्पिलीं आपुलेनि मनें ॥ तें हेंचि निर्माण केलें तेणें ॥ जीवां लागीं ॥७४॥ कर्मसृष्टी पुढें केली ॥ तैं भूतीं भूतें उपजविलीं ॥ तेथें हींचि निर्मिलीं ॥ स्थूळें जीवां ॥७५॥ कर्मास्तव योनी नाना ॥ चतुर्विध भूत ग्राम रचना ॥ तेयां स्छूळांची कल्पना ॥ व्यक्ति पालटिली ॥७६॥ स्त्री पुरुषु नपूसक ॥ हे स्थूळ शरीरचि येक ॥ असो बोलिजे पांच भौतिक ॥ तेंचि कैसें ॥७७॥ शुक्ल रक्त आदि करून ॥ जें जें बीज जया-लागून ॥ यया स्थूळाचें कारण ॥ पांच भौतिक तें ॥७८॥ अस्थि मास त्वचा नाडी ॥ रोमादिक हे परवडी ॥ कठिण ह्मणोन फुडी॥ पृथ्वी जाणावी ॥ ७९ ॥ स्वेदु रक्त स्नायु मज्जा ॥ वीर्यादिक देहीं मनुजा ॥ सारद्र भेद ते सहजा ॥ आपाचे जाणावे ॥७८०॥ क्षुधा तृषा आलस्य मैथुनु ॥ पिंडीं हा शोषकु गुणु ॥ ह्मणौनि तेजाचा हें जाणु ॥ जाणता होये ॥८१॥ चलन गमन धावन ॥ निरोधन प्रसारण ॥ स्पंदन हे चंचळ वायोचे गुण ॥ येये स्थूळीं ॥८२॥ भय कामु क्रोधु ॥ मोहो शोकु प्रमादु ॥ व्योम गुणु प्रसिद्धु ॥ जाणावा हा ॥८३॥ येका विराटाचीं अपारें ॥ जालीं इयें स्थूलें शरीरें ॥ साहीं विकारिं समग्रें ॥ दूषिलीं ऐसीं ॥८४॥

३०

शुद्ध सत्वगुणें करून ॥ स्फुरे जे स्वरूप संवेदन ॥ जयातें देह महाकारण ॥ ऐसे ह्मणिजे ॥८५॥ तेंचि प्रकृतीचें स्वरूप ॥

त (मो गुणे हो) ये अचिद्रूप ।। कारण देह आपें आप ।। महा-कारणचि तें ।।८६।। तम पूर्वकें सत्त्वें स्फुरें ।। तें तेंचि त्रिपुटीचेनि आकारें ।। लिंग देहाकारें आकारे ।। होये स्वयेंचि स्थूळ ।।८७।। ह्मणौनि महाकारणाचि तें का ... ।। ... (तें) चि स्थूळ आपण ।। प्राकृत देहगुण भेदें भिन्न ।। येकचि चतुर्द्धा ।।८८।।

३१

जीवांचिया अवस्छा चतुष्टय

३२

ज्ञान मात्र तें महाकारण ।। आतां तेणें ज्ञानेंकरून ।। स्फुरे स्वरुपानुसंधान ।। तेचि तुरिया ।।८९।। जें कीं साक्षित्व गुणाचें ।। देहांतीं हीं अवस्छांचें ।। मग अभाव दर्शन तयांचें ।। अधिष्ठान सिद्धि ।।७९०।। ज्ञेय रूपीं पूर्णत्वाची वृत्ति ।। ते तुरीयेचि सकळ प्रवृत्ति ।। जीवांचां ठांयीं युक्ति ।। अनुभवाची ।।९१।। ते तुरीया जाणावी ।। साक्षित्वाचि प्रति मानावी ।। तीतें जाणती अनुभवी ।। स्वरूप वेत्ते ।।९२।।

३३

कारण देह आत्मा ज्ञान ।। तेथें ज्ञानवृत्तीचें विस्मरण ।। लीन होये अन्यथा ज्ञान ।। तयेचि ठांई ।।९३।। तेचि अवस्था सुषुप्ति ।। प्रलय प्रतिमा त्या बहुति ।। लागलिया जीवां प्रति ।। वृत्ति लयरूप ।।९४।।

३४

गुण त्रयाचेनि व्यापारें ।। त्रिपुटीचेनि आकारें ।। मनोरथु परि साचोकारें ।। ऐसा उठी ।।९५।। ज्ञातृत्वें सत्व आकारे ।। रज स्फुरे कवणाकारें ।। तमाचें कार्य विस्तारे ।। ज्ञेय प्रपंचु ।।९६।। ज्ञान क्रिया द्रव्य शक्ति ।। नित्य गुणी आभासती ।। जैं सूक्ष्माचे व्यापार स्फुरती ।। स्थूळें विण ।।९७।। कार्य कवण कर्त्ता ।। स्थूळत्वें आकारलें नसतां ।। व्यापारे सूक्ष्म तैं अन्यथा ।। भान

उठी ॥९८॥ तें वासनामयचि सकळ ॥ स्वप्न ह्मणती ज्ञानशीळ ॥ अज्ञानाचें जंव जंव बल ॥ तंव तंव आगळे ॥९९॥ ऐसें स्वप्न विचारितां ॥ लिंगदेहीं होये अवस्था ॥ येके स्थितीचिया अनंता ॥ प्रतिमा इया ॥८००॥

३५

पांच भौतीक साकार ॥ षड्विकारीं स्थूळ शरीर ॥ येथें बाह्य प्रपंच ज्ञान समग्र ॥ ते जागृति अवस्था ॥१॥ बाह्येंद्रियद्वारा बाह्यज्ञान ॥ बाह्यभोग कर्मसाधन ॥ एवं बाहय स्फुरे चेतन ॥ ते जागृति अवस्था ॥२॥ उत्पत्तीचिया अनंता ॥ प्रतिमा जागृती भूतां ॥ कार्या कारणातें सर्वथा ॥ न साहे अनारिसेपण ॥३॥

३६

शुद्ध सत्वें स्वरूपानुसंधान ॥ तेंचि तमोगुणें जालें विस्मरण॥ तमप्रधानें सत्वें स्वप्न ॥ तेंचि होये ॥ ४ ॥ तेचि अंतरींचि प्रवृत्ति॥ रजोगुणें माजली सांती ॥ बाहेरि पडे जागृती ॥ आपणचि होये ॥ ५ ॥ ह्मणौनि तुरीयाचि ते सुषुप्ती ॥ तेचि स्वप्न तेचि जागृती॥ परंतु दुसरी नाहीं स्ववृत्ति ॥ येकीचि ते ॥ ६ ॥

३७

जीवांचिये ठांइं अभिमानी चतुष्टय

३८

महाकारण तुरीयावस्था ॥ उभयाभिमानी आत्मा भोक्ता ॥ स्वरूपीं अनुसंधान कर्त्ता ॥ आत्म भाऊ जो ॥ ७ ॥ तो जाणावा प्रत्यगात्मा ॥ अंशरूपें जो परमात्मा ॥ वेगळा गुणा रूपां नामा ॥ निराभासु ॥ ८ ॥

३९

कारण देह सुषुप्त्यवस्था ॥ उभयाभिमानी प्राज्ञु भोक्ता ॥ प्रकर्षें वर्त्तें अज्ञता ॥ ययाचा ठांइं ॥ ९ ॥ माया प्रळइं रुद्रु ॥ तयाचा अंशु भेदु समग्रु ॥ तेहे प्राज्ञ विचारु ॥ ऐसा येथिचा ॥८१०॥

४०

लिंग देह आणि स्वप्न ।। हें वृत्तिरूपचि ह्मणौन ।। व्यक्ती आले गुण ।। ऐसें मानावें ।।११।। परंतु विण आश्रयें पुरुषें ।। वृत्तिरूप हे केविं प्रकाशे ।। ह्मणौनि अंतरंगु पुरुषु असे ।। ऐसें जाणावें ।।१२।। नसतिया स्फुरणा उपजवी।। उपजलियातें दाखवी ।। दिसतियातें नादवी ।। सत्या[1] ऐसें ।।१३।। ज्ञाता कर्त्ता भोक्ता ।। आत्माचि आश्रयो त्यां समस्तां ।। जो येकु तेथें नसतां ।। तें कांहींचि नुरे ।।१४।। ऐसा आत्मागुणी ।। तो तेणें सूक्ष्म संगें करूनी ।। प्रकाशवंतु ह्मणौनि ।। तैजसु ह्मणिजे ।।१५।। लिंगदेह स्वप्नावस्छा ।। उभयाभिमानी तैजसु भोक्ता ।। तो कारण दृष्टी पाहातां ।। विष्णूचा अंशु ।।१६।।

४१

साकार स्थूळ शरीर।। पांच भौतीक जड समग्र ।। येथिचे जागृति धर्म समग्र ।। तेही तैसेचि।।१७।। विण अभिमानियें कवण।। आछादी ययांचें जडपण ।। जो तरी मी ह्मणौन ।। वागवी हें ।।१८।। निदैलियातें उठवी ।। मी ह्मणौन हें दावी ।। दाऊनि मग करवी ।। हें सकळ कर्म ।। १९ ।। जागृती अंतरंगु जागता ।। जागृति कैंचि तो नसता ।। ह्मणोनि अभिमानी आत्मा[2] भोक्ता ।। तो विश्वु येथें ।।८२०।। येकु जो चतुराननु ।। तो अनंतधा जाला आपणु ।। तो अंशु हा ह्मणौन ।। विश्वु जाणावा ।।२१।।

४२

शुद्ध सत्वें महाकारणी ।। प्रत्यगात्मा अभिमानी ।। तोचि तमोगुणें कारणी ।। प्राज्ञु जाला ।।२२।। प्रकाशें अज्ञु तो प्राज्ञु[3] ।। सत्वें तमपूर्वकें जाला जाणु ।। तैं (सत्त्वें तमपूर्वकु गुणु) ।। तैजसु ह्मणविलें ।।२३।। तोचि स्थुळीं रजोगुणें ।। मी देहो येणें अभिमानें।। विश्व जाला जाणे ।। स्थूळ (भोग) ।।२४।।

---

१. सत्वा. २. आला. ३. प्राप्तु.

४३

जीवांस स्थान चतुष्टय

४४

प्रत्यगात्मा अभिमानी ॥ वर्त्ते देहीं महाकारणी ॥ तेथें तुरीयावस्था तीलागूनी ॥ अतींद्रिय स्थान ॥२५॥

४५

वृत्ति भेदा हृदयस्थान ॥ वृत्तिलया तेचि आयन ॥ सुषुप्ति स्छल ह्मणौन ॥ हृदयचि बोलावें ॥२६॥

४६

मनोरथूचि जालें स्वप्न ॥ अतेव तया स्छान ॥ कंठू ऐसें वचन ॥ साच मानावें ॥२७॥

४७

नेत्र स्छान जागृतीतें ॥ हे अनुभवा न ये कवणातें ॥ नेत्रीं अधिष्ठान धरितां तें ॥ जागणेंचि वाढे ॥२८॥

४८

अतींद्रियी चिदाकाश ॥ (तेंचि जालें) हृदयाकाश ॥ (तेंचि) + + + ॥ अवस्था + + + ॥ २९ ॥

४९

जीवांस भोग चतुष्टय

५०

तुरीयेचिया दृष्टी ॥ देहत्रयभान अभावे सृष्टी ॥ भासु नव्हे ऐसी उठी ॥ अभाव कळा ॥८३०॥ तोचि अभासु तेथें ॥ भोगू जाणावा पुरुषातें ॥ सर्वभावो तयातें ॥ विषयो होये ॥३१॥

५१

सकळां विषयांचें विस्मरण ॥ परंतु आनंदाचें असे स्फुरण ॥ या लागिं तोचि भोग ह्मणौन ॥ तेथें बोलिला ॥३२॥

५२

स्थूळा प्रपंचा वेगळा ॥ नाडळतु स्थूळां इंद्रियां सकळा ॥ विषयाकारें आकारला॥ प्रपंचु स्वप्निचा॥३३॥ तेथिचा घडे संगु ॥

तो प्रविविक्तु विषय भोगु ।। [1]सक+इंद्रियां अंतरंगु ।। आभासु जयाचा ।।३४।।

५३

स्थूळीं जागृती द्वारा दिसे ।। तो बाह्य प्रपंचु स्थूळ असे ।। तोचि स्थूळ विषय भोगु अनायासें ।। जो ये भोगासी ।।३५।।

५४

आभासु भोगु जो ज्ञानें ।। तोचि अतंत्रु अज्ञानें ।। प्रविविक्तु मनोधर्में तेणें ।। तोचि आभासला ।।३६।। तोचि रजाचिया वृत्ति ।। बाह्य आला व्यक्ती ।। स्थूळ भोगु मानिती ।। तयातेंची ।।३७।।

५५

जीवांचें ठांई गुण चतुष्टय

५६

एवं महाकारण देह तुरियावस्था ।। उभयाभिमानी प्रत्यगात्मा भोक्ता ।। अभासु भोगु अतींद्रियता ।। ऐसें सर्व ।।३८।। स्वस्वरूपाचें येक स्फुरण ।। प्रपंचाभावें करून ।। तेंचि शुद्ध सत्त्व ह्मणौन ।। मानावें अविद्येचें ।।३९।। शुद्ध सत्त्व गुण मायेचा ।। अंशत्वें भेद तयाचा ।। तोचि शुद्ध सत्त्व गुणु अविद्येचा ।। जीवाचां ठांयीं ।।८४०।।

५७

कारण देह सुषुप्त्यवस्था ।। उभयाभिमानी प्राज्ञु तत्वता ।। आनंद मोघु विचारितां ।। हृदयस्था[2] हें ।।४१।। सकळ आत्मा स्फुरण ।। जडत्व लय प्रधान ।। तमो गुणाचें लक्षण ।। अविद्येचिया ।।४२।। जैसा कारणी अप्रकाशमानु ।। मायेचा कीरु तमोगुणु ।। (तेंवि) तैसा हा आपणु ।। जीव[3] रूपीं अविद्या ।।४३।।

५८

लिंग देह स्वप्नावस्था ।। कंठस्थान तेथें जें तत्वतां ।। आणि भोगू भोगी भोक्ता ।। प्रविविक्तु तो ।।४४।। एवं चतुर्विध हें गुण-

---

१. 'ळ' किंवा 'ळा' असें एक अक्षर मूळांतच लिहावयाचें राहिलेलें आहे.

२ स्थान. ३. जीवा रुपी अविद्ये.

भान ।। पांचवें अभिमानित्व भोक्तेपण ।। हें अविद्यक तमप्रधान ।। जाणावें सत्त्व ।।४५।। जो कीरु सत्त्व गुणु मायेचा ।। तोचि बोलावा अविद्येचा ।। कां जें अंशभेदु तयाचा ।। ह्मणौनियां ।। ४६ ।। येक सत्व मायावी ।। अनंतधा जालें मायीवी भावीं ।। तेंचि पंचक हें जीवीं ।। जाणावें आपुलालें ।।४७।।

५९

स्थूळ देह जागृती अवस्था ।। आणि विश्वु अभिमानी भोक्ता ।। नेत्रस्थान तत्वता ।। स्थूल विषय भोगू ।।४८।। हा पंच-विधु रजोगुणु ॥ जो अविद्येचा आभास मानु ।। आता अंशी ते कवण ।। यया गुणा (चा) ॥४९।। (रजो) गुणु जो मायावी ।। तोचि अनंतधा जाला जीवात्मभावीं ।। कारणें कार्यें अनुभवी ।। तों ऐसें जाणे ।।८५०।।

६०

या परी अविद्येचें शुद्ध (स) त्व ।। तेचि तमपूर्वक सत्व ।। तेचि रजोगुणें स्पष्टत्व ।। पावे अनुपायें ।। ५१ ।। गुणभेदु तो कल्पना ।। येथ प्रकृतिं दुसरी असेना ।। अनुभवी जाणे जो आपणा ।। तो हें जाणें ।।५२।।

६१

जीवांचें ठांइं सार्ध्द मात्रात्रय वाचक

६२

महाकारण तुरिया प्रत्यगात्मा ।। अभासु अतींद्रिय स्थान महिमा ।। हे शुद्ध सत्व गुणाची सीमा ।। इतुली सांगीतली ।।५३।। अविद्येचा शुद्ध सत्वगुणु ।। तो प्रणवाचा चतुर्थ चरणु ।। अर्द्ध-मात्रा जाणे जाणु ।। बीज तेथें ।।५४।। मायामयु जो ओंकारू ।। तयाचा अर्द्ध मात्रांकुरू ।। अनंतधा तयाचाचि विकारू ।। होता जाला ।।५५।। अर्द्धमात्रा जे ते तत्वता ।। तेचि या जालिया अनंता ।। अविद्या स्थानी प्रतिबिंबतां ।। भोगि जिउ ।।५६।।

६३

तमोगुणु अविद्येचा ।। तो तृतीय पादु प्रणवाचा ।। मकारु मात्रा येथिचा ।। ऐसा अभिप्राऊ ।।५७।। मायावी प्रणवीं मकारू ।। तृतीय पादु जो समग्रु ।। तोचि अंशत्वें भेदला अपारू ।। कार्याचां ठांइं ।।५८।। बीज होउनि वृक्षाकारें ।। अनंतधा जैसे स्फुरे ।। तैसा मकारु विस्तारे ।। अनंता मकारी ।।५९।।

६४

लिंग देह स्वप्नावस्था ।। तैजसु अभिमानी भोक्ता ।। कंठ-स्थान आणि तत्वता ।। प्रविविक्तु भोगु ।।८६०।। हा जो अविद्यकु सत्वगुणु ।। बोलिला तमप्रधानु ।। तो प्रणवा द्वितीय चरणु ।। उकारु मात्रा ।।६१।। मायावी प्रणवाकारु ।। तेथिचा द्वितीय पादु उकारू ।। तोचि अनंतधा सविकारू ।। भेदला असतां ।। ६२ ।। अंशत्वें उकारू सत्वगुणी ।। तोचि हा जाणावा जीवस्थानीं ।। स्थूळ प्रपंचु ययापासूनि ।। अपरु जीवा ।।६३।।

६५

देह अवस्था अभिमानी लक्षणु ।। स्थान भोग आदि करूनु ।। जो बोलिला रजोगुणु ।। इये अविद्येचा ।।६४।। तोचि कार्यरूपा ययातें ।। प्रथम पादु प्रणवातें ।। अकारू मात्रा येथें ।। जाणावी निरंतर ।।६५।। मायावी प्रणउ सांगीतला ।। तेथिचा अकारु पादु पहिला ।। तोचि अनंतधा भेदला ।। अविद्येचा होये ।।६६।।

६६

ऐसा चौथा जो चरणु ।। प्रणवाचा सगुणु ।। तोचि तिसरा दुसरा आपणु ।। पहिला होये ।।६७।। अर्द्ध मात्रा जे ध्वनि ।। तेचि मकारू जाली तेथूनी ।। उकारू अकारू तीचि पासूनि ।। तरि तेचि सकळ ।।६८।। आउठ मात्रा ॐ कारीं ।। परंतु आदि अंतीं सर्वत्रीं ।। ध्वनीचि येकी खरी ।। तयांचां ठांइं ।।६९।।

मराठी ग्रंथ संग्रालय. ठाणे. स्थलक्र
अनुक्रमांक ..... दि: ...
क्रमांक ... . नोंद दि: .....

या भागासाठीं २ फूट ११ इंचांची जागा देण्यांत आलेली आहे. यांत सलग ओळींत असा मजकूर नसून आरंभापासून शेवटपर्यंत कपाटाकृति काढण्यांत आलेल्या आहेत. एकूण अशा ५ आकृति यांत आहेत. पहिल्या तीन आकृति डाव्या बाजूला एका खालीं एक देण्यांत आलेल्या असून त्यांच्या पुढें मध्य भागीं १० चौकोनांची स्तंभाकृती आहे. शेवटची आकृति उजवीकडील बाजूस देण्यांत आलेली आहे. जेथे शक्य आहे तेथें मूळाप्रमाणेंच आकृति मजकुरासुद्धां देण्यांत आलेली असून स्थल मर्यादेनें ज्या ठिकाणीं अडचण वाटली त्या ठिकाणचा मजकूर क्रमाकांच्या निर्देशानें देण्यांत आलेला आहे.

माया शबळ परमात्मा व त्याचे गुण गुणकार्य				
महामाया	साक्षित्व	सर्वेश्वरू	शुध्द सत्वगुणु	अर्ध्दमात्रा
माया	प्रळयो	रुद्रु	शुध्दतम	मकारु मात्रा
हिरण्य गर्भु	स्छिति	विष्णु	तमपूर्वक सत्व	उकारू
विराट	उत्पत्ति	ब्रह्मा	रज	अकारु
हें देह–चतुष्टय	हें अवस्था-चतुष्टय	हें अभिमानी चतुष्टय	हें गुण चतुष्टय	आउठ मातृका ॐ कारू

अविद्या शबल ब्रह्म जी (वात्मा त्याची प्रकृती प्राकृत गुणकार्य)						
महाकारण	तुरीया	प्रत्यगात्मा	चिदाकाश	आभासु	शुद्धसत्व	अर्ध्दमात्रा
कारण	सुषुप्ति	प्राज्ञ	हृदय	आनंदु	तम	मकारु
लिंगदेह	स्वप्न	तैजसु	कंठ	(अ)विवि क्तु	सत्व	उकारू
स्थूळ	जागृति	विश्वु	नेत्र	स्थूळ	रज	अकारू
हें देह च तुष्टय	हें अवस्र चतुष्टय	हें अभिमानी चतुष्टय	हें स्छान चतुष्टय	हें भोग चतुष्टय	हें गुण चतुष्टय	हा आउठ मातृका ॐ कारू

१– कार्य आणि कारण ।। उपाधिद्वय हें सगुण ।। जीवेश्वर भेदें निरोपण ।। केलें ययाचें ।।८७०।। तें अगाध असे जाणतां ।। नव्हे संग्रहायोग्य तत्वता ।। संग्रहें विण बोलतां ।। नये विवंचना[1] ।।७१।। ह्मणोनि पाठा (चि) कारणें ।। नाम मात्रेंचि लागैल बोलणें ।। तया नामें ह्मणणें[2] ।। येथिचें भावचक्र ।।७२।।

१	२	३
४		
५		
६		
७		
८		
९		
१०		
११		
१२		

१. विवेचना. २. हाणणें.

१

स्थूळ भागु भूतांचा ईश्वरें कर्दमु केला तयाचा ।। अत्यंत सारद्रांशु तेथिंचा ।। तो शोषला तेजें ।।७३।। तयाचें ब्रह्मांड केलें।। स्व शरीर विराट[1] रचिलें ।। पाठीं तदंशेनी मिळे ।। जीवांचें स्थूळ ।।७४।।

२

सूक्ष्मा शरीराची विचारणा ।। पुराष्टकें आपणा ।। कीं मना मग स्थूळांची विवंचना ।। बोलिजैल ।।७५।।

३

सूक्ष्म भाग समस्त ।। करूनि ते पंचीकृत ।। तयाचें हिरण्य-गर्भ त्वरित ।। देह रचिलें ।।७६।। तदंशें जीवा लिंग शरीर ।। ईश्वरें रचिलें सविकार ।। यया परिं चराचर ।। निर्माण जालें ।।७७।।

४

करितां स्वस्वरूपानुसंधान ।। ईश्वरा होये दुचितेपण ।। नावेक राहे अनवधान ।। मात्र जें स्थिती ।।७८।। तेंचि मायारूप मोहन ।। ईश्वरी बोलिजे ह्मणौन ।। आतां तत्कार्य अज्ञान ।। प्रत्यगात्मयातें ।।७९।। स्वस्वरूपाचें अज्ञान ।। चिदानंदमयतेचें आछादन ।। अविद्यानामें गहन ।। मोहक जें कां ।।८८०।। केवळ मोही स्वाश्रयातें ।। आवरक विक्षेप जें तयातें ।। अविद्या पुरतत्त्व-वेत्ते ।। (तें) चि बोलती ।।८१।। स्वस्वरूप वृत्तीचा विलयो ।। मीपणाचा केवल क्षयो ।। जेणें आत्मा आश्रयो ।। आछादला स्फुरे ।।८२।। मी आपणातें नेणें ।। ऐसें हीं न उमळे जाणणें ।। अविद्या पुरतें गुणें ।। येणें जाणावें ।।८३।।

५

स्वस्वरूपाचेनि अनवधानें ।। ईश्वरीं अन्यथा जाणणें ।।

---

१. विराटक.

महतत्व ह्मणणें ।। जयातें घडे ।।८४।। माया प्रधान संस्फुरण ।। सर्वेश्वरीं प्रपंचज्ञान ।। निर्विकल्प गुणप्रधान ।। केवळ जें ।।८५।। तें सर्वेश्वरीं सहजें ।। महतत्व ऐसें बोलिजे ।। कार्योपाधि ह्मणिजे ।। अन्यथा ज्ञान ।।८६।। अज्ञान पूर्वक जें ज्ञान ।। निर्विकल्प प्रपंच स्फुरण ।। कामनारूप अर्थज्ञान ।। व्यापारापूर्वीं ।।८७।। जेथें कर्तृत्व ना कार्य करण ।। निर्विकल्प प्रपंच ज्ञान ।। काम रूप वृत्ति ह्मणौन।। का ('म') रूप तें ।।८८।।

६

निर्विकल्प प्रपंच स्फुरण ।। तेचि सविकल्प गुण प्रधान ।। कार्य कर्त्ता करण ।। येणें आकारें ।।८९।। ज्ञाता ज्ञेय आणि ज्ञान ।। चेष्टच्य चेष्टकु चेष्टणें ।। ऐसे गुणत्रय प्रधान ।। जे स्फुरण उठी ।।८९०।। जयातें अहंकारु ह्मणिजे ।। गुणत्रय भेदें भेदिजे ।। स्थूळ सूक्ष्म निपजे ।। जेथून क्रियेसीं ।।९१।। त्रिगुणाहंकारू जें सर्वेश्वरीं ।। स्फुरण बोलिजे योगेश्वरीं ।। तें कार्योपाधींचां घरीं ।। बोलिजे क्रिया ।।९२।। पुर विषय कामु जो निर्विकल्पु ।। तोचि होये सविकल्पु ।। जो कर्त्ता करण क्रिया रूपु ।। भर्वसेन ।।९३।। एवं वृत्तिरूप क्रिया-रूपु ।। कर्मपुराचें हें स्वरूप ।। आतां तेचि भेद धर्मरूप ।। कैसे असती पां ।।९४।।

७

निर्विकल्प स्फुरण अंत:करण	१	कर्तृत्व पंचक
संकल्पात्मक स्फुरण मन	२	
निश्चयात्मक स्फुरण बुद्धि	३	
अनुसंधानात्मक स्फुरण चित्त	४	
अहंता स्फुरण अहंकारू	५	

३२

सर्वांग व्यापी वायो व्यानु
नाभि वसे तो समानु
कंठस्थानी उदानु
हृदयीं वसे तो प्राणु
गुदीं वसे अपानु

१ २ ३ ४ ५ } चेष्टाकरण[1] पंचक

३३

श्रोतव्यादि धर्मक श्रोत्रा
स्पर्शज्ञान जेणें तें त्वक्
द्रष्टव्यादि धर्मक चक्षु
रसज्ञानादि[2] धर्मक रसनेंद्रिय
गंधज्ञान जेणें तें घ्राणेंद्रिय

१ २ ३ ४ ५ } हें ज्ञान-करण पंचक

३४

वक्तव्यादि धर्मक वागींद्रिय
ग्रहणदान वृत्ति ते कर
गतव्यात्मक वृत्ति ते पाद
आनंदैतव्यात्मक शिश्न
विसर्गैतव्यात्मक पायु

१ २ ३ ४ ५ } हें कर्मेंद्रियपूर

११

अंत:करणादिकां विषयो शब्दु गुणु व्योमाचा १
मनादिकां विषयो स्पर्श गुणु पवनाचा २
बुध्यादिकां विषयो रूप गुणु तेजाचा ३
[3]चित्तादिकां विषयो रस गुणु उदकाचा ४
अहंकारादिकां विषयो गंध गुणु पृथ्वीचा ५

} हें विषयपंचक

१२

सूक्ष्में तत्वें सांगीतलीं ॥ गुणभेदें तीं वेगळालीं ॥ तयांची

१. चेष्टावरण. २. रसनादि. ३, चित्रादिका.

किं लक्षणता कथिली ।। पुराष्टक यंत्रें ।।९५।। कर्त्ताकिरण कार्या कृती तयांची असे व्यक्त स्फूर्ति ।। सूक्ष्म शरी (र) ह्मणती ।। तयाचि लागी ।।९६।। सूक्ष्म तत्वांपासून ।। हिरण्यगर्भाचें निर्माण।। तदंशज आन ।। लिंगदेह जीवाचें ।। ९७ ।। तेथ त्रिपुटीचा व्यापारू ।। मानसीकु वर्त्ते समग्रु[२] ।। स्थूलें वीण स्थूळ आकारू ।। भोगु न संपादे ।।९८।। ह्मणौनि स्थूळा भूत विभागाचें ।। कार्य देहद्वय साकार साचें ।। ईश्वरें रचिलें तयाचें ।। कैसें विवरण ।।९९।। [३]चतुर्द्दश भुवनात्मक ।। स्थूल देह विराटनामक ।। ईश्वराचें पांच भौतीक ।। शरीर तें ।।९००।। तैसेंचि पांच भौतीक केवळ ।। जीवाचे शरीर स्थूळ ।। तेथिचे भूत भेद स्थूळ ।। तेचि कैसे ।।१।। अस्थि मांस त्वचा नाडी रोमा ।। हें काठिण्यत्वें पृथ्वीची महिमा ।। शरीरीं वर्त्ते देह धर्मा ।। आधार भूत ।। २ ।। स्वेद रक्त स्नायु मज्जा रेत ।। हे सारद्र आप समस्त[४] ।। शरीराकारें वर्तत ।। जीवाचिया ।। ३ ।। क्षुधा तृषा[५] आलस्य निद्रा मैथुन ।। हे शोषक तेजाचे गुण ।। सारद्र विकारां कारण ।। होती अन्नपानें ।।४।। चळन गमन धावन ।। निरोध प्रसारण स्पंदन ।। हे चंचळ देहीं गुण ।। तया वायोचें ।।५।। भय कामु क्रोधु मोहो शोकु ।। देहीं व्योम विकारु हा व्यापकु ।। ऐसा स्थूळ देहो पांच भौतिकु ।। पुडती कैसा ।।६।।

अस्ति जायते वर्ध्दते विपरिणमते
अपक्षीयते विनश्यति ।।

ऐसे ते साही विकार ।। जयातें असती अनिवार ।। ऐसें सप्त धातुक साकार ।।.....।। ७ ।। जीवाचें स्थूळ शरीर ।। तया विश्राम मंदिर ।। सूक्ष्म शरीराचें नवद्वार ।। पुर जीवाचें ।। ८ ।। कीं क्षेत्र कर्म निष्पत्तीचें ।। साकार वर्णाश्रमाचें ।।.....।। आधार भूत ।। ९ ।। ऐसे स्थूळ देह सृजुनि ।। लिंगदेह प्रवेशउनि ।। परमात्मा जीवा लागुनि ।। वर्त्तविता जाला ।।९१०।।

---

२. समगृ. ३. चतुर्दक ४. समग्र. ५. तृष्णा.

परम	माया	ईश्वर	स्ववेदन	अव्यक्त	महत्	अहंकार	सात्विक	राजस	तामस	विराट	उत्पत्ति	ब्रह्मा	हिरण्यगर्भ	स्थिति	वि (ष्णु)	माया	प्रळय	रुद्र
तत्व	अविद्या	जीव	स्ववेदन	अज्ञान	अन्यथाज्ञान	अहंकार	सात्विक	राजस	तामस	स्थूळ	जागृति	विश्व	लिंगदेह	स्वप्न	तैजस	कारण	सुषुप्ति	प्राज्ञ

साम्य	माया	ईश्वर	स्ववेदन	अव्यक्त	महत्	अहंकार	सात्विक	राजस	तामस	विराट	उत्पत्ति	ब्रह्मा	रजोगुण	हिरण्यगर्भ	स्थिति	विष्णु	सत्वगुण
साम्या	अविद्या	जीउ	स्ववेदन	अज्ञान	अन्यथाज्ञान	अहंकार	सात्विक	राजस	तामस	स्थूल	स्थिति	विश्व	रजोगुण	लिंगदेह	स्वप्न	तैजस	सत्वगुण

शुद्ध ब्रह्म सच्चिदानंदमय तेंचि प्रकृति योगें शबळ स्वानुसंधानशील स (च्छ) ब्दें वाच्य बोलिजे	
शबला ब्रह्मा पासाव अव्यक्त	
अव्यक्ता पासाव महतत्व	
महतत्वा पासाव अहंकारू	
अहंकारापासाव पंचतन्मातृकाविषय	
तामसाहंकारापासाव	
शब्द गुणें आकाश	१
शब्द गुणु	१
आकाशा पासूनि वायो	१
गुणु	२
वायो पासाव तेज	१
गुण	३
तेजा पासाव उदक	१
गुण	४
उदका पासाव पृथ्वी	१
गुण	५

पृथ्वी	आप	तेज	वायो	आकाश	गु
शब्दु विषयो १	वाचा कर्मकरण १	श्रोत्र ज्ञानकरण १	व्यानु चेष्टाकरण १	अंत:करण कर्त्ता १	रु
स्पर्शु विषयो १	पाणि कर्मकरण १	त्वक् ज्ञानकरण १	समान चेष्टाकरण १	म (न) कर्त्ता १	दे
रूप विषयो १	पाद कर्मकरण १	चक्षु ज्ञानकरण १	उदानु चेष्टाकरण १	बुध्दि कर्त्ता १	व
रस विषयो १	शिश्न कर्मकरण १	रसना ज्ञानकरण १	प्राणु चेष्टाकरण १	चित्त कर्त्ता १	द
गंध विषयो १	पायु कर्मकरण	(घ्राण) (ज्ञानकरण) १	अपानु चेष्टाकरण १	अहंकारु कर्त्ता १	त्त
विषय ५	कर्मेंद्रियें ५	ज्ञानेंद्रियें ५	घ्राण ५		

गु

सांगतां (तें) पंचिकरण ।। ये अर्थीं मत्ताभेद आन ।। ते . . . विवरण ।। संक्षेपें बोलिजैल ।।११।।

यस्मिन्पंच पंचजनाः आकाशश्च प्रतिष्ठितः ।।
तमेव मन्य आत्मान विद्वान्ब्रह्मामृतोमृतं ।। छ ।।

ऐसें सिद्धांत मुखें करून ।। वेदाचें असें वचन ।। सांख्यमतें तत्व विवरण ।। (तेणें) चि प्रकारें ।।१२।।

. . . वाच्यमविद्या शबलब्रह्म ।।
ब्रह्मणोक्तं अव्यक्तान् . . . महतोहंकारः ।।
अहंकारान्पंचतन्मात्रा ।। पंचतन्मात्रेभ्यो
पंच महाभूतानि ।। पंच महाभूतानामेकैकं
द्विधा विभज्यार्द्धभागं विहाय इतरं
विभागं समं पंचधा विभज्य ।।
पंचीकरणं योजयेत् ।।

सकळ विश्वाचें कारण ।। निमित्य आणि उपादान ।। परब्रह्म निर्गुण ।। निराभास जें ।।१३।। जेथें कार्य ना कारण ।। माया अविद्या भान ।। जीउ ईश्वरु ना आन ।। वस्तुजात ।।१४।। ज्ञाता ज्ञेय ना जेथ ज्ञान ।। कर्त्ता कार्य ना करण ।। ऐसें सच्चिदानंदमय संपूर्ण ।। परब्रह्म ।।१५।। जें ब्रह्म निर्विकल्प ।। तें ईश्वराचें निर्गुण स्वरूप ।। तेचि स्वप्रकृति सविकल्प ।। स्फुरे ।। गुणी ।।१६।। तें मी ब्रह्म ऐसें स्फुरे अनुसंधान ।। ब्रह्मीं तदाकार स्फुरे स्फुरण ।। तें महामायेचें लक्षण ।। जाणतीं जाणावें[1] ।।१७।। ते महामाया मूळ-प्रकृति ।। ईश्वरु असतां तिया स्छिती ।। स्वरूपानुसंधानाचिये वृत्ती ।। जडत्व पावे ।।१९।। केवळ होतांचि अनवधान ।। अव्यक्त माया रूप तेथून ।। होतें जालें निर्माण ।। अनायासें ।।९२०।। ब्रह्मी माया उपजली ।। ते सर्वेश्वरें अवलोकिली ।। ऐसी असतां प्रसवली ।।

---

१ जाणावीं.

महतत्वातें ते ॥२१॥ तें महतत्वाचें स्फुरण ॥ गुणत्रयाचें सूक्ष्म-कारण ॥ सर्वेश्वरें अधिष्ठित ह्मणोन ॥ प्रौढ जालें ॥२२॥ महतत्व व्यक्त जालें ॥ मग तें अहंकारातें व्यालें ॥ तेथें गुणत्रय अंकूरलें ॥ तेणें करून ॥२३॥ ए . . . . . स्फुरण ॥ गुणत्रय भेदें त्रिधा भिन्न ॥ तया माजि प्रथम स्फुरण ॥ तया तामसाचें ॥२४॥ सर्वोत्तमें अवलोकिला ॥ तामसु अहंकारू येकला ॥ तो वि . . . . . ला ॥ भूतांतें प्रसवता ॥२५॥ तामसु प्रसवला गगनातें ॥ गगन तया वायोतें ॥ वायो प्रसवे अग्नीतें ॥ इछा ईश्वराचिया ॥२६॥ अग्नी प्रसवला उदकासी ॥ उदक तिये पृथ्वीसी ॥ पांचहीं महाभूतें ॥ ऐसीं ॥ प्रसवतीं जालीं ॥२७॥ एवं परस्परा संभूतें ॥ ईश्वरेछया महाभूतें ॥ आतां मुख्य गुणु तयांतें ॥ तोचि कवणु ॥२८॥ शब्दु विशेष गुणु गगनि ॥ स्पर्शु तैसाचि पवनी ॥ रूप कारण गुणु दहनी उदकीं रसु ॥२९॥ गंधू विशेष गुणु धरणीतें ॥ विशिष्टा गणीं ऐशीं भूतें ॥ आतां आवांतर गुण ययांतें ॥ मिनले ते कवण ॥९३०॥ कारण भूतांतें व्याप्य स्थानी ॥ कार्यभूत असे ह्मणौनि ॥ कार्य तें कारणेंसी मिळोनि ॥ व्यक्त स्फुरे ॥३१॥ तैं कारण भूताचे गुण ॥ कार्यभूतीं असती वर्त्तमान ॥ ते तयांतें प्रकासून ॥ सार्वकाळ ॥३२॥ आकाश शब्दें येकें गुणें ॥ वायोतें व्यापिलें तेणें ॥ ह्मणौन शब्द स्पर्शु पवनें ॥ ध्येले दोनि गुण ॥३३॥ रूप निजगुणु तेजाचा ॥ तेथें स्पर्श तो तया पवनाचा ॥ शब्द तेंवीचि नभाचा ॥ जाणावा गुणु ॥३४॥ उदकीं रसु आपुला गुण ॥ शब्द व्योम स्पर्श पवनु ॥ रूप गुणें दहनु ॥ वर्त्ते आपीं ॥३५॥ पृथ्वीचा गुणु तो गंधूचि ॥ शब्दु तो तया व्योमाचाची ॥ स्पर्शु गुणु ॥ तैसाचि ॥ वायोचा वर्त्ते ॥३६॥ रूप गुण तेजाचा ॥ रस गुणु तया उदकाचा ॥ ऐसा सगुणु महाभूतांचा आभासु हा ॥३७॥ शब्द गुणु वर्म गगनी ॥ सछिद्रता धर्म तयाचा स्थानी ॥ अवकाश प्रदान निर्वाणी ॥ कर्म हें तया ॥३८॥ शब्दु स्पर्शु पवनी वर्म ॥ चंचळता हे तेथें धर्म ॥

विहरणादिक कर्म ।। निरंतर जाणावें ।।३९।। शब्दु स्पर्शु रूप ।। तेजीं वर्म स्वरूप ।। उष्णता आपेंआप ।। निजधर्म तयाचा ।।९४०।। पचनादिक कर्म दहनी ।। शब्द स्पर्श रूप रस वर्म जीवनी ।। सारद्रता धर्म त्याचा स्छानी ।। क्लेदनादिक कर्म ।।४१।। शब्दु स्पर्शु रूप रसु गंधु ।। हा विषय पंचकु प्रसिद्धु ।। पृथ्वीचां ठांईं भेदु ।। यया वर्माचा ।।४२।। कठिणता हे पार्थिव धर्म ।। धारणादिक कर्म ।। एवं महाभूतपंचक परम ।। ऐसें उपजलें ।।४३।। द्रव्य शक्तीसीं समवेतु ।। तामसु अहंकारु मूर्तिमंतु ।। ईश्वरें अवलोकिला असतां व्यक्तु ।। तो प्रसवला भूतांतें ।।४४।। मग परमेश्वरें अवलोकिला ।। राजसु अहंकारु आपुला ।। क्रिया शक्तिसीं संचला ।। अनायासें ।।४५।। अवलोकन मात्र बीज तेथें ।। राजसु क्रियेचेनि संघातें ।। प्रसवला पंचदश तत्वांतें ।। तयेचि काळीं ।।४६।। एकु पंचकु प्राणाचा ।। दुसरा तो ज्ञानेंद्रियांचा ।। तिसरा कर्म करणाचा ।। ऐसें त्रिविध करण ।।४७।। व्यानु उदानु समानु ।। प्राणु आणि अपानु ।। हा प्राण पंचकु पवनु ।। श्रोत्रत्वक् चक्षु रसना घ्राणु ।। ज्ञानेंद्रियें हीं ।। . . . . ।।४८।। वाचा पाणि पाद शिश्न पायु ।। हा कर्मेंद्रिय पंचकु ज्ञेयु ।। राजसु अहंकारू करणमयु ।। तो येणें प्रकारें ।।४९।। सात्विकीं अहंकारीं ज्ञानशक्ति ।। सर्वेश्वरु अवलोकी ययांप्रति ।। तेणेंचि निमित्य कारणें होती ।। तेथून पांच तत्वें ।।९५०।। अंतःकरण मन बुद्धि चित्त ।। पांचवा अहंकारु निश्चित ।। ऐसीं सूक्ष्में तत्वें तेथ ।। निपजतीं जाली ।।५१।। सात्विकें अहंकारें जालीं ।। तीं ज्ञानरूपेंचि तत्वें उपजलीं ।। तेथ ज्ञानशक्ति मूळीं ।। होती ह्मणौन ।।५२।। ज्ञानरूपें तीं तत्वता ।। पांचही तत्वें कर्त्ता ।। ज्ञाता चेष्टकु भोक्ता ।। येणें आकारें ।।५३।। राजसी क्रियाशक्ति ह्मणौन ।। त्या पासाव जालें तें करण ।। चेष्टा ज्ञान कर्म जाण ।। येणें आकारें ।।५४।। तामसीं वर्त्तें द्रव्यशक्ति ।। या लागीं तीं द्रव्येंचि होती ।। ऐसीं तत्वांचीं उत्पत्ती ।। जाली असतां ।।५५।। करणेंसीं सहितु कर्त्ता ।। कार्याचां ठांई

प्रवेशतां ।। सूक्ष्माचा अनुवेशु तत्वता ।। होये (स्थूळीं) ।।५६।। अंत:करण व्यानाश्रये ।। श्रोत्रां वाचेचेनि अन्वयें ।। शब्दगुणें मिनतें[1] होये ।। तये गगनि ।।५७।। मन समानाचेनि वेगें ।। त्वचा कर संयोगें ।। स्पर्शास्तिव पवनी रिघे ।। आपेंआप ।।५८।। बुद्धि उदानाचेनि बळें ।। चक्षु पादेसीं रूपी मिळे ।। तें रूप गुण मिसळे ।। तये तेजीं ।।५९ चित्त प्राणाधारें उठे ।। रसने शिश्नेसीं एके वाटे ।। रस गुणे आपा भेटे ।। येक होये ।।९६०।। अहंकारु अपान वेगें ।। घ्राणा पांयुचेनि संगें ।। गंध गुणे रिघे ।। धरणि माजि ।।६१।। ऐसा कारणाचा एकवळा ।। कार्याचा ठांईं जाला ।। सूक्ष्में आश्रयूनि स्थूळां ।। वर्त्ततें असतां ।।६२।। पंचविसांचीं पांचचि जालीं ।। सूक्ष्में स्थूळीं संक्रमलीं ।। तेणें पुष्टता पावलीं ।। पांच ही स्थूळें ।।६३।। मग परमेश्वरें अनंतें ।। द्विधा विभागूनि समस्ते ।। देह द्वय आपणाते ।। रचिलें तें कैसें ।।६४।।

रु

सूक्ष्म भागाचें गगन ।। ईश्वरें दृष्टी अवलोकून ।। पंचधा भेदें भिन्न ।। विभागिलें तें ।।६५।। त्यामाजि अंत:करण गगनी ।। व्यानु मेळविला पवनी ।। श्रोतृ तये दहनी ।। समर्पिला देवें ।।६६।। वाचा मेळविली उदकासि ।। शब्दु तिये पृथ्वीसी ।। यया परि येक पांचासी ।। मेळविलें देवें ।।६७।। व्योमी व्योम अंत:करण ।। वायो व्यानु तेज श्रवण ।। वाचा उदक पृथ्वी ह्मणौन ।। शब्दु बोलिजे ।।६८।।

दे

सूक्ष्म भागें पवनु ।। ईश्वरें पंचधा केला भिन्नु ।। तो मनोरुपें जाउन ।। गगनी राहिला ।।६९।। समानेंशि पवना ।। त्वक् स्वरूपें दहना ।। पाणींद्रिय रूपें जिवना ।। पवनु मिनला ।।९७०।। स्पर्शाचेनि स्वरूपें ।। धरणी माजि वायो समर्पे ।। येक पांचा ठांयीं वर्त्ते ।।

---

१ निवर्तें

वायु तत्व ऐसें ॥७१॥ पवनी व्योम रूपें मन ॥ पवनु पवनी समान ॥ त्वक् स्वरूपें दहन ॥ ऐसें जाणावें ॥ ७२ ॥ पाणींद्रिय पवनी आप ॥ स्पर्शु पृथ्वीचें स्वरूप ॥ येणें प्रकारें पवन रूप ॥ येक पंचधा ॥७३॥

व

सर्वेश्वरें अवलोकिला ॥ पावक पंचधा भेदिला ॥ तो बुद्धिरूपें ठेविला ॥ तये गगनी ॥७४॥ उदान रूपें प्रभंजनि ॥ चक्षुरूपें दहनीं पादरूपें जीवनी ॥ दहनु मेळविला ॥७५॥ रूप गुणें पृथ्वीसी ॥ अग्नि मेळविला निर्धारिंसीं ॥ येक तत्व पांचांसी ॥ दिधलें प्रकारें येणें ॥७६॥ तेजीं बुद्धि गगन ॥ वायो उदानु तेज नयन[1] ॥ पादेंद्रिय बोलिजे जीवन ॥ रूप ते पृथ्वी ॥७७॥

द

सूक्ष्म तोय सर्वेश्वरें ॥ पंचधा केलें इछामात्रें ॥ तें चित्तांशें शुद्धाकारें ॥ ठेविलें गगनी ॥७८॥ प्राणरूपें पवनी ॥ रसनारूपें दहनी ॥ शिश्नरूपें उदकस्थानी ॥ उदक ठेविलें ॥७९॥ रसगुणें आप खंडिलें ॥ ते पृथ्वीचिया भागा मेळविलें ॥ ऐसें येक उदक वांटिलें ॥ पांचां ठांई ॥९८०॥ आणि आकाश चित्ताकारें ॥ प्राण वायो सत्याकारें ॥ रसना तेज शिश्न खरें ॥ उदक उदकीं ॥८१॥ रसु स्वरूप पृथ्वीचें ॥ ऐसें स्वरूप जळाचें ॥ पांचही भेद तयाचे ॥ संक्षेंपें सांगीतले ॥८२॥

त्त

सूक्ष्म भागु पृथ्वीचा ॥ पंचधा छेद केला तयाचा ॥ अहंकारु सूक्ष्मांशु तीचा ॥ तो ठेविला आकाशी ॥८३॥ अपानांशें धरणी ॥ संस्थापिली तये पवनी ॥ घ्राण रूपें दहनी ॥ मेदिनी ठेविलि ॥८४॥ पायू गुणें उदकी धरणी ॥ गंध गुणें ते तीचां स्थानी ॥ ऐसी पंचधा विभागूनि ॥ वाटिली मही ॥८५॥ पृथ्वीसी गगन अहंकारू ॥

---

१ गगन

अपान रूपें समीरू ।। घ्राणु तो वैश्वानरू ।। पायू तें जळ ।।८६।। गंधु धरणी धरणीतें ।। एवं एकि पंचधा ऐसी वर्त्ते ।। सूक्ष्म भागें पृथ्वीतें प्रकारें येणें ।।८७।।

१०

या भागासांठीं ४ फूट ९ इंच इतकी जागा लागलेली आहे. आरंभीं सलग असा १० ओळींचा मजकूर आहे, आणि त्यानंतर अश्वत्थ वृक्षाची आकृति काढलेली आहे. वृक्षाची मुळापासून शाखेच्या शेवटच्या टोकापर्यंत उंची साडेचार फूट असून रुंदी तीन फूट आठ इंच आहे. वृक्षाकृति काढल्यानंतर दासोपंतांनीं डावीकडे प्रथम शोध, खालीं द्वितीय शोध आणि उजवीकडे तृतीय शोध अशा प्रकारें मजकूर लिहिला आहे. हा मजकूर इतर सर्व लिखाणाच्या मानानें अतिशय बारीक अशा अक्षरांत दिलेला आहे. उजवीकडील भागास एका ठिकाणीं कांहीं भाग फाटून गेलेला आहे.

ऐसें कार्य आणि कारण ।। उपाधिद्वय हें सगुण ।। जालें असतां निर्माण ।। पुडती कैसें ।।८८।। कारणोपाधि माया बोलिजे।। तीचें गुणसाम्य स्वरूप जें ।। तें चिन्मात्र ब्रह्म सहजें ।। बीजरूप ।।८९।। तया पासाव विस्तारू ।। तैं शुद्ध सत्वा उठीं अंकुरु ।। तोचि बळावें डीरू ।। स्तंभु होये ।।९०।। तेथूनि उपजे गुणत्रय ।। तें शाखारूप ज्ञेय ।। सेवटीं गुणाचें कार्य ।। ते हे जीवसृष्टी ।।९१।। शाखा सहित विस्तारु ।। जैसा कां शोभे तरुवरू ।। कारणोपाधीचा विचारू ।। प्रसारू तैसा ।।९२।। वृक्षा शाखाग्रीं झोंपाळ ।। कावरूखें जैसें पाल्हाळ ।। तैसें कार्योपाधिचें केवळ ।। डाळ फुटलें ।।९३।। प्रपंचु तयाचि भूमिका ईश्वरांशु जीउ बीज कणिका ।। अविद्या-मया गुणशाखा ।। शोभा देती ।।९४।। इंद्रियांचें सरळ फोक ।।

विषय प्रवाला अनेक ।। गुणाचें बल अधिक ।। तेणें वाढे ।।९५।। वासना नाविधा मूळिका ।। संसारीं सिरकलिया सकळैका ।। विस्तारू पावती अधिका ।। निबिडा होती ।।९६।। कर्मयोगाचे आचरण ।। पारू तो मूळिका आछादन ।। झाड बळावलें तेणें करून ।। ऊंच वाढे ।।९७।। सांडुनि आपुलिया मूला ।। उंचा शाखा होती प्रबळा ।। त्या गुणसाम्या केवळा ।। ब्रह्मातें पावती ।।९८।। येकी खोडाचि पासून वळती ।। अधोमुखा उतरती ।। संसार भूमिके येती ।। पावती मूळा ।।९९।। ऊर्ध्व शाखा त्या कवणी ।। ऐसी आशंका होईल मनी ।। तरि ते विवंचना येथूनि ।। सांगिजैल ।।१०००।। जें पुरुष सर्वज्ञपणें ।। शोभती अपरोक्ष ब्रह्मज्ञानें ।। शाखा रूपें तयांचीं करणें ।। तीं पां कैसीं ।। १ ।। सांडूनि संसार भूमिका ।। आणि तिया वासना मूळिका ।। खोड सांडूनि ऊर्ध्वमुखा।। पावलीया परब्रह्मीं ।। २ ।। ब्रह्मानंदीं निमग्नें ।। जालीं तयांचीं करणें ।। मन बुद्धि चित्त अंत:करणें ।। अहंकरणें निमालीं ।। ३ ।। गुणसाम्य ब्रह्म केवळ ।। पूर्वीं बोलिले जें मूळ ।। तयातें भेदूनि डाळ ।। पावले सन्मात्रीं ।। ४ ।। निर्विकल्प समाधिस्था ।। शाखा जालिया तद्गता[1] ।। तिया नाहीं परततां ।। देखिलि या पुडती ।। ५ ।। सविकल्प समाधि जें भोगिति ।। तयांचिया करणवृत्ति ।। ब्रह्माकारत्वें स्फुरती ।। ह्मणौनि कैसिया ।। ६ ।। मूळिं पावलिया समग्रा ।। शोभा देती तदाकारा ।। विश्रांति योगियां समग्रां ।। विहंगमातें ।। ७ ।। येकां ईश्वराचें आराधन ।। तयांचे ही करण गण ।। ईश्वरोन्मुख ह्मणौन ।। ऊर्ध्वशाखाचि तिया ।। ८ ।। एक आराधिती कर्मयोगें ।। एक ध्यानयोगें ज्ञानयोगें ।। एवं वर्त्तति साधन मार्गे ।। मोक्ष-काम जे ।। ९ ।। तयाचिया गुणप्रवृत्ति ।। कारणोन्मुखाचि करणवृत्ति ।। ऊर्ध्व शाखा परि दिसती ।। अधिकार भेदें ।।१०१०।। ह्मणौनि येकी मुळा पावलिया ।। येकी पावो

---

१ तत्वता.

आलिया ।। येकी प्रथम अंकुरलिया ।। वाढि धरिती ।।११।। आतां जे संसारीक जन ।। नावडे जया मोक्ष साधन ।। इंद्रियां विषय सेवन ।। नित्य जयां ।।१२।। काम्यें निषिद्धे आचरते ।। जन वास-नेतें पोषिते ।। तयांचे करणगण जितुले ते ।। संसारोन्मुखचि ।।१३।। तयांचिया कारण वृत्ती ।। अध:शाखा प्रसारति ।। पृथ्वी पावोनि डोलती ।। पाल्हइलिया ।।१४।। नाना योनिचिया आकृती ।। विषय पल्लव शोभती ।। भूमिका सोडूनि नव जाती ।। अंगुळ द्वय ।।१५।। कर्म फळाचिया चाडा ।। येकी स्वर्गा धांवती उंचवडा ।। तिया कर्मक्षयें बुडा ।। येऊनि पडती ।।१६।। ऐसा कारणकार्यात्मकु ।। वृक्षु बोलिला येकु ।। गीतें गोविंदें विटंकु ।। तो कैसा हा ।।१७।। येकें मूलें वरुतीं ।। येके निबिडें खालुतीं ।। ऐसीया कवण याती ।। वृक्षाची पां ।।१८।। येकी शाखा सरला ।। ऊर्ध्व गेलिया पूर्व मूळा ।। तिया तेथेंचि पाल्हाला ।। शोभती तदाकारत्वें ।।१९।। येकी अध:शाखा पोगारे ।। भूमिके स्पर्शले आगारे ।। आपुला मूळीं झाड शीरे ।। ऐसें नवलाचें ।।१०२०।। खालि वरि शाखा मूळें ।। झाड दिसे वाटोळें ।। नामारूपाचेनि विटाळे ।। विटाळेंचिना ।।२१।। येक ह्मणती येक मूलीं ।। येक ह्मणती दोनि जुलली ।। जाणतें माणूस न्याहाळी ।। तंव कांहींचि नव्हे ।।२२।। येका दिसे येक ।। येका दिसे अनेक ।। येकां सत्य येकां फोंक ।। कांहींचि नसे ।।२३।। येकां अमृता ऐसीं फळें ।। येकां विषा ऐसीं केवलें ।। येकां पानें प्रतिकूळें ।। अनुकूळें येकां ।।२४।। छाये बैसले येक जन ।। तयांचे लागती नयन ।। जीवा बाधी दु:ख स्वप्न ।। चिरकाळ तें ।।२५।। ऐसी विश्रांति परि मारक ।। येकांतें जाली अचूक ।। तंव जन आन येक ।। तयांचि माझारिचे ।।२६।। तयांचे ताप शोक हरले ।। नयन निर्मळ उघडले ।। तेंहीं दिसों लागलें ।। परात्पर जें ।।२७।। (ये) कां आकारू न संपडे ।। येकां दिसे निवाडें ।। शाहाणे जन येणें झाडें ।। मूर्ख केले ।।२८।। फळ तें निर्मळ जैं फळे ।। न फले

न फळणें तैं न फळे ।। फळे न फले तैं न फले ।। फळे फलेंसी[1] ।।२९।। पाहातां व्योमाचें फळ ।। उगवितां दोडकियाचें जाल ।। लोटितां न लोटे सबळ ।। पर्वता परी ।।२०३०।। उडतें संकल्पवातें ।। ये (ऱ्ह) वीं नुचले ईश्वरातें।। मग तो श्रमोनि येथें ।। आंग नेदी ।।३१।। गोविंदु ह्मणे धनंजया ।।जो जाणे झाडा यया ।। तोचि सर्वज्ञु ययां ।। ब्राह्मणा माझारीं ।।३२।। ऐसा हा वृक्षु कवणु ।। परि कार्यकारणोपाधि लक्षणु ।। ययाचां करितां अनुमानु ।। विवेकी चूकती ।।३३।। तो कार्य कारणोपाधी सांगीतला ।। आतां वृक्षाकारें कैसादेखिला ।। तो अनुवादु केला ।। पाहिजे येथूनि ।।३४।।

(अश्वत्थ वृक्षाची आकृति[2])

प्रथम शोध

मागां सांगीतलें पंचीकरण ।। तेणें जालें तत्वाचें ज्ञान ।। आतां वृक्ष साहित्यें येणें करून ।। कवणु बोधु ।।३५।। ऐसिया आक्षेपा परिहारू ।। [3](बोलि) जतु असे विचारू ।। गीतें श्रीकृष्ण योगेश्वरू ।। (तेणें) ही बोलिला ।।३६।। तोही वृक्षु सविस्तरू ।। सांगीतला याची आकारू ।। (हा) न कळतां संसारू ।। गोचरू नव्हे ।।३७।। कारण बीज तें कवण ।। कैसें काय जालें तेथून ।। कवणाचें कवण स्थान ।। स्थिती ते कैसी ।।३८।। एवं कार्या कर-णाचा उभा (रा) ।। (अ) गोचरु जीवा समग्रा ।। अनादि [4]अनंताअपारा ।। कवण जा (णें) ।।३९।। (ना होतां) ययाचें रूपज्ञान ।। कैसें कळतें छेदन ।। ह्मणौनि सकार्यकारण ।। झाड कल्पिलें ।।१०४०।।

---

१. फले ऐसी. २. या आकृतीचें काढलेलें चित्र आंतील मजकुरासह इतरत्र दिलें आहे.
३. बोलिजेल ऐसे ४. मूळांत 'अपारा अनंता' असे शब्द लिहिलें आहेत.

ऊध्वमूलमध:शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।।
अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्यशाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवाला: ।
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ।।

ऐसी कार्या कारणाची उभवणी ।। वृक्ष साहित्यें करूनि ।। संसारू तो (ऐसा) ह्मणौणि ।। रूप केलें ।।४१।। तेचि सांगिजैल विवंचना ।। वृक्ष साहित्य कल्पना ।। आश्रयूनि कृष्ण वचना ।। बोलिजत असे ।।४२।। सत्य ब्रह्म बीज होतें ।। तरि सत्यचि झाड हें असतें ।। सत्यात्म[1] ज्ञानें नाशतें ।। न घडतें हें ।।४३।। असदूप होतें बिज ।। तें असन्मात्र झाड सहज ।। [2].....।। तें आभासतेंचि ना ।।४४।। (काज) निरासें नसते ।। सत्याआड विरोधी ऐसें न घडतें ।। कधीं कवणु कायि कां छेदितें ।। कैंचे कैसा ।।४५।। आतां विवर्त्तु ययाचें बीज ।। तैं विवर्त्तरूप सकळ सहज ।। भान मात्र निःकाज ।। मृगजळा परि ।।४६।। आपुलें ज्ञान विवर्त्तीं ।। (ना) अधिष्ठान साक्षात्कारू तत्वता ।। तैं गुरु शिष्य व्यवहारू नसता ।। सत्याचा बोधु ।।४७।। विवर्त्तु विवर्त्तत्वें जाणणें ।। जाणोनि मिथ्या मानणें ।। आत्मा[3] ब्रह्म अनुभवणें ।। हें कवणा[4] होतें ।।४८।। ह्मणोनि सदसद्गुणी साभासु ।। आनंदमय जो पुरुषु ।। तोचि बीज विशेषु ।। येथ कल्पिला ।।४९।। सदसद्रूपतेचें लक्षण ।। सांगता असे गहन ।। तरि संक्षेपेचि निरूपण ।। कीजत असे ।।१०५०।। गुणसाम्यावस्थेची प्रकृति ।। शुद्धें अधिष्ठिली ज्ञप्ति ।। तेचि मीपणे सदसद्ग्रंथी ।। राहिली ब्रह्मीं ।।५१।। चैतन्य योगें जेणें ।। आनंद-मयत्वें आप (ण) जाणें ।। आनंदमयु पुरुषु ह्मणणें ।। घडलें ह्मणोनिचि ।।५२।। चैतन्यानंद-मयता ।। ते जो मानी अवस्था ।। उन्मनी तीचा भोक्ता ।। निर्गुणु[5] जो ।।५३।। तो पुरुषु बीज स्थानी ।। भूमिका ब्रह्म जेयाचेनि कारणी ।।

---

१. सत्यासज्ञानें. २. मूळांत तिसरें चरण नाहीं. ३. आत्म. ४. हांतें. ५. निगुण.

द्वितीय–शोधु

आतां मूळ तें कवण ह्मणोनि ।। तेथ कल्पिलें ।।५४।। भूमिके माजि अति गुप्त ।। चित्स्फुरण[1] जे स्वगत ।। तेंचि मूल निश्चित ।। प्राकृत गुणसाम्य ।।५५।। प्रळयो ही पावला तरुवरु ।। मूलास्तव होये (नव) तरु ।। या मूलातें संहारू ।। तो असेचिना ।।५६।। (बीजचि) तें विकारलें ।। शाखा मूल (स्वयेंचि) जालें ।। निर्विकल्प (भूमिका आछादलें) ।। ज्ञान तें मूल ।।५७।। (आ) धारें तया मूळाचे (न) ।। (पुरुषी उठी) स्वरूप[2] स्फुरण ।। तें शुद्ध सत्व ह्मणोन ।। (बोलिजे) प्रकृतीचें ।।५८।। (शुद्ध सत्व गुणु प्रकृतीचा) ।। पुरुषा बोध स्वरुपाचा ।। देह अवस्था अभिमानी ययाचा ।। आभासु जो ।।५९।। (वाच्य) जो अर्ध्द मातृका खरें ।। तो वृक्ष स्तंभु निर्ध्दारिें ।। येथूनि गुणत्रय स्फुरे ।। + तिन्ही शाखा ।।१०६०।। एवं गुणत्रय प्रकृत्तीचें ।। सकल कार्य तयाचें ।। रूप तया वृक्षाचें ।। ऐसें कल्पिलें ।।६१।। आतां (ओं)कारू जें हा तरुवरू ।। तैं वेदु तया विस्तारू ।। पर्णस्थानी आकारू ।। तयाचां कल्पिला ।। ६२ ।। (शा) खात्व आलें देवगणा ।। वेद तयांची उपासना ।। ह्मणौनि शोभा स्थानी पर्णां ।। वेदां कल्पिलें ।।६३।। ऊर्ध्व मूलका पर्णत्वें ।। अधःशाखा कार्य रूपत्वें ।। आणि ॐकार ब्रह्मनाद–मयत्वें ।। तैसेंचि व्यक्त ।।६४।। (गुण बुध्दि) हा अस्थिरु ।। उद्या नव्हे राहणारू ।। अश्वत्थ नामे तरू ।। ह्मणौनिचि हा ।।६५।। (अश्वत्थ) मूळ ख (रें) ।। (बीज भावें न मरे) ।। (वेदाला ही) पुडती स्फुरे ।। ह्मणौनि अव्ययो ।। ६६ ।। (कारणोपाधि हा) ऐसा ।। वृक्ष आला आभासा ।। हाचि पुडती कैसा ।। कार्याचां सृजनी ।।६७।। रजोगुण प्रभावता ।। ईश्वरु जाला जीव सृजिता ।। तेथें जीव (व्यक्ती) अनंता ।। (उदेली) प्रतिबिंबें ।।६८।। येणेंचि साहित्यें करून ।। जाणावें तयाचें ज्ञान ।। कार्याकारें कारण ।।

---

१. विस्फुरण. २. पुरुष.

प्रतिबिंबलें जें ॥६९॥ कारण गुणी (प्रचित) ॥ कार्योपाधि गुण समस्त ॥ ह्मणौनि झाड तें (प्रस्थान) युक्त ॥ (तरुचि) मानावे ॥१०७०॥ वृक्ष शाखाग्री कावरूकें[1] ॥ (तैसा जीव रूपें अनेके) ॥ [2]असत्यवस्थे गुण भूमिके ॥ विरूढतीं जालीं ॥७१॥ कारण वृक्षा-चिया शाखा ॥ (तेचि) ययाते भूमिका ॥ विस्तारु पावलिया मूलिका ॥ (तयचि ठांईं) ॥७२॥ (इहीं शाखा युक्त तरू) ॥ तयाचा कैसा (आकारू) ॥ (सांगि) जैल प्रकारू ॥ अवघा (चि तो) ॥७३॥ (केलिया) अधोमुखा ॥ येकी चालिलिया ऊर्ध्वमुखा ॥ तथापि आधारू ते भूमिका ॥ संसारू [3]मूला ॥७४॥ मुक्त मुमुक्षु (साधु) जन ॥ ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मण ॥ कारणोन्मुख ह्मणौन ॥ ऊर्ध्व-

वृक्ष साहित्य तृतीय शोध +

॥-शाखा त्या ॥७५॥

तेथें बीज बोलिजे जीवत्व ॥ मूल तें प्रारब्धजनित ॥ देहाकारें जें व्यक्त[4] ॥ न सोडी संसारातें ॥७६॥ मु (क्ता) ही देहभोगु न चुके ॥ तेचि मूल गुंपले भूमिके ॥ आतां (येथें) कायसीं साधकें ॥ मुमुक्षें तीं ॥७७॥ न भोगिती देह भोग ॥ प्रारब्धा धारें (तयाचे) योग ॥ ऐसिया कर्ममूलां सांग ॥ कर्मेंचि बांध (लें) ॥७८॥ प्रारब्ध नरदेह आकारलें ॥ तें विहितें कर्म बांधलें ॥ तेणेंचि झाड बलावलें ॥ वाढे ऊर्ध्वगती ॥७९॥ (देहें) अवस्था अभिमानी ॥ हा गुणु स्तंभु तये स्थानी ॥ त्रिपुटी व्यापार तेथूनि ॥ तीं करणें शाखा ॥१०८०॥ विषय (अग्र) प्रवाळ ॥ (तें योगरुपची सकळ) ॥ गुणी वांछी प्रबळ ॥ पल्लवादिकां ॥८१॥ आतां (बहु) असंस्कारीं ॥ जीव विषय व्यापारी ॥

---

१. सादरूकें. २. असत्य रूपें. ३. तो. ४. त्यक्त.

+ प्रस्तुतचा शोध मुळांत याच शीर्षकांनीं डाव्या, मधल्या व उजव्या बाजूस लिहिलेला आहे. यांतील अक्षरें बारीक आहेत.

तयाची (प्रवृत्ती) संसारी ।। (ह्मणौनिया) ।।८२।। (शाखाग्र) तयातें भूमिका ।। तथापि ते यातें भूमिका ।। अधोमुखा मूळ सांडूनि शाखा ।। वाढो लागती ।।८३।। जीवत्वचि बीज तयातें ।। संचित प्राचीन मूल तें निरूते।। तेणें संसारा शरीरातें ।। न सोडी पुरुषु ।।८४।। देहें अवस्था गुण ।। (स्थावरूस्थ) भु तया लागून ।। त्रिपुटी वृत्ति करण गण ।। तेथें शाखा ।।८५।। (विष) विषय प्रवाल ।। सुख दुःख भोग मूल ।। ऐसे झाड पाल्हाल ।। (संसारु) हें ।।८६।। ययातें अंतु ना पारु ।। नाम रूप निर्द्धारू ।। स्थिति स्थान प्रकारू ।। गोचरू नव्हे ।।८७।। व्यतिरेकान्वय ज्ञानें ।। अद्वैत बोधें तेणें ।। असंग शस्त्रें तीक्ष्णें ।। छेदिती ज्ञानी ।।८८।। असतेन सकळ भानें ।। (नाहीं) जाणावा ज्ञानें ।। साहित्य यया कारणें ।। कल्पावें लागलें ।।८९।।

११

या भागासाठीं एकूण ६ फूट ६ इंचांची जागा देण्यांत आलेली आहे. आरंभीं अडीच फूट लांबीच्या १० ओळींत सरळ मजकूर दिलेला आहे. त्यानंतर डावीकडे ३२ इंच व्यासाचें एक आणि २४ इंच व्यासाचें एक अशीं दोन वर्तुळें काढलेलीं आहेत. पहिल्या वर्तुळांत एकांत एक अशीं क्रमानें लहान लहान १० वर्तुळें असून त्यांत मजकूर लिहिलेला आहे. दुसऱ्या वर्तुळांत क्रमानें लहान लहान अशीं अकरा वर्तुळें असून त्यांना हिरवा, लाल, जांभळा असे रंग देण्यांत आलेले आहेत. यांत मजकूर थोडासा आहे. हीं भावचक्रें म्हटलीं जातात. उजवीकडील भागांत सर्पाकृति काढण्यांत आलेली आहे तीहि अधोमुखी आहे. शेपटी वर आणि तोंड खालीं असा हा सर्प आहे. शेपटीच्या टोंकापासून जिभेच्या टोंकापर्यंत याची लांबी ५ फूट २ इंच आहे. यांत निरानिराळे विभाग करून मजकूर लिहिलेला आहे. सर्पाची फणा, डोळे, दोन जिभा सर्व कांहीं जेथल्या तेथें आहे. आणि त्यांतहि मजकूर आहेच. डावीकडील भागांत उपरोक्त दोन वर्तुळांच्या खालीं पंचकोशचक्र हृदयाकृति काढलेलें आहे. १६″×१८″ इतकी जागा त्याला लागली आहे. यांत एकांत एक पांच हृदयाकृति असून त्यांत मनोमय ज्ञानमय या पांच कोशांची माहिती लिहिलेली आहे. याखालीं मात्र डावकिडील बाजूला १३ इंच लांबीच्या ४७ ओळींचा मजकूर आहे. या भागांत मात्र ८।९ ठिकाणीं फाटका भाग आहे. अक्षरें पुसट होत चाललेलीं आहेत. (आकृति इतरत्र छापल्या आहेत.)

मागां सांगीतलें पंचीकरण ।। सकळां तत्वांचें परिज्ञान ।। तें तेणेंचि येकें करून ।। संपूर्ण जालें ।।१०९०।। पुडती अंडाकारें विवरण ।। करावया भूतांचें निरूपण ।। कवण जालें कारण ।। ऐसी आशंका ।।९१।। तीचा आतां परिहारू ।। बोलिजेल येथूनि विचारू ।। जेणें पाविजे पारू ।। आशंकेचा ।।९२।। मागां सांगीतलें पंचीकरण ।। कपाट यंत्रें करून ।। तेणें जालें ज्ञान ।। स्थूला सूक्ष्माचें ।।९३।। कर्त्ता कार्य करण ।। प्रांजळ तेणें करून ।। पंचीकृता पंचीकृत ज्ञान ।। वेद्य[1] जालें ।।९४।। अनु प्रवेशु आणि विभागु ।। गुण धर्म कळला सांगु ।। परंतु कव्हणी येकु प्रसंगु ।। तेणें नकळेंचि ।।९५।। कारण भूत संचलें ॥ कार्य तयापासाव उपजलें ।। उपजौनि तें राहिलें ।। कवणे स्थानी ।।९६।। तरि भूत असतां कारणं ।। कार्यभूत जालें निर्माण ।। तें तयाचि पासाव होउन ।। राहिलें तयाचि माजी ।।९७।। तिथेंचि आन प्रसवलें ।। तें जें भूत उपजलें।। तें निजकारणी सामावलें ।। वसे तया पोटी ।।९८।। कार्याचें होतां निर्माण ।। कारणभूत याचें स्थान ।। तेचि तया आवरण ।। स्वभावें होये ।।९९।। माये पासाव उपजलें ।। तें मायेचि माजि राहिलें ।। तया महतत्वा जालें ।। मायेचें आवरण ।।११००।। महतत्वीं असतां (दृष्टी) ।। (ते वसे 'तया तत्वा' पोटी) ।। [2]आवरला अहंकारू दृष्टी ।। महतत्वें पडे ।। १ ।। अहंकारा पासाव गगन ।। अहंकारूचि त्याचें स्थान ।। अहंकाराचें आवरण ।। स्वभावेंचि तया ।। २ ।। तेथ आकाशीं पवनु [3]जाला ।। होऊनि त्याचि माजि राहिला ।। (भोंवती) वेढा पडिला ।। व्योमाचा तया ।। ३ ।। पवनी तेज निर्माण ।। पवनु तयाचें स्थान ।। तेज येक देशी ह्मणौन ।। आवरण पवनाचें ।। ४ ।। उदक जन्मलें तेजी ।। (तें राहिलें) तेजाचि माजि ।। आवरण जालें तेजीं ।। तया तेजाचें ।। ५ ।। उदकीं धरणी जन्मली ।। ते उदकाचि माजि राहिली ।।

---

१ वेदा. २. यानुरला. ३. आला.

एक देसी ह्मणौनि आवरली ॥ तेज उदकें ॥ ६ ॥ ऐसें कार्य[1] उपजलें ॥ तें कारणा पोटींचि राहिलें ॥ येक येकातें (जालें) ॥ (आवरण) या परी ॥ ७ ॥ कार्यभूत येक गुणा ॥ कारणभूत दशगुणा ॥ प्रमाण जालें आवरणा ॥ ऐसिया परी ॥ ८ ॥ कार्यभूत जें जें निपजे ॥ तें तें कारणें व्यापिजे ॥ या परी बाह्यांतरीं सहजे ॥ भूतें भूता ॥ ९ ॥ अव्यक्तु व्यापी महतत्वातें ॥ महतत्व तें अहंकारातें ॥ तेथूनि निपजलीं भूतें ॥ तैसींचि तीं ॥११०॥ आकाशीं अहंकारु संचरे ॥ तैसेंचि ते पवनी भरें ॥ पवनु तेजीं येकसरें ॥ प्रवेशे कारणेसीं ॥११॥ तेज स्वकारणेसीं आपीं ॥ आप त्या सर्वांसीं पृथ्वी रूपीं ॥ ते पृथ्वी सकला रूपीं ॥ व्यक्त जाली ॥१२॥ पृथ्वी माजि भूतें स्थूलें ॥ अहंकारेसीं सूक्ष्में सकलें ॥ महदव्यक्त संक्रमलें॥ सर्वेश्वर वरी ॥१६॥ तोचि स्थूल सूक्ष्म संयोगु॥ स्वभावें पावला विभागु ॥ येकु अंतरंगु येकु बहिरंगु ॥ ऐसा असतां ॥१४॥ येकु अव्यक्तु येकु व्यक्तु ॥ येकु जडु येकु चैतन्यवंतु ॥ ह्मणौनि तो विभक्तु ॥ भाऊ[2] स्थूल सूक्ष्माचा ॥ १५ ॥ पृथ्वीमाजि निवडले ॥ स्थूलांचें विराट देह रचलें ॥ सूक्ष्मा तत्वांचें जालें ॥ हिरण्यगर्भ देवतामय ॥१६॥ महतत्व जें निर्विकल्प॥ तेंचि अहंतत्व सविकल्प ॥ देहद्वयाचें स्वरूप ॥ तेंचि जालें ॥१७॥ अव्यक्त तें माया शरीर ॥ मूल प्रकृति ज्ञानमय (इतर) ॥ अंडा अंतर्भावीं समग्र ॥ ऐसें मीनलें ॥१८॥ परमात्मा पूर्ण पुरुषु ॥ करिता जाला प्रवेशु ॥ अभिमानित्वें साभासु ॥ स्फुरे तेथें ॥१९॥ उदकीं तरंगु [3]उपजला ॥ तो तिया सारद्रता व्यापिला ॥ (त) या बाह्यांतरी जाला ॥ समुद्रु जैसा ॥११२०॥ तैसें जें कार्य निफजे ॥ तेंतें कारणे व्यापिजें ॥ या परी बाहेरील ही सहजे ॥ अंतरा आलें ॥२१॥ पृथ्वी माजि कर्दमु जाला तो ते तेज प्रभावें सोषला ॥ पवनु अंतरीं राहिला ॥ वरि सूक्ष्म संबंधी ॥२२॥ तेणें (ओंकारु)

---

१. कारण. २. भाऊ. ३. उपला.

अंडाकारु ।। अंतरीं प्रपंचु समग्रु ।। कार्य कारण जीउ ईश्वरू ।। रचना जाली ।।२३।। बाह्य तैसींचि आवरणें ।। जालीं तीं स्वभाव गुणें ।। भाव यंत्रें जाणणें ।। विचारु येथिचा ।।२४।। विराट पुरुषा लागून ।। भूतांचेंचि पंचधा आवरण[१] ।। अहंकारू महतत्व मिळोन तरि[२] सात होती ।।२५।। आठवे ते माया ।। नववें तें महामाया ।। तैसेंचि दाहावें तया ।। पूर्ण पुरुषाचें ।।२६।।

भुजंग भाव यंत्र

अंतःकरण	व्यानु	श्रोत्र	वाचा	शब्दु	आकाश
वायो	स्पर्शु	कर	त्वक्	समानु	मन
बुद्धि	उदानु	चक्षु	पाद	रूप	तेज
आप	रसु	शिश्न	रसना	प्राण	चित्त
अहंकारू	अपान	घ्राणु	पायु	गंधु	पृथ्वी

याशिवाय
{ सर्प, भावचक्र, पंचकोश, स्थूलादि देह
यांच्या आकृति }

मागां सांगीतलें पंचींकरण ।। सकळां तत्वांचें विवरण ।। वरि वृक्ष साहित्यें कार्य कारण ।।। रचना केली ।। २७ ।। तेथें सकळ सिद्धांतु कळला ।। उत्पत्ति क्रमु वेद्यु जाला ।। सर्पाकारु हा रचिला ।।

---

१ [illegible]

पुडती कासया ॥२८॥ ऐसिया आक्षेपा परिहारू ॥ करणें लागैल मारू ॥ तरि ययें अर्थि विचारू ॥ आईकावा आतां ॥२९॥ पूर्वीं सांगतां पंचीकरण ॥ त्रिगुणाहंकाराचें विवरण ॥ कर्त्तया पासाव करण ॥ कार्य सूचिलें ॥११३०॥ सात्विकें अहंकारू कर्त्ता ॥ तोचि रजोगुणें करणरूपतां ॥ पावोनि विषय अपेक्षिता ॥ स्वभावें जाला ॥३१॥ तया विषय स्फुरणा पासून ॥ भूतपंचक जालें निर्माण ॥ विषय ते भूतांचे गुण ॥ ह्मणौनिया ॥३२॥ शब्दापासाव गगन जालें ॥ स्पर्शें वायु तत्व व्यक्ती आलें ॥ रूपें तेज प्रकटलें ॥ आपे आप ॥३३॥ रसगुणें जालें पाणी ॥ गंधगुणें ते मेदिनी ॥ एवं भूतें विषयां पासूनि ॥ जालीं तामसाहंकारें ॥३४॥

पंचतन्मात्रेभ्यः पंचमहाभूतानि

ऐसें स्मृतीचें बोलणें तो अर्थु (जाला) प्रकारें येणें ॥ आतां वेदाचें बोलणें ॥ तें अनारिसेंचि ॥३५॥

आत्मन आकाराः सभूतः

ऐसें हें वेदांचें वचन ॥ जालें आशंकेचें कारण ॥ तेंचि कैसें ह्मणौन ॥ आतां सांगिजैल ॥३६॥ तामसाहंकारें आकारला ॥ आत्मा आकाशातें प्रसवला ॥ तया व्योमापासाव जाला ॥ प्रभंजन हा ॥३८॥ तो पवनु व्याला दहनातें ॥ दहनु तया उदकांतें ॥ उदक तें पृथ्वीतें ॥ प्रसवतें जालें ॥३८॥ ऐसें असतां वेदवचन ॥ कवण मानावें प्रमाण ॥ कवण तें अप्रमाण ॥ दूरि करावें ॥३९॥ तरि उभय वाक्या समाधान ॥ कैसें जाणावें येकपण ॥ आतां कळत न कळत वचन ॥ येक बोलों पां ॥ ११४० ॥ कर्त्तयापासाव कार्य निर्माण ॥ विषयांपासाव भूत सृजन ॥ ये अर्थीं येक कारण ॥ इछाचि तयाचिं ॥४१॥ कर्त्तेन काय[1] अपेक्षिलें ॥ तें भूत व्यक्तीसीं उठिलें ॥ परि भूतचि तेणें कालें व्यालें ॥ भूतातें तया ॥४२॥ कर्त्तेन शब्दु अपेक्षिला ॥ तो व्योमाकारेंसीं भासला ॥ परि तामसूचि प्रसवला ॥ तया व्योमांतें ॥४३॥ कर्त्तेन स्पर्शु अपेक्षिजे ॥

---

१. कार्य.

तेणें गुणें वायो उपजें ।। परि आकाशाचि माजूनि सहजें ।। तयाचें होणें ।।४४।। कर्त्तया (ची) इछा कारण ।। रूप गुणें तेज निर्माण ।। वायोचि जन्म तें स्थान ।। तया तेजाचें ।।४५।। कर्ता अपेक्षी रसातें ।। र (स) गुणें उदकातें ।। तेजा (माजू) नि जन्मते ।। सहज होये ।।४६।। गंधु अपेक्षितां धरणी ।। तीतें प्रसवलें पाणी ।। या परी जाली उभवणी ।। (भू)त पंचका (ची) ।।४७।। ये (थें) आशंका मागुतेनि ।। स्पर्शु कें होता गगनी ।। जें तेणेंसी सहितु (ते)थूनि ।। पवनु जाला ।।४८।। पवनीं कें होतें रूप ।। कैसें जालें अग्नीचें स्वरूप ।। अग्नि माजि रसरूप ।। जें कारण आपा (तें) ।।४९।। (ऐसीया आक्षेपा परिहारू) ।। कीजत असे मारू ।। तरि ययें अर्थीं विचारू ।। ऐसा आहे ।।११५०।। विषय पंचक बोलि (जे) ।। + + + प्र असें सहजे ।। (व्यक्ता व्यक्त भावें) जाणिजे।। तयाचें रुप ।।५१।। अव्यक्त विषय पंचक ।। तें कर्त्ता वसे (वासनात्मक) ।। (व्यक्त बोलिजे) आणिक ।। (तें गुण भूतांचे) ।।५२।। भूत वि (ना) शें व्यक्त नाशे ।। भूतांचि सरिसे तें नाशे ।। भूतां वेगळें न दिसे ।। (व्य) क्त जे तें ।।५३।। आतां स्थूळा विषयांचे विनाशे ।। वासनामयु जे सूक्ष्म असे ।। अनादि-सिद्ध तें असे ।। कर्त्तया आंगीं ।।५४।। प्रळयो[1] व्यक्त संहारे ।। अव्यक्त शेज तेथे उरे ।। सृ(ष्टि) काळीं व्यक्त स्फुरे ।। तेंचि पुडति ।।५५।। भुक्त भोग वासनामय ।। मनोगत असतां विषय ।। निद्रावस्थें[2] कार्य ।। सकळ अभावें ।।५६।। मग ते विषय मनोगत ।। अव्यक्तचि होती व्यक्त ।। स्वप्नावस्थे आभासत ।। तें दृश्य कैंचे ।।५७।। तैसे व्यक्त विषय नाशले ।। प्रळय काळीं ऐसें जालें ।। परंतु वासनामय तें उरलें ।। कर्त्तया आंगीं ।।५८।। तो सात्वीकु अहंकारू कर्त्ता ।। पंचधा भीन्नु गुण भेदता ।। जेणें रूवें कर्त्ता असतां ।। तेंचि करण[3] होये ।।५९।। तेंचि कार्य तेथें स्फुरे ।। तेंचि तेणें भूत आकारे ।। करण सहितु संचरे ।। कर्त्ता तेथें ।।११६०।।

---

१. प्रणयीं. २. निद्रावस्थेचें. ३. कारण.

तोचि कर्त्ता पुडती ।। पालटता होये गुण वृत्ती ।। तया तया स्फूर्ति ।। करणाची होये ।।६१।। तो तोचि विषयो तेथे स्फुरे ।। तें तेंचि भूत तेथें आकारे ।। होतां येणें प्रकारें ।। भूतांचें सृजन ।।६२।। भूतांचि पासाव भूतें होती ।। परि अंतरी कारण दुजें आथी ।। कर्त्ता करण सूक्ष्म गती ।। जाणावें तें ।।६३।। आतां सर्पाकारु तो कासया ।। सर्पभावयंत्र बरवया– ।। परी पाहतां भूतां तया ।। उत्पत्ति कैसी ।।६४।। (क्रमु) पाहातां भूतांचा ।। कर्त्तया करण कार्याचा ।। वाकुडा तिकुडा सर्पाचा ।। आकारु जैसा ।।६५।। मागां पंचीकरणीं भूतें ।। सांगीतलीं समस्तें ।। परि तेणें (अनुक्रमें) ययांतें ।। उत्पत्ती नसे ।।६६।। सर्पा ऐसिया वक्रगती ।। आणावी[1] भूतांची उत्पत्ती ।। हे भावयंत्रें प्रतीती ।। जाणावी (रोकडी) ।।६७।। सर्पाकारें पंचींकरणें ।। तत्वता भूतोत्पत्ती जाणणें ।। आन येकें लक्षणें ।। भुजंगु हा ।।६८।। अहंकारू त्रिगुणात्मकु ।। तो स्थूळ सूक्ष्मेंसीं येकु ।। संसार विषदायकु ।। विनाशु कर्त्ता ।।६९।। ह्मणौनि साहित्य सर्पगुणें ।। येथें प्रवर्त्तलें बोलणें ।। विश्व अहंकारें येणें ।। विष (वं) त असे ।।११७०।। एवं सर्पसादृश्य घडलें ।। तरि वारूळ हें कां कल्पिलें ।। यया आक्षेपा खंडिलें ।। तें हें वचन ।।७१।। सांगीतला सर्पु विखारु ।। तो हा त्रिगुणाहंकारू ।। त्रिपुटी रूपु गोचरू ।। समू (ह) तत्वांचा ।।७२।। द्विविध कार्य तयाचें ।। येक हिरण्यगर्भ ईश्वराचें ।। दुजें लिंगदेह जीवाचें ।। तत्वात्मक जें ।।७३।। हिरण्यगर्भचिें स्थान ।। [2]बिळ ब्रह्मांड संपूर्ण ।। विराट देह अभिधान ।। जया साकारा ।।७४।। तया आश्रयूनि तो असे ।। (हिरण्यगर्भु सर्पु) विशेषें ।। आतां लिंगदेहातें कैसें ।। कवण स्थान ।।७५।। तरि पांचभौतीक स्थूळ शरीर ।। (पंचकोशात्मक) साकार ।। कार्य सर्पाचें (विवर) ।। वारूळ कल्पिलें ।।७६।। हेंचि बीळ विस्तारें ।। वेदीं बोलिलें असें खरें ।। आणि सर्प साहित्य

---

१. जाणावी. २. किळ.

दुसरें ॥ (तया लिंग शरीरा) ॥७७॥

तदेश श्लोको भवति ॥

अर्वाग्बिल + मस ऊर्ध्वबुध्नस्तस्मिन्यशो निहित ... .

(अ) णा संविदानेति ॥ अर्वाग्बिलस्य समऊर्ध्व बुध्न इति

इदं तच्छिद्र.... ....

विश्वरूपमितिवयशोनिहितं विश्वरूप प्राणानेतदाह.... ....

वागष्टमीब्रह्मसंवित इमामेव गौतमभारद्वाज ऊयते.... ....

इमामेव विश्वामित्र जमदग्नि अयमेव विश्वामित्रोय

जमदग्निरिमा–

मेव वसिष्ठ कश्यपावयमेव वशिष्टोयं वागेवात्रिर्वाचा + न मद्ये

त्तिहवैनामैतद्यदत्रिरितिसर्वस्यावा भवति सर्वमस्थानं

भवति य एवं वेद + + + वल्मिके मृता + + +

अशरीर ॐ + ते तयापमनस्थि को शरीरः प्राज्ञ आत्मा

ब्रह्मैव लोक एव + + + होवाच + + + याज्ञवल्क्या- + + +

धते सहस्र ददामीति होवाच जनको वैदेहः ॥

१२

[या भागांत आकृति वगैरे कांहीं नाहींत. २ फूट ४ इंच जागेंत एकूण ६७ ओळींत सरळ मजकूर लिहिलेला आहे. मात्र इतर ठिकाणीं ज्या प्रमाणें ३½ फूट लांबीची सलग ओळ असते तसें येथें नाहीं. उजवीकडील भागास दीड इंचाचें सरळ अंतर सोडून रेखीव अशी जागा सोडलेली आहे. मजकुरांत मात्र ५:७ असे लहान लहान तुकडे फाटलेले आहेत.]

ऐसें तत्वांचें विवरण ।। यथामती केलें निरूपण ।। ययेचि-अर्थीं आन ।। असती मत्तभेद ।।७८।। सूक्ष्में तत्वें पंचवीस ।। स्थूळें पांच मेळऊनि तयास ।। तत्वें करिती तीस ।। येक साधू ।।७९।। नाग कूर्मु कुकुलासु ।। देवदत्त धनंजयो साभासु ।। हा आवांतर वायो प्राण विशेषु ।। बोलती पंचविधु ।।११८०।। हा पंचक मेळऊनि ।। तत्वें पंचतीस करूनि ।। महतत्व येकवटूनि ।। छतीस करिती ।।८१।। आन येक अनुवादती ।। पांचही स्थूळें बोलती ।। अव्यक्त महदंकारु मेळविती ।। करिति आठ ।।८२।। (दहा इंद्रियें अकरावें मन) ।। (पांचहीं) विषय मेळऊन ।। तत्वें चोवीस ह्मणौन ।। बोलती येकु ।।८३।। पृथ्वी आप तेज वायो गगन ।। अहंकारु महदव्यक्त मिळोन ।। आठचि तत्वे ह्मणौन ।। बोलती एक ।।८४।। लिंगदेहाचे अंश (एक) ।। बोलती तत्वें वीस ।। विषय पंचक तैं महाभूतांस ।। लाउनियां ।।८५।। दाहा इंद्रियें पांच प्राण ।। सोळावें घालूनि मन ।। षौडश कळात्मक ह्मणौन ।। लिंग बोलती ।।८६।। मेळऊनि बुद्धितत्व येक ।। ह्मणती सप्तदश-तत्वात्मक ।। तयाहीं वेगळे आणिक ।। बोलती अकरा ।।८७।। दाहा इंद्रियें अकरावें मन ।। इतुलेचि लिंगदेह ह्मणौन ।। येक

(बोलती विचक्षण) ॥ (आत्मवा) दी ॥ ८८ ॥ पांच ज्ञान (करणें साहावें) मन ॥ षट्कलात्मक लिंग ह्मणौन ॥ एक बोलती वचन ॥ निर्द्धाराचें ॥८९॥ मन बुद्धि अहंकरण ॥ एक बोलती त्रिविध ह्मणौन ॥ यया वेगळें आन ॥ तें कार्य तयाचें ॥११९०॥ उपक्रमोपसंहारें ॥ ऐसी मत्तें अपारें ॥ परंतु (तीं समग्रें) ॥ साधारणेंचि ॥९१॥ (जीं कळलीं हीं समग्रें) ॥ हें मत्त न कळे सत्याकारें ॥ जें हें येक जाणतां बरें ॥ तीं सर्वें कळतीं ॥ ९२ ॥ पंचवीस सूक्ष्में तीं वेगळींचि ॥ पांच महाभूतें तीं स्थूलेंचि ॥ विवंचना त्रिगुणा अहंकाराची ॥ ऐसी आहे ॥९३॥ यया (चा) चि (अंतर्भावी) आन ॥ ते नागकूर्मादिक प्राण॥ तया कैंचें स्वतंत्रपण जे ते गणावे॥९४॥ त्रिगुणाहंकाराचें विवरण ॥ करितां तत्वांचें संख्यान ॥ महतत्व (ययाचें) कारण ॥ ते यामाजि कैसे ॥९५॥ पुत्रचि (आप) गणिता ॥ (माजि) गणिजे जैसा पिता ॥ (तेंवीं) कार्याचें रूप करिता ॥ कारण बोलावे ॥९६॥ दश इंद्रियें येक मन ॥ ऐसें जयाचे प्रलपन ॥ तया उपक्रमोपसंहार ज्ञान ॥ (न कळे) सर्वथा ॥९७॥ पंचधा भेदें भिन्नें ॥ विषयज्ञान करणे (कर्म करणें) ॥ यया भेदा कारणें ॥ कवण कारण ॥९८॥ आक्षेपु करितां ऐसा ॥ उकलु तो नव्हे सहसा ॥ या लागिं असो जैसा तैसा ॥ मत्त वादु तो ॥९९॥ सांगीतलें जें पंचीकरण ॥ तेणें (उपक्रमोपसंहार) – – ॥ आणि (भूत) भेद विवरण॥ ते (सांग) कळे ॥१२००॥ जैसा उपक्रमाचा विचारू ॥ तेणेंचि (क्रमें) उपसंहारू ॥ (अनुलोम) प्रतिलोम[1] प्रकारू ॥ जाणावा हा ॥१॥ (आतां तत्वातत्व) विवेक ज्ञानें ॥ ये अर्थि कैसें जाणणें ॥ तें यथामती काळें येणें ॥ (बोलि) जत असे ॥२॥ रचना कीजे आयासें ॥ मोडितां मानचि न–लगे जैसें ॥ संहार दृष्टीचें तैसें॥ देखणें आहे ॥३॥ स्थूळ पंचमहाभूतें बोलिलीं ॥ सूक्ष्में पंचविस कथिलीं ॥ अव्यक्तादीनि तीनि पहिली ॥ ऐसीं

---

१ प्रतिलोमाकारू.

त्रेतीस ॥४॥ मेळविता प्रकृति पुरुषे ॥ पंचवीस भेद ऐसे ॥ आतां विवेकें वेद्य[1] कैसें ॥ साचार[2] दृष्टी ॥५॥ शब्दादि सूक्ष्म विषय ॥ पुरुषीं जे वासनामय ॥ भूतपंचकाकारें[3] ज्ञेय ॥ तेंचि (आभासलें) ॥६॥ वासना भुक्तां विष (यांची) ॥ (आका) रवंत स्वप्नि तेचि ॥ जागृती ये तैं द्रष्टाचि ॥ आणि ते वासना ॥७॥ तैसा पूर्व सर्गी देखिला ॥ प्रळईं तो प्रपंचु सामावला ॥ नाकीं अभा ॐ चि जाला ॥ भूतपंचकाचा ॥८॥ (ऐसें असतां वर्तमान) ॥ पावे (कल्पा[4]) दीचें मान ॥ तैं अव्यक्ता विषय स्फुरण ॥ जे पुरुषीं वसे ॥९॥ तेचि भूतपंचकाकारें ॥ व्यक्त होऊन स्फुरे ॥ अतेव अव्यक्ता व्यक्त दुसरें ॥ ऐसें न घडे ॥१२१०॥ वृक्षाकारें आकारे ॥ तें बीज वृक्षेसी दुसरें ॥ ऐ (से न घडे सत्वाकारे) ॥ एकचि सत्य ॥११॥ अव्यक्त विषय सनातन ॥ जयां विनाशु ना संभवन ॥ तयाचें प्रतिकल्पि व्यक्तपण ॥ कित्ती गणावें ॥१२॥ स्थूळातें नाही गणणा ॥ कित्ती करावी कल्पना ॥ या लागि नित्य तेचि जाणा ॥ पांचही विषय ॥१३॥ नाना वेषी एकु नटे ॥ तो एकु खरा ते सर्व खोटे ॥ यालागिं (येथें वाटें) ॥ तत्वें तीस ॥१४॥ तयांही माजि विचारितां ॥ वासनामय जे तत्वता ॥ तयां नाही पृथक् सत्ता ॥ आश्रयेंसीं ॥१५॥ करण समूहेसीं कर्त्ता (चि) ॥ (तरि वासना) वेगळ (नाहींचि) ॥ केवल कल्पना मात्र (चि) ॥ ते काय असे ॥१६॥ स्फुरतां ते पृथक् सत्य ॥ स्फुरलया पृथग सत्य ॥ वासने (चें) यथातथ्य ॥ आश्रयोचि ॥१७॥ ह्मणौनि तत्वें जाणावीं ॥ तैं पंचवीसचि मानावीं ॥ पाच परमें अप (रभावीं) ॥ सूक्ष्में वीस ॥१८॥ पांच कर्त्ती पंधरा करणें ॥ ऐसीं सूक्ष्में वीस जाणणें ॥ तयांही माजि चतुरपणें ॥ विचारु घेती ॥१९॥ क्रिया चेष्टा कर्त्तयाची ॥ तेणेंसीं ते स्वतंत्र कैंची ॥ गति जैसी प(व 'ना') चि ॥ पवनूचि ते ॥१२२०॥ (चेष्टतया) रथा परी ॥ चे (ष्टया) चेष्टे

---

१. वेध. २. साचोर. ३. भूतपंचकारें. ४. कल्पादिकाचें.

दुसरी ॥ ऐसिया विवेका चतुरीं ॥ मानिजेचि ना ॥२१॥ ह्मणौनि पंचधा कर्मकरण ॥ तें क्रियारूप ह्मणौन ॥ आश्रयेंसीं विलक्षण ॥ ऐसें न घडे ॥२२॥ तरि तत्त्वें आतां वीसचि ॥ त्यामाजि लिंग देहींचि पंधराचि ॥ येरें पांच करणेंचि ॥ जीं ययाचीं जनकें ॥२३॥ आतां जैसे कर्मकरण ॥ तैसेंचि तें ज्ञानकरण ॥ ज्ञातया[1] पुरुषेंसीं अभिन्न ॥ निरंतर वर्त्ते ॥२४॥ स्वयें (जाणोनि जाणिजे) ॥ ऐसें जाणणें तें काये (दुजे) ॥ मा जयाचेनि भेदें[2] भेदिजे ॥ ते अपूर्वचि कीं ॥२५॥ दीप कलिका मालऊनि ॥ प्रकाशु घेइजे काढूनि ॥ तरीचि ज्ञातया[3] तया पासूनि ॥ ज्ञानकरणें वेगलीं ॥२६॥ निद्रे मरणी ज्ञा (ते) न विण ॥ वेगलें कैंचे ज्ञानकरण ॥ तो सुषुप्ति तैं विषयज्ञान ॥ तें कां नव्हे ॥२७॥ या लागीं तत्त्वें पंधराची ॥ ज्ञानें कर्मेंसीं ज्ञाताचि ॥ लिंगदेहीं दाहाचि ॥ मानावीं तत्त्वें ॥२८॥ तयां माजि करितां ज्ञान ॥ प्राणपंचक तें चेष्टाकरण ॥ चेष्टतेनसीं स्वतंत्रपण ॥ तया कैंचें ॥२९॥ वायोरूपीं (बोलिलें) ॥ तें वायोचि सरिसें (गेलें) ॥ सूक्ष्म चेष्टारूप उरले ॥ स्वकारणी जे ॥१२३०॥ ते आंगाचि चंचलता ॥ वेगली नये करितां ॥ चेष्टे तोचि सर्वथा ॥ चेष्टेसीं सहितु ॥३१॥ ह्मणौनि तत्त्वें तीं दाहाचि ॥ त्या माजि लिंगदेह (पांचाचेचि) ॥ (आतां विवंचना तेथीचि) ॥ (तेंचि कैसी) ॥३२॥ आतां करण आणि मन ॥ बुद्धि चित्त अ (हं) करण ॥ यया पंचकाचें कवण ॥ स्वरूप कैसें ॥३३॥ तरि येकचि अंतःकरण ॥ वृत्ति भेदें पंचधा भिन्न ॥ हें पूर्व निरूपणें करून ॥ सर्व (जाणावें) ॥३४॥ आइकतें वेगळे अंतःकरण ॥ तरि पाचारिलें ये तें कवण ॥ दृष्टि आणि चरण ॥ बुद्धीचें जे ॥३५॥ सुखदुःख भोगणें मनाचें ॥ तरि अनुभउ सांगणें कवणाचें ॥ वाचा श्रवण अंतःकरणाचें ॥ हें साच जैं ॥३६॥ रूप विषयो बुद्धीचा ॥ आणि स्त्री (कामु तोचि साचा) ॥ — — — — — पुरे भेदांचा ॥ (खरा)

---

१. ज्ञाता. २. भेदेंजें ३. ज्ञान तया.

खरा आतां ॥३७॥ या लागिं एकचि अंतःकरण ॥ हेंही न घडे तया अभिधान ॥ निर्विकल्प प्रपंचज्ञान ॥ तेंचि खरें ॥ ३८ ॥ निर्विकल्प प्रपंचज्ञान ॥ तेंचि महतत्वाचें स्फुरण ॥ ह्मणौनि मिथ्या अंतःकरण ॥ महतत्व खरें ॥३९॥ महतत्व जैं अंतःकरणचि ॥ तरि कवण गति अहंकाराची ॥ आतां विवंचना येथिची ॥ सांगिजैल ॥१२४०॥ निर्विकल्प प्रपंच स्फुरण ॥ तेंचि महतत्वाचें ('का' र) ण ॥ तें आ (श्रयूनि) तिन्ही गुण ॥ शबलु होये ॥४१॥ (तैसा वि) वेकें कर्त्ता राजस (करण) ॥ तामसे कार्या (चे नि 'रूपण') (या) परि निविकल्प स्फुरण ॥ सविकल्प होये ॥४२॥ तोचि त्रिगुणाहंकारू ॥ जो लिंगदेहाचा आकारू ॥ पंचविसां तत्वांचा विस्तारु ॥ खंडिला जो ॥४३॥ सूक्ष्मा स्थूलाचेनि निरासें ॥ अहंकार छेदन जालें आपैसें ॥ तैं शेष निर्विकल्प ज्ञान जें असे ॥ तें महतत्वचि ॥४४॥ यया वेगला अहंकारू ॥ तो मिथ्याचि कल्पिला त्याचा आकारू ॥ उपक्रमाचा (अवडंबरू) ॥ (पाहोनिया) ॥४५॥ नदी माजि बुडाला ॥ आतां घरां पोंहोंचला ॥ तैसा व्यवहारू जाला ॥ अहंकाराचा ॥४६॥ + + + + + रसनी तत्वांचा ॥ निरासु जाला त्रिपुटीचा ॥ आतां अहंकारू तो कैंचा ॥ वेगळा तया ॥४७॥ ह्मणौनि अहंकारेंसी सहित ॥ मिथ्या तत्व समूह समस्त ॥ (महतत्वचि) येक येथ ॥ सत्य (आथी) ॥४८॥ (निर्विकल्प) जें प्रपंच ज्ञान॥ तेणें करितां स्वरूपावलंबन ॥ तेंचि होय आत्मज्ञान ॥ नाथी संदेहो ॥४९॥ स्वस्वरूपाची ते ज्ञान शक्ती ॥ तेचि ते मूळ प्रकृति ॥ (तयेची जाली) + + + + + + + + + + ॥१२५०॥

+ + + + + + + + + +

+ + + + + + + + पुरुषा तेथें ॥ ५१ ॥

महतत्वचि शुद्ध सत्व जालें ॥ पुरुषा स्वस्फुरण आपुलें ॥ तरि मध्यें अव्यक्त बोलिलें ॥ तै कें असे ॥ ५२ ॥ ऐसिया आक्षेपा परिहारू ॥ (सांगिजतु असे विचारू) ॥ (तरि ये खुणेची)

– – – – ।। अनुभवी जाणे ।। ५३ ।। आपुलिये ज्ञानशक्ती ।। पुरुषु आश्रयूनि मूळ प्रकृति ।। आपणा जाणोनि पूर्ण स्थिती ।। आपणू असतां ।।५४।। करितां (स्वरूपाचें अनुसंधान) ।। (स्थि) ती पुरुषा (होये कवण) ।। + + + + + प्रसक्त ह्मणौन ।। (मागां बोलिले ।।५५।। (तेंचि) + + + + (अनवधान) ।। तेणेंचि (युक्त जें ज्ञान) ।। तेंचि महतत्व निर्विकल्प स्फुरण ।। अस्वरूपोन्मुख ।। ५६ ।। महतत्वा शुद्ध सत्वातें ।। अनवधानचि (आदु वर्त्ते) ।। सावधान होताचि तो तेथें ।। तें पैं वाॐ ।।५७।। जाणणें असोनि व्यग्रता ।। तिया आछादेला ही ज्ञाता ।। तथापि सावधानत्वें पाहातां ।। कैसें होये ।। ५८ ।। होता तैसाचि स्वयें आहे ।। विण साधनें उपायें ।। व्यग्रता (चि ते नेणें काये) ।। (कें उठि गे) ।।५९।। आपुलिये (असावधानते) ।। (सावधानी) पाहों प्रवर्त्ते ।। तैं ती (चे रूपें तेथें ।। + + + ह काये ।।१२६०।। दृष्टीने (तरळे) पण ।। तेंचि मी द्रष्टी पाहीन ।। [1]ह्मणे तया सन्निधान ।। मूर्खाचें नको ।।६१।। [2]आपुलया अज्ञाना ।। वेगळे जाणोनि शाहाणा ।। तया पुरुषा सुजाणा ।। या परी (मानावें) ।।६२।। ह्मणौनि जें शुद्ध सत्व ।। तें तैसेंचि असतां महतत्व ।। ज्ञानरूप आत्मतत्व ।। अनायासें ।।६३।। आपण आपणा न पाहे ।। तंवं तें महतत्व खरें होये ।। जाणिवा धरिताचि + + + ।। तेथें आपुली ।।६४।। अव्यक्त मि (थ्या) महतत्वेंसीं ।। महतत्व मिथ्या अ (व्यक्तेंसी) ।। पुरुषु न (देखे) दोहीं (सीं) ।। देखे आपणयां ।।६५।। ह्मणौनि मिथ्या अहंकारू ।। मिथ्या महत-त्वाचा विचारू ।। अव्यक्त मिथ्या हा निर्द्धारू ।। करणेंचि नलगे ।।६६।। स (त्य येकी मूळ) प्रकृती ।। ज्ञानकला चिछक्ती ।। आणि आपणु अंतर्वर्ती ।। नियंता तीचा ।।६७।। ऐसा जाला निर्द्धारू ।। पुडती करितां येथ विचारू ।। महामाया की सर्वेश्वरु ।।

---

१. ह्मणौनि. २. आपुलिया.

कवण सत्य ॥६८॥ आपुलया आश्रय स्थिती ॥ पुरुषु जाणता प्रकृती ॥ जाणणें तेचि व्यक्ती ॥ (तिये) प्रकृतीची ॥६९॥ जाणिव ह्मणौनि जें जाणणें[1] ॥ जाणीव (तें तीचें) जाणणें ॥ जाणितलें जें तीचेनि गुणे ॥ ते प्राकृत भाग ॥१२७०॥ जाणौ ह्मणतांचि पहिलें ॥ जाणणें तें स्वरूप आपुलें ॥ जाणिजे ऐसें वेगळें ॥ (नव्हे) सर्वथा ॥७१॥ जाणीव तो आवेशु आंगी ॥ जाणता तयाचा संगी ॥ तो तीचि चेष्टा अवघी ॥ सांडूनि पाहे ॥७२॥ प्रकृतीचा करितां निरासु ॥ आपणचि निरसे पुरुषु ॥ तेथें उरे सत्यांशु ॥ तें केवळ ब्रह्म ॥७३॥ ज्ञान सांडितां (ज्ञाते) पण ॥ निःशेष करी मीपण ॥ तेणें (आपुलेंचि) निरशन ॥ आपणु लाहे ॥७४॥ मीपण सुटतांचि वेले ॥ जाणणें नेणणें सर्व गेले ॥ सत्य तें दोहीं वेगळें ॥ उरे द्रष्टा[2] ॥७५॥ तेथ माया ना ईश्वरू ॥ सकळां तत्वांचा संहारू ॥ आत्मा ब्रह्म निराकारू ॥ पूर्णत्वें स्फुरे ॥७६॥ तेथिची चिदानंदमयता ॥ तें सदन्वयेंचि भासे पूर्णता ॥ सत्येंसीं वेगली करितां ॥ गुणसाम्य नुरे ॥७७॥ सद्रूप तेंचि चिन्मय ॥ सद्रूप तेचि आनंदमय ॥ सद्रूप स्वसंवेद्य ज्ञेय ॥ स्फुरे आत्मत्वें ॥७८॥ सद्रूपीं आत्मस्फुरण ॥ चिदानंद बोधें करून ॥ सदसदात्मक ह्मणौन ॥ जें पूर्वीं कथिलें ॥७९॥ आनंदमयु पुरुषु आत्मा ॥ निर्गुणु जो परमात्मा ॥ तयाची ही महिमा ॥ सदसदात्मक जे ॥१२८०॥ तेथ असभ्दागु तो काय असे ॥ ह्मणौनि सत्या प्रति-योगी नसे ॥ सत्य येक तत्व विशेषें ॥ तेचि सिद्ध ॥८१॥ येणें सत्यासत्य विचारें ॥ सत्य एक तत्व खरें ॥ सत्या-प्रति दुसरें ॥ सत्य न वर्त्ते ॥८२॥ सत्य एक तत्व असतां ॥ इतुलया तत्वांची व्यवस्था[3] ॥ श्रमकर ते कथा ॥ बोलोनि काय ॥८३॥ ऐसिया आक्षेपा वचन ॥ (कीजत) असे निरूपण ॥ (जणें संदेहाचें) दहन ॥ निःशेष होये ॥८४॥ सत्या प्रतियोगीं दुसरें ॥ सत्यत्वें नाहीं हें खरें ॥ तथापि असत्य

---

१. जाणें. २. ब्रह्म. ३. अवस्था.

एक सत्याकारें ।। दिसे विपरीत ।।८५।। यथार्थ असतां दोरू ।। नाथिला दिसे तेथ विखारु ।। तेणें तो सत्य साक्षात्कारू ।। पुरुषासि त्याचा ।।८६।। जंवं तो मिथ्या ऐसें कळे ।। तंवं भयकंपादिक साच जालें ।। सत्यें अबाधकें बाधिलें ।। पुरुषा जैसें ।। ८७ ।। तैसें ब्रह्म सत्य निर्गुण ।। मिथ्या द्वैताचें संस्फुरण ।। तथापि मायायोगें करून ।। विपरीत भासे ।।८८।। सत्य (तेंचि) असे ।। परि (प्रपंचाकारत्वें आभासे) ।। मृगातें कीरणिं जैसें ।। उदकाचेनि आकारे ।।८९।। न करितां तयाचें निरसन ।। सत्याचें रूप जे सत्यज्ञान ।। लटकिया नाथिलें साचपण ।। अनिवार तें ।।१२९०।। सत्याचेनि दृश्य ज्ञानें ।। परम सत्य तें मानें ।। मिथ्या ह्मणिजे न मने ।। तेंचि वचन ।।९१।। ऐसे जें सत्य जालें ।। तें मिथ्या न वदे बोलें ।। तें ज्ञानयोगें छेदिलें ।। सर्वथा पाहिजे ।।९२।। ह्मणौनि सत्य वाखाणिजे ।। श्रोते अभिमुख कीजे ।। उपक्रमु सांगिजे ।। सांगु तया ।।९३।। (उपक्रमु उपजवावें) ।। (उप) जले स्थिती (असावें) ।। (आणि) सत्यपण बो (धा) वें ।। (क्रमेंचि तयाचे) ।।९४।। उपक्रमोपसंहारें करून ।। नित्य वेगळें अधिष्ठान ।। ययाचेनि ज्ञानें ज्ञान ।। करावे ज्ञातयाचें ।।९५।। कारण सत्य मानलें असतां ।। जाणावी तयाची व्यापकता ।। मग सत्ता आणि असत्ता ।। तत्व बोधावें ।।९६।। मग सत्याधिष्ठान ज्ञानें ।। सकळ मिथ्या हें माने ।। असत्य परि प्रकारें येणें ।। छेदावें हें ।।९७।। ह्मणौनि केला हा विस्तारु ।। उपक्रमु उपसंहारू ।। यया प्रपंचाचा आकारु ।। व्यक्त आणिला ।।९८।। तत्वातत्व विवेकें ।। दाविलें हें (सर्व लटिकें)।। आतां इतुलयावरि सुखें ।। जाणतां (ज) नी ।।९९।। सच्छिष्याप्रति उपदेशावें ।। मुख्यत्वें स्वस्वरूप सत्य बरवें ।। येर कळलें ऐसेंचि करावें ।। इतुलें पाहिजे ।।१३००।। शिष्याधिकारु जीवी ।। वोळखोनि प्रज्ञा बरवी ।। तदनुसारचि करावी ।। तत्वांची कल्पना ।। १ ।। उपक्रम उपसंहारू ।। जितुलेनि होये गोचरू ।। तितुलाचि

विस्तारु ।। तत्वांचा बोलावा ।।२।। ययाचा अपेक्षावा निरासु ।। यथार्थ वस्तूचा प्रकाशु ।। यथार्थ वाचूनि मृगजळाचा आभासु ।। कित्ती (गणावा) ।।३।। वाहातें कां तें (सांचलें) ।। नदी कीं तें तळें ।। जेणें जैसें देखिलें ।। तैसेंचि होये ।। ४ ।। प्रथम सांग जाणावें ।। मग मत्त संकोचें बोलावें ।। शिष्या तत्व बोधावें ।। भलयतेनि पक्षें ।। ५ ।। प्रथम विस्तारु नेणतां ।। मत्त संकोचेंचि बोलतां ।। पुढें+सी गुंति पडतां ।। कवण सोडवी ।। ६ ।। अ ('वस्था') प्रपंचाची ।। मानिजे तैसी नव्हेची ।। ह्मणौनि पाहिजे विवेकाची ।। अपार सामग्री ।। ७ ।। तेचि ययाची अभावना ।। कैसी तेथिची विवंचना ।। आरोपाचिया संहरणा ।। बोलिजैल ।। ८ ।। अभाॐ बोलिजे तो षड्विधु ।। तयाचा कैसा बोधु ।। सांगिजैल यथाविधु ।। येणें कालें ।। ९ ।। प्राग भाॐ एकु बोलिजे ।। प्रत्यगभाॐ दुजा मानिजे ।। अन्योन्या भाॐ कल्पिजे ।। तीसरा तो भाव स्फुरण ।।१३१०।। प्रध्वंसा भाॐ तो चौथा ।। पांचवा अत्यंताभाॐ तत्वता ।। पृथग सभ्दाॐ विचारितां ।। साहावा तो ।।११।। निर्माणा पूर्वीं घट नाहीं ।। तें नाहीपण कैसें काई ।। प्रागभाॐ प्रपंचाचा ठांईं ।। बोलावा ऐसा ।।१२।। तरि निर्माणा पूर्वीं नाहींपण ।। तेथ होतां अभाव स्फुरण ।। स्फुरण तयाचें कारण ।। घटूचि असे ।।१३।। अभाव स्फुरण पूर्व भावीं ।। घट स्थिती असेचि जाणावी ।। अभावा-कारें अघवी ।। तेचि आकारली ।।१४।। (प्राग) भावना घटाची ।। ते कां नव्हे पटाची ।। ह्मणौनि तया अभावाची ।। यातीचि विलक्षण ।।१५।। अभाॐ ऐसा नाम वादु[1] ।। तया जैं होये रूप भेदु ।। तैं भावाचाचि संबंधु ।। तेथ जाला ।।१६।। रूप भेदु जेथ जाला ।। तैं धर्मु ही तया लागला ।। आतां तोचि कवण सांगीतला ।। पाहिजे कीं ।।१७।। प्रयोजने वीण शब्दु ।। नये तयाचा अनुवादु ।। ह्मणौनि कव्हणी येक बोधु ।। तें कार्य तया ।।१८।। घटाभावाचेनि स्फुरणें ।।

---

१. बाहु.

जाणोनि धरिजे तें काय माने ।। अभावना अभावगुणें ।। धरितां न येचि ।।१९।। अभाॐ ऐसी कल्पना ।। ते अपरभावीं ये गुणा ।। मग आपुली अभावना ।। तीतें स्फुरें ।।१३२०।। ते भावगुणें आकारती ।। अभावातें हाणती ।। अभावना नव्हे निरुती ।। घटाची भावना ।।२१।। आतां स्फुरणाचिये प्राग्दशे ।। अभाॐ तो कैसा असे ।। ह्मणतां ह्मणतां स्फुरण तें कैसें असें ।। यया वेगळें ।।२२।। तथापि तें असो आतां ।। तरि प्राग भाॐ ऐसी वार्त्ता ।। विरुद्ध आपुलिया शब्दार्था ।। तरि ते न बोलावी ।।२३।। प्रत्यक्षु घटु नाहीं ।। प्रश्नु भाॐ ऐसा जयीं ।। मानावा ययें हृदईं ।। यया प्रपंचाचा ।।२४।। तरि प्रत्यग भाॐ बोलता ।। तो पटुभावें जयीं सरता ।। तैं अभाॐ स्वयं होतां ।। आपणूचि तो ।।२५।। घटाचें नाहींपण ।। परभावेंसीं आन ।। तैं रूप आणि अभिधान ।। वेगळें दोहींचें ।।२६।। रूपें नामें वेगळा ।। आणि संदेह नाशकु जाला ।। तो अभाॐ नव्हे संचला ।। आंगें भाॐ ।।२७।। तया अभावाचीचि कल्पना ।। (ध) रून असतां मना ।। आधारु तो घटु जुना ।। मानसातें ।।२८।। अभावो ह्मणतां अभाॐ ।। नव्हे तो [1]घटाचा भाॐ ।। घटत्व जेथ वाॐ ।। समूळ नाहीं ।।२९।। तेंचि घटत्व गुणा येतां ।। अभावाचि हरे चिंता ।। अभाॐ दिसे विनाशतां ।। तैं तो भाॐ ।।१३३०।। हाणतया हाता आडळे ।। देखती युक्तीचे डोळे ।। ह्मणौनि अभाॐ बोलतां कळे ।। भाॐचि तो ।।३१।। स्फुरणापूर्वीं कैसा होता ।। ऐसा अनुवादु करितां ।। स्वविरोधि तत्वतां ।। व्यवहारु तो ।।३२।। प्रत्यगभाॐ हें बोलणें ।। (सिद्ध) नव्हे विण स्फुरणें ।। या लागि न बोलिजे तेणें गुणें ।। मत्तचि उडालें ।। ३३ ।। अन्योन्याभाव कल्पना ।। ते अन्योन्यभाव कल्पना ।। अन्य शब्देंचि अभावना ।। हाणीतली ते ।।३४।। घटीं घटत्वें पटु नाहीं ।। [2]पटीं पटत्वें घटु नाहीं ।। या परी उभयत्व

---

१. घटकाचा भाॐ. २. हा चरण संपूर्ण गाळला आहे.

दोंहीं ठांईं ।। सत्य संपादलें ।।३५।। पटीं घटाभाव दर्शन ।। तया प्रसवलें घटज्ञान ।। घटूचि आधी होये मन ।। तैं हे घडे ।।३६।। घटाचेनि दृश्यपणें ।। भाऊ तो धरिला मनें ।। मग पटाचेनि अपर ज्ञानें ।। अभावाकृती ।।३७।। (तेथें आरोपिला तो भाऊ) ।। कैसा मानावा अभाऊ ।। जो नव्हे मठा भाऊ ।। ना मठाभावें कळे ।।३८।। बोलतांचि जे अभावना ।। पूर्वापर भावीं भावना ।। न तुटे घटाची वासना ।। जीचा व्यवहारू ।।३९।। न ह्मणतां अभाऊ जैसा ।। ह्मणिजे तैं कवण कैसा ।। अन्योन्याभाऊ हा कलसा ।। शब्दु नये ।।१३४०।। आतां प्रध्वसाभाऊ मानावा ।। तरि प्रध्वंसु सत्यु जाणावा ।। घटूचि नाहीं तरि घालावा ।। कवणा वरि तो ।।४१।। घटु सत्यु तैं तो साचारु ।। तो सत्यु तैं-घटाकारु ।। इतुलेनि घट बुद्धीचा प्रकारु ।। कैसा छेदला ।।४२।। घटध्वंसु तो घटध्वंसु ।। नव्हे पटाचा विनाशु ।। यापरी स्वता रूप विशेषु ।। तयातें जाला ।।४३।। अभाऊचि तो जरी ।। तरि सुखादुःखातें करी ।। अभा (वी फळ क्रिया) होये तरी ।। भाऊ चि तो ।। ४४ ।। पूर्वापर भावी भावना ।। न तुटे घटाची वासना ।। आतां नव्होतां अभाव स्फुरणा ।। अभा ऊ कैसा ।।४५।। तरि अभाऊ ह्मणतां तो भाऊ ।। न ह्मणतां आपुलाचि अभाऊ ।। उभय पक्षां ठाऊ ।। ययातें नसे ।।४६।। आतां अत्यंताभाऊ ह्मणावा ।। वंध्यापुत्रापरी मानावा ।। तरि तो भाऊचि आघवा ।। ऐसा दिसे ।। ४७ ।। वंध्या वंध्यास्थानी वंध्याचि ।। पुत्रू पुत्रस्थानी पुत्रूचि ।। स्थिती वेगळी दोहींची ।। ऐसें असतां ।।४८।। अन्योन्याभाव न्यायें ।। येथिची कल्पना आहे ।। भावेंचि अभावना गुणा ये ।। ह्मणौनियां ।। ४९ ।। पुत्रवतीचा देखिला ।। पुत्रु तो मनीं बैसला ।। मानसु व्यक्तीं आला ।। तैसाचि तो ।। १३५०।। वंध्या देखोनी नसुधी ।। केला तो तीचा संबंधी ।। न होती तेचि पुत्रबुद्धी ।। सत्य केली ।।५१।। न ह्मणतां जें निर्मळ-

पण ।। तें बोलोनि केलें क्षीण ।। वंध्यें आंगीं पुत्रपण ।। भावनेचें ।।५२।। एसणी असतां भावना ।। ते कैसी मानावी अभावना ।। एवं वंध्या आणि पुत्रु हे वासना ।। सत्य खरी ।।५३।। दोन्हींचा साचारपणी ।। अभाऊ तया कवणु मानी ।। आतां वंध्येतें नाहीं ह्मणौनि ।। पुत्रु ह्मणती ।।५४।। अभावाकारें भावना ।। पुत्रत्वाची संभावना ।। ते जैं होती अभावना ।। तैं येक होतें ।।५५।। अभावा अभावा येकि याती ।। तैं पटाभावेंचि संपादती ।। ह्मणौनि भावरूप याती ।। स्वतंत्र ययाची ।।५६।। अभावाचें अभाव लक्षण ।। कार्यबोधु कैंचा तेणें करून ।। असो भावें होये निर्माण ।। तैं भाऊ चि तो ।।५७।। वंध्या पुत्रु न ह्मणतां ।। पूर्वीं तो कैसा होता ।। तैसा अभाऊ जल्पतां ।। दोषु लागे ।।५८।। स्फुरणा पूर्वीं सर्वथा ।। तो वायूचि कोठें होता ।। ह्मणौनि वंध्यापुत्रु वायु यथार्थता ।। मिथ्या जाला ।। ५९ ।। ऐसे अभाव जे बोलिले ।। ते ते भावचि सर्व जाले ।। तैसेनि अभावें अभावलें ।। तें अभावलें नव्हे ।।१३६०।। आकाशा पुष्प आलें नाहीं ।। संकल्पूचि न घडे कांहीं ।। कीं गेलें तें ये समयीं ।। ऐसें ह्मणावें ।।६१।। कीं खपुष्प मर्दूनि सांडिलें ।। ऐसें बोलावें बोलें ।। पुष्पवासना मूळें ।। विसरावी ते ।।६२।। खपुष्पा सारिखें सुमन ।। कोठेंचि नाहीं आन ।। कीं सकळां पुष्पा समान ।। खपुष्प नव्हे ।।६३।। आकाशा पुष्प आलें नाहींचि ।। ऐसें बोलणें वेडे वांकुडेंची ।। नाथिली भावना पुष्पाची ।। अभाऊ भजतां ।।६४।। तरि अभाऊ तो कैसा आतां ।। जया दोष न लागे बोलतां ।। तया प्रथग्सभ्दावाची व्यवस्था ।। जाणती तत्वज्ञ ।।६५।। घटत्वें घटु असतां ।। आणि व्यवहारींही बोलतां ।। सत्य मृत्तिका पाहातां ।। घटूचि नाहीं ।।६६।। पटु कासया फाळावा ।। न लगे तंतुत्वें उकलावा ।। प्रयोजनु तयाचा अघवा ।। घेईजतु असतां ।।६७।। तंतु दृष्टी तो नाहींचि ।। किरणी मृगजळ तैसेंची ।। किरणा वेगळें कांहींचि ।। न ये रूपा ।।६८।। किरणचि सत्य असती ।। पाहतां

तेचि अभासती ।। तेथें उदक ह्मणौनि भ्रांति ।। आभासे एकीं ।।६९।। तींचा निरासु न करितां ।। आभासु जळाकृती भासता ।। किरणा वेगळें सर्वथा ।। तेथ कांहींचि नसे ।।१३७०।। अधिष्ठानेंसीं अनारिसें ।। अधिष्ठानान्वयेंचि भासे ।। वेगळें तया नसे ।। सत्य कांहींची ।।७१।। असतांहीं जें भान फुडे ।। अधिष्ठान केवळ उघडे।। करावें न लगें जें कडें । अधिष्ठान जाणावया ।। ७२ ।। ऐसें[1] हें प्रथग संत भान ।। येणें मत्तें करून ।। प्रपंचाचें निरसन ।। केवळ करावें ।।७३।। प्रपंचु प्रपंचाकारें भासे ।। परंतु ब्रह्मचि (त) द्रूप तैसें ।। न घेपिजत तेणें दोषें ।। असे निजाकारें ।।७४।। मृगजळ भासे एकदाट ।। तैसें तें किरणचि प्रकट ।। परंतु निजाकारा भ्रष्ट ।। केवलपणें ।।७५।। अलंकाराचें दिसे वानें ।। परंतु नाछादवे (तया) सोनें ।। तरंगांचें लेउनि लेणें ।। समुद्द जैसा ।।७६।। तैसें असो हें प्रपंच भान ।। निर्मळ ब्रह्म स्छिर पूर्ण ।। सत्या असत्याचें आछादन ।। आछादू न शके ।।७७।। असतेन भानें ब्रह्मज्ञान।। तैं ब्रह्मज्ञानें न मोडे भान ।। यालागि ययाचें भान ।। देखिजेना ।।७८।। ब्रह्मनिष्ठा प्रपंचु न भसे ।। तैं उपदेश व्यवहार कैसे ।। ह्मणौनि अभाॐ तो ऐसा असे ।। देखणें ययाचें ।।७९।। आहे न तुटे भान ।। ह्मणौनि असावें संपूर्ण ज्ञान ।। उपक्रमोपसंव्हारें करून ।। ययां तत्वांचें ।।१३८०।। येथिचीया अल्पज्ञाना ।। हाणें ते असंभावना ।। तीचेनि आंगें भावना ।। विपरीत होये ।।८१।। मग गुरूशिष्याचा एकांतीं ।। दोघांतेंही पडे भ्रांती ।। ते निर (सा) वया शक्ती ।। नसे कव्हणा ।।८२।। ह्मणौनि आयास[2] केले।। पंचीकरण विस्तारिले मत्ताचे प्रकाशिले ।। वेगळाले भेद ।।८३।। हें समूळ सर्व जाणावें ।। तरीचि मत्त संकोचें बोलावें ।। अनुभव दृष्टी विचारावें ।। युक्ता युक्त ।।८४।। तरि अनु[3] तो आतां कैसा ।। कव्हणी प्रश्नु करील

---

१. या ओवींत पृथग या शब्दानंतर ∨ अशी खूण करून शेवटी ७८ व्या ओवीपर्यंतचा मजकूर लिहिलेला आहे. वाचकांच्या सोयीसाठीं आम्ही तो सलग दिलेला आहे.

२. आभास. ३. 'अनुभव' हा शब्द असावा.

ऐसा ।। तया कारणें ते दशा ।। सांगिजैल ।। ८५ ।। गुणसाम्या पासून ।। जें केलें प्राकृत विवरण ।। कार्यकारणाचें भान ।। आदि करूनि ।।८६।। तयाचेनि सर्व निरासें ।। शुद्ध अधिष्ठान जें असे ।। तें मीं आत्मा सन्मातृ ऐसें ।। जाणोनियां ।।८७।। तेथिचें ज्ञप्तिमात्र स्फुरण ।। तेंचि गुणसाम्य जाणोन ।। उन्मनी अवस्था आनंदमय स्फुंदन ।। बोलिजे जें ।।८८।। तें अधिष्ठितांचि पुरे ।। शबळ होऊनि विज्ञान स्फुरे ।। तेणें स्वरूप निर्द्धारें ।। स्फुरे ज्ञानरूप ।।८९।। तेंचि स्वरूप संवेदन ।। बोलिजे देह महाकारण ।। ईश्वरीं महामाया ह्मणौन ।। तेंचि जाणावें ।।१३९०।। तिये ज्ञानावस्थेचां ठांईं ।। अनवधान स्वरूप विषईं ।। स्फुरण लयो जें कांहीं ।। विस्मरण होये ।।९१।। तेंचि ईश्वरीं अव्यक्त ।। कारणदेह अव्याकृत ।। स्वरूप विस्मरण जें निश्चित ।। आपुलां ठांईं ।।९२।। तेचि करूनि प्रधान ।। उठी अज्ञानपूर्वक अन्यथाज्ञान ।। ईश्वरीं मायाप्रधान स्फुरण ।। महतत्व तें ।।९३।। आपणा नेणोनि पर जाणतां ।। अव्यवधानेंहीं परि सर्वथा ।। तयाचा पोटीं अवस्था ।। तीनि होती ।।९४।। ज्ञान अज्ञान अन्यथाज्ञान ।। सद्य आपणा प्रतीयमान ।। महामाया महतत्व स्फुरण ।। तेंचि ह्मणिजे ।।९५।। निर्विकल्प प्रपंच ज्ञान ।। तें ह्मणिजे महतत्व ह्मणौन ।। आतां तें स्वभावेंचि करून ।। व्यापारीं प्रवर्त्ततां ।।९६।। स्वभाव रूपें विज्ञेय ।। आंगिचेंचि गुणत्रय ।। कर्त्ता करण कार्य येणें आकारें ।।९७।। कर्त्ता कार्य करण ।। ज्ञाता ज्ञेय तेंवीचि ज्ञान ।। चेष्टकु चेष्टय चेष्टणें ।। आदि करूनी ।।९८।। भोगणें भोग्य भोक्ता ।। इत्यादि त्रिपुटीया समस्ता ।। हे गुणत्रयचि स्वभावता ।। ते (थ) जाणावे ।।९९।। सात्विकु स्वभाऊ तें ज्ञान ।। राजसु प्रवृत्ति क्रिया साधन ।। तामसु स्वभाऊ ते जडपण ।। जें नाथिलें स्फुरे ।।१४००।। प्रकाशु प्रवृत्ति आणि भान ।। उठी जैं निद्रे माजू + + ।। व्यक्ती स्वभावें स्वप्न ॥ यथाविध ।। १ ।। तैसें स्वरूप ज्ञानी स्फुरलें ।। अज्ञान मायारूप अंकुरलें ।। ज्ञाना आछादूनि

ठालें ।। करण रूपा ।। २ ।। तयामाजि प्रतिबिंबलें ज्ञान ।। तेंचि महतत्व विपरीत ज्ञान ।। गुणप्रभावें करून व्यक्त होये ।। ३ ।। सत्वाची ज्ञानमयता ।। तेचि ज्ञानशक्ति विचारितां ।। तीचेनि योगें ज्ञाता भोक्ता ।। स्वभाॐ तो ।।४।। राजसें गुणें क्रिया वर्त्ते ।। तेचि क्रिया शक्ती तेथें ।। स्वभाॐ तो तीचेनि मत्तें ।। क्रिया रूपु होये ।। ५ ।। तमसें पदार्थाचें भान ।। तेचि द्रव्यशक्ति ऐशी खूण ।। तींचेनि योगें करून ।। उठी आभासु ।। ६ ।। ज्ञान शक्तींसीं वर्त्तता सात्विकु स्वभाॐ सात्विकु अहंता ।। आपणू मी ज्ञाता कर्त्ता ।। ऐसा स्फुरे ।। ७ ।। तेचि गुणभेदें वृत्ति भेदली ।। पांच तत्वें तेथें निपजलीं ।। अंतःकरण मन बुद्धि चित्त ह्मणितलीं ।। अहंकारादिकें ।। ८ ।। राजसें क्रियाशक्ति वर्त्तता ।। स्वभावता जाली करणरूपता ।। तेथ क्रिया तेचि आतां ।। गुणभेदें त्रिविध ।। ९ ।। सत्वांशें तें ज्ञानकरण ।। रजें केवळ चेष्टाकरण ।। तमोमयत्वें कर्मकरण ।। विचेष्टच्य जें ।।१४१०।। चेष्टाकरण पंचविध ।। ते प्राणाचे क्रमेंचि भेद ।। ज्ञान करण तथाविध ।। पंचविध तें ही ।।११।। पंचविध कर्मकरण ।। ऐसें त्रिविध क्रिया स्फुरण ।। कर्त्तृवृत्ति भेदें करून ।। पंच पंचधा भेदलें ।।१२।। तामसें स्वभावें द्रव्य शक्ती ।। तीचेनि अंगें द्रष्टया प्रती ।। नाथिले आभास आभासती ।। स्वप्नदृश्या परी ।।१३।। पूर्वाध्यासें करून ।। स्वप्नी उठी प्रपंचभान ।। तैसेंचि तामस प्रधान ।। हें पूर्वाध्यासें स्फुरे ।।१४।। पूर्वी विषय भोगिले ।। ते वासनेमाजि होते संग्रहले ।। ते वासना येणें कालें ।। प्रकटती जाली ।।१५।। तें शब्द गुणें जालें गगन ।। स्पर्शगुणें पवनाचें निर्माण ।। रूपगुणें स्फुरण ।। तेजाचें जालें ।।१६।। रसगुणें जालें पाणी ।। गंधगुणें ते मेदिनी ।। कार्य वर्त्तता कारणी ।। जालीं आवरणें ।। १७ ।। कारणें कार्य व्यापितां ।। द्विगुणा कार्याची स्पष्टता ।। ह्मणौनि पृथ्वी पाहातां ।। अत्यंत स्थूळ ।।१८।। एकें शब्द गुणें गगन ।। वायो शब्द स्पर्शें करून ।। शब्द स्पर्श रूपें सघन ।। तेज जालें ।।१९।। शब्द स्पर्श रूप

रस ।। चौं गुणीं जळ साभास ।। पृथ्वी पांचां गुणी पुरुषास ।। संवेद्य असे ।। १४२० ।। ऐसें महतत्वाचें स्फुरण ।। जालें असतां गुण प्रधान ।। त्रिगुणाहंकार ह्मणौन ।। तेंचि ह्मणिजे ।।२१।। तया त्रिगुणात्मका अहंकारा ।। पासाव स्थूळाचा उभारा ।। स्थूळा उत्पत्ति समग्रा ।। जाली (त्या) पासाव ।।२२।। ऐसें अनुभवेंचि जाणावें ।। तत्व समूहा उपजवावें ।। तेणेंचि क्रमें (बो) धावें ।। उपसंहार लक्षण ।।२३।। मग उपक्रमोपसंहार ज्ञानें ।। अधिष्ठानेंसीं अभिन्न जाणणें ।। सर्व ब्रह्मरूप पाहाणें ।। भान मात्र ।।२४।। सर्व ब्रह्म जाणणें ।। परि निजाकारा + + + + तेंचि ध्याणें ।। येरु पृथग संतु मानणें ।। विवर्त्तु हा ।। २५ ।। अनुभवाचिया दृष्टी ।। ऐसी जाणतां तत्व सृष्टी ।। सकळांही मनी उठी ।। स्वभावें योग्यता ।।२६।। आतां साहित्याची कल्पना ।। तेथें कवण प्रयोजना ।। तरि या गुणकल्पा रचना ।। कळे प्रपंचाची ।।२७।।

ऊर्ध्वमूळोर्वाक् शाखा एकोश्वत्थ ।।
ऊर्ध्व मूळमधः शाखं ।।

येणें वेदवाक्योक्त प्रकारें ।। आणि गीते श्रीकृष्ण उत्तारें ।। वृक्ष साहित्य चतुरें ।। जाणावें कीं ।।२८।। पुरुषु बीज केवळ ।। गुणसाम्य गुणाचें मु (ळ) ।। तेथूनि शुद्ध सत्व प्रबळ ।। अंकूरतें जालें ।।२९।। तेथून शाखारूपें गुणत्रय ।। अंकूरतें जालें सकार्य ।। नामें रूपें अप्रमेय ।। परि शब्दें आछादलें ।।१४३०।। तेचि वेद तेथ पर्णें ।। वृक्ष साहित्यें प्रकारें येणें ।। आतां भूतोत्पत्तिक्रमाकारणें ।। सर्पाकारु हा ।।३१।।

पुरुष ए वेदं सर्वं ।।

वेदवाक्य प्रकारें येणें ।। नराकारें हाचि जाणणें ।। गुणसर्गु तो कवणें ।। प्रकारें कैसा ।।३२।। शाखास्थानी कल्पिलें ।। गुणत्रय वृक्षीं आरोपिलें ।। ते विशेषाकारें न रमले ।। साहित्य दे ('ख') ।।३३।।

पादोस्य विश्वा भूतानि ।।

येणें वाक्योक्त प्रकारें ।। प्रपंचु रचूनि प्रणवाकारें ।। तोचि त्रिपादु पुरुषु हें ईश्वरें ।। कल्पिलें साहित्य ।।३४।। तथापि तेही कल्पना ।। विशेषें न मिळे गुणा ।। तेथें असंभावना ।। उपजे तैं ते कैसी ।। ३५ ।। स्थूळ सूक्ष्म भावें करून ।। रजोगुण सत्वगुण ।। कार्यस्थानी प्रवर्त्तन ।। ययांचें सर्वदा ।। ३६ ।। तमोगुण ययाचां कारणी ।। मायाप्रधानु तो ह्मणौनि ।। तद्वतचि जीवस्थानी ।। विचारें पाहातां ।।३७।। कारण तमोमय अज्ञान ।। (हे++का) र्य तया पासून ।। रजोरूप सत्वरूप स्फुरण ।। जे जीव प्रकृतीचे ।।३८।। स्थूळ सूक्ष्म प्रधान ।। रज सत्व हे गुण ।। ययां माजि कारण ।। न गणिजे तिसरें ।।३९।। ह्मणौनि पादत्रय ह्मणावें ।। पाददयचि मानावें ।। द्विपद साहित्यें स्वभावें ।। पक्षी कल्पिला ।।१४४०।। रज सत्व गुणद्वय ।। स्थूळ सूक्ष्मरूपें ज्ञेय ।। व्यवहारनिष्ठ पाददय ।। प्रवृत्त कर्मी ।।४१।। मायीक तमोमय कारण ।। तें उदर विहंगमा लागून ।। शुद्ध सत्व तें कारण ।। ग्रीवा तयाची ।।४२।। ('आनंद वक्तृत्व') तें वदन ।। (स्वरूप चेतना) दर्शन ।। शिर तया लागून ।। आनंदमयु तो ।।४३।। नाद ब्रह्म पांख अपार।। गुरूवाक्यें वेदशास्त्र ।। ज्ञान विज्ञानें सर्वत्र ।। विराजती ते ।।४४।। परि व्यतिरेकान्वय भाग दोनी ।। तया विहंगमा लागूनि ।। सकळ पक्ष त्यांचा स्थानी ।। असती अन्वित ।। ४५ ।। पक्षद्वयाचेनि आधारें ।। स्ववृत्ति पक्षी फडत्कारें ।। व्योमाकारीं संचरे ।। जाऊनिया ।।४६।। तेथ मुक्ति-फळाचा चारा ।। पक्षी भावे[1] आहारा ।। स्वानंद भोक्तृत्वें खरा ।। हंसरूपी तो ।।४७।। पाददयाचेनि आधारें।। तोचि कर्मभूमि विचरे।। यज्ञ फळें समग्रें ।। समर्पितें भोगी ।।४८।।

एकः सुपर्णः स समुद्रमाविवेश ।।

ऐसें हें वेदाचें वचन ।। द्विपदु खेचरु ह्मणौन ।। प्रणवाकारू

---

१. मात्रे.

मोडून ।। पक्षी कल्पिला ।।४९।।

एकं संतं बहुधा कल्पयंति ।।

कारणोपाधि पूर्णात्मा ।। पक्षी कल्पिला परमात्मा ।। साहित्य गुणमहिमा ।। अपार तयाची ।।१४५०।। ययाचि पासाव जाले ।। प्रतिबिंब जीव वेगळाले ।। तेचि असती बोलिले ।। उक्तें वेदवाक्यें ।।५१।। शुद्ध शबळ भेदें करून ।। द्विविध तयाचें लक्षण ।। तेही वेदेंचि करून ।। प्रतिपादित असे ।।५२।।

द्वा सुपर्णा सयुजा सखाया ।।

येणें वेदवाक्यें करून ।। जीवाचें तेंचि द्विविधपण ।। शुद्ध शबळ भाव भिन्न ।। प्रकाशिलें असे ।।५३।। अविद्यक प्राकृत शरीर।। जड स्तब्ध निरंतर ।। आणि गुण शाखा वृत्ति विकार ।। केवळ ययाचे ।।५४।। तरुवराचेनि आकारें ।। जें मागां बोलिलें निर्द्धारें ।। तेंचि वृक्षु सत्याकारें ।। तया आश्रयूनि ।।५५।। दोनि पक्षी असती ।। समान सारिखे येकि याती ।। एकचि आतां रिती ।। कैसी तयांची ।।५६।। एकु क्रिया फळाचा भोक्ता ।। नित्य विषय अनुभविता ।। तया आंगीं कृपणता ।। दुर्बळता अत्यंत ।।५७।। इतरु अभोक्ताचि परी ।। पूर्णता त्याचां शरीरीं ।। आतां हेचि बरवियापरी ।। कल्पना सांगों ।।५८।। अविद्या गुणी मिळितु ।। अवस्थात्रय अनुभवितु ।। देहत्रय परिवेष्टितु ।। जीवात्मा जो ।।५९।। तो सकळ विषय सेविता ।। क्रिया फळाचा भोक्ता ।। तयां आंगीं कृषता ।। तेचि कैसी ।। १४६० ।। नित्य क्षरत्वें क्षीणत्व ।। असद्रूपत्वें अति कृषत्व ।। परिछिन्नत्व गुणबाध्यत्व ।। नित्य असे ।।६१।। आतां अभोक्ता जो पुरुषु ।। गुणसाक्षी अगोचरु ।। असंगु आत्मा इतरु ।। देहत्रयासि जो ।।६२।। साक्षी अलिप्तु अभोक्ता ।। तयाचा आंगीं पूर्णता ।। नित्यता आणि अक्षरता ।। सनातन असे ।।६३।। हेंचि निरुक्तीं बोलिलें ।। कृष्णेंहि अर्जुना उपदेशिलें ।। क्षराक्षर पुरुष वेगळे ।। उत्तमें पुरुषेंसीं ।। ६४ ।। ऐसे पक्षी कल्पिले ।। तथापि

साहित्य न मिळे ।। तेथु दोष लागले ।। तेचि कवण ।।६५।। वृक्षीं विषयज्ञान नाथी ।। कर्मेंद्रिय व्यापारही पुडती ।। ज्ञान करणाची व्यक्ती ।। ते असेचि ना ।।६६।। वृक्षी त (द्व) त मन प्राण ।। सर्वदा वर्त्ते अज्ञान ।। ह्मणौनि पक्षी तो ययाहून ।। चेतनावंतु ।।६७।। परि अधिकारु ज्ञानी नाथी ।। तोचि दोषु तया प्रति ।। ह्मणौनि देवें नराकृती ।। स्थान केलें ।।६८।।

विश्वं नारायणं देवं अक्षरं परमं पदं ।।

नरसमूह नराकारू ।। तयातें ह्मणिजे नारू ।। तेंचि आयन ईश्वरु ।। करूनि ठेला ।।६९।। नराकृती वर्त्तता ।। भोगिजे विषयां समस्तां ।। आणि इंद्रिय व्यापार सर्वथा ।। यथान्यायें ।।१४७०।। प्राणाचां ठांईं प्राणत्व ।। सर्वदा सकल[1] भोक्तृत्व ।। ज्ञानविज्ञानें परमतत्व ।। तेंही कळे ।।७१।। धर्म कर्म व्यापार ।। गुणाचे करणाचे समग्र ।। (व्यक्ती येती साचा) र ।। ये (णें) नरदेहें ।।७२।। ज्ञान आणि विज्ञान ।। परम तत्वाचें सेवन ।। गुरु शिष्य योगु साधन ।। नरदेहेंचि येणें ।।७३।। ऐसें जाणोनि ईशें तेणें ।। नारायणत्व आपणाकारणें ।। सिद्ध केलें बहुगुणें ।। आगळे तें ।।७४।।

सइममेवात्मानद्वेधा पा (त) यत्ततः ।।

तथदिदमाहुः ।।

इत्यादि तत्वें सृजितां ।। नाना का (रीं) रमतां ।। विश्रांति नाहीं पावता ।। जाला कोठें ।।७५।। मग नराकारु हा कल्पूनि ।। तत्वांची केली मांडणी ।। ते गुण ते (व्यापार 'करणी') ।। (वेगळाली ते) ।।७६।। (तेथ) पावला विश्रांतीतें ।। पाॐ नि तिये व्यक्तीते ।। तैसींचि सकळें भूतें ।। नराकृती रचिलीं ।।७७।। मग नरदेह ब्राह्मणवर्ण ।। गुरुत्व प्रतिष्ठे लागून ।। तयाचें करूनि निर्माण ।। वर्त्तता जाला ।।७८।। (ये) णें वेदवचनें हें मानिजे ।। मग नररूप जाणिजे ।। आदिगुरुत्वें भाविजे ।। अतेव षड्भुज

---

१. सर्वत्र.

॥७९॥ तो पुरुषु पंचविधु ॥ तयाचा कैसा भेदु ॥ सकळ व्यापारु प्रसिद्धु ॥ जेणें होये ॥१४८०॥ स्थूळ सूक्ष्म भेदें ॥ ईश्वरीं द्विविधु ना (दे) ॥ (तैसाचि 'जीवप' दा शुद्धें) ॥ अंशत्वें द्विविधु ॥८१॥ विराटु स्थूळ सर्वेश्वरीं ॥ हिरण्यगर्भु सूक्ष्मु अंतरीं ॥ दोंहीं पासाव गुणव्यापारी ॥ सृष्टयादि कार्य ॥८२॥ स्थूळ शरीर जीवाचें ॥ लिंगत्वें पुरुषु नाम ययाचें ॥ सूक्ष्म लिंग शरीर साचें ॥ सूक्ष्मु पुरुषु तो ॥८३॥ येणें पुरुष द्वयें करून ॥ कर्माकर्मीं प्रवर्तोन ॥ पुरुष चतुष्टय सगुण ॥ तें येणें प्रकारें ॥८४॥ पांचवा पुरुषु बोलिजे ॥ तो कार्यकारणात्मकु ह्मणिजे ॥ तत्वामाजि (चिंतिजे) ॥ सर्वदा मनी ॥८५॥ पुरुष चतुष्टयाचें लक्षण ॥ तयाचिये व्यक्तीचि खूण ॥ करिताचि निरूपण ॥ प्रकट होये ॥८६॥ पांचवियाची विवंचना ॥ ते साहित्यें आणूनियां गुणा ॥ व्यक्ति दिसे नयना ॥ ऐसी सांगों ॥८७॥

१३

[या भागासाठीं ७ फूट २ इंच इतकी जागा लागलेली आहे. प्रारंभींच मूर्ति काढलेली आहे. ही मूर्ति दत्तात्रयाची आहे असें म्हणण्यांत येतें, पण तसा उल्लेख मात्र कुठेंच नाहीं. ३ फूट १ इंच इतकी मूर्तीची उंची मुकुटासुद्धां आहे. मूर्तीच्या शरीरांत मजकूर आहेच. परंतु हातांतील आयुधें मूर्तीच्या आकृतींतच लहान काढलेलीं आहेत. तेथें त्यांच्यांत मजकूर नाहीं. मात्र मूर्तीच्या डाव्या बाजूस चक्र, डमरू आणि माळा व उजव्या बाजूस शंख, त्रिशूळ आणि कमंडलू अशा मोठ्या आकृति काढून त्यांत मजकूर लिहिण्यांत आलेला आहे. या मूर्तीच्या खालीं हंसाची आकृति आहे. ती पुसट झालेली आहे. २ फूट ११ इंच लांब आणि १॥ फूट उंच अशी ही हंसाकृति आहे. उजवीकडील भागांत मोठ–मोठीं छिद्रें पडलीं आहेत. याच्या खालीं समविषम तत्त्वांचें एक चक्र आहे आणि सर्वांत शेवटीं ९ ओळी लिहिलेल्या आहेत. हा पासोडीचा शेवट आहे. परंतु याचा डावीकडून २२″×११½″ इतका तुकडा गेलेला असल्यानें प्रत्येक ओळ जेमतेम अर्धी वाचतां येते. याच अर्ध्या भागाखालीं वेलबुट्टीची चौकट आलेली आहे व येथें पासोडी संपलेली आहे.]

१ मालाकृति

विवेकहीनां स्वभृत्यांशिष्यांतें (मंत्रादि) उपदेशीं वेद–पठणादिकी अधिकारू ह्मणौनि गुरु सर्वेश्वरें श्रीयोगिराजें अवर्णादि क्षवर्णपर्यंत जे वर्णमाळा ते अक्षमाळा तदपर दक्षिण करीं उपदेश व्यवहारा निमित्त धरिली असे ते मंत्रमाळ नादब्रह्ममयी

२ डमरू आकृति

अनुभव ज्ञानी अधिकारहीनातें शाब्दिक ज्ञातेही उपयुक्त असे ह्मणौन समतत्व विषमतत्व (वादु) हा डमराकारें कल्पिला तो कैसा तरि चक्र निर्विकल्प स्वरूप निष्ठा तें निर्विकल्प हें शाब्दीकज्ञान वादनिष्ठत्वें सशब्दु जो तो परमतत्व संस्पर्शेंचि होये अन्यथा जना कीं जया शब्दाचा ठांईं परमात्मतत्वाचा नित्य

१,२. आकृति इतरत्र छापल्या आहेत.

स्पर्शु तेणेंविण बोलणेंचि नाहीं ऐसें जें शब्दज्ञान तें श्रीयोगिराजाचां अपर दक्षिण करीं स्वभक्त-शिष्यानुग्रह-निमित्त असे..... ...

१ त्रिशूलाकृति

उपजलिया प्रपंचाची स्थिति प्रणय विवरणें वृक्ष साहित्यें जाणावीं तेचि व्यक्ति शूळ रूपें गुरु सर्वेश्वरा माया भागीं वामांगीं अपर वामकरी विराजे हें ईश्वर चिन्हचि परि गुरुचिन्ह नव्हे हे वामभागी मध्यभुजास्थानी शूलचिन्ह आतां वामांग ऊर्ध्व भागीं शंख चिन्ह ॥

सृष्टीचा उपक्रमु पंचीकरण

२ शंखाकृति

सृष्टीचा उपक्रमु पंचीकरण मार्गें भुजंग साहित्यें जो बोलिला तो शंखाचेनि साहित्यें ईश्वरा गुरूतें माया मार्गीं-अळंकाररूपें विराजला हें चिन्ह सर्वेश्वरत्वाचें ह्मणौनि वामकरीं ॥ छ ॥

३ चक्राकृति

सकळे उपाधीचा सकळां तत्वांचा उपसंहारु अनुभव ज्ञानें करितां तेणें मत्तें पांच ज्ञानेंद्रियें सावें मन इतुलीचि तत्वें अधिकें न घडती तीं कवण मत्तें तरि पांचही ज्ञानकरणासी असंग करूनि निरावलंबी मन ठेवितां कार्यकारणरूपा सकळा तत्वांचा निरासु अनायासेंचि होये तेथें चेष्टाकरण ज्ञानकरण ना कर्मकरण ना विषयपंचकाचें भान ना भूतें महाभूतें हीं कर्त्तृवृत्तीचा पंचधा भेदु तोही निरावलंबी मन मात्र चैतन्यरूप एक तेणेंचि स्वस्वरूप

१,२,३. आकृति इतरत्र छापल्या आहेत.

जाणिजे जाणीतलया तेचि गुणसाम्य चिन्मात्र ब्रह्म तेंचि ह्मणौन सर्वोपाधि खंडण अनुभव प्रवर्त्तक माया अविद्या छेदक हे चक्राकारें विज्ञानयंत्र जगद्गुरू ईश्वरा श्रीयोगिराजाचां करीं भक्त-शिष्या-नुग्रहा-निमित्त पाहिजे ह्मणौनि दक्षिण करीं विज्ञान चक्र ॥

श्रीदत्तमूर्ति

हंस

येण्हें प्रकारें पूर्ण पुरुषाची रचना

एकं संतं बहुधा कल्पयंति ॥

येणें प्रमाणें वेदवाक्योक्त प्रकारें प्रकारांतर भाव सांगीतले आतां विषम तत्ववादु समतत्ववादु (सांगि) जत असे प्रथम विषमतत्ववादु तो कैसा.

[विषम तत्ववाद चक्राकृति पुढें दिली आहे. मूळांत ती सलग अशा चार ओळींत व २९ वर्तुळांत काढलेली आहे. येथें वर्तुळा ऐवजीं चौकोन उपयोगांत आणले आहेत, आणि १५ चौकोन पहिल्या भागांत व १४ चौकोन दुसऱ्या भागांत देऊन दोन विभागांत ती छापली आहे.]

१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५
(प)	साम्य	महामाया	ईश्वरू	स्ववेदन	अव्यक्त	महतत्व	अहंकारू	सात्विकु	राजसु	तामसु	विराट	उत्पत्ति	ब्रह्मा	रजो "गुणु"
(र)	साम्य	अविद्या	जीउ	स्ववेदन	अवेदन	अन्यथा वेदन	अहंकारू	सात्विकु	राजसु	तामसु	स्थूळ	जागृति	विश्व	रजोगुणु
(म)	साम्य	महामाया	ईश्वरू	स्ववेवन	अव्यक्त	महतत्व	अहंकारू	सात्विकु	राजसु	तामसु	विराट	उत्पत्ति	ब्रह्मा	रजोगुणु
(तत्व)	साम्य	"अविद्या"	"जीउ"	स्ववेदन	अवेदन	"अन्यथा" वेदन	"अहं–कारू"	"सा–त्विकु"	"राजसु"	"तामसु"	"स्थूळ"	"जागृति"	"विश्व"	"रजो–गुणु"

१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९
हिरण्यगर्भु	स्थिति	विष्णु	सत्वगुणु	माया	प्रळयो	रुद्र	तमोगुणु	महामाया	साक्षित्व	सर्वेश्वरू	शुद्धसत्व	ॐ	आनंदमयु
लिंग	स्वप्न	तैजसु	सत्वगुणु	कारण	सुषुप्ति	प्राज्ञु	तमोगुणु	म "हा" कार "ण"	तुरीया	प्रत्यगात्मा	शुद्धसत्व	ॐ	आनंदमयु
हिरण्यगर्भु	स्थिति	विष्णु	सत्वगुणु	माया	प्रळयो	रुद्र	तमोगुणु	महामाया	साक्षित्व	सर्वेश्वरू	शुद्धसत्व	ॐ	आनंदमयु
"लिंग"	स्वप्न	तैजसु	सत्वगुणु	कारण	सुषुप्ति	प्राज्ञु	तमोगुणु	महाकारण	तुरीया	प्रत्यगात्मा	शुद्धसत्व	ॐ	आनंदमयु

शेवटचा भाग

[हा भाग उपसंहाराचा आहे. ३॥ फूट लांबीच्या ९ ओळींत तो लिहिलेला आहे. पण दुर्दैवानें हा शेवटचा भाग डावीकडील बाजूनें दोन फूट फाटून गेलेला आहे. उजव्या बाजूकडील १॥ फुटाच्या भागांत ९ ओळींत मजकूर आहे पण प्रत्येक ओळ अर्धींच आहे. म्हणून मजकुराची कल्पना येण्यासाठीं तो मज़कूर ओळीवार देण्यांत आलेला आहे— संपादक]

१ ली ओळ

+ + + + + परम तत्वीं विभेदु ॥ साम्यद्वया जो ॥ तो स्वगतभेदु मानावा ॥ जो ऐक्यावबोधें ये अनुभवा ॥ भेदें जयाचिया भावा ॥ पाविजेना ॥ भेदें स्वरूपभेद गोचरु ॥ + + + + + + +

२ री ओळ

+ + + + नव्हता प्रबोधु ॥ तो कां होता ॥ न होता ऐसा तो होये ॥ (जाला ऐसा प्रतीति ये) ॥ प्रतीती ये आला जाये ॥ हातिचा बोधुं ॥ मग अबोधाची (प्रतीती) ॥ + + + + वस्थेची स्फूर्त्ती ॥

३ री ओळ

वर्षाव काळीं अकूरतां ॥ स्वरूप भेदु तो आइता ॥ ('तृण जातीची ' विभिन्नता) ॥ सिद्ध होये ॥ ऐसा व्यक्तु भेदु संहारे ॥ तो अव्यक्तरूपें (स्वगत उरे) ॥ (स्वरूप) तें ही निजाकारें ॥ + + + + + +

४ थी ओळ

साम्य समत्व ध्येय ॥ कवणे वस्तूचे ॥ (तरि) सत्वादि प्राकृत गुण ॥ वेगळाले ययाचें स्फुरण ॥ परस्परा विरुद्ध लक्षण ॥ त (या गु) णाचें ॥ एका कारत्व + + + + + + + + + +

५ वी ओळ

+ + + + + + + + ॥ (बोलि) जे यापरी ॥ आतां परम (तत्वा) प्रकृति द्वय ॥ सर्वथा न घडे कार्य ॥ ह्मणोन

आश्रयरूप पुरुषद्वय ।। तेथें जाणावें ।। ऐसीं सा (तत्वें) बोलिलीं ।। ज्ञानभेदें + + + +

६ वी ओळ

+ + + + + + + ।। परमतत्व ब्रह्मनिर्मळ ।। (तेथ सा) म्य द्वय निर्मूळ ।। तें कांहींचि नसे ।। ह्मणौनि तत्व संख्ये वेगळें ।। परमतत्व अ (से) संचलें ।। भावा अभावा + + + + + + + + + +

७ वी ओळ

ह्मणौनि साम्येंचि मानावी ।। (तत्वें ' दोन्ही अनुभवावीं) प्रकृति (द्वयें) सी गणावी ।। ते च्यारि होती ।। पुरुषु मेळवितां तत्वें सा ।। सवतत्व–वादु तो ऐसा ।। आनु+ + + + + + + + + +

८ वी ओळ

+ + + + + + ।। आठ जालीं ।। अज्ञान तें अन्यथा ज्ञाने ('सीं') ।। + + + + + + सत्वेंसीं ।। (तत्वांची ' उत्पत्ती ') ऐसी ।। स्वभावेंचि असे ।। रज तम कार्य करण ।। समवेत तयाचें स्फुरण ।। होये + + + + + + + + + +

९ वी शेवटची ओळ

+ + + + करितां अनुवादु ।। (सिद्धि होये) ।। (सर्व) दा सर्वत्र अभेद ज्ञान ।। पर सिद्धीचें तें लक्षण ।। स्फुरे गुरुमुखें करून ।। भाग्यवंतांतें ।।

"पासोडी"ची पुरवणी

लेखक : म. दा. गाडगीळ

१. पासोडीचें पर्यालोचन

२. विषयानुक्रमणिका

पासोडीचें पर्यालोचन

कविवर्य श्रीदासोपंत उर्फ दासो दिगंबर हे एक दीर्घोद्योगी विद्वान हैद्राबाद प्रांताच्या बीड जिल्ह्यामध्यें इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत (सुमारें ४०० वर्षांपूर्वी) होऊन गेले. यांचा इतिहास, कुळपरंपरा, संप्रदाय, विद्वत्ता, त्यांनी लिहिलेली ग्रथ–संपत्ति इत्यादिकांचें वर्णन या ग्रंथात इतर ठिकाणीं विस्तारपूर्वक आलेलें आहे. या ठिकाणीं त्यांनी लिहिलेल्या पंचीकरण, ' पासोडी ' चें अद्वैत तत्त्व–ज्ञानाच्या दृष्टीनें पर्यालोचन करण्याचें योजिलें आहे.

' पंचीकरण ' या शद्धांतील मूळ संस्कृत धातु ' पचि ' म्हणजे व्यक्तकरणें अथवा विस्तार होणें या अर्थाचा आहे. संस्कृत शब्द ' प्रपंच ' हा हि याच धातुपासून झाला आहे. संस्कृत भाषेमध्यें सिंहालाहि पंचानन किंवा पंच्यास्य म्हणतात. अर्थात ' विस्तृत आहे जबडा ज्याचा ' असाच येथे अर्थ आहे. एवंच ' पंचीकरणा ' मध्यें पांच या संख्येचा अथवा १०, १५, २०, २५ इत्यादि तदुभ्दव गुणांकांचा अंतर्भाव अथवा सम्बन्ध असलाच पाहिजे असा अर्थ नाहीं. तथापि उत्तर वेदान्तामध्ये जे द्वैतवादी ' कापिल सांख्यां ' चें पंचीकरण घेतलें गेलें आहे त्यामध्यें पांच या संख्येचें आणि तदुभ्दव गुणांकांचें प्राधान्य आहे यांत शंका नाहीं उत्तर वेदान्तामध्यें उपर्युक्त सांख्यां-च्या अनेक प्रक्रिया घेतल्या गेल्या आहेत, पण प्राचीन औपनिषत्तत्त्वज्ञानामध्यें असलें पंचीकरण स्वीकारलेलें नाहीं. बादरायणाचार्यांच्या ब्रह्मसूत्रांमध्यें याचें नांव नाहीं. तेव्हां अद्वैत तत्त्वज्ञानास पंचीकरण प्रक्रियेची आवश्यकताच आहे असें नव्हे. हा एक करमणुकीचा किंवा विद्याविनोदाचा काल्पनिक विषय आहे आणि तो जर प्रमाण शास्त्राच्या कसोटीला अथवा अनुभवाला उतरणारा होईल तर मान्य करण्यास हरकत नाहीं. पण चालू युगांत भौतिक शास्त्रांची इतकी आश्चर्यकारक प्रगति झालेली आहे कीं आतां हें कल्पना–राज्यांतील डोलारे कल्पना राज्यांच्या इतिहासांतच राहणार हें उघड आहे. तथापि ज्या काळीं असली प्रगति झालेली नव्हती त्या काळांतील एका विद्वान् दीर्घोद्योगी पुरुषाचा विश्वाच्या मांडणीचा उलगडा लावण्याचा प्रयत्न (जरी तों द्वैतवादी सांख्यांच्या पंचीकरणाच्या पायावरच उभारलेला असला तरी) वाखाण-ण्यासारखा नाहीं असें मात्र नव्हे.

मानवी समाजापुढें हा विश्वाचा अफाट पसारा कसा उत्पन्न झाला आणि विस्तार पावला अर्थात हा ' पंचीकरणाचा ' चा प्रश्न स्वभावतः स्मरणातीत काला–

पासून उभा आहे, आणि याचें उत्तर शोधून काढण्याकडे समाजांतील बुद्धिवान् पुरुषांचें सारें लक्ष लागलेलें आहे. आजहि हे विश्वाचें कोडें पूर्णपणें उलगडलें गेलें आहे असें म्हणतां येत नाहीं. मृत्तिका हातांत घेऊन पहावी तर ती वारींक बारीक अणूंची बनलेली आहे असें दिसतें. गारगोटी सुद्धां अनेक खडयांची बनलेली, आणि प्रत्येक खडा लक्षावधि अणूंचा बनलेला आहे असें दिसून येतें. प्रचंड झाड सुद्धां कोटयावधि अणूंचे आणि हे सर्व एका लहान वीजापासून अर्थात सूक्ष्माचें स्थूल बनतें हा अनुभव आल्यावर हें सारें विश्व अत्यंत सूक्ष्म अशा परमाणूंपासून झालें असलें पाहिजे असें साहजिकच वाटतें. आणि या शोधाच्या सारखे पाठीमागे लागल्यामुळेंच आजची सारी भौतिक शास्त्रें उत्पन्न झालीं आहेत. परवां परवां पर्यन्त या शास्त्रज्ञांनीं नैसर्गिक सूक्ष्म तत्त्वांची संख्या ९० म्हणून ठरविली होती. पण आतां इलेक्ट्रॉन, प्रोटॉन आणि न्यूट्रॉन अशीं तीनच तत्त्वें आहेत. आणि तीहि एका विद्युत् शक्तीचींच रूपें असावीत असें अनुमान करण्यास आधार दिसूं लागले आहेत. एवंच सध्याचे शास्त्रज्ञ या तीन तत्त्वांच्या त्रिवृत्करणानें अर्थात विकासानें अथवा पंचीकरणाने विश्वांतील सर्व पदार्थ कसे उत्पन्न होतात या शोधामध्यें मग्न झालेले आहेत.

आमच्या देशामध्यें असल्या तऱ्हेचे प्रायोगिक शोध करण्याची प्रवृत्ति पूर्वीहि नव्हती आणि अद्यापहि नाहींच. अद्वैत शास्त्रज्ञांपुढें निर्गुण निराकार निर्द्रव्य आणि निरवयव अशा परब्रह्मापासून सगुण साकार सद्रव्य व सावयव असें विश्व कसें उत्पन्न झालें हा प्रश्न पहिल्यापासून होताच आणि त्याचें उत्तर त्यांनीं आपल्या सूक्ष्म बुद्धीने जें शोधून काढलें तें असे :–

ते ध्यानयोगानुगता अपश्यन्
देवात्मशक्ति स्वगुणैर्निगूढाम्
(श्वेताश्वतर उ० १–२)

या पेक्षां जास्त भानगडींत ते पडलें नाहींत. परमात्म्याची एक अचिन्त्य अद्‌भुत शक्ति प्रत्ययास आली म्हणजे काम झालें. तिला त्यांनीं 'अव्यक्त' असें नांव दिलें. कारण ती सदा झांकलेली गूढच राहते, जरी तिचें अस्तित्व प्रत्ययास आल्याशिवाय रहात नाहीं. म्हणूनच प्राचीन वेदान्तामध्यें किंवा ब्रह्मसूत्रांमध्यें पंचीकरणाचें नांव नाहीं. पण या बाबतीमध्यें कापिलसांख्यांनीं फारच मोठी मजल मारली आणि सृष्टिप्रक्रियेला त्यानीं संख्येच्या चौकटींत बसवून एक सुसम्बद्ध आणि संघटित रचना आणून दिली. पंच तन्मात्रांची आणि गुणांची कल्पना त्यांचीच आहे. प्राचीन वेदान्तानें तीन मूलतत्त्वें तेज, आप आणि अन्न आणि त्यांचाच विकास व विस्तार म्हणजे त्रिवृत्करण असें मानलें पण सांख्यांनीं पंचतन्मात्र पंचमहाभूतें त्यांचें गुण, प्रकृतिचें सत्व, रज, तम, हे गुण या सर्वांचें नानाविध प्रकारांनीं आणि परिमाणांनीं झालेलें परस्पर

सम्मेलन आणि संमिश्रण म्हणजे 'पंचीकरण' असा अर्थ निश्चित करून ठेविला आणि तोच अर्थ आतां वेदान्तात स्वीकारला जात आहे.

कापिल सांख्यमतप्रवर्तक विद्वान फार सूक्ष्म बुद्धीचे होते यांत शंका नाहीं. त्यांच्या अनेक प्रक्रिया वेदान्तामध्ये घेतल्या गेल्या आहेत हें मागें सांगितलेंच आहे. कारण त्या जर एकाद्या विषयाचें विशद ज्ञान करून देण्यास योग्य असतील आणि अद्वैत तत्त्वज्ञानांच्या मौलिक सिद्धान्तास बाधक नसतील तर त्या स्वीकारण्यास कांहीं हरकत नाहीं, असेंच अद्वैत सम्प्रदायाचें मत आहे आणि तें योग्यच आहे. मात्र त्या प्रक्रिया आमच्या नाहींत हें स्पष्टपणे सांगितलें गेलें पाहिजे. हैड्रोजन आणि ऑक्सिजन या दोन द्रव्यांच्या संयोगानें पाणी होतें हें नाकारण्याची अद्वैत शास्त्रास कांहीं जरूरी नाही. 'स्वविषय शूराणिहि प्रमाणानि' (बृ. उ. २–१–१० वरील भांष्य) प्रत्येक प्रमाण आपल्या क्षेत्रामध्यें प्रभावीच असतें. अद्वैत शास्त्राचें हेंच म्हणणें आहे कीं हे सर्व व्यवहार कायदे आणि प्रमाणें एका अक्षर ब्रह्माच्या 'प्रशासना' खालीं येतात. ही अचिन्त्य 'अव्यक्त' शक्ति मान्य करून पंचीकरणाच्या अथवा इतर शास्त्रांतील प्रक्रिया जर शास्त्रज्ञ बसवीत असतील आणि त्या जर तर्कशुद्ध व अनुभवास येणाऱ्या असतील तर त्या मान्य करण्यास कांहींच हरकत नाहीं. पण त्या जर उपर्युक्त अव्यक्त शक्ति सम्बन्धानें दिशाभूल करणाऱ्या व केवळ काल्पनिक असतील तर त्या हानि केल्या-वांचून राहणार नाहींत.

अद्वैत शास्त्रांतील मौलिक सिद्धांत म्हणजे 'ब्रह्मकारणता' सिद्धांत होय. आमचें 'आत्मतत्त्व' एकमेवाद्वितींय नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव, अशनाया पिपासारहीत, शोकमोहातीत 'बहुस्यां प्रजायेय' असें विश्वाची उत्पत्ति– स्थितिलय करणारें आणि प्रशासक आहे. याच्या विरुद्ध कापिल सांख्यशास्त्र द्वैतवादी असल्यामुळें अनंत आत्मे मानतें आणि एक वेगळी 'प्रकृति' ही मानतें आणि हिच्या प्रभावामुळें हे अनंत आत्मे यांत होतात आणि मग ज्ञानानें मुक्त होतात असेंहि मानते. अद्वैत शास्त्रामध्यें एकच आत्मा अथवा पुरुष (अक्षर ब्रह्मपरम् गी ८–३) आणि प्रकृति म्हणजे पुरुषा-चाच 'स्वभाव' (स्वभावोऽध्यात्ममुच्यते गी. ८–३)तो कोणता ? तर 'भूतभावोद्भ-वोकरः' म्हणजे सृष्टि उत्पन्न करण्याचा, असें श्रीशंकराचार्य आपल्या भाष्यांत म्हण-तात. अर्थात पुरुष आणि प्रकृति एकच. प्रकृति म्हणजे 'अव्यक्त' नांवाची बीज शक्ति आणि तिच्यामुळें परब्रह्म रूपी पुरुष भ्रांत होत नसतो कारण ती त्याचीच शक्ति आहे, वेगळी नव्हे. अद्वैत शास्त्रांमध्यें भ्रांत होणारे 'जीवात्मे' मानलेले आहेत पण ते केवळ 'चिदाभास' आहेत. चैतन्य नव्हेत. कारण चैतन्य निरवयव एकमेवाद्वितीय आहे. त्याचे अंश होणे अशक्य आहे. भगवद्गीता (अ. १५ श्लो. ७) मध्यें जें 'ममै-वांशो' म्हटलेलें आहे. तें परमात्म्याच्या 'जीवभूता परा प्रकृति' सम्बधानें म्हटलें

आहे. संसारी भ्रान्त प्राण्यासंबंधाने नव्हे. अशा स्थितींत सांख्यांच्या पंचीकरणाच्या प्रक्रिया अद्वैत शास्त्रांत कशा लागू पडणार ? म्हणूनच ब्रह्मसूत्र भाष्यामध्यें पंचीकरणाचें नांव नाहीं. श्रीशंकराचार्यांनीं तर सांख्यांचे जबरदस्त खंडनच केलें आहे तें त्यांचें पंचीकरण कसें मान्य करतील ? आचार्यांच्या नांवांवर एक 'पंचीकरण' म्हणून प्रसिद्ध प्रकरण आहे. पण ते सांख्य प्रक्रियेवर आधारलेलें नसून कठोपनिषदावर आधारलेलें आहे. कारण त्यांत गुणत्रयांचें नांव नाहीं ! हया पंचीकरणाचा सारांश खालीं पत्रक रूपानें दिला आहे :-



+ श्री शंकराचार्यकृत आत्मबोध :-

पंचीकृतमहाभूतसंभवं कर्म संचितम्
शरीरं सुखदुःखानां भोगायतनमुच्यते ॥१२॥

पंचप्राणमनोबुद्धिदशेन्द्रियसमन्वितम्
अपंचीकृतभूतोत्थं सूक्ष्मांगं भोगसाधनम् ॥१३

ॐ काराची विभागणी:– स्थूल शरीर 'जागृत' अवस्था आणि तदभिमानी 'विश्व' म्हणजे 'अ'कार, सूक्ष्म शरीर 'स्वप्न' स्थिति आणि तदभिमानी 'तैजस्' म्हणजे 'उ'कार आणि कारण शरीर 'सुषुप्ति' अवस्था आणि तदभिमानी 'प्राज्ञ' म्हणजे 'म'कार आणि सर्व मिळून ॐकाररूपपरमात्मा 'अव्यक्त' शद्वाचें विवरण भगवद्गीतेच्या शांकर भाष्यांत खालील प्रमाणें दिलें आहे:–

गी. अ. ८ श्लो. १८, प्रजापते: स्वापा वस्था श्लो.२० परब्रह्म भूतग्राम बीज (अविद्या लक्षण),श्लो. २१,२२, परब्रह्म

गी. अ. १२ श्लो. ३, अचिन्त्य सर्वव्यापी कूटस्थ
अविद्याद्यनेक संसारबीज अचल ध्रुव

गी. अ. १५ श्लो. १ ब्रह्म अव्यक्तम् मायाशक्तिमत्, संसारवृक्षाचें मूळ,
(अव्यक्त मूल प्रभवस्तस्या नु ग्रहोत्थित: संसारवृक्ष:)

अव्यक्ता'ला परमात्म्याची 'अविद्या' शक्ति असेंही उपनिषदांतून म्हटलें आहे पण तिच्यामुळें परब्रह्मच भ्रांत होतें असली खुळचट कल्पना अद्वैत शास्त्रास मान्य नाहीं. कठोपनिषदामध्येंहि (३–११) अव्यक्त शद्व आला आहे. तेथें शांकर भाष्यामध्ये "जगतो बीजभूतमव्याकृतनामरूपसतत्वं सर्वं कार्यकारणशक्तिसमाहाररुपमव्यक्ताण्याकृताकाशादि नामवाच्यं पदमात्मन्योतप्रोतभावेन समाश्रितं वटकणिकायामिव वट वृक्षशक्ति." असें त्याचें विवरण करण्यांत आलें आहे.

आतां सांख्य सिद्धांतात चैतन्यरूपी आत्मतत्त्वच भ्रांत होतें असें गृहीत धरलेलें आहे आणि त्यांची पंचीकरणाची प्रक्रिया घेतांना हीं त्यांची चूक आम्ही गिरविली आहे ! ÷

अद्वैततत्वज्ञानातील मौलिक हिरा म्हणजे 'ब्रम्हकारणता' अथवा चैतन्य

÷ या संम्बधानें लेखकाने आपल्या 'ब्रह्मविद्या' नावांच्या पुस्तकांत पृष्ठ १५८ वर जी कारण मीमांसा केली आहे तिचा उतारा खालीं दिला आहे:–

पूर्वीचें ग्रंथकार अनेक ठिकाणीं चूकले यांत मुळींच संशय नाहीं. पण या बद्दल ते अवमानास अथवा निंदेस मात्र पात्र नाहींत ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. परकीयांच्या स्वाऱ्यापासून तो इंग्रजांचे राज्य स्थायी होण्यापर्यंतचा काळ अत्यन्त अंदाधुंदीचा आणि संकटांचा होऊन गेला आहे. देशामध्यें कलह, मारामाऱ्या, खून, डाके,दरोडे सारखे चालूच होते. कोणाचेंही जीवित सुरक्षित आहे अशी स्थितीच नव्हती. सार्वत्रिक शिक्षणाची सोय नव्हती आणि संस्कृत भाषेचें ज्ञानहि अत्यंत थोडया विद्वांनांतच होतें. अशा बिकट स्थितीमध्यें वेदान्त शास्त्राकडे पाहतोंच कोण ? जेथें जीविताचीच

कारणतेचा सिद्धान्त होय. याचेच असंदिग्ध प्रतिपादन मूळ एकादश उपनिषदें, भगवद् गीता आणि बादरायणाची ब्रह्मसूत्रें करीत आहेत. आजकाल पाश्चात्य तत्वज्ञानामध्ये जो Emergent Evolution चा सिद्धांत प्रतिपादिला जात आहे तोच आमच्या प्राचीन महर्षींनीं प्रणीत केलेला एकमेवाद्वितीय चैतन्यकारणतेचा सिद्धांत होय. यासच व्यूह सिद्धान्त म्हणतात (पहा ब्रह्मसूत्र २–२–४४ भाष्य) यांचेंच मूळ (ऋग्वेद ६–४७–१८) 'रुपं रुपं प्रति रूपो बभूव इन्द्रो मायाभिः पुरुरुप ईयते'या ऋचे मध्यें साठविलेंलें आहे. सच्चिदानन्द स्वरूप परब्रह्म आपल्या नानाविध सामर्थ्यानें या जगामध्यें नटलेलें आहे त्यानें ही रूपें धारण केलीं आहेत असा येथे अर्थ आहे आत्म्या पासून आकाश, वायु, तेज इत्यादि जड द्रव्यें उत्पन्न झालेलीं नसून हे एक प्रकारचें परमात्म्याने उत्पन्न केलेले व्यूह आहेत. आकाशापासून वायु वायुपासून अग्नि अशी जडद्रव्यांच्या विपरिणामामुळें सृष्टि झाली नसून परमात्म्याने प्रथम आकाशाचा व्यूह अथवा रूप उत्पन्न केलें आणि त्यानंतर त्यानें त्यांतूनच स्वशक्तिनें वायुरूप व्यूह उत्पन्न केला असा अर्थ आहे. परब्रम्ह हें स्वतःच या विश्वाचें अभिन्न निमित्तोपादान कारण आहे जडवादांतील जडद्रव्यापासून जडद्रव्यें उत्पन्न होण्याची प्रक्रिया अद्वैत वेदान्तास मान्य नाहीं. तात्पर्य मुख्य प्रस्थानत्रयी मध्यें कोठेहीं पंचीकरणाचा असला प्रपंच वर्णिलेंला नाहीं. जें आहे तें त्रिवृत्करणाचें प्रतिपादन आहे. छान्दोग्य उपनिषदां–मध्ये (६–२–६) तीन देवतांची तेज, आप आणि अन्न या रूपानें उत्पत्ति सांगितली असून या देवतांची व्याप्ति सर्व पदार्थामधून कशी आहे हें दाखविलें आहे, आणि याचेंच विवरण ब्र. सू. २–४–२० ते ३–१–३ पर्यंत, केलेलें आहे. अर्थात् यांचा अर्थ वरील व्यूह सिद्धान्ताच्या दृष्टिनेंच घेतलेला आहे, अज्ञानकारणता अथवा जडकारणतेच्या दृष्टीनें नव्हे.

पंचाईत आणि धास्ती तेथें या विषयाकडे कांहीं लोकांनीं लक्ष दिलें हेंच आश्चर्य आहे. अर्थात् चागलें लक्ष लागणेंच अशक्य. शिवाय त्याकाळांत जुने ग्रंथ तर अत्यन्त दुर्मिळ होते. छापण्याची कला या देशांत येऊन आज एक शतक होऊन गेलें तरी वीसपंचवीस वर्षांपूर्वी छापलेले ग्रंथ ज्यांच्या हजारो प्रति त्यावेळेस निघाल्या तें सुद्धां आज आपणांस दुर्मिळ झाले आहेत ! मग जेंव्हा छापण्याची कलाच नव्हती तेव्हां ग्रंथ मिळणे अतीच दुर्घट होतें. ३०।४० गांवें हिंडावींत तेव्हां एकादा जुना ग्रंथ मिळावयाचा, तोहि अपूर्ण, कसरीने खाल्लेला आणि अनेक हस्तदोषांनी युक्त असा मिळायचा आणि फिरून तद्विषयक इतर ग्रंथ मिळायचेच नाहीत ! अशा स्थितींत या मंडळीनीं इतके पुष्कळ श्रमाने आस्थेनें आणि सविस्तर लिहून ठेविलें या बद्दलच ते धन्यवादास पात्र आहेत. आजची गोष्ट अगदीच वेगळी पडते. कोणाहि अभ्यासकाच्या घरी दहा, पांच, एका विषयावरील ग्रंथ सहज सांपडतात. त्याना सूचीहि असते आणि

दैव दुर्विलासाची विचित्र गोष्ट ही की आमच्या या अभागी देशावर बौद्ध-सम्प्रदायाचें प्राबल्य सुमारे ६०० वर्षें राहिल्यामुळें त्यांच्या 'अज्ञान कारणता वादाची जबरदस्त छाप आमच्या बुद्धीवर पडली. या अज्ञान काळामध्ये संस्कृत भाषेचा लोप झाला आणि आमच्या तत्त्वज्ञानाचा भरभक्कम पाया म्हणजें प्रस्थानत्रयी, ही समजून घेण्याची योग्यताच नाहींशी झाली ! आज सुद्धा या मौलिक वाङ्मयाचें अध्ययन करण्याचीं प्रवृत्तीच दिसून येत नाही. जो उठतो तो बौद्धमताच्या छायेंत सांपडलेल्या संस्कृत अथवा प्राकृत प्रकरण ग्रंथावरच आपली भिस्त ठेवतो ! मध्यकाळांतील तथाकथित पंडित वर्ग आणि त्यांचे अनुयायी आम्ही, परब्रह्म परमात्म्याचे प्रभावी चैतन्य स्वरूप अगदी विसरून गेलों ! 'एतद्वैतदक्षरं गार्गि ब्राम्हणा अभिवदंति अस्थूलमनणु अह्रस्वदीर्घमलोहितमस्नेहम् इ. इ.' बृहदारण्यका (३–८–८) मधील परब्रह्माचें वर्णन मात्र आम्ही घ्यानांत ठेविलें कारण तें बौद्धाच्या शून्यतत्वा सारखेंच आम्हांस वाटलें. पण त्याच्याच पुढील (बृ. ३–८–९ मधील) वर्णन 'एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि सूर्याचंद्रमसौ त्रिधृतौ तिष्ठता' इ. इ. प्रभावी वर्णन आम्हांस पटेनासें झालें. कारण तें बौद्ध मताच्या विरुद्ध आहे ! श्रीमद्भगवदगीतेमध्येंही परमात्म्याचें गुह्यतम राजविद्याराजगुह्यरूप ऐश्वर्य (पश्यमे योग मैश्वरम्. गी. अ. ९ श्लोक ५) तसेंच विभूतिवर्णन (गी. अ. १० श्लोक १९ ते ५२) गुंह्य अध्यात्म ज्ञान (गी.११–१) सुदुर्दर्श (रूप गी.११–५२) 'यज्ज्ञात्वामृतमश्नुते' असें रूप (गी.१३–१३ ते १७) ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् (गी.१४–१) 'गुह्यतमं शास्त्रम् (गी १५–२०) इ. इ. अनेक ठिकाणी वर्णिलेलें परमात्म्याचें 'ग्रसिष्णु प्रभविष्णु' (गी.१३–१६) स्वरूप आम्ही उकिरड्यावर फेकून दिलें ! आमचें परब्रम्ह उदासीन, निर्बल, निर्धमक, निष्प्रभ अगदी शून्यतुल्य आहे अशा भलत्याच कल्पनेचे आम्ही उपासक बनलों ! याचा परिणाम व्हायचा तो झाला. 'तंयथा यथोपासते तदेव भवति' (मृग्दलउ मं ३) असा सिद्धान्तच आहे. म्हणूनच आम्ही निबंल हीन दीन होऊन शेकडो वर्षे परकीयांच्या दास्यात

वाचक एकाद्या विशिष्ट विषयासंबंधी कोठें काय लिहिलें आहें हें चटकन पाहूं शकतो.

शिवाय तत्वज्ञानाविषयीं इतर देशांमध्ये काय काय कल्पना आहेत, ह्याहि तो थोड्याशा परिश्रमानें जाणूं शकतो. आपणास आश्चर्य वाटेल कीं, १९१३ सालीं एक जर्मन पंडित हिलेब्रांट यानें ऋग्वेदांतील १८ सुन्दर सूक्तांचें सुरस भाषांतर केलें आहे! हे वाचण्याची सहजच आपणास जिज्ञासा होते.आणि अशा रीतीनें आपणांस इतर लोकांचेहि विचार अवगत होऊं शकतात. ह्या आजच्या सवलती पूर्वीच्या काळीं नव्हत्या. मूळ वेदांच्या भाष्याचाच पत्ता नव्हता ! तेंव्हा पूर्वीच्या लोकांचाच दोष आहे असे म्हणता येत नाही. आज जर हे ग्रंथकार असते तर ते सत्याचे पक्षपाती असल्यामुळें त्यांनी आपले ग्रंथ पुनः तपासून लिहिले असते. हा केवळ काळाचा महिमा आहे.

कुजत राहिलों ! उदाहरणार्थ आम्ही जर पुढच्या पिढी पुढे श्री शिवाजी, बाजी, राणा-प्रताप अशा थोर पराक्रमी पुरुषांचा आदर्श ठेवूं तर त्यांच्यापैकी कांहीजण तरी शूरवीर निघतील, आणि याच्या उलट एकाद्या अफू खाणाऱ्या किंवा आळशी मनुष्याचा जर आदर्श ठेवला तर काय होईल हें सांगणें नको.

एवंच परब्रह्माचें प्रभावी चैतन्यस्वरूप विसरल्यामुळें आम्हांस सृष्टि प्रक्रियेची उपपत्ति लावतां येईनाशी झाली. परब्रह्म पहावें तर ते निर्गुण, निराकार, निर्धर्मक, निर्द्रव्य आणि निरवयव त्यापासून सगुण साकार, सधर्मक, सद्रव्य आणि सावयव सृष्टि होणें अत्यंत असंभवनीय अशी आम्ही आमच्या बुद्धीची समजूत करून घेतली आणि एखाद्या जडकारणाच्या शोधांत लागलों ! जगांतील अनेक द्वैतमतवादी लोकांनी प्रपंचाचें निमित्तकारण ईश्वर आणि उत्पादन कारण जड प्रकृति अथवा द्रव्य मानलें आहे. कापिल सांख्यानी ही 'प्रधान' या नांवाची एक जड मूल प्रकृति मानली आहे. आम्ही त्याचेंच अनुकरण करून एक माया नांवाची जड, परब्रह्माहून भिन्न अशी प्रकृति मानली आणि तिच्या पासूनच सृष्टिस्थिति लय होतात असेंहि मानलें ! परंतु लोक आम्हाला द्वैत म्हणतील म्हणून हिला आम्ही 'नसलेली' 'झालीच नाहीं' असे कांहीं तरी अर्थशून्य म्हणतों पण सृष्टीच्या उपपत्तिकरितां मात्र आम्हाला हिचा अवलम्ब करावा लागतो ! आणि आश्चर्य हें कीं यांतील असंबद्धता आणि विवेक शून्यता आमच्या लक्षांत येत नाहीं.

'ब्रह्मकारणता' सिद्धान्ता मध्ये माया मानिलेली आहे हें खरें. पण ती उपरि निर्दिष्ट वैदिक ऋचेंत स्पष्ट सांगितल्याप्रमाणें परमात्म्याचे अचिन्त्य सामर्थ्यरूप मानिलेली आहे. द्वैतवादी सांख्या प्रमाणे पुरुषाहून भिन्न मानलेली नाही. किंवा शश-शृंगा प्रमाणे अभावात्मक अथवा 'जीव कल्पित' किंवा नष्ट होणारी अशीही मानलेली नाही उघडच आहे, परमात्म्याची शक्ति म्हटल्यावर ती अशी कशीं असेल? अर्थात विश्वप्रपंच ही अभावात्मक किंवा स्वप्नाप्रमाणे नव्हे हें ही श्रीशंकराचार्यांनी ब्रह्मसूत्र (२-२-२८ आणि २९) 'नाभावः उपलब्धेः' आणि 'वैधर्म्याच्चनस्वप्नादिवत्' या वरील आपल्या विद्वत्तापूर्ण भाष्यामध्ये सिद्ध केलें आहे.

परंतु चैतन्य कारणतेचा सुन्दर सिद्धान्त समुद्रांत फेकून देऊन ज्या सांख्यांच्या मताचे मार्मिक खण्डण श्री शंकराचार्यांनी आपल्या ब्रह्मसूत्र भाष्या मधून अनेक ठिकाणी आपल्या गम्भीर वाणीनें केलें तेंच मत त्यांच्या पश्चात् केवळ थोडी निराळी नावें देऊन आम्ही आपल्या गळी बांधून घेतलें आहे ! आणि जड पंचमहा-भूता पासून प्रपंचाचा पसारा कसा उत्पन्न होऊं शकेल या सम्बंधाने त्यांच्याच पंची-करणाच्या पायावर आम्ही काल्पनिक डोलारे बांधीत बसलों आहोंत ! हे मनोरे भौतिक विज्ञानाच्या प्रभावी प्रगतिमध्ये कसे टिकणार ?

पुष्कळ शिकलेल्या लोकांची अशी समजूत आहे कीं 'मायावाद' हा श्री-शंकराचार्यांनी आपल्या डोक्यांतून काढला, मूळ उपनिषदांत त्यांस आधार नाहीं. पण या मध्ये बराच समजूतींचा घोटाळा आहे. माया अविद्या हे शद्ध श्रुतीतले आहेत आणि शंकराचार्यांनी त्यांचे वर सांगितल्या प्रमाणें सुन्दर अर्थ प्रतिपादिले आहेत. त्यांचा मायावाद म्हणजे ब्रह्मकारणता सिद्धान्त आहे. भ्रमकारणता सिद्धांत नव्हे, त्याचे 'अध्यास भाष्य' म्हणजे माणूस अनेक जन्मार्जित संस्कार आणि वासनांच्या योगाने कसा चुकतो आणि भलत्या मार्गांस लागू शकतो, याचें मनो विज्ञानाच्या दृष्टीने सुन्दर विवेचन आहे. अज्ञान अविद्या यांच्या योगानें माणूस भवचक्रांत फसतो हें खरें पण जड अज्ञान हेंच जगाची उत्पत्ति स्थिति लय करतें असलें त्यांचें मुळींच मत नव्हे. संसार हा अत्यंत दु:खमय आहे हे सांगण्याची त्या काळांतील पद्धतीच होती कारण त्यामुळे तरी लोकानीं अध्यात्माकडे वळावे हा उद्देश होता. पण अध्यात्मज्ञान सम्पन्न आणि वैराग्य शील क्षत्रिय राजे, हेंच जगाचे कमें उत्तम रीतीने परिपालन करूं शकतात आणि ब्रह्मविद्येचे आणि क्षत्रियांचे रक्षण करू शकतात, असें प्रतिपादन करणारे गीतेचे भाष्यकार केवळ शंकराचार्यच होत. एवढें कशाला, ब्रह्मसूत्रांवर 'वेदान्त कृल्पतरु' या नांवाची सुन्दर व्याख्या लिहिणारे श्री अमलानन्द सरस्वती. ब्र. सू. २-१-२० वरील आपल्या प्रतिपादनांत लिहितात :-

स्वशक्त्या। नटवत ब्रह्म कारणं शंकरोऽब्रवीत्
जीवभ्रांति निमित्तं तत बभाषे भामती पति: ।।

या वरून भ्रांतिवाद कोणाचा आणि चैतन्य कारणता सिद्धान्त कोणाचा हें स्पष्ट दिसून येईल. भ्रांन्तिवादी 'भामती' चें व्याख्यान करणारें वाचस्पति मिश्र आहेत, शंकराचार्च नाहींत. त्यांचे यथार्थ हृद्गत कळण्यास त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचें सखोल वाचन करणें आवश्यक आहे.

शेवटी श्रीसमर्थ रामदास स्वामी यांच्या खालील ओव्यानी हा लेख संपवितो:-

दशक ८ समास ३ ओवी २०

मूलमाया तोचि मूळपुरुष । तोचि सर्वांचा ईहा
अनंत नामी जगदीश । तयासीच बोलिजे ।। २० ।।

अर्थात मूळमाया' ही नष्ट होणारी अथवा भ्रांतिरूप वस्तु नव्हे.

(दशक १० समास ८ ओव्या १६ ते २५)

तैसे प्रचितीवीणज्ञान । तेथे नाहीं समाधान
करून बहुतांचा अनुमान । अनहित केले ।। १६ ।।

परमेश्वरास वोळखिले । आपण कोणसे कळले
आत्मनिवेदन जाले । म्हणजे बरे ॥ २२ ॥

ब्रह्माण्ड कोणे केले । कासयाचे उभारले
मुख्यकर्त्यांस वोळखिले । म्हणजे बरे ॥ २३ ॥

येथे अनुमान राहिला । तरी परमार्थ केला तो वायां गेला
प्राणी संशयी बुडाला । प्रचिंतीवीण ॥ २४ ॥

हेंच परमार्थाचें वर्म । लटिकें बोलेतो अधम
लटिके मानी नो अधमोद्धम । येथार्थ जाणावा ॥ २५ ॥

यानंतर पुढे ९ व्या समासामध्ये मूळ माया म्हणजे 'पुरुष प्रकृति' अथवा 'शिवशक्ति' रूप जगज्ज्योति परब्रह्मच असें स्पष्ट सांगितले आहे.

तैसी बीजरूप मूळमाया । विस्तार जाला तेथुनियां
तिचें स्वरूप शोधुनियां । बरें पाहावें ॥ ३ ॥

तेथें दोनी भेद दिसती । विवेकें पाहावी प्रचिती
निश्चळीं जें चंचळ स्थिती । तोचि वायो ॥ ४ ॥

तयामधें जाणीवकळा । जगज्जोतीचा जिव्हाळा ।
वायो जाणीव मिळोन मेळा । मूळमाया बोलिजे ॥ ५ ॥

सरिता म्हणता बायकों भासे । तेथे पाहातां पाणीच असें
विवेकी हो समजा तैसें । मूळ मायेसी ॥ ६ ॥

वायो जाणीव जगज्जोती । तयास मूळमाया म्हणती ।
पुरुष आणि प्रकृती । याचें च नांव ॥ ७ ॥

वायोस म्हणती प्रकृति । आणि पुरुष म्हणती जगज्जोती ।
पुरुष प्रकृती शिवशक्ती । यांचेंच नांव ॥ ८ ॥

वायो मध्ये विशेष जाणीव । तो चि प्रकृती मधे पुरुष ।
ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ॥ ९ ॥

सारांश श्रीरामदासाचें स्पष्ट मता प्रमाणे जसे 'सरिता' म्हणजे बायको नव्हे, तद्वत मूळमाया ही एकादी भ्रांतबाई अथवा नष्ट होणारी वस्तु नव्हे तर ही 'जगज्जोती' अर्थात परमात्म्याचें अद्भुत सामर्थ्य आहे. नष्ट होणारी ती मूळमाया आहे. जी अब्रह्मरूप होय.

यावरून श्री दासोपंत आणि श्री रामदास यांचे तत्त्वज्ञानांत कसें प्रचण्ड अंतर आहे तें दिसून येईल. पहिले 'भ्रांतिकारण' वादी म्हणजे परब्रह्मच अज्ञानी होते, रजतमांनीं विकृत होते असें मानतात आणि मूळ मायेला प्ररब्रह्मास सुद्धा विकृत करणारी असे मानतात. तर दुसरे ब्रह्मकारणंता आणि मूळमाया म्हणजे परब्रह्मच असे यथार्थ मानतात. त्यांनीं आपल्या 'दासबोधा'मध्यें पंचीकरणासंबंधी पुष्कळसे विवरण दिलें आहे. :–: पण ते वर्णन त्रोटक आहे. 'पासोडीं'त दिल्याप्रमाणें प्रचंड विस्तारात्मक नाहीं. आतां ही गोष्ट खरी की समर्थांच्या लिखाणांतूनही अनेक ठिकाणीं तत्त्वज्ञानासंबंधीं दिशाभूल करणारी वाक्यें आणि मतें दिसून येतात. याचें कारण त्यांच्या काळांतील शास्त्री ग्रंथ संपत्तीचा अभाव हेंच होय. तथापि ते तेजस्वीं आणि प्रभावी बुद्धीचे असल्यामुळें त्यांनीं शेवटी यथार्थ तेंच लिहून ठेविलें आहे आणि अनेक भ्रांत समजुतींचा खरपूस समाचारही घेतलेला आहे.

श्री दासोपंतांची गोष्ट थोडी वेगळी पडते. त्यांना संस्कृतपेक्षां मराठी भाषेचा आणि वाङमयाचा विशेष अभिमान होता. त्यांना मूळ संस्कृत शास्त्रीय ग्रंथ कितीसे पाहण्यास मिळाले होते हे समजण्यास मार्ग नाहीं. पण एवढें खरें त्यांचा स्वभाव निस्पृह आणि करारी होता. आणि आपल्या स्वतःच्याच मताला चिकटून राहण्याची त्यांचीं विशेष प्रवृत्ति होती असें दिसते 'न पाहे श्रोतयांचे वदन। न करी भाष्याधारें विवरण' असे ते स्वतःच लिहितात. अर्थात् त्यांनीं शांकरभाष्याची परवा ठेविली नसल्यास आश्चर्य नाहीं. आणि त्यांच्या 'भ्रांति कारणता वादाचे हें हीं कारण असेल.

श्रीमच्छंकराचार्यानी वेदान्त समजून देण्याकरितां म्हणून 'रज्जुसर्पा' चा दृष्टान्त दिला. पण त्यांच्या अनुयायी मंडळीनीं, त्यांचा द्रांष्टांत करून टाकून, त्यास 'जळी काष्टीपाषाणी' इतका घुसळला आणि 'दे माय धरणी ठाय' करायला लावलें कीं त्यानें अद्वैत वेदान्त शास्त्राचा जणु 'सूड' उगविल्या सारखा दिसत आहे! तो प्रत्यक्षच विषारी सर्प झाला आणि त्यानें या मध्यकालीन पंडित मंडळीच्या अंतःकरणाचा कडकडून चावा घेतल्यासारखा दिसत आहे. ह्या चाव्याचे विष काढून टाकण्यास ज्ञानाग्निच पाहिजे.

:–: दासबोध, ८–१ ते ५; ९–६ ते ८; १०–१, ३, ४; ११–१ ते ४; १२–६; १३–३; १७–८ व ९

विषयानुक्रमणिका

ही 'पासोडी' म्हणजे श्री.दासोपंताच्या अचाट बुद्धीची एक अतुलनीय कसरत आहे. पंचीकरणावर एवढा प्रचंड विस्तार आतापर्यंत कोणत्याहि संस्कृत अथवा प्राकृत ग्रंथकारानें केलेला नाहीं. कविवर्यांनी दीर्घ परिश्रम करून विषयाची सांगोपांग विभागणी आणि विवरणाची रेलचेल करून सोडली आहे. विषय ठसवून देण्याकरिता पुन:पुन: आलटून पालटून ही मांडणी केली आहे.ग्रंथांतील विवरण विशद करण्यासाठीं संपूर्ण विषयांवर कोष्टके नकाशे आणि पत्रकें जर दिलीं असती तर फार बहार झाली असती. ग्रंथकारांनीं शेवटीं शेवटीं कोष्टकें व पत्रकें चित्रें दिलीं आहेत. पण ती पहिल्या भागांत नाहींत. पण त्याकाळांत असली पद्धतिच नव्हती. तरी श्री. दासोपंतास या संबंधानें चांगली जाणीव होती असें दिसते. ते आपल्या २८३ व्या ओवी मध्यें लिहितात :–

येणे प्रोक्त प्रकारे करूनी
तत्त्वाची केली मांडणी ।
ते कपाटाकृती नयनी
व्यक्ति दिसे ॥

ग्रंथ समजून घेण्याच्या दृष्टीनें आवश्यक असलेली विषयानुक्रमणिका पुढें देण्यांत येत आहे. अभ्यासकांस तिचा बराच उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

ओवी क्रमांक	विषय	पृष्ठ
१ ते २२	मंगलाचरण आणि शुद्ध ब्रह्म वर्णन – –	१
२३ ते ५६	शुद्ध ब्रह्मांतर्गत अनादि अनिर्वचनीय विवर्त रूपमायेचें स्फुरण आणि त्यामुळें त्यास 'शवलते' ची प्राप्ति–– म्हणजेच ईश्वराची उप्तत्ति – –	३
५७ ते ७४	ईश्वराचें शुद्धसत्वें करून स्वरूपानुसंधान, त्यांत 'तमा'चें स्फुरण म्हणजेच त्याचे ठायीं 'अनवधान' आणि 'अज्ञान'	६
७५ ते ८१	ईश्वराच्या अज्ञानापासून 'महत्तत्त्वा'ची उत्पत्ति –	८
८२ ते ९७	तदनंतर 'त्रिपुटी' द्वारा प्रपंचाची उप्तत्ति –	९
	त्रिगुणाहंकाराचा विस्तार – –	११
९८ ते १४१	त्रिगुण अहंकार, सात्विक अहंकारापासून अंत:करणपंचक आणि तद्व्यापार – – –	१२
१४२ ते १४८	'करण' निरूपण (पंचदशतत्त्व) – –	१५
१४९ ते १७३	प्राणपंचक निरूपण – – –	१५
१७४ ते १७५	ज्ञानकरण निरूपण – – –	१७
१७६ ते १९७	ज्ञानेंद्रिय पंचक – – –	१८
१९८ ते २०२	कर्म करण – – –	१९
२०३ तें २२४	कर्मेंद्रिय पंचक – – –	२०
२२५ ते २४५	कार्य अथवा विषय पंचक – –	२२
२४६ ते २४९	अव्यक्त शुद्ध सत्वापासून 'महत्तत्त्व' त्रिगुण अहंकार आणि पंचमहाभूतांची क्रमानें उत्पत्ति –	२३
२५० ते २६४	'पंचीकरणा' ची प्रक्रिया आणि स्थूल सूक्ष्म देह निरूपण	२४
२६५ ते २८२	सृष्टीची उत्पत्ति ; पंचीकरणा विषयीं आशंका –	२५
२८३ ते २९५	पंचीकरणाचें स्पष्टीकरण – –	२६
२९६ ते ३३०	पंचीकृत पदार्थांचे त्रिगुणात्मक वर्गीकरण –	२७
३३१ ते ३३४	पंचविधकर्ता, प्राण, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, आणि त्यांचे विषय	३०
३३५ ते ३६१	पंचमहाभूतें आणि विषय यांचा संबंध –	३०
३६२ ते ३८४	पंचमहाभूतांच्या गुणांची व्याप्ति, त्यांचें कार्य अथवा विषय, व्यवहार आणि त्यांची 'वर्ण कर्म धर्म' द्वारा विलक्षणता – – – –	३२
	सृष्टि विकासा विषयी कोष्टक – –	३३
३८५ ते ३९२	सूक्ष्म तत्त्वांचा द्विविध भाव, 'हिरण्यगर्भा'चे देवतामय शरीर आणि जीवाचा 'लिंग' देह – –	३४

ओवी क्रमांक	विषय	पृष्ठ
३९३ ते ४११	देवतांची व्याप्ति – – –	३६
४१२ ते ४१७	शब्दादि विषय आणि गुण विवरण – –	३८
४१८ ते ४२४	लिंग शरीर भेद–अंत:करणपंचक भेद –	३८
४२५ ते ४३०	प्राणपंचकाचे धर्म – – –	३९
४३१ ते ४३६	ज्ञानेंद्रियांचे अध्यात्मादि भेद – –	४०
४३७ ते ४४२	कर्मेंद्रियांचे अध्यात्मादि भेद – –	४०
४४३ ते ४४८	विषयांचे गुण आणि त्यांचे स्थूल व वासनारूप भेद	४१
४४९ ते ४६३	ईश्वराचें पांचभौतिक विराट शरीर – –	४२
४६४ ते ४७४	जीवाचें स्थूल शरीर – – –	४३
४७५ ते ४७७	शुद्ध ब्रह्मापासून सृष्टीची निर्मिति आणि अभेद सिद्धांताचा भावार्थ – – – –	४३
	अहंकार विकासा संबंधीं कोष्टक – –	४४
४७८ ते ५४३	सृष्टि प्रक्रिया आणि भेद भान या सम्बंधीं अधिक विवरण	४५
५४४ ते ५८६	पूर्ण ईश्वरा पासून जीवाची उत्पत्ति – –	४९
५८७ ते ६०९	'अग्निस्फुलिंग' 'अंशीं अंश भाव' आणि इतर दृष्टांत	५२
	ईश्वराच्या देहगुणादि वर्णनाचें कोष्टक –	५४
६१० ते ६२२	ईश्वरांचे देह चतुष्टय – – –	५५
६२३ ते ६३०	ईश्वराच्या अवस्था चतुष्टय – –	५५
६३१ ते ६३९	ईश्वरीं अभिमानी चतुष्टय – –	५६
६४० ते ६४५	ईश्वरी गुण चतुष्टय – – –	५७
६४६ ते ६५७	ईश्वरीं सार्ध मात्रात्रयात्मक बीज – –	५७
६५८ ते ७०५	ईश्वराच्या हिरण्यगर्भ रूप शरीरांतील त्रिपुटी स्फुरणाचें देवतामयत्व आणि विराट शरीराचें वर्णन –	५८
७०६ ते ७२९	ईश्वराचा सृष्टिव्यापार – – –	६२
७३० ते ७३७	जीवात्म्याची उत्पत्ति आणि लक्षण – –	६४
७३८ ते ७५३	जीवाचे देहचतुष्टय – – –	६५
७५४ ते ७७१	हिरण्यगर्भाचे अंशविभाग म्हणजेच जीव –	६६
७७२ ते ७८४	जीवाचें स्थूल शरीर – – –	६९
७८५ ते ७८८	जीवाचे चार देह – – –	६९
७८९ ते ८०६	जीवाच्या अवस्था चतुष्टय – –	७०
८०७ ते ८२४	जीवाचे ठायीं अभिमानी चतुष्टय – –	७१
८२५ ते ८२९	जीवास स्थान चतुष्टय – – –	७३

ओवी क्रमांक	विषय	पृष्ट
८३० ते ८३७	जीवास भोग चतुष्टय — —	७३
८३८ ते ८५२	जीवाचे ठाई गुण चतुष्टय — —	७४
८५३ ते ८७२	जीवाचे ठाई सार्धमात्रात्रयवाचक प्रणव —	७५
	मायाशबल परमात्मा आणि अविद्याशबल जीवात्मा यांचे संबंधीं दोन कोष्टकें — —	७८
	कार्य कारण विकासाचे संग्रह रूप भावचक्र —	७९
८७३ ते ८९४	सृष्टि प्रक्रियेचें संग्रहरूप निरूपण — —	८०
८९५ ते ९१०	हिरण्यगर्भ आणि जीवात्मा यांच्या सूक्ष्म स्थूल शरीरांची निर्मिति — — —	८२
	एतद्विषयक कोष्टक — — —	८४
	शुद्ध ब्रह्मापासून सृष्टीच्या उत्पत्ति संबंधी कोष्टकें	८५
९११ ते ९८७	पंचीकरणात्मक विस्तारा संबंधीं कांहीं मतभेद आणि त्यांचें निराकरण — — —	८७
९८८ ते १०३४	संसार वृक्ष निरूपण — — —	९२
१०३५ ते १०५३	एतद्विषयक प्रथम शोध — —	९५
१०५४ ते १०७४	द्वितीय शोध — — —	९७
१०७५ ते १०९०	वृक्षसाहित्य-तृतीय शोध — —	९८
१०९१ ते ११२६	अंडाकार विवरण — — —	१००
	भुजंग भाव यंत्र— — — —	१०२
११२७ ते ११७७	सर्पाकार विवरण — — —	
११७८ ते १४८७	तत्त्वविवरणा संबंधी मतभेदांचे निरूपण —	१०७

अश्वत्थवृक्ष

पासोडीच्या १० व्या भागांत अश्वत्थवृक्षाची आकृति काढलेली आहे. श्रीमद्भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायांतील १ ल्या तीन श्लोकांत या वृक्षाची मूळ कल्पना असल्यानें आणि गीतेवर दासोपंतांच्या दोन टीका आज उपलब्ध असल्यानें त्यांचाहि थोडक्यांत परामर्ष घेणें अस्थानीं होणार नाहीं. गीतार्णवाच्या १५ व्या अध्यायांत या तीन श्लोकांच्या विवेचनासाठीं एकूण १२०४ ओंव्यांचा विस्तार दासोपंतांनीं केलेला आहे. अध्यायप्रारंभाला पूर्वाध्यायसंगति आणि उपक्रमासाठीं ३० ओंव्या लिहून पुढें या वृक्षाची सविस्तर माहिती देण्यांत आलेली आहे. 'त्रिपादूर्ध्व-उदैत पुरुषः' या वेदवचनाधारें विवेचन करीत असतांनाच 'यैसी ही वृक्षकल्पना। वेदेंचि केली अर्जुना। ह्मणौनी ऊर्ध्वमूळु हा जुना। मायावी वृक्षु॥ (गी.१५-२२०) विवेचनाच्या ओघांत याचें नांव अश्वत्थच कां ठेविलें याचीं अनेक उत्तरें देत. शेवटीं 'सर्वत्रु सर्वदा सर्वथा। अनित्यु पादपु पार्था। यालागि अश्वत्थु म्हणतां। योग्यता दिसे॥ (गी. १५-२५८) तीन गुण, कर्मप्रवृत्ति, ऊर्ध्व अध कर्मगति या सर्वांचें या वृक्षशाखांतून वर्णन केल्यानंतर,' दासोपंतांनीं गीतेंत नसलेला असा, पारहि या वृक्षाभोंवतीं आपल्या कल्पनेनें बांधलेला आहे. पार बांधल्यानें झाडाच्या वाढीला आणि मुळांना वळण लागतें. तो अमर्याद असा फोंफावत नाहीं. या कल्पनेनें त्यांनीं पारहि बांधला आहे. तो असा :- 'पारू जैसा वृक्ष मूळातें। विहित तेवि नरवासनेतें। सांडूनि कर्ममर्यादेतें फुटोचि नये॥७९१॥ वेदु अतिशयें कुशळ। तेणें बांधिला हा पिंपळ। नित्य नैमित्यिकें समूळ। केला गाडोरा॥९२॥ शास्त्रें राबती बहुतें। पुराणें आपलालेनी मतें। अश्वत्थु प्रियु स्वामीते। त्याचिया आज्ञा॥९३॥ चहुवर्णांचीं मूळें। गवसिलीं तेणें योगबळें। च्याऱ्ही आश्रम वेगळे। तेचि पाउटणी॥९४॥ वेदाचारू शास्त्राचारू। पुराणाचारू श्रेष्ठाचारू। या चहूंहि कोनी पारू। शोभतु असे॥९५॥ तेथ ज्ञानयुक्तु वेदाचारू। वेदयुक्तु शास्त्राचारू। शास्त्रयुक्तु पुराणाचारू। येसे असता॥९६॥ वेदशास्त्र आणि पुराण। यया अविरुद्ध आर्यवचन। तेही कर्माकर्मीं प्रमाण। असतचि असे॥९७॥ अविहित मार्गें खचैल। ह्मणौनि धर्मशास्त्राचें बळ। सज्जन संगाची केवळ। पडली भरी॥९८॥ पारू सांडूनि मूळ धांवे। तें यमें खांडूनि सांडावें। गुरु सर्वज्ञें वळावें। हें जैं न घडे॥९९॥ साधूंचि घनवट सभा। प्रायश्चित्तांची अतिप्रभा। अकर्म नाविक कर्मशोभा। कर्माची यैसी॥८००॥ ऐसा विहितें कर्मपारू। नरलोकीं बांधिला दृढतरु। मूळिका अमार्गें पसरू। न येती तेणें॥८०१॥ (गीतार्णव अ. १५)

गीतार्थचंद्रिका या आपल्या दुसऱ्या गीताटीकेंत दासोपंतांनीं एकूण २१७ ओंव्यांत या अश्वत्थवृक्षवर्णनाचा प्रपंच केलेला आहे. तेथेंहि वेदवचनांचे आधार आणि युक्तिवाद गीतार्णवाप्रमाणेंच, पण संक्षेपांत देण्यांत आलेले आहेत. ज्ञानेश्वरांनीं हाच विषय आपल्या ज्ञानेश्वरींत २७४ ओंव्यांत दिलेला आहे. मात्र वर्णाश्रमधर्मांच्या रक्षणार्थ त्यांनीं पार वगैरे बांधण्याचा प्रकार केलेला नाहीं. **-संपादक.**



अश्वत्थवृक्ष

(मुळाच्या डावीकडे)

पूर्ण सन्मात्र सनातन ।। अखंड अद्वय निर्गुण ।। निराकार निरंजन ।। निर्विकार ।। १ ।। सजातीय विजातीय स्वगत भेद गलित तत्वें शाश्वत पूर्ण अखंड सदोदीत निरंतर सदा ।। कार्या कारणाचें भान ।। जेथ न वर्त्ते सगुण ।। तें परब्रह्म निर्गुण ।। सद्रूप जें ।।२।।

(मुळाच्या उजवीकडे)

रूप गुणें व्योमा ऐसें ।। परि अभावाचेनि ग्रासें ।। निरंतर उदका ऐसें ।। एकदाट जें ।। ३ ।। एवं सत्य येक सनातन ।। तें सर्वाचें अधिष्ठान ।। अ (सत्या) चें स (त्य भा) न ।। स्फुरे जेणें ।। ४।। मृगजळ निजाकारें ।। सत्यें किरणें सत्य स्फुरे ।। नातरि नाम रूपें गुणें नुरे ।। सर्वथैव ।। ५ ।। तैसा मायावी गुणविस्तारू ।। विवर्त्त-रूप हा तरूवरू ।। ययाचा सत्य आकारू ।। सत्यें ब्रह्में ।। ६ ।। तें परब्रह्म अधिष्ठान ।। भूमिका ऐसें हें वचन ।। मानूत श्रोते सर्वज्ञ ।। पादपाचें ।। ७ ।।

(मुळांत)

नित्य अखंड ब्रह्म निर्गुण ।। तें ज्ञप्तिमात्र जें संस्फुरण ।। तेचि सगुण साम्य ह्मणौन ।। बोलती सांख्य ।। ८ ।। योगी बोलती तत्वता ।। तयातें उन्मनी अवस्था ।। वेदाचेनि मतें ।।९।।

प्रज्ञानं ब्रह्म ।।
विज्ञानं ब्रह्म ।।
सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ।।

ब्रह्मचि बोलिजे केवळ ।। ऐसें प्राकृत गुणसाम्य वृक्षमूळ ।। चैतन्य मात्र जें ।। १० ।।

२

तेचि केवळ चिन्मयता ।। प्रकृति बोलिजे तत्वता ।। गुण-साम्यावस्थे वर्त्तितां ।। स्फुरे ब्रह्माकार ।।११।। तीणेसी मिळित जालें ।। ब्रह्म आत्मत्वें स्फुरलें ।। तेंचि अवस्था प्रवर्त्तलें ।। आपण भोगूं[1] ।। १२ ।। निर्विकल्प आनंदमयता ।। आपण आपली संपूर्णता ।। परब्रह्म जाणतां ।। बोलिजे पुरुषु ।। १३ ।। ऐसा सच्चिदानंदमयु ।। निर्गुणु पुरुषु ज्ञेयु । परमात्मा आनंदमयु सदसदात्मकु (जो)।।१४।। तो सदसद्ग्रंथि योगु ।। यये वृक्षीं बीज भागु ।। जेणें स्फुरलेन सांगु ।। तरूवरू स्फुरे ।। १५ ।। ब्रह्मी चिन्मयता मूळ ।। तद्गत ह्मणौनि केवळ ।। तें पुरुषें अधिष्ठितां केवळ ।। शबल होये ।।१६।।

(बुंध्यांत)

सांडूनि उन्मनी अवस्था ।। पुरुषें अधिष्ठिजे ज्ञानमयता ।। तेचि शबल जाणीव स्फुरतां ।। बोलिजे महामाया ।।१७।।

२

आश्रयितां शबल ज्ञान ।। आनंदमयता होये क्षीण ।। स्फुरें आपुलें अनुसंधान ।। ते सर्वज्ञावस्छा ।।१८।।

३

महामाया सर्वज्ञत्व ।। ययातें प्रकाशी[2] आत्मत्व ।। तेचि आनंदमया ईश्वरत्व ।। सिद्धि होये ।।१९।।

४

महामाया साक्षित्व सर्वेश्वरु ।। हा शुद्ध सत्वगुणाचा विकारू ।। मायेचिया बडिवारू ।। तयाचा ऐसा ।।२०।।

५

मायेचा शुद्धसत्वगुणु ।। तो प्रणवाचा चतुर्थ चरणु ।। अर्द्ध-मात्रा हा अनुमानु ।। करणेंचि नलगे ।।२१।।

---

१ भागू २. आकाशी.

६

अर्द्धमातृका जे प्रणवाची ।। नादमयी जे साची ।। अकारु उकारू मकारू तेचि ।। जाली मात्रा तयाकारें ।।२२।। तेवींचि शुद्ध सत्व कथिलें ।। तेंचि गुणत्रय स्वयें जालें ।। रज सत्व तम विभागलें ।। येणें आकारें ।।२३।। ह्मणौनि शुद्धसत्व मायेचें ।। वाच्य जें अर्द्ध मातृकेचें ।। तेंचि रूप वृक्षस्तंभाचें ।। निर्धारितां ।।२४।। शुद्ध सत्व स्तंभस्थानी ।। मात्रागुणत्रय शाखा येथूनि ।। स्फुरलें कैसें तेथूनि ।। सांगिजैल ।।२५।। छ ।। छ ।।

(१ ली डावीकडील शाखा)

प्रथम ध्वनी पासून ।। अकार मात्रेचें निर्माण ।। प्रथम पादु प्रणवालागून ।। बोलिला तो ।।२६।।

२

प्रथम पादु अकारू ।। तो रजोगुण साचारू ।। ह्मणौनि अकारें निर्द्धारू ।। तयाचाचि कीजे ।।२७।।

३

मायेचा ऐसा रजोगुणु ।। तोचि व्यक्तु चतुराननु ।। ह्मणौनि तेणें गुणें कमलासनु ।। तोचि असे ।।२८।।

४

तया ब्रह्मयापासून ।। विराट देह जालें निर्माण ।। तें शरीर भोग स्थान ।। अतेव येणेंसीं तो ।।२९।।

५

विराटीं ब्रह्मा कर्त्ता ।। उत्पत्ती तयाची अवस्था ।। ह्मणौनि ययां समस्तां ।। रजोगुणु बोलिजे ।।३०।।

(मधली शाखा)

अकारा पाठीं उपजला ।। नादें उकारू जन्मला ।। प्रणउ द्वितीय पादु बोलिला ।। तैं दुसरी शाखा ।।३१।।

२

द्वितीय पादु उकारू ।। तो सत्वगुणु जाणावा पवित्रु ।। ह्मणौनि उकारें निर्द्धारू ।। करावा तयाचाचि ।।३२।।

३

मायेचा जो सत्वगुणु ।। तोचि व्यक्ती आला श्रीविष्णु ।। आतां सत्वें तेणें श्रीरमणु ।। तोचि जाणावा ।।३३।।

४

हिरण्यगर्भ देवतामय ।। स्थितिवंत विष्णुकार्यं ।। यालागिं तेणेंसी अद्वय ।। जाणावें तें ।।३४।।

५

हिरण्यगर्भु शरीरिं ।। विष्णु स्थितीतें करी ।। अभिमानी व्यापारीं ।। हें सर्व द्वितीय शाखा ।।३५।।

(३ री – उजवी कडील – शाखा)

उकारा पाठीं मकारू ।। नाद उपजला सविकारू ।। तृतीय पादु परिकरू ।। प्रणवाचा तो ।।३६।।

२

मकारें तमोगुणी जाणावा ।। तिसरा पादु मानावा ।। शाखा स्थानी भावावा ।। तेणेंचि प्रकारें ।।३६।।

३

मायेचा तो तमोगुणु ।। तोचि व्यक्तु त्रिनयनू ।। यालागिं तमोगुणु अनुमानु ।। याचाचि करावा ।। ३८।।

४

तमोगुणु रुद्र निर्धारें ।। तरी मायादेह तेथ खरें ।। आतां तेणेंसीं सहाकारें ।। जाणावा तो ।। ३९ ।।

५

प्रळया ऐसी अवस्था ।। मायादेही रुद्रु कर्त्ता ।। यालागिं यथा समस्तां ।। जाणावें तमोरूप ।।४०।।

(गुणत्रयांत सृष्टिव्यवहार)

विराट उत्पत्ति दोन्ही ।। ब्रह्मा येथिचा अभिमानी ।। हा मायेचा रजोगुणी ।। व्यापारू जाणावा ।। ४१ ।। हिरण्यगर्भ स्थित्यवस्छा ।। विष्णु येथिचा कर्त्ता ।। सत्वगुणाची प्रकटता ।। ते हे ऐसी ।। ४२ ।। माया प्रळयो अभिमानी ।। रुद्रु कर्त्ता तमोगुणी ।। या परी गुणत्रयाची करणी ।। वेगळाली हे ।। ४३ ।। आतां शृष्टिकाळीं वर्त्ततां ।। तें गुणत्रय कैसें तत्वतां ।। हें सांगिजैल सर्वथा ।। विवंचून ।। ४४ ।। जेणें गुणें जे अवस्था वर्त्तमान ।। अपर गुण तीचि अधिन ।। ऐसें असतां लक्षण ।। प्रस्तूत कैसें ।। ४५ ।। शृष्टिकाळीं साचें ।। क्रिया कार्य ब्रह्मयाचें ।। येथ कर्त्तव्य विष्णुचें ।। सर्वांचें पालन ।। ।। ४६ ।। संव्हारकार्य शिवाचें ।। यापरि गुणा तिंहीचें ।। एकत्व असे प्रळयाचें ।। जंव मान पावे ।। ४७ ।।

(कार्योपाधिविवरण)

कारणोपाधीचा गुणविभागु ।। सांगीतला मायावी सर्गु ।। आतां कार्योपाधीचा प्रसंगु ।। बोलिजतु असे ।। ४८ ।। परमात्मा रजोगुणें ।। उत्पत्तीचेनि अभिमाने ।। अपार जीव शृष्टि कारणें ।। कल्पिता जाला ।। ४९ ।। तिये कल्पनेचि सरिसा ।। स्वयं प्रतिबिंबला आपैसा ।। द्रष्टा पुरुष तो जैसा ।। प्रतिबिंबे दर्पणी ।। ५० ।। कीं स्वप्नद्रष्टा भानाकारें ।। स्वयेंचि आकारला स्फुरे ।। तैसा जीवरूपाचेनी आकारें ।। ईश्वरूचि स्फुरला ।। ५१ ।। सत्य संकल्पी परमात्मा ।। म तेणें समान सत्य जीवात्मा ।। सत्या ईश्वर स्वरूपाची महिमा ।। तोचि जाणें ।। ५२ ।। साचार[1]पण जीवाचें ।। हेंचि सत्यत्व येथिचें ।। जें येक सुख ब्रह्मीचें ।। दोघे भोगिति ।। ५३ ।। ऐसे जीव उपजले ।। ते ईश्वरगुणेंचि प्रतिबिंबले ।। देह अवस्था अभिमानी जाले ।। हे तेचि हे ।। ५४ ।। वृक्षाची मांडिता मांडणी ।। गुण कल्पिलें शाखा-

---

१. साचार तया

स्थानी ।। तरि ते जीव वेगळेचि ह्मणौनि ।। कैसे कल्पावे ।।५५।। तरि ययाचि वृक्षाचिया ।। जीव प्रतिशाखा तिया ।। आतां उपराटिया सुफराटिया ।। येथ कवण कारण ।।५६।। तरि देहे अवस्छा अभिमानी ।। हा मूळस्तंभू करूनि ।। करणें (शाखा)तये स्थानी ।। ऐसें असता ।।५७।। मुक्त मुमुक्षु साधक ।। उत्तमाधिकारी लोक ।। तयांचे + + + + + ।। + + + असतां ।।५८।। + + + + + शाखा सकळा ।। कल्पिलिया अधोमूळा ।। आतां बद्धां संसारिका स (मूळां) ।। कैसें क(ल्पि)ला ।।५९।। संसारोन्मुख जे वर्त्तती ।। ते ऊर्ध्वमूळ अधोगती ।। शाखारूपें वर्त्तती ।। पामर जीव ।।६०।। + + + + + + + + + ।। + + + + + + + + ।। वृक्ष साहित्यें यथाविध ।। + + + + + ।।६१।।

(उजवी ब डावीकडील पहिली शाखा)

जीवन्मुक्त केवल ब्रह्मभूतु परि त्यासही संसारी वसती सुख दुःखभोगप्राप्ति ययासि कारण स्थूलदेहसंगु स्थूळदेह संगासि कारण प्रारब्ध ह्मणौन मुक्तासिही संसारी अन्वयो सुखदुःखादि भोगुसंगु असावयासि मूळ प्राचीन कर्म ह्मणौन जीव प्रतिशाखा ऊर्ध्वमूल तया हें अधोमूल ।।



महाकारण तुरीया प्रत्यगात्मा हें शुद्धसत्वमायावी शुद्धसत्वाचें प्रतिबिंब ।।

कारण सुषुप्ति प्राज्ञु हा अविद्या मायावी तमोगुणु तमोगुणाचें प्रतिबिंब ।।

लिंग स्वभाव तैजसु हें अविद्यक सत्व मायाकारत्वाचे प्रतिबिंब ।।

स्थूल जागृति विश्वु हा अविद्यक रजोगुणु मायावी रजोगुणाचें प्रतिबिंब ।।

ऐसे देहावस्था अभिमानी समूह हे गुणचतुष्टय कार्योपाधिरूपा उत्तमाधिकारिया जीवरूप स्तंभु अधिष्ठाननिष्ठत्वें ऊर्ध्वमुखु हा पादपु ।। आता बाह्यक्रियाज्ञान साधन वृत्ति ।। कर्त्ता कार्य करणाध्यासें प्रसृता त्या शाखा आतां कर्त्ता करणाकारें कार्य पर्यंतु पावे ।। तया शाखारूपा वृत्ति प्रसाराची स्पष्टता ।।

अंतःकरण कर्त्ता व्यानु चेष्टाकरण वाचा कर्मकरण श्रोत्र ज्ञानकरण अंतःकरण व्यानाधारें श्रोत्र द्वारा वक्तव्य करी योगा विरुद्ध ते शद्ध ।। प्रवाल ।।१।।

मन कर्त्ता समान चेष्टाकरण त्वक् ज्ञानकरण पाणि कर्मकरण मन समानाधारें त्वगेंद्रिय मार्गें स्पर्शु जाणे कर योगें त्यागादाने साधी स्पर्शु ।। योगाविरूद्ध स्पर्श वृक्ष प्रवाल ।।२।।

बुद्धि कर्त्ता उदानु चेष्टाकरण चक्षुज्ञानकरण पादुकर्मकरण बुद्धि उदानाधारें चक्षुमार्गें रूप जाणें पाद योगे गमनागमन करी योगाविरुध्द दृश्यरूप ।। प्रवाल ।।३।।

चित्तकर्त्ता प्राणु चेष्टाकरण रसना ज्ञानकरण (शिश्न) कर्मकरण चित्तप्राणाधारें रसनेद्वारें रसु जाणे शिश्न मार्गे आनंदैतव्य करी योगाविरुध्द रस ।। ते प्रवाल ।।४।।

अहंकारू कर्त्ता अपानु चेष्टाकरण घ्राण ज्ञानकरण पायु कर्म-

करण अहंकारू अपानाश्रयें चेष्टे घ्राणद्वारें गंधु जाणे पायुद्वारें मलोत्सर्गं करी योगाविरुध्द सेव्य गंध ते वृक्ष प्रवाल ॥५॥

(उजवी व डावी कडील दुसरी शाखा)

मुमुक्षु ज्ञानयोगीं प्रवर्त्ते साधनी तें त्यासि प्राचीन आधारू मूल संसारी देह भोगासही या लागीं तें मूल ॥



शुद्धसत्वगुणु तमोगुणु तमपूर्वक सत्वगुणु रजोगुणु हे गुणचतुष्टय देहावस्था चतुष्टयाकारें वर्त्तमान वृक्षाचा स्तंभु ॥

मूलस्तंभापासाव मूलाधारें कर्त्ता करण कार्य वृत्ति ज्ञान योगाभ्यास होती त्या वृक्षशाखा ॥

अंतःकरण व्यानाधारें श्रोत्र मार्गें शद्धु जाणे वाचे द्वारें वक्तव्य करी योगा विरुद्ध ते प्रवाल ॥१॥

मन समानाधारें त्वगींद्रिय द्वारें स्पर्शु जाणे करयोगें त्यागु त्यागदान साधी स्पर्शु योगाविरुद्ध सेव्य स्पर्शु ते वृक्ष पल्लव ॥२॥

बुद्धि उदानाधारें चक्षुमार्गे रूप देखे पादे गंतव्य करी रूप पर्यंत वावरे योगाविरुद्ध साधन रूप रूपगुण प्रवाल तिसरा ॥३॥

चित्त प्राण वेगें चेष्टे रसनेमार्गे रसु जाणे शिश्न योगें आनंदैतव्य करी योगाविरुद्ध साधनानुकूल रस वृक्ष पल्लव चौथा ॥४॥

(उजवी डावीकडील तिसरी शाखा)

मुमुक्षु भक्तीयोगें वर्त्तितां देहाचा आधारु ते पूर्वसंस्कारू तें मूल ॥



देह अवस्था अभिमानी गुणचतुष्टय हा वृक्षस्तंभु ॥
ईश्वरोन्मुख गुणवृत्ति ऊर्ध्वशाखा ॥
अंत:करण व्यानु श्रोत्र वाचा शद्ध योगाविरुद्ध शद्ध प्रवाल ॥१॥
मन समानु त्वक् पाणि स्पर्शु योगाविरुद्ध स्पर्श वृक्ष प्रवाल ॥२॥
बुद्धि उदानु चक्षु पाद रूप योगाविरुद्ध दृश्य रूप प्रवाल ॥३॥
चित्त प्राणु रसना शिश्न रसु योगाविरुद्ध रस ते प्रवाल ॥४॥
अहंकारु अपानु घ्राणु पायु गंधु योगाविरुध्द सेव्य ते गंध वृक्ष प्रवाल ॥५॥

(उजवी व डावीकडील चौथी शाखा)

मुमुक्षु योगाभ्यासे वर्त्ते ते स्थूल देहाकारे देहकर्मांधारे तेंचि प्राचीन क्रियमाणासि आधारु ह्मणौन योगास पूर्व संस्कार मूल ॥



देहें अवस्था गुण अभिमानी हा समूहु वृक्षाचा स्तंभु ।।

बीजरूप कर्त्तयापासाव ब्रह्मजिज्ञासत्वें गुणवृत्ती होती त्या शाखा ।।

अंत:करण व्यानु श्रोत्र वाचा शद्धु योगाविरुध्द शद्ध प्रवाल ।।१।।

मन समानु त्वक् पाणि स्पर्श योगाविरुध्द सेव्य स्पर्श प्रवाल ।।२।।

बुद्धि उदानु चक्षु पाद रूप योगाविरुध्द दृश्य रूप प्रवाल ।।३।।

चित्त प्राणु रसना शिश्न रसु योगाविरुध्द रस पाद प्रवाल ।।४।।

अहंकारु अपानु घ्राणु पायु गंधु योगाविरुध्द सेव्य गंध प्रवाल ।।५।।

(उजवी व डावीकडील पांचवी शाखा)

मुमुक्षु कर्मयोगी कर्मसंगत्यागें फलत्यागा प्रवर्त्तला असता त्याचा आचरण मुख्यत्वें स्थूळ शरीर मूळ स्थूलेविण आचारू न घडे आणि संसारसंगु सूखदु:खभोग स्थूले तेणें या स्थूळाचें कारण प्रारब्ध तेणें अनुकूलें कर्म सांग ह्मणौन या वृक्षासि हेंचि मूल ।।



सकार्य गुण चतुष्टय वृक्ष स्तंभु ।।

ब्रह्मार्पणत्वें कारणोन्मुखा वृत्ती ऊर्ध्वशाखा ।।

अंत:करण व्यानु श्रोत्र वाचा शद्ध योगाविरुध्द शद्ध प्रवाल ।।१।।

मन समानु त्वक् पाणि स्पर्श योगाविरुध्द स्पर्श प्रवाल ।।२।।

बुध्दि उदानु चक्षु पाद रूप योगाविरुध्द रूप प्रवाल ।।३।।

चित्त प्राणु रसना शिश्न रसु योगाविरुध्द रसु प्रवाल ॥४॥
अहंकारू अपानु घ्राणु पायु गंध योगाविरुद्ध गंध प्रवाल ॥५॥

(खालीं फुटलेल्या सहा शाखा)

संसार भोग वासना बीज नाना वृत्तिमूळें ॥ १ ॥

महाकारण देह तुरीयावस्था उभयाभिमानी प्रत्यगात्मा हा अविद्यामयु शुध्द सत्वगुणु ॥ २ ॥

कारण देह सुषुप्ति अवस्था उभयाभिमानी आत्मा प्राज्ञु हा अविद्येचा तमोगुणु ॥ ३ ॥

लिंग देहू स्वप्नावस्छा उभयाभिमानी आत्मा तैजसु हा अविद्येचा तमपूर्वक सत्वगुणु ॥ ४ ॥

स्थूळ देह जागृति अवस्था उभयाभिमानी आत्मा विश्वु हा अविद्येचा रजोगुणु आतां बाह्य प्रपंचाचें अनुसंधान कर्त्तया करण संगे कार्यांचें स्फुरण ॥ ५ ॥

अंत:करण मन बुध्दि चित्त अहंकार हा कर्त्ता व्यान आदि प्राणु हे चेष्टाकरण श्रोत्रादि पंचक ज्ञानकरण कर्मेंद्रिय पंचक कर्मकरण शद्वादि विषय कार्यज्ञेय एवं कर्त्तर्त्ता करणुयोगें कार्यांचें ठांईं प्रवर्त्तता गुणी वृत्ति प्रसारली ते शाखा तिये शाखेचां ठांईं प्रवाळ ते शब्द स्पर्श स्पर्श रूप रस गंध हे पांचही विषय ऊर्ध्वमूळाचेनि आधारें संसारी जीउ प्रपंचोन्मुख प्रवर्त्ते ह्मणौनि अध:प्रवृत्ति प्रतिशाखा ते ॥ गंध रस रूप स्पर्श शद्व ॥ छ ॥ छ ॥



सर्प

(पृष्ठ १०२)

सर्ग

(शेपटीच्या टोकापासून)

सच्चिदानंद रूप ब्रह्म ब्रह्मीं चिन्मयत्व गुणसाम्य पुरुषें अधिष्ठितां तेचि मूलमाया तीचेनि योगें तो परमात्मा स्वरूपी अनवधान ते अव्यक्त माया अनवधान-पूर्वक उठी स्फुरण ते माया-प्रधान ज्ञान प्रपंचोन्मुख ज्ञान तें महतत्व ह्मणिजे तया महतत्वापासून त्रिगुणात्मक अहंकार स्फुरण उठी तें त्रिपुटी रूप कर्त्ता करण कार्य ज्ञाता ज्ञेय ज्ञान भोक्ता भोग्य भोगणें येणें आकारें तेथें प्रथम स्फुरण ज्ञानशक्तीसीं कर्त्ता याचेंही प्रथम स्फुरण तें अंतःकरण ॥ १ ॥

प्रथम कर्त्ता अंतःकरण ॥ सत्वात्मक त्याचें लक्षण ॥ निर्विकल्प विषय स्फुरण ॥ तेणेंचि कारणें ॥१३८॥ ॥२॥

तेंचि राजस अंतःकरण ॥ करितां स्वविषय साधन ॥ तयाचे वृत्ति चंचलते[1] पासून ॥ (व्यानु) जाला ॥३९॥ ॥३॥

(तेचि आवरण रा) जस ॥ जाणों प्र (वृत्ति शद्धास) ॥ तें त्याची ज्ञानवृत्ति साभास ॥ तेचि श्रोत्रेंद्रिय ॥१४०॥ ॥४॥

राजस तेंचि अंतःकरण ॥ शद्धाचे करी स्फुरण ॥ तें ते क्रियावृत्ति पासून ॥ वाचा जाली ॥४१॥ ॥५॥

राजस तेंचि अंतःकरण ॥ तमस प्रधान करून ॥ शद्धाकारें आपण ॥ आपणा आभासे ॥ ४२ ॥ ॥६॥

शद्धु विषयो अंत.करणा ॥ तें तो गुणु तया गगना ॥ ह्मणौनि गगनेंलीं सहीतु कल्पना ॥ शद्धाची जाली ॥४३॥ मग अंतःकरण व्यानाधारें ॥ श्रोत्रा वाचेचेनि साहाकारें ॥ शद्ध विषयार्थ संचरे ॥

---

१. चें बल ते

जाऊनि आकाशी ॥४४॥ आकाशी असतां अंत:करण ॥ सत्वात्मक तयाचें स्फुरण ॥ तेथेंचि तें सत्वप्रधान ॥ संचरे राजस ॥४५॥ ॥७॥

सत्वरजात्मक वृत्ती उठी ॥ संकल्पात्मक स्फूर्ती ॥ तेणें अंत:करणचि (तें शबल) स्थिती ॥ जालें मन ॥४६॥ ॥८॥

सात्विक मन राजस होतां ॥ स्वविषय सा(धु) प्रवर्त्ततां ॥ (निजांगाची) चंचलता ॥ समानु जाला ॥४७॥ ॥९॥

स्पर्शु विषयो मनाते ॥ तियेचि ज्ञानवृत्ती (ते)॥ (ह्मणिजे) त्वगींद्रिय ॥४८॥ ॥१०॥

तेचि राजसे गुणें मन ॥ करूं अपेक्षीं ग्रहणदान ॥ तेंचि क्रिया-वृत्तीपासून ॥ कर उपजले ॥४९॥ ॥११॥

तेंचि मन तामस जालें ॥ स्पर्शाकारें स्वयेंचि भासलें ॥ द्रष्टेंचि भानाकारें स्फुरलें ॥ स्वप्नी जेवीं ॥१५०॥ ॥१२॥

स्पर्शु विषयो मनातें ॥ तो गुणु तया पवनातें ॥ त्यालागि स्पर्शगुणें तेथें ॥ पवनूचि उपजला ॥५१॥ मन समानाधारें उठी ॥ (त्वचे) करा घेत पोटी ॥ जाये स्पर्शाचिये भेटीं ॥ तें मिळे पवनी ॥५२॥ पवनी असतां मन ॥ सत्वासत्व वृत्ती होये क्षीण ॥ केवळ रजचि प्रधान ॥ वृत्ती स्फुरे ॥५३॥ रजो प्रभावें करून ॥ कर्त्ता उठी निश्चयात्मक स्फुरणें ॥ तेचि बुद्धि ह्मणौन ॥ तेणें कारणें ॥५४॥ ॥१३॥

सात्विक बुद्धि कर्त्ता ॥ रजो गुणें विषयो साधितां ॥ तेथें आंगाची चपळता ॥ तोचि उदानु ॥५५॥ ॥१४॥

रूप विषयो बुद्धीतें ॥ जाणतांचि ते तयातें ॥ तियेचि ज्ञान-वृत्तीते ॥ चक्षु ह्मणिजे ॥५६॥ ॥१५॥

तेचि बुद्धि रजोप्रधान ॥ करूं अपेक्षी गमन ॥ तेचि क्रिया-वृत्ति चरण ॥ साभास होये ॥५७॥ ॥१६॥

कर्त्ता बुध्दि तमोप्रभावें ॥ रूपाकारें स्वयें संभवे ॥ त्रिपुटी-

चेनि अवयवें ।। येकीचि ते ।।५८।। ।।१७।।

विषयो रूप बुध्दिसी ।। तो गुणु तया तेजासि ।। ह्मणौनि रूप गुणें आपैसी ।। जाली तेज संभवना ।।५९।। ।।१८।।

बुध्दि उदानाचेनि वेगें ।। रूपार्थ तेजीं रिघे ।। चक्षु पाद ये तींचीं अंगें ।। तीं तीच सरिसीं ।।१६०।। बुध्दि तेजीं स्थान ।। तमोगुणु उपजे (ते) थून ।। मग रजसा तमसा मिळोन ।। वृत्तीतें करी ।।६१।। रजतम योगें करून ।। उठी अनुसंधानात्मक स्फुरण ।। तेणें वृत्ति विकारें करून ।। चित्त ह्मणिजे ।।६२।। ।।१९।।

सात्विक चित्त कर्त्ता ।। रजोगुणें अर्थ साधितां ।। आंगाचि चपलता ।। तेचि प्राणु होये ।।६३।। ।।२०।।

रसु विषयो चित्ता ।। तेणे तो आपुला जाणता ।। तद्विषयींची ज्ञानमयता ।। ते रसना जाणावी ।।६४।। ।।२१।।

राजसें सात्विकु चित्त कर्त्ता ।। तरि व्यापारीं प्रवर्त्तितां ।। तेचि त्रिधावृत्ति सर्वथा ।। शिश्नेंद्रिय होये ।।६५।। ।।२२।।

तमस प्रभावें चित्त ।। रसगुणें स्वयेंचि असत्त ।। स्वप्नीं त्रिपुटी व्यक्त ।। ते मनचि जयापरीं ।।६६।। ।।२३।।

रसु विषयो चित्तातें ।। तो गुणु तया उदकातें ।। ह्मणौनि रसगुणें तेथें ।। तेंचि आभासलें ।।६७।। ।।२४।।

चित्त प्राणाचेनि बडिवारें ।। रसने शिश्ना साहाकारें ।। रसू अपेक्षूनि संचरे ।। तये उदकीं ।।६८।। उदकीं वर्त्तितां चित्त ।। तेथें रजस आटे समस्त ।। तमसचि प्रधान होत ।। अनायासें ।।६९।। तमसें केवलें करून ।। उठी अहंतव्य वृत्ति स्फुरण ।। तोचि अहंकारू तेणें करून ।। तेथ ह्मणितला ।।१७०।। ।।२५।।

कर्त्ता अहंकारू सत्वगुणें ।। राजसु करी विषयसाधन ।। तयाचिये चपलते कारणें ।। अपानु ह्मणिजे ।।७१।। ।। २६।।

गंध विषयो अहंकारा ।। जाणतां तो ते मात्रा ।। तोचि ज्ञानांशु

खरा ॥ घ्राणु ह्मणिजे ॥७२॥ ॥२७॥

कर्त्ता (अहं) कारु तेथें ॥ करू अपेक्षी विसर्गातें ॥ तें तोचि त्या वृत्ति + + + क्तीतें ॥ पा + + + पायु ॥७३॥ ॥२८॥

तोचि तमोप्रभावें कर्त्ता ॥ गंधाकारें तत्वतां ॥ आकारला केवलु सांता ॥ आपणातें स्फुरे ॥७४॥ ॥२९॥

गंधु विषयो आहंतेतें ॥ तो गुणु तिये मेदिनीतें ॥ ह्मणौनि गंधगुणें व्यक्ते ॥ तेंचि व्यक्त जाली ॥ ७५॥ ।३०॥

अहंकारू अपानाधारें ॥ घ्रागा पायूसीं पृथ्वी संचरे ॥ तेथें स्थूलसूक्ष्म येकसरे ॥ सकलें येकवाटे ॥७६॥ ॥३१॥

शद्ध गुणें आकाश ॥ शद्धस्पर्श गुण पवनास ॥ रूप मिलोन तेजास ॥ तीनि जालें ॥७७॥ रसें चतुर्गुणा पाणी ॥ गंधें पंचगुणा धरणी ॥ एवं कार्यभूत कार्यस्थानी ॥ मिळित असतां ॥७८॥॥३२॥

भूत पंचकेंसीं येकि धरणी ॥ पांचही महाभूतें तीचा स्थानी ॥ आतां सूक्ष्म तत्वांची मिळणी ॥ ते तेणेंचि क्रमें ॥७९॥ ॥३३॥

व्योमी पंचकु अंतःकरणाचा ॥ पवनी योगु दों भूतांचा ॥ तरि स्वभावेंचि दोहांचा ॥ अनु-प्रवेशु तेथें ॥१८० ॥३४॥

तेजीं पंधरा मिनलीं ॥ उदकीं वीस संक्रमलीं ॥ पृथ्वीमाजि सामावलीं ॥ सूक्ष्में पंचवीस ॥८१॥ ॥३५॥

पंचवीस सूक्ष्में मिळितें ॥ आणि स्थूलें पांचहीं भूतें ॥ ऐसीं तीस तत्वें येथें ॥ मिनतीं जालीं ॥८२॥ ॥३६॥

सूक्ष्माचें सूक्ष्म शरीर ॥ स्थूळाचें स्थूळ साकार ॥ ऐसें देहद्वय हें येकत्र ॥ वर्त्तमान असतां ॥८३॥ ॥३७॥

(फणीमध्यें)

अहंकारू तो येकची ॥ सात्विकें गुणें कर्त्ता तोचि ॥ ज्ञानशक्ति

प्रकृति तयाची ।। ह्मणौनिया ।।८४।। तोचि क्रियेचा ठांइं मिनला[1]।। क्रियाशक्ति-युक्तु जाला ।। राजसाहंकारू ह्मणीतला ।। तेणें योगें ।।८५।। ज्ञानशक्ती सात्विकु ज्ञाता ।। गुणी तयाची पंचविधता ।। आतां तोचि क्रिये प्रवर्त्तितां ।। त्रिविध ते ।।८६।। येकि ते चेष्टा चंचलता ।। सहज स्वभावें चपलता ।। दुसरी ज्ञानरूपता ।। क्रिया-वृत्ती तीसरी ।।८७।। पंचधा भेदे करून ।। आश्रयिता येक येक करण ।। पंचदश भेद तेथून होते जाले ।।८८।। चेष्टा पंचविध ते प्राण ।। ज्ञान-करण पंचधा ज्ञान ।। कर्मेंद्रिये कर्मकरण ।। स्वभावेंचि ।।८९।। एवं कर्त्ताचि करणाकारें ।। स्फुरे कार्याचेनि आकारे ।। द्रव्यशक्ति निजा-कारें ।। जे तामसु होये ।।१९०।। एवं कर्त्ताचि तो करण ।। सकळ-कार्याचें भान ।। तत्व नाहीं आन ।। अहंकाराहूनि ।।९१।। आता देहद्वयाचा आकारू ।। (ये)णेंसीं येकु अहंकारू ।। देहद्वयेंसीं निरंतरू ।। आपणूचि स्फुरे ।।९२।। बहिरंग स्थूल साकार ।। अंतरीं सूक्ष्म निराकार ।। केवळ साभास सविकार ।। त्रिपुटी रूपें ।।९३।। तयाची बाह्य प्रवृत्ती ।। ज्ञान क्रिया द्विविध वृत्ती ।। तिसरी चंचलता तीचि स्थिती ।। ते ठेली सर्वांगीं ।।९४।। तया ज्ञाना द्विविधपण ।। व्यवहार परमार्थ भेदें करून ।। क्रिया तद्वतचि विभिन्न ।। परमार्थी परमार्थ भेदें ।।९५।।

ऐसा सर्पाकारें पुछ्यापासून फडे पर्यंत सांगीतला आतां ययास रसनाद्वय आणि नेत्र ।।

(द)क्षिण नेत्र प्रथम पारमार्थ्य ('ज्ञान')

वाम नेत्र द्वितीय व्यवहार परिज्ञान

क्रियाद्वय ते रसनाद्वय

देहद्वय संयोगापासाव पारमार्थिक क्रिया हे दक्षिणभाग रसना ।।

देहद्वय संयोगापासाव व्यवहार संपादन क्रिया हे वामभाग रसना द्वितीय ।।

---

१. निर्मिला.



भावचक्र (पृष्ठ १०२)

भावचक्र

(१ लें वर्तुळ)

निर्विकल्प निरंजन ।। (निरूपा) धीक निर्गुण ।। तेथिचें ज्ञप्ति-
मात्र स्फुरण ।। तदाकार जे तें ।।६२।। प्राकृत गुणसाम्य केवळ ।।
शुद्धे अधिष्ठित स्फुरे शबल ।। [1]माहामाया तत्व निर्मल ।। तेचि
बोलिजे ।।६३।। महामाया योगबलें ।। ब्रह्मींचि ईश्वरत्व आरोपलें ।।
रूपा अनुसंधान प्रवर्त्तलें ।। तें तयेचि ठांईं ।।६४।। तया स्वस्वानु-
संधानाचां पोटीं ।। वृत्ति लयो अनवधान उठी ।। केवल पाहातिये
आड दृष्टी ।। निमिष जैसें ।।६५।। तेचि तें अनवधान ।। लय रूप
तम प्रधान ।। अव्यक्त ऐसें अभिधान ।। तयाचेंचि ।।६६।।
तया अनवधाना पोटीं ।। विपरीत जाणणें उठी ।। जेवि सुषुप्तिचां
पोटी ।। स्वप्न प्रतिबिंबे ।। ६७।। असतां ईश्वरा स्वरूपज्ञान ।। उठी
तेथ प्रपंचानुसंधान ।। स्वरूपीं केवळ विस्मरण ।। ऐसें न होतां ।।६८।।
तथापि अनवधान मात्र खरें ।। तेचि अव्यक्त माया निर्द्धारें ।। ती
माजि महतत्व स्फुरे ।। स्फुरण प्रपंचाचें ।।६९।। निर्विकल्प प्रपंचानु-
संधान ।। तया माजि विश्वसृजन ।। ह्मणौनि तें आवरण ।। प्रथम
घडे ।।७० ।।

(२ रें वर्तुळ)

निर्विकल्प प्रपंच स्फुरण ।। तेंचि महतत्व मायप्रधान ज्ञान ।।
तया अंतर्भावीं तीनि गुण ।। प्रगुप्त होते ।।७१।। ते गुण स्फुरणाचि
सरिसे ।। प्रकाशले ईश्वर प्रकाशे ।। तेणें गुणत्रय योगें कैसें ।। जालें
तें स्फुरण ।।७२।। गुणत्रय करूनि प्रधान ।। अहमित्याकारें जालें
स्फुरण ।। तोचि त्रिगुणाहंकारू ह्मणौन ।। तत्वज्ञ बोलति ।।७३।।

---

१. माया.

त्रिगुणाहंकाराची स्पष्टता ।। तोचि ज्ञान तोचि ज्ञेय तोचि ज्ञाता ।। कार्य कारण कर्त्ता ।। तोचि स्वयें ।।७४।। चेष्टयकु चेष्टय चेष्टणें ।। भोगणें भोग्य भोक्तेपण ।। येकेंचि गुणभेदें करून ।। अहंकारी वर्त्तें ।।७५।। सात्विकु तोचि तैं कर्त्ता ।। चेष्टकु ज्ञाता भोक्ता ।। पांचा तत्वांची प्रकटता ।। होये तेथूनि ।।७६।। अंत:करण मनबुद्धि चित्त ।। अहंता पांचवी निश्चित ।। आता राजसें निपजत ।। तें कवण कार्य ।।७७।। पहिला पंचकु प्राणाचा ।। दुसरा ज्ञान करणाचा ।। तिसरा कर्म करणाचा ।। ऐसी पंधरा तत्वें ।।७८।। तोचि स्फुरे तामसु ।। तैं विषय पंचकाचा आभास ।। भूतपंचकाचा प्रकाशु ।। होये तेथूनि ।।७९।।

(३ रें वर्तुळ)

तामसाहंकारें करून ।। होतां शद्धाचें स्फुरण ।। पहिलेंचि तें गगन ।। उपजतें जालें ।।८०।। गगनी धर्म सछिद्रता ।। अवकाश प्रदानें कर्म तत्वता ।। वर्म शद्ध प्रथमता ।। जो तयाचा गुणु ।।८१।। अव्यक्तीं व्यक्त स्फुरण ।। तें येकांशें महतत्व सगुण ।। अव्यक्त दश-गुण तयाहुन ।। स्वभावेंचि ।।८२।। तया महतत्वा अंतरीं ।। अहं-कारू त्रिगुणात्मकु ही परि ।। दाहावेनि अंशें माझारीं ।। वर्त्ते येकदेशी ।।८३।। अहंकारू महतत्वीं एक गुणा ।। महतत्व अहंकारा दशगुण ।। आतां तया उदरीं संभावना ।। आकाशाची ।।८४।। आकाश एक गुण अहंकारी ।। अहंकारू दशगुणा तया बाहेरि ।। आवरण तें यया परी ।। सहज जालें ।।८५।। आकाशीं गुण शद्धु वर्त्ते ।। ह्मणौनि कर्त्ता करण तेथें ।। सूक्ष्म विषयो कार्य निरूतें ।। जाणावा शद्धु ।।८६।।

(४ थें वर्तुळ)

आकाशीं असतां अंत:करण ।। तेंचि रजमिश्रें गुणें करून ।। संकल्पात्मक मन ।। स्वयें जालें ।।८७।। मग तें मन करणसंगें ।। स्पर्श विषयातें स्मरों लागे ।। तैं तया स्पर्श गुणा आंगें ।। वायो जाला ।।८८।। उपजला वायो गगनी ।। ह्मणौनि एकदेशी दशांशें करूनि ।। गगन

दशगुणा पवनाहुनि ॥ असे आवरण रूपें ॥८९॥ पवनी शद्ब स्पर्श गुणें वर्म ॥ चंचळता पवनी धर्म ॥ असे (विहरणादिक) कर्म ॥ स्वभावेंचि ॥९०॥ शद्बयोगे अंतःकरण ॥ व्यानु श्रोत्र वाचा वचन ॥ सूक्ष्मा तत्वांचें संक्रमण ॥ असे ययां ॥९१॥ स्पर्शगुणें मन[1] वर्त्ते ॥ समानुकरत्व कुसंघातें ॥ सूक्ष्म स्पर्शुहि तेथें असे ॥ वासनामयु ॥९२॥ ऐसा पवनु उपजला ॥ तो दो गुणां आथिला ॥ ह्मणौनि समुदा ॐ मिनला ॥ दाहा सूंक्ष्माचा ॥९३॥

(५ वें वर्तुळ)

पवनी असतां मन ॥ रजचि उरे सत्व क्षीण ॥ निश्चयात्मक वृत्ति स्फुरण ॥ तेणें स्फुरे ॥९४॥ तितुलेनि ते बुद्धि ह्मणिजे ॥ बुद्धिरूप विषयो आठविजे ॥ रूप गुणें तेज उपजे ॥ ते पवनापोटीं ॥९५॥ पवनी दहन येक गुणा ॥ दहना पवनु दशगुणा ॥ ययापरी तें बाह्यावरणा ॥ सारिखें जालें ॥९६॥ शब्दु स्पर्शु रूप दहनी ॥ त्रिविध वर्म असे सहजगुणी ॥ उष्णता धर्म तेणें करूनि ॥ पचन हे क्रिया ॥९७॥ तेजीं शद्ब गुणें अंतःकरण ॥ व्यानु वाचा शद्बु श्रवण ॥ स्पर्शगुणे वर्त्तमान ॥ समानु तोही ॥९८॥ त्वक् पाणि स्पर्शु तिन्ही ॥ तेवींचि रूपगुणें करूनि ॥ बुद्धि उदानु चक्षु तीन्ही ॥ पाद आणि रूप ॥ ९९ ॥

(६ वें वर्तुळ)

बुद्धि तेजीं वर्त्तमान ॥ तीचें राजस केवळ स्फुरण ॥ तेथेंचि तम उपजोन ॥ पूर्व गुणी मिसले ॥१००॥ तेणें रज-तमो-योगें ॥ अनुसंधानात्मक वृत्ति उठी तदंगें ॥ चित्त हें ह्मण (णें) लागे ॥ योगें तेणे ॥१॥ चित्ता विषयो स्फुरे रसु ॥ तो उदकीं गुणु विशेषु ॥ मग उदकें सहितु आभासु ॥ तया उपजला ॥२॥ (उदक) तेजीं उ (पजलें) ॥ (तें याचांच पोटीं रा) हिलें ॥ येक गुणा सामावलें ॥

---

१ सम.

दहना पोटीं ।। ३ ।। दहनी उदक येक गुणा ।। दहनु उदका दशगुणा ।। एवं तेजाचिया (आवरणा) ।। साहिलें उदके ।।४।। उदकीं शद्धगुणें अंत:करण ।। व्यानु श्रोत्र वाचा स्फुरण ।। सूक्ष्म शब्दु तेणेंचि करून ।। तेथें वर्त्ते ।।५।। स्पर्श गुणें मन असेचि ।। समानुत्व कुस्वभावेंचि ।। पाणींद्रिय क्रमेंचि ।। वर्त्ते सूक्ष्म स्पर्शु ।।६।। रूपगुणें बुद्धिज्ञाता ।। उदानु चक्षु हे स्वभावता ।। पाद (रूप हें) तत्वता ।। हें सक (ळ) सूक्ष्म ।।७।। रसगुणें वर्त्ते चित्त ।। प्राणु रसना सहज तेथ ।। कर्त्ता तो करण विरहित ।। न करी प्रवेशु ।।८।। असतां आप चहुं गुणी ।। च्यारि कर्त्ते त्याच्या स्थानी ।। सहित चेष्टा ज्ञानकर्म करणी ।। वर्त्तत असतां ।।९।। स्थूलें मिनलीं भूतें च्यारि ।। सूक्ष्में वीस तया अंतरीं ।। तत्व समूह ययापरी ।। येक वाटोंचि लागला ।।११०।।

(७ वें वर्तुळ)

उदकीं असतां चित्त ।। रजो वृत्ति आटे तेथ ।। तमो-गुणेंचि अत्यंत ।। वृत्ति स्फुरे ।।१११।। अहंतव्यात्मक वृत्ति स्फुरण ।। उपजतें होये तेथून ।। तेणें योगे करून ।। तो अहंकारू ह्मणिजे ।।१२।। अहंकारा त्रिषयो गंधु ।। ह्मणौनि उठी याचा बोधु ।। तंव तो पृथ्वीचा प्रसिध्दु ।। गुण (विशेषा) कारें ।।१३।। गंध गुणे जाली धरणी ।। तीते दशगुणा बाहेरि पाणी ।। एक गुणा एके स्थानी ।। सलिली मही ।।१४।। उदकीं पृथ्वी उपजली ।। ते (कारणी बहु व्या) पिली ।। + + + + + आभासली ।। तेंचि वर्म ।।१५।। शब्दु स्पर्शु रूप रसु गंधु ।। विषय पंचकु अगाधु ।। गुण भेद प्रसिध्दु ।। वर्म पृथ्वीचें ।।१६।। कठिणता हे धर्म ।। धारणादिक पार्थिव कर्म ।। आतां ईचां ठांईं सूक्ष्म ।। अ (वघेंचि) मिनलें ।।१७।। शद्धगुणें अंत:करण ।। (व्यानु श्रो) त्र वाचा वचन ।। शद्ध वासना (निमग्न) ।। (तेथेंचि) असे ।।१८।। मन

स्पर्शगुणें जाणावे ।। समानु त्वक् हा स्वभावें ।। पाणींद्रिय आणि[1] सूक्ष्म भावें ।। वर्त्ते स्पर्शु ।।१९।। (रूप गुणें) वर्त्ते बुध्दि ।। उदानु तीचाचि संबंधी ।। चक्षु + + रूपें त्रिशुध्दि ।। वर्त्तती जाणावी ।।१२०।। रस गुणें ज्ञाता चित्त ।। प्राण चक्षु स्वभावेंचि तेथ ।। शिश्न रसु निश्चित ।। ही दोन्हीं असतां ।।२१।। गंध गुणें अहंकारू ।। (तदं-गत्वें अपानु) समीरू ।। घ्राणा पायु रहंकारू ।। सू (क्ष्म) गंधाचा ।।२२।। यापरी पृथ्वीचा स्थानी ।। (पांचा) स्थूलांची मिळणि ।। सूक्ष्में पंचवीस पांचा गुणी ।। सहजें एकवटलीं ।।२३।।

(८ वें वर्तुळ)

शरीर संबंधी भूमि (सां) गीतली ।। ती हूनि दश गुणा अपार वर्मधर्म कर्मे आगली ।। हे भूमि ।।२४।। ईचेनि आधारें मेरू ।। तोचि विराट पुरुषु ।। तिये पृथ्वीसि सहितु ।। उभा असे ।।२५।। इयें पृथ्वीचां ठांईं ।। सागरु ना (सरिता) भूतें (देव ना) अवतार केवळ धर्मकर्मवती मेदनीचि असे ।। इये पृथ्वीसि दशगुणा पृथ्वीचि आवरण असे ।।

(९ वें वर्तुळ)

हे शरीर संबंधी पृथ्वी ईश्वरा विराट पुरुष कटिस्थानी ईचेनि आधारे सप्त सागर सकळ भूत रचना चतुर्विधु भूतग्रामु देवावतार[2] तीर्थें देवता (हाचि) (नाभि) स्थानीं तया विराटातें मृत्युलोकु हेंचि कर्मभूमी मोक्षसाधन क्षेत्र संसारु पतन तें सकळ येथेंचि ।।

(१० वें वर्तुळ)

तीसां तत्वांचा योगु ।। पृथ्वीसि मिनला अंतरंगु ।। तयाचा आता विभागु ।। किजतु असे ।।२६।। स्थूलाचां ठांईं जडपण ।।

---

१. हा. २. देशवतार

सूक्ष्म तें ज्ञाता ज्ञान ॥ तें येणेंसीं विलक्षण ॥ स्वभावेंचि ॥ २७॥ ह्मणौनि स्थूळ भागाचें ॥ विराट देह पांचा भूतांचें ॥ निवास स्छान सूक्ष्मांचें ॥ चतुर्द्दश भुवनात्मक ॥२८॥ सहस्त्र शिरें नेत्र पाद ॥ साकार देह प्रसिध्द ॥ चौदा भुवनाचे भेद ॥ जयाचां ठांई ॥२९॥ आतां सूक्ष्म भूत दलवाडें ॥ देवता-मय तें फुडे ॥ कव (ण) कैसें निवाडे ॥ सांगिजैल ॥१३०॥ अंतःकरण ह्मणिजे तो विष्णु ॥ मन चंद्र (मा बुध्दि) कमलासनु ॥ चित्त देऊ नारा-यणु रुद्र अ (हंता) ॥३१॥ हा (पंचविध) सांगीतला कर्त्ता ॥ आतां करणाची प्रकटता ॥' तरि वायो (ब्रह्मांडी) विचरतां ॥ हा पंचविधु प्राणु ॥३२॥ आतां दिशा श्रोत्रांचा आकारू ॥ (त्वगीं-द्रिय) वायु देव हा निर्धारू ॥ चक्षु ह्मणिजे दिवाकरू ॥ (वरुण रसना) ॥३३॥ अश्विनौदेव[1] तें घ्राण ॥ वाचा अग्निरूप सगुण ॥ + + + + प्रजापति शिश्न ॥ वामनु (ते पादु) ॥३४॥ पायु नैर्ऋति + + + + + ॥ + + + + + रणाचें रूप खरें ॥ + + + अता सूक्ष्म का + + + ॥ + + + + + ॥ ३५ ॥ (स्थूळ विषय) स्थूळ ॥ + + + + + + + + ॥ (भूत-पंचकाकारें ज्ञेय) ॥ ऐसें + + + + ॥३६॥ + + + + + +(स्थूळ) सूक्ष्म देह द्वय ॥३७॥

१. अविनौदेव.



पंचकोशचक्र (पृष्ठ १०२)



स्थूलादिदेहचक्र (पृष्ठ १०२)

(यांत, तांबडा, निळा इत्यादि रंग उपयोगांत आणलेले आहेत)


ब्रह्म सन्मात्र शिरता
गुण साम्य अलंकरण
आनंदु कला किरीटु
चैतन्य दृष्टि
स्वगता ध्यासु श्रवण
स्वरूपाध्यासु घ्राण
आनंद मयु श्रीमुख
आनंद भोकृत्व वदन
ऐसा स-
चिदानंद
मयु पुरुष
तो नित्य
निर्गुणु पर
मात्मा पुरुषु
वर्म संस्थान कंठु
सच्चिदानंदमया पु
रुषाचा अंशु आत्मा
त्याचा प्राकृत गुण
स्कंध स्थान
महा कारण तुरीयान
स्था प्रत्यगात्माहा
शुद्ध सत्वगुणु
कारण सुषुप्ति प्रा
ज्ञु हा तमोगुणु हृदय
बाहु स्थान . लिंग
स्वप्न तैजसु हा
सत्वगुण अविद्ये
चा स्थूळ देह
जागृति अव
स्था विश्वु अ-
भिमानि हा
अविद्येचा रजो
गुणु देहद्वय
संयोगें त्रि
पुटीचे
व्यापार दे
हतें स्थान
निर्गुण परमात्मा अज अव्ययो आपुली निजानंदमयता
उन्मनी अवस्थासांडून ज्ञप्तिमात्र प्राकृत गुण साम्यअधि
ष्ठीतें ते विज्ञानमयता महामाया शरीरी साक्षित्वावस्था
महामाया साक्षित्व उभयाभिमानत्वें तो परमात्माचि
सर्वेश्वरू महामाया साक्षित्व सर्वेश्वरू हा महामाये
चा शुद्ध सत्वगुण महामायेचा शुद्ध सत्वगुण तें
पुरुषाचें हृदयस्थान
माया शरीर प्रळयावस्थारूढ अभिमानी
हें प्राकृतम पुरुषाचें उदर
या पासाव स्थूळ सूक्ष्म कार्याकारें
बीजरूप महतत्व स्फुरणते नाभि
स्थान
महतत्वा पासाव त्रिगुणाहंकारें जालीं तत्वें
त्रिपुटी रूपें तेंचि देवतामय हिरण्यगर्भ शरीर
हिरण्यगर्भी स्थिति अवस्था हिरण्यगर्भ स्थिति
उभयाभिमानी विष्णु हिरण्यगर्भ स्थिति विष्णु
हा त्रिविधु सत्व गुणु कर्तृत्व करण रूपत्वें कार्य
निष्टत्वें चेष्टामयत्वें चरण रूपत्वें सूक्ष्म पादु
कार्य रूपा विषया पासाव जालीं व्योमादि पंच
भूतें तत्कार्य विराट विराटी अवस्था उत्पत्ति
विराट उत्पत्ति उभयाभिमानी ब्रह्मा विराट
उत्पत्ति ब्रह्मा हा त्रिविधु मायेचा रजोगुणु
सृष्टयादि व्यापारमयु चरण रूपत्वें
द्वितीय पादु॥
स्थूलेंसीं युक्त सूक्ष्मगुण व्या-
पारीं वर्तनांतें थें अंतःक-
रणादिकें कर्त्ती ५
चेष्टा करणें ५
ज्ञान करणें ५
कर्म करणें ५
शब्द
स्पर्श
रूप
रस
गंध
चरण अंगुली
का स्थानी
शब्द
स्पर्श
रूप
रस
गंध
कारणोप कार्य रूपज्ञेय
विषय स्थूळें ५ चरण
अंगुलिका स्थानी शब्दादि-


अं
अं
आं
इं
ईं
उं
ऊं
ऋं
ॠं
ऌं
ॡं
एं
ऐं
ओं
औं
अं
अः
कं
खं
गं
घं
ङं
चं
छं
जं
झं
ञं
टं
ठं
डं
ढं
णं
तं
थं
दं
धं
नं
पं
फं
बं
भं
मं
यं
रं
लं
वं
शं
षं
सं
हं
ळं
क्षं

माला (पृष्ठ १२७)


महामा
याशरीर
साक्षी
व्यवस्था
उभयाभि
मानी पर
मात्मास
वेंश्वरूहा
त्रिविधु
मायेचा
शुध्दस
त्वगुणु
येथेंवा
चकमा
तृकाबी
जप्रणवा
चेंअर्ध्द
मातृका
हें त्रिशु
ळचादं
डु
हिरण्यगर्भु
स्थिति अवस्था
भयाभिमानी वि
हा त्रिविधु माये
चासत्वगुणु प्र
णवातें द्विती
पादुका
रूमा
त्रा
प्रळयो
त्रिनयनु
हा मायेचा
केवळ तमोगु
णुप्रणवातें तृ
तीय पादुयेथें
मात्रा मकारू
हा त्रिशुळा
चा तृतीय
भागु॥
त्रिशूल (पृष्ठ १२८)

शुद्ध तेमाया
योगें केवल ब्रह्म
अव्यक्त
महतत्व स्फुरण
त्रिगुणाहंकार
ऐसा उपसंहारक्रमु ऊसतां उत्पत्ति कालीं सकळा तत्वांतें पृथ्वीपासोनि
अव्यक्ती अव्यक्त शब्दलीं शब्दलीं बळ शुद्धी
पवनी पवनु स्पर्शी करूनि स्पर्शु
मनेसी गगनी गगनु शब्द वाचा श्रोत्रु श्रोत्रु
अंतःकरणें चित्तें बुद्धि अहंकारें सीं जीवनी जीवनु
तैसाचि संहारु पृथ्वी गंधु पायु घ्राण समानु अहंकारें सीं जीवनी जीवनु
अपानु घ्राण पायु गंध पृथ्वी येणें प्रकारें भूतां
उदानु चक्षु पादु रूप तेजु
अंतः करण
चित्त बुद्धि अहंकार
वाचा शब्द आकाश
श्रोत्र वाचा शब्द

शंख (पृष्ठ १२८)


ऐसे समतत्व
वाद विषमतत्व
वाद दोन्ही अस
ताजे पक्षीं पर
म तत्वा मिळेतो
विषम तत्व वादु
परमतत्वें सत्ता
चैतन्य रूप
शब्दु हो
ये

डमरू (पृष्ठ १२७)

अव्यक्त माया यास्सि आ
स्वरूपा ज्ञान हेतुक हे ज्ञान मि
द्वितीयावरण अहंकार २
तृतीयावरण आकाश ३.
चतुर्थवायो ४.
पंचम तेज ५.
षष्ठम आप ६
प्रथमावरण मंडलाचें निवरण
ग्रास अंतरी अधिष्ठान
आठवें कार्य कारणोपाधिजनित
प्रपंच जीव स्वरोपाधि यासचि स'आ
वरण ब्रह्मांडाकारें कमंडलु जाणिजे क
शब्दें त्याला त्याचें मंडल बोलिजे ती कार्य
कारणापाधकें सियुक्त जीवेश्वर भावें
ब्रह्म ऐसा शब्दु तु भात्मा परमात्मा प्रपंव
चा कारें भाकारला याची जे स्थि
ति बोलिली तीचे स्थान
हे समावरण ब्रह्मांड
माया

कमंडलू (पृष्ठ १२८)


स्पर्श ज्ञान त्वक
श्रवण ज्ञान श्रोत्र
अंतरीं प्रज्ञान मात्र
तेचि मन स्वरूपा ज्ञान प्रधान
त्वं स्वरूपा विश्व रूप विवेकें
चि आत्म चैतन्य बहिर्मुख स्फु
रे तैं तेचि ज्ञान करण पंचक

चक्र (पृष्ठ १२८)


ॐ
ॐ
ॐ
नादब्रह्म नाना पत्र
ॐ
व्यतिरेकज्ञान
पक्षु प्रथम एकु
ॐ
ॐ
ॐ
अव्यक्तज्ञान
पक्षु द्वितीय ॐ
नादब्रह्म

हंस (पृष्ठ १२९)


सन्मात्र शिरवा
स्वगताध्यासु घ्राण
चैतन्य दृष्टि
आनंद मयु पुरुषु शिरवा
सुप्तनानंद भोक्तृत्य
चाचुपुट
स्वरूपाध्यासु
कैंठु
स्वस्वरूपज्ञान
महामायातेथसा
क्षित्वावस्थासर्वे
श्वर अभिमानी हा
त्रिविधु शुध्द सत्व
गुण ग्रिवा..
स्वस्वरूपाचा अनुसंधानी
अनय धान वृत्ति सर्वेश्वरातें ते
माया आवरण रूप शरीराकारें
तेंचि माया शरीर.
माया शरीरीं प्रळयो अवस्था माया
शरीर प्रळयावस्था उभयाभिमानी
परमात्मा रुद्र माया प्रळयो रुद्र हा
त्रिविधु मायेचा तमोगुणु येथेंचि
सकळां भूतांचीं लयो येथूनि चि
सकळां भूतांची उत्पत्ति हेंचि माया
प्रधाना सत्वगुणाचें कारण आधार
स्वरूपस्थान ह्मणोन पक्षीस्वरूपातें
उदर स्थानीं....
येथून स्फुरणें गुणद्वय अंकु
रलें रजसत्वें तेंचि व्यापाररूप
तें त्रिपुटी रूपलें विरोधें चरण
रूपलें पादद्वय बालिलें तेंच
प्रथम पादु दृश्यलें रजोगुणु
अदृश्यलें चालकलें दुसरा
सत्वगुणु हिरण्यगर्भु स्थिति
विष्णु हा त्रिविधु सत्वगुणु
विराट उत्पत्ति ब्रह्मा
हा गायत्री रजोगुण
पादु प्रथमु
त्रिपुटी व्यापारे
रूपलें वि-
रणतें
द्वितीय
पादु
ॐ
व्यतिरिक्त ज्ञान
पक्षु प्रथम एकु
ॐ
सदभ्रह्म नानापक्ष
ॐ
अव्यक्तज्ञान
पक्षु द्वितीय
नादब्रह्म

हंस (पृष्ठ १२९)

REFBK-0012704